# पहाटतारे

दादा धर्माधिकारी



७५

अमृतमहोत्सवी
प्र का श न

चेतश्री
प्रकाशन

पहाटतारे / आ० दादा धर्माधिकारी

चेतश्री
प्रकाशन

# पहाटतारे

— लेखक —

आचार्य दादा धर्माधिकारी

— संपादक —

तारा धर्माधिकारी

राजा मंगळवेढेकर

या प्रयास महा. राज्य सा. संस्कृती मंडळाचे अनुदान
प्राप्त झाले आहे. आभार.

चेतश्री प्रकाशन, अमळनेर

प्रकाशिका :
सौ. यशोदा सोनार
चेतश्री प्रकाशन,
'मुक्ताई', अमळनेर

मुद्रक :
सौ. मंजुळा अंबिके
अंबा मुद्रण
८९८ मंगळवार पेठ, पुणे ११.

© तारा धर्माधिकारी
११, सारंग, मुंबई २०

प्रथमावृत्ती :
१८ जून १९८८

मुखपृष्ठ :
अरुण कालवणकर

मूल्य :
पन्नास रुपये

– संपादन सहाय्य –
डॉ. मु. ब. शहा
प्रा. कृष्णा पोतदार

# संपादकीय

कै. दादा धर्माधिकारी यांच्या लेखणीतून प्रसंगोपात उतरलेली भारतीय ख्यातनाम पुरुषांची व्यक्तिचित्रे पुस्तकरूपाने एकत्रित करून वाचकांना सादर करताना आम्हाला अत्यंत आनंद वाटत आहे. या लेखनात दादांची भूमिका समीक्षकाची नाही किंवा टीकाकाराचीही नाही, तर ती सामान्य माणसाची गुणग्राही भूमिका आहे. या पुस्तकात स्वातंत्र्यपूर्व काळात, देशस्वातंत्र्यासाठी निस्सीम त्याग आणि मार्गदर्शक नेतृत्व करणारे म. गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल व रवींद्रनाथ ठाकूर आदि महापुरुषांची व्यक्तिचित्रे आहेत. देशाल ललामभूत ठरणारे महाराष्ट्रातील म. फुले, डॉ. आंबेडकर सेनापती बापट, सानेगुरुजी आदींच्या चरित्रातील वैशिष्टचे टिपणारे लेखही आहेत. यातील सर्व व्यक्ती काळाच्या पडद्याआड झाल्या आहेत. परंतु त्यांच्या विचारांचे धन आजही मोलाचे आहे.

या पुस्तकात समाविष्ट झालेल्या व्यक्तींबद्दल स्वतंत्र चरित्रे, ग्रंथ व अनेक लेखही लिहिले गेले आहेत. परंतु परस्पर तुलना अगर समीक्षा न करता दादांनी जे गुण टिपले आहेत, ते आमच्यामते आगळेवेगळे वाटतात. महापुरुषांचे जीवनच त्याचे व चरित्र चारित्र्य असते. म. गांधी म्हणत त्याप्रमाणे तोच त्यांचा जीवन–संदेशही असतो. कारण जे इतिहास घडवीत असतात त्यांना चरित्र अगर इतिहास लिहायला वेळच नसतो. त्या फक्त ऐतिहासिक व्यक्ती असतात म्हणून देशाचा इतिहास जाणून घेण्यासाठी त्यांची चरित्रे जाणून घेणे आवश्यक ठरते. त्याशिवाय इतिहासाचे अध्ययन अपूर्ण राहते. अशा व्यक्तींच्या जीवनातून आमच्या पिढीला बरेचसे शिकायला मिळते. शेवटी इतिहासाचा अभ्यास वर्तमानात जगण्यासाठीच करावयाचा असतो. आपल्या देशात या व अशा अनेक व्यक्ती होऊन गेल्या की ज्यांची जीवने 'पहाटताऱ्यां'प्रमाणे पथप्रदर्शक–मार्गदर्शक ठरू शकतात. अशाच काही व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन दादांसारख्या सिद्धहस्त लेखकाने या लेखांमधून घडविले आहे. थोर पुरुषांविषयी लिहिताना ते म्हणतात, 'माझे सौभाग्य म्हणा वा दुर्भाग्य, पण कुणाही महापुरुषाच्या अधिक निकट राहण्याची संधी मला आयुष्यात मिळाली नाही. त्यामुळे त्यांच्या व्यक्तीगत जीवनाची मला फारशी माहिती नसते. फक्त त्यांच्या विभूतीमत्त्वाचा सामाजिक जीवनात जो आविष्कार असतो, त्याच्याशी माझा परिचय असतो आणि त्यासाठीच मी त्यांना विनम्रपूर्वक अभिवादन करीत असतो'–आणि याचा प्रत्यय या लेखांमधून वाचकाला येईलच.

आचार्य भागवतांनी १९५३ साली दादांच्या एका पुस्तकाला प्रस्तावना लिहिताना म्हटले होते की, 'दादांनी एक स्वत:चे अध्यात्मदर्शनच बनविले आहे.' त्यांच्या जीवनात निष्ठा व परिपक्वता होती. जीवनविषयक सर्वांगीण विचार व निरपेक्ष स्नेह या दोन घटकांनी दादांचे व्यक्तिमत्त्व घडविले होते. ते आपल्याला नवविचारांचे निर्माते मानीत नसत, पण ते

नवविचारांचे वाहक होते. समाजजीवनात सामाजिक समस्या सोडविण्याचे चिंतन करणाऱ्या प्रतिभाशाली विचारकांची व समाजजीवनाशी उत्कटतेने समरस होण्याची शक्ती असलेल्या व्यक्तींची समाजास नेहमीच गरज असते. दादांच्या जीवनात हे गुण प्रकर्षाने जाणवत असल्यामुळे त्यांनी टिपलेली व्यक्तिचित्रे वाचकांपुढे एकत्रित ठेवणे अगत्याचे वाटते.

दादांची चिंतनप्रक्रियेतील स्पष्टता, मांडणीतील तर्कशुद्धता, समर्पक दृष्टान्त देण्याचे सामर्थ्य, ओघवती व लयबद्ध भाषाशैली व परिचित शब्दातही नवीन आशय ओतून त्याचे चैतन्य वाढविणारी प्रतिभा यामुळे दादांचे लेखन व वक्तृत्व तरुणपिढीला व अभ्यासू वाचकाला नेहमीच आकर्षित करीत असे, असे अनुभवास येई. मात्र ते स्वतःला कुणाचाही मार्गदर्शक वा उद्धारकर्ता मानीत नसत. तसेच केव्हाही ग्रंथप्रामाण्य मानू नये अशी त्यांची धारणा होती, मग ते वेद असोत, बायबल असो वा कुराण असो. विभूतीप्रामाण्यही त्यांना मान्य नव्हतेच, मग तो मार्क्स असो, कृष्ण असो, बुद्ध असो वा गांधी असो. कारण त्यांचे असे प्रामाणिक मत होते की, विचार उधार घेऊ नये. माणसाचा विचार कोणत्याही ग्रंथाने, विभूतीने अथवा वादाने मर्यादित झाला म्हणजे त्याच्या विचारशक्तीचा विकास कुंठित होतो. म्हणून त्यांनी स्पष्टपणे सांगितले की 'सर्वोदयाच्या तत्त्वज्ञानाला अनुसरून जे कार्य चालू असते त्यात मी एक नागरिक म्हणून मनःपूर्वक भाग घेतो, पण मी कोणत्याही संस्थेचा अगर संघटनेचा सभासद नाही. लोकांचे प्रेम मला अमाप मिळाले आणि हाच माझा मी मोठा गौरव मानतो. निरपेक्ष स्नेह हीच माझी जीवनसाधना आहे !'

दादांचे धोरण पुष्कळसे व्यक्तिनिष्ठच होते. कुठल्याही राजकारणाच्या दृष्टीने किंवा इतर कार्यासाठी माणसे गोळा करण्याचा उद्योग त्यांनी केला नाही. कारण राजकारणात माणसाचे लक्ष तात्पुरत्या कार्यसिद्धीकडे अधिक असते व जीवनाच्या शाश्वत मूल्यांपेक्षाही तात्पुरत्या कार्यसाधक युक्तीचे

महत्त्व वाटते. म्हणून दादांना राजकारणात रस वाटला नाही. परंतु भारतीय लोकशाहीच्या भविष्याची चिंता वाहात असताना राजकीय परिस्थितीचे अवलोकन, चिंतन, मार्गदर्शन थांबले, असे मात्र नव्हे !

विविध व्यक्तींच्या जीवनाची वैशिष्टये टिपताना दादांनी आपले विचार अत्यंत परखडपणे मांडलेले आहेत. म. फुले यांच्याविषयी ते लिहितात की, 'गांधींचे क्रांतिदर्शन, म. फुल्यांनी आपल्या क्षेत्रात म. गांधींच्या जन्माआधीच साकार केले, म्हणून म. फुले हे आद्य महात्मा होत. बुद्ध, महावीर, नानक, मार्टिन ल्युथर किंग यांचे ते उत्तराधिकारी होते. कार्ल मार्क्सने जगातील मजुरांच्या उद्धाराचा उद्घोष केला, तर ज्योतिबांनी त्यात खेतकऱ्यांच्या उद्धाराची भर टाकली.'

परिस्थितीचे विश्लेषण करताना दादा स्पष्टपणे लिहितात— 'महाराष्ट्रात आज ब्राह्मण सत्तेवर नाहीत. खेड्यात, शहरात त्यांची प्रतिष्ठा क्षीण झाली आहे. त्यांनी परंपरेचा कितीही अभिमान धरला, तरी समाज परिवर्तनाच्या लाटेत त्यांचा टिकाव लागणार नाही. हे समाज-परिवर्तन करण्याची आकांक्षा व उत्कंठा जर हिंदू समाजातील धुरिणांना असेल तर त्यांनी जातीसंस्थेला संकल्पपूर्वक, व्यवस्थितरीतीने मूठमाती दिली पाहिजे. जोपर्यंत हिंदूसमाजात जातपात व अस्पृश्यता आहे, तोपर्यंत आमची राष्ट्रीयत्वाची कल्पना फोल आहे व आमची एकतेची घोषणा पोकळ आहे.'

म. गांधींच्या अभूतपूर्व जीवनाचे सार अत्यंत मार्मिक भाषेत सांगताना ते म्हणतात, 'गांधींनी कुठलेही आयते तत्त्वज्ञान आणून जीवन घडविण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांच्यासाठी जीवन हेच परमसत्य होते. त्याची सगळी अंगें-उपांगे मिळून एक अखंड पूर्णांक बनलेला आहे. हे सत्य माणसाच्या रोजच्या व्यवहारात साकार करण्याचा प्रयत्न गांधींनी केला, हीच त्यांची जीवनसाधना होती !'

पंडित जवाहरलाल नेहरू म. गांधींचे उत्तराधिकारी का? याचे सुस्पष्ट व वैचारिक विवेचन करताना ते लिहितात, 'पं. जवाहरलाल बुद्धिनिष्ठ होते व सत्यनिष्ठ होते. त्यांच्या भाषणांमधून, लेखांमधून, विचारांमधून आणि मनोवृत्तीवरून हे स्पष्ट दिसून येत असे. गांधींची सत्यनिष्ठा व अहिंसा या दोन्हीचा प्रयोग एक राज्यनेता म्हणून राष्ट्रात व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात जितका करता येईल तितका त्यांनी केला. त्यांच्यामध्ये एका विशिष्ट पद्धतीचे 'खरेपण', 'इमानदारी', 'इंटिग्रिटी, होती हा माणूस आंतरराष्ट्रीय जगताच्या चेतनेचा–मानवीय चेतनेचा प्रतीक होता, म्हणूनच गांधीजींचा उत्तराधिकारी होता.'

विनोबा, जे. पी., लोहिया यांची व्यक्तीचित्रेही फारच सरस वाटतात. जे. पीं च्या विचारयात्रेचे उदात्त व उद्‌बोधक दर्शन घडविण्यातही दादांची लेखणी अत्यंत यशस्वी ठरली आहे. तसेच 'रवींद्रदर्शनाचे' भारदस्तपणही उठून दिसते.

आज मानवाला सुखी करण्याच्या कामी धर्म, यंत्र आणि विज्ञान असफल ठरले आहेत. राज्यसत्ता, शस्त्रसत्ता, धनसत्ता अयशस्वी होऊ पहात आहेत. भारतीय लोकशाहीत अधिकाराचा दुरुपयोग, गुंडगिरी व भ्रष्टाचार या दोषांव्यतिरिक्त संप्रदायवाद व जातीयवाद सतत डोके वर काढू पहात आहे, अशाप्रसंगी विचारप्रवण नागरिक व विधायक प्रवृत्तीची तरुणपिढी ही काळाची गरज आहे, आणि हेच आमचे आशास्थान आहे. थोर पुरुषांच्या चरित्रांचा परिमल वातावरणात दरवळत असतो, त्यांचे जीवन प्रकाश, स्फूर्ती व संजीवन देणारे असते. दादांच्या व्यक्तिमत्त्वाला व्यापक पितृत्वाचे देणे लाभले होते. म्हणून त्यांच्या लेखांनी असंख्य तरुण-तरुणींना विचार करण्याची प्रेरणा लाभो, हीच अपेक्षा.

या संग्रहाच्याकामी दादांच्या ज्या सुहृदांचे साहाय्य झाले आहेत ,या सर्वांचे आभार !

— संपादक

# अनुक्रमणिका

१. सत्यनिष्ठ 'प्रयोगी' गांधीजी / १
२. गांधींचे उत्तराधिकारी जवाहरलाल / ३२
३. विनोबांचे अद्वितीय विभूतिमत्त्व / ५२
४. मी पाहिलेले जयप्रकाश...! / ६५
५. महात्मा ज्योतीराव फुले / ७९
६. भारतीय अस्मितेचे प्रतीक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर / ८६
७. एक अद्‌भुत सेनापती / ९२
८. साने गुरुजी नावाचे सत्त्व / १०१
९. अखिल भारतीय व्यक्तिमत्त्वाचे लोकनायक अणे / १०६
१०. बॅ. अभ्यंकरांची तात्त्विक भूमिका / ११२
११. समन्वयाचे उद्‌गाते : काका कालेलकर / ११९
१२. अद्वितीय व्यक्तिमत्त्वाचे मनोहर दिवाण / १२८
१३. लोकसत्तेचा नित्य जागरुक लोकपाल :
कै. किशोरीलालभाई मशरूवाला / १३३
१४. तत्त्वनिष्ठ, व्यवहारकुशलतेची मूर्ती :
कै. जमनालालजी बजाज / १४०
१५. भारताचा सहृदय लोहपुरुष : सरदार वल्लभभाई पटेल / १४८
१६. अध्यात्मवीर कै. रविशंकर महाराज / १५५
१७. सप्तधातूंची मूर्ती : डॉ. राममनोहर लोहिया / १५८
१८. रवींद्रदर्शन / १७०

# शुद्धिपत्र

| | पृष्ठ क्रमांक | ओळ क्रमांक | चुकीचा शब्द | सुधारित शब्द |
|---|---|---|---|---|
| १. | ७७ | १६ | ३१ मे १९८२ | ३१ मे १९७२ |
| २. | १०१ | ५ | ‘ प्रेमाबाई ’ | ‘ प्रेमापायी ’ |
| ३. | ११२ | ३ | A. G. Gardmer | A. G. Gardiner |
| ४. | १५५ | मथळा | अध्यात्मवीर | अध्यात्मवीर |
| ५. | १५७ | २३ | ‘ अन्कल्टिव्हेटेड सुमिलेटी ’ | ‘ अन्कल्टिव्हेटेड ह्युमिलिटी ’ |
| ६. | १७६ | २० | Let whose wil | Let whose will |

# सत्यनिष्ठ ' प्रयोगी ' गांधीजी

गांधींचे विभूतिमत्त्व सर्वदा अनाकलनीय असेच वाटते. ते एकविध किंवा स्थिर कधीच नव्हते. सतत प्रगतिपरायण व विकासोन्मुख होते. त्यात जडतेचे स्थैर्य किंवा पूर्णतेची परिणती कधीच आली नाही. पुण्यसलिला गंगामाईच्या पवित्र प्रवाहाप्रमाणे त्यात अखंड जिवंतपणा व नित्यनूतनता होती. गंगेच्या प्रवाहात जे सातत्य आहे, ते अखंड जिवंतपणाचे सातत्य त्यात आहे. प्रतिक्षणी तो प्रवाह नूतन होत असतो. जीवनाच्या या निरंतर गतिशीलतेतच त्याची निर्मलता आहे. गांधींचे विभूतिमत्त्व या निर्मलतेने ओथंबलेले आहे. या निर्मलतेचेच दुसरे नाव तटस्थता किंवा विनय आहे. जो तटस्थ वा विनयशील नसेल तो जिज्ञासू होऊच शकत नाही. अखंड जिज्ञासा हेच धार्मिक व्यक्तीचे शील आहे, जेथे जिज्ञासा नसेल तेथे अभिनिवेश आणि आग्रह यांचा अंमल असतो. अभिनिवेश आपल्या अनुभवाचा, आग्रह आपल्या तत्त्वांचा ! अशा प्रकारच्या आग्रहाची बाधा गांधींच्या मनाला अजिबात झालेली

नव्हती. म्हणूनच त्यांना सत्याच्या आग्रहाचा अंगीकार करता आला. जेथे इतर कुठल्याही आग्रहाला वाव असेल, तेथे सत्याच्या आग्रहाला अवकाशच राहू शकत नाही. म्हणूनच गांधींच्या जीवनात कुठल्याही सिद्धांताच्या, विचारसरणीच्या किंवा धर्म-पंथाच्या आग्रहाला थारा नव्हता. त्यांच्या सत्यनिष्ठेपुढे ग्रंथनिष्ठा, विभूतिनिष्ठा व संप्रदायनिष्ठा टिकत नाही. त्यांच्या जीवनात गतिशीलता आहे, अखंड व अकुंठित प्रयोगशीलता आहे आणि गंगेच्या प्रवाहाप्रमाणे एक निश्चित दिशाही आहे. अतिनिश्चित दिशा आहे, सत्याच्या शोधाची. गंगा सागरोन्मुख आहे, गांधी सत्याभिमुख आहेत.

अनेक विचारवंत टीकाकारांनी गांधींवर विसंगतीचा आरोप केला आहे. वस्तुतः हा आरोप हे त्यांचे भूषण आहे. सत्यनिष्ठेचे स्वरूप असेच असते. सत्यनिष्ठ व्यक्तीला सुसंगतपणाचा बाऊ वाटत नाही. किंवा सुसंगतता अनेक प्रसंगी सत्यनिष्ठेत प्रत्यवाय-भूत ठरते. जे सत्य असेल ते सुसंगत असलेच पाहिजे, असे म्हणता येणार नाही. म्हणूनच गांधींच्या जीवनात, त्यांच्या लेखांत किंवा भाषणात सुसंगतपणाचा आग्रह दिसून येत नाही. सत्यपरायण व्यक्तीच्या जीवनात सुसंगतपणा हे एक मिथ्या दैवत आहे. पुष्कळदा ते सत्याच्या शोधात अंतराय निर्माण करते. म्हणून गांधींनी सांगून टाकले की, 'कुठल्याही विषयाच्या बाबतीत मी शेवटी जे म्हटले असेल, तेच माझे खरे मत समजा; त्याच्या अगोदर त्या बाबतीत मी जे म्हटले असेल ते चुकीचे माना.' याचेच नाव प्रांजलपणा. येशूने जिचा 'इन्नोसेन्स' अथवा निरागसता म्हणून उल्लेख केला, तीच ही बालसुलभ प्रांजलता. हा प्रांजलपणा म्हणजे सहज सत्यनिष्ठेचे सत्त्व. ही निरागसता किंवा नम्रता काही विशिष्ट गुण नव्हे. त्याची गणना व्रतांतही होऊ शकत नाही. 'मंगलप्रभात' पुस्तिकेत व्रतविचाराच्या संदर्भात गांधींनी ही

गोष्ट विशद केली आहे. म्हणूनच गांधींच्या जीवनात आणि त्यांच्या भाषेत सत्यनिष्ठेची अनलंकृत सुषमा आहे.

सत्याच्या शोधात जो गढून गेला असेल, त्याच्या दृष्टीने जीवनाच्या इतर महनीय विभूती गौण ठरतात. गांधींनी नीती, धर्म आणि तत्त्वज्ञान या विषयांच्या काही अंगोपांगांसंबंधी क्वचित परस्परविरोधी व अत्यंत भिन्न स्वरूपाचे विचार व्यक्त केले आहेत; पण त्यात सत्यनिष्ठेचे सूत्र मात्र अनुस्यूत आहे. सनातन धर्म, इस्लाम, ख्रिस्ती धर्म, वेद-उपनिषदे, महाभारत-रामायण, कुराण-गीता किंवा बायबल यांच्याविषयी त्यांनी वेळोवेळी जे म्हटले आहे, त्यात त्यांचा पारमार्थिक विचार प्रकट झालेला नाही. गांधींच्या विभूतीचे ते उपादान नाही. म्हणून इतर दृष्टीने त्यांच्या त्या उक्तींचे कितीही महत्त्व असले, तरी त्यांच्या अध्यात्मात त्या उक्तींचे स्थान गौण आहे. म्हणूनच गांधींच्या धर्मविषयक कल्पना व व्याख्या भिन्न आहेत. सारेच धर्म सत्य आहेत असे जेव्हा गांधी म्हणतात, तेव्हा त्यांचा जोर सत्यावर असतो. धर्मावर नसतो. गांधींच्या म्हणण्याचा आशय असा की, शेवटी ईश्वरनिष्ठा, सत्यनिष्ठा, सदाचार व प्राणिमात्राविषयी आत्मीयतेची भावना हेच तर साऱ्या धर्मांच्या शिकवणीचे सार आहे. म्हणून सारेच धर्म सारखेच अनुष्ठेय व पूजनीय आहेत. परंतु वस्तुस्थिती अगदीच निराळी आहे. ईश्वरपरायणता, नीतिनिष्ठा व बंधुत्व सगळ्याच धर्मांना समान आहेत. त्यामुळे विशिष्ट अनुयायी या गुणांना आपला स्वधर्म मानीत नाहीत. स्वतःला जे आपल्या विशिष्ट धर्माचे कट्टे अनुयायी मानतात, ते असे म्हणतात की, धार्मिक दृष्टीने एक सामान्य मुसलमानदेखील महात्मा गांधींपेक्षा श्रेष्ठ आहे. त्याचप्रमाणे दरेक वर्णाश्रमवादी सनातनी ब्राह्मणाचे दृष्टीने सदाचारी अस्पृश्यापेक्षा दुराचारी ब्राह्मणसुद्धा अधिक पवित्र व सामाजिक व्यवहाराकरिता अधिक योग्य आहे. सारांश,

रूढ अर्थाने धर्म ही संज्ञा ईश्वर, नीती व बंधुत्व बाद केल्यानंतर जो क्रियाकलाप व संस्कारकलाप उरतो, त्याला लागू आहे. उलट, हे विशिष्ट क्रियाकलाप व संस्कारकलाप वगळल्यानंतर जे सत्त्व शेष राहते, त्याला अनुलक्षून गांधींनी धर्म शब्दाचा प्रयोग केला आहे. गांधींच्या भूमिकेप्रमाणे सत्य हाच धर्म आहे. आणि म्हणून धर्म एकच असू शकतो.

समन्वय शब्दाचाही गांधींनी नवीनच अर्थ केला. जो धर्मग्रंथ, कर्मकांड व व्यवहार सत्याच्या शोधाला पोषक असेल तोच प्रशस्त व आदरणीय आहे, हे गांधींच्या समन्वयाचें मुख्य सूत्र होय. धर्माच्या क्षेत्रात परधर्मसहिष्णुतेपासून तो सर्वधर्म-समन्वयापर्यंत आणि सर्वधर्मसमादरापर्यंत अत्यंत उदात्त भावनांचे प्रतिपादन राजा राममोहन राय व श्री रामकृष्ण परमहंस देव इत्यादी पूर्वसूरींनी केले. परंतु समन्वयाच्या या यथार्थ भूमिकेचा अंगीकार गांधींच्या जीवननिष्ठेचा अनन्य विशेष म्हणता येईल.

ईश्वरपरायणतादेखील भिन्नभिन्न धार्मिक गटांना एकमे-कांच्या जवळ आणू शकली नाही. सगळेच म्हणतात की, ईश्वर एकच आहे आणि तो सर्वांचा आहे. परंतु, दरेकाचा आग्रह असा की, जो एकच ईश्वर आहे तो माझा आहे; आणि तोच सर्वांचा झाला पाहिजे. तदितर सगळे ईश्वर सैतान नसले तरी निदान अनीश्वर तरी आहेत. अशा प्रकारची धर्मनिष्ठा हीच धर्मकलहांची जननी होय. गांधींसारखा सत्यनिष्ठ पुरुष साहजिकच ईश्वराच्या या स्वरूपापासून विमुख झाला. त्यांच्या लक्षात आले की, ज्याने माणसाला जन्म दिला तो ईश्वर हा खास नव्हे. हा माणसाने निर्माण केलेला ईश्वर आहे. माणसाची जशी भावना, आकांक्षा अगर वासना असेल, तिच्या अनुरूप तो आपला देव घडवितो. गांधींनी म्हटले, ही सगळी निरनिराळी स्वरूपे एका ईश्वराचीच आहेत. कारण, तोच अवघ्या चराचरात भरलेला आहे. अर्थात

सारीच नामरूपे ईश्वराची आहेत. म्हणजे यच्चयावत् संज्ञा ईश्वर-वाचक आहेत म्हणा–किंवा कुठलीही संज्ञा त्याला लागू नाही म्हणा ! तो अनाम आहे. म्हणूनच सर्वनाम आहे. सर्वनामच विश्वरूप आहे. तरी पण काही संज्ञा व काही रूपे अशी आहेत की, ज्यांच्यावर विशिष्ट मानवसमुदायांची निःस्सीम निष्ठा आहे. आणि असे असूनही त्या संज्ञा व ती रूपे ईश्वराला शोभण्यासारखी नाहीत. म्हणून अखेरीस गांधींनी असा निष्कर्ष काढला की, सत्य हाच ईश्वर आहे. सत्याची जिज्ञासा हीच मुमुक्षा आणि सत्याचा शोध हीच साधना.

गांधींचे सत्य म्हणजे एकादे अनाकलनीय किंवा परोक्ष तत्त्व नव्हे. भूतमात्राच्या व जीवमात्राच्या अस्तित्वाचे अधिष्ठान म्हणजेच परम सत्य. मनुष्याचा इतर मानवांशी संबंध व मनुष्याचा मनुष्येतर प्राण्यांशी संबंध हेच या सत्याच्या आविष्काराचे क्षेत्र होय. अनवधानाने, प्रमादाने अथवा मोहवशतेने या धर्मक्षेत्राचे कुरुक्षेत्र होऊ नये, याची काळजी त्यांनी सतत वाहिली. ही सावधानताच त्यांच्या अहिंसेच्या रूपाने परिणत झाली. यादृष्टीने गांधी हा ज्ञानयोगी नव्हे, कर्मयोगी नव्हे किंवा भक्तियोगी नव्हे, तर तो सत्यनिष्ठ ' प्रयोगी ' आहे. माणसामाणसांत आणि मनुष्य व मनुष्येत्तर प्राण्यांत पारस्परिकतेच्या विकासाला जे आचरण उपकारक ठरते, त्याचे नाव सदाचार. या पारस्परिकतेला जी बाधक असेल, ती अनीती. विशिष्ट परंपरेत व निरनिराळ्या समाजात रूढ झालेले जे आचार व व्यवहार या पारस्परिकतेला अनुकूल वाटले, त्यांचा गांधींनी नैतिक म्हणून स्वीकार केला. आणि त्याच भूमिकेवरून वर्णभेद (रंगभेद), वर्गभेद, जातिभेद व अस्पृश्यता यांना निकराने विरोध केला. फार काय, गांधींनी अनीश्वरवाद्यांच्या सत्यनिष्ठेला प्रणाम केला. त्यांनी तर असे म्हणायलादेखील कमी केले नाही की, अनीश्वरवाद्यांची प्रामाणिक

नास्तिकतादेखील ईश्वराचेच स्वरूप आहे. अनीश्वरवादी जवाहरलालांना आणि प्रो. गोरांसारख्या निष्ठावान नास्तिकांनासुद्धा त्यांनी सत्याग्रहाचे अधिकारी मानले. ही सत्यनिष्ठा इतकी व्यापक असते की, तेथे व्यावर्तकतेला थाराच उरत नाही.

सत्यनिष्ठ गांधींनी जीवनाच्या अधिष्ठात्री दोन पृथक् सत्ता मानल्या नाहीत. त्यांनी असत्याचे किंवा असत्‌चे स्वतंत्र अस्तित्व कधीच मान्य केले नाही. कारण, असत्याचे किंवा अमंगलाचे निराकरण शक्य आहे आणि इष्टही आहे. दुष्टता किंवा असत्य मनुष्याचा स्वभाव नाही. म्हणून गांधींच्या धर्मकोषात प्रतियोगी व प्रतिपक्षी तर आहे, पण विपक्षी किंवा शत्रू कोणीच नाही. जो प्रतिपक्षी असेल त्याच्याविषयी प्रेम आहे आणि जो स्वतःला विपक्षीय मानीत असेल, त्याच्याविषयी प्रेमच आहे. शेवटी विपक्षीदेखील प्रतिवेशी किंवा शेजारीच आहे. स्वदेशीचा गांधींनी केलेला हा विशिष्ट अर्थ होय.

ज्याला शत्रू म्हणून नाहीच तो खरा विश्वसुहृद्. त्याला ज्याप्रमाणे दुसऱ्यांची सुखदुःखे स्वतःच्या सुखदुःखांप्रमाणे आहेत, त्याचप्रमाणे दुसऱ्यांचे दोष, अपराध व प्रमादही स्वतःचे दोष, स्वतःचे अपराध व स्वतःचे प्रमाद याप्रमाणे आहेत. कुसंस्कारांमुळे व कुशिक्षणामुळे मनुष्य बहुतेक स्वतःच्या अपराधांकरिता क्षमा इच्छितो आणि इतरांच्या अपराधांकरिता शिक्षेची मागणी करतो. ही नैतिकता तर नव्हेच, पण न्यायनिष्ठाही नव्हे. गांधींनी आजन्म या वृत्तीच्या विरुद्ध अभ्यास केला. स्वतःकरिता शिक्षा, इतरांकरिता क्षमा असे त्यांच्या सदाचाराचे सूत्र होते. अनासक्तियोगात त्यांनी ‘ये यथा मां प्रपद्यन्ते…’ या श्लोकावर जी संक्षिप्त टिप्पणी लिहिली आहे, तिच्यावरून त्यांची भूमिका लक्षात येईल.

गांधींचा पिंड मुळात धार्मिक होता. त्यांनी राजकीय क्षेत्रात नैतिकतेचे व सभ्यतेचे बीज पेरण्याकरिता प्रवेश केला.

परंपरागत राजकारणाचे व्यवहारवादी सूत्र होते. 'आजचा मित्र उद्याचा शत्रू असू शकतो, म्हणून आजच्या मित्रापासून सावध रहा.' गांधींनी म्हटले, सदाचाराचे सूत्र याच्या अगदी उलट आहे, 'आजचा शत्रू उद्याचा मित्र असू शकतो, म्हणून आजपासून विश्वास ठेवायला सुरवात करा.' ही विश्वासपरायणताच मानवी व्यवहारातील वीरतेचे तत्त्व होय. हिचेच नाव वास्तविक वीरता अथवा वास्तविक आस्तिकता. या आस्तिकतेचा विनियोग गांधींनी राजकारणात केला. या दृष्टीने त्यांना गोखल्यांचे शिष्य म्हणता येईल. प्रत्यक्ष राजकीय व्यवहाराच्या बाबतीत गांधींचे आध्यात्मिक शौर्य अपूर्व होते. राजकारणातील अद्भुत आत्मवान व्यक्ती, असे त्यांचे वर्णन यथार्थतेने करता येईल.

राजकारणात लोकसत्तेचा प्रयोग गांधीजींना अभिप्रेत होता. संसदीय लोकशाहीबद्दलही त्यांचे विचार मौलिक आहेत.

या देशातील जहालवाद्यांपैकी लोकमान्य टिळकांनी सांसदीय लोकशाहीचा प्रश्न सर्वप्रथम चर्चेला आणला. १९१७ च्या कलकत्ता काँग्रेसमध्ये हा विचार मांडताना ते म्हणाले होते की, 'याला स्वराज्य, स्वयंशासन, होमरूल किंवा ए. बी. सी. फॉर्म ऑफ गव्हर्नमेंट असे कुठलेही नाव दिले तरी आम्हाला अभिप्रेत असलेले सरकार कायदे बनविणाऱ्या संस्थेप्रत पूर्णतः जबाबदार असेल व कायदे बनविणारे संसद पूर्णपणे निवडून आलेले असेल.' मी याचा उल्लेख इथे अशासाठी केला की, लोकमान्यांचे महानिर्वाण झाले तेव्हा त्यांच्यावरील मृत्यूलेखात गांधींनी असे लिहिले होते की, 'बहुसंख्या वा बहुमताच्या राज्यावर लोकमान्यांचा जो जबरदस्त विश्वास होता त्यामुळे मी थोडा घाबरलो होतो.' गांधींचे हे वाक्य फार महत्त्वाचे आहे. कारण बहुसंख्या व बहुमत

यांत फरक आहे. बहुमताचे राज्य म्हणजे लोकसत्ता, पण बहुसंख्येचे राज्य म्हणजे लोकसत्ता नव्हे. हा फरक निःसंदिग्धपणे आम्हाला उमगला नव्हता; मत आणि संख्या यात फार मोठा फरक आहे. मत बदलते व ते परिवर्तनशील आहे. आजचे अल्पमत उद्या बहुमत होऊ शकते आणि आजचे बहुमत उद्या अल्पमत होऊ शकते. परंतु आजची बहुसंख्या उद्याची अल्पसंख्या होऊ शकत नाही. संख्या जेव्हा मताची जागा घेते, तेव्हा लोकसत्तेचा ऱ्हास होतो. ती क्षीण होते. जेथे अल्पसंख्येला मान नाही, तिला संरक्षण नाही, तेथे लोकसत्ता असत नाही. अल्पसंख्येला संपूर्ण संरक्षण मिळून बहुसंख्येइतकेच तिचेही अधिकार सुरक्षित व स्थिर असतील तरच ती लोकसत्ता होय. नाहीतर राज्य हे बहुसंख्यकांचे होऊन अल्पसंख्यकांना दुय्यम नागरिकत्व दिले जाईल. याला लोकसत्ता म्हणता येणार नाही.

लोकसत्ता काहीशी एकाद्या खेळासारखी आहे. मग ती सांसदीय असो अगर इतर कुठल्याही प्रकारची असो. खेळात एक असे अध्यात्मिक मूल्य आहे की, जे आमच्या इतर कुठल्याही व्यवहारात असत नाही, किंबहुना आपल्या जीवनात खेळात जितके अध्यात्म आहे, तितके इतर कुठल्याही बाबतीत नाही. खेळ खेळायला नेहमी प्रतिस्पर्धी लागतो. जोपर्यंत प्रतिस्पर्धी मिळत नाही तोपर्यंत खेळ खेळलाच जाऊ शकत नाही. येथे आपला प्रतिस्पर्धी हाच आपला खेळातला सवंगडी आहे. प्लेमेट आहे. म्हणजे जेथे आपला प्रतिस्पर्धी हादेखील आपला सोबती आहे. असा खेळ हा प्रकार आहे. विनोबा नेहमी आम्हाला म्हणत असत, निवडणुका लढवल्या जायला नकोत तर निवडणुका खेळल्या गेल्या पाहिजेत. याचा अर्थ असा की जो प्रतिस्पर्धी असेल तोदेखील या प्रणालीचाच एक भाग आहे. ' हिज मॅजिस्टीज् गव्हर्नमेंट ' आणि ' हिज मॅजिस्टीज् अपोझिशन ' दोघेही राजाचेच आहेत. जेथे

लोकसत्ता आहे, 'द पिपल्स् गव्हर्नमेंट अॅण्ड द् पिपल्स् अपोझिशन' तीदेखील याचाच एक घटक आहे ! १९३८ साली एक असा प्रश्न उभा राहिला होता की, विधानसभेत व लोकसभेत जाणाऱ्या आमच्या लोकांनीदेखील राजनिष्ठेची शपथ घ्यावी काय ? किशोरीलालभाईंनी हा प्रश्न चर्चेला आणला होता. शपथ घेतल्यास ती कृती अनैतिक होईल असे त्यांना वाटत होते. तेव्हा गांधींनी या प्रश्नाचे उत्तर दिले. हुबळीला गंगाधरराव देशपांड्यांकडे गांधी–सेवासंघाचे सम्मेलन होते. त्यात गांधीजी म्हणाले, 'हा किशोरीलाल धर्मराजाप्रमाणे आहे. याला पडणारे सगळे प्रश्न धर्मसंकटासारखे असतात. परंतु मी केवळ महात्मा नाही, तर बॅरिस्टरदेखील आहे. त्यामुळे नैतिकता आणि कायदा यांतील भेद मी जास्त स्पष्टपणे समजू शकतो. जी बाब बेकायदेशीर असते ती नेहमीच अनैतिक असते असे नाही. तसेच जे अनैतिक असते ते नेहमीच बेकायदेशीर असते असेही नाही. जेव्हा ही जी राज-निष्ठेची शपथ आहे ती कायदेशीर शपथ आहे. ही शपथ घेणारा राजाला फाशीवर देखील चढवू शकतो ! ' मी तुम्हाला म्हणालो की यात खेळ आहे. लोकसत्तेत जरी खेळ नसेल तरी खेळातील अध्यात्मिक अंश मात्र लोकसत्तेत असला पाहिजे. परंतु खेळ म्हणजे पोरखेळ--फ्रोलीकींग नाही. यासाठी गांधीजी म्हणत की, बहुमताचे राज्य (रूल ऑफ मेजॉरिटी) हा काही सिद्धान्त नाही, तर ती एक व्यवहार्य योजना आहे. कन्ट्रायव्हन्स आहे. व्यवहारात निर्णय घेण्यासाठी नेहमी कुठल्यातरी एखाद्या बाबीचा आधार घ्यावा लागतो, म्हणून हे बहुमत जितके अधिक असेल तितके चांगले. केवळ ४९–५१ च नाही तर ते ६० आणि ३० किंवा ८० आणि २० किंवा ९० आणि १० देखील असू शकते. परंतु हे जे दहा आहेत त्यांचेही महत्त्व तितकेच असेल जितके ९० ला आहे. त्यांचे मूल्य समान आहे. जॉन स्टूअर्ट मिल आपल्या 'लिबर्टी अॅण्ड रिप्रेझेन्टेटीव्ह गव्हर्नमेंट' या पुस्तकात म्हणतो, 'जसा एका

व्यक्तीला नव्याण्णव व्यक्तींवर आपले मत लादण्याचा अधिकार नाही, तसाच ९९ व्यक्तींनादेखील एका व्यक्तीवर आपले मत लादण्याचा अधिकार नाही. जर एक व्यक्ती तसा प्रयत्न करत असेल तर ती एकाधिकारशाही होईल व ९९ व्यक्ती जर तोच प्रयत्न करत असतील तर ती बहुसंख्येची हुकुमशाही होईल.' म्हणूनच गांधीजी म्हणाले ती फार महत्त्वाची बाब आहे. कारण लोकसत्तेत 'व्यक्ती' एकच आहे–युनिट आहे–आणि तीदेखील कुठल्याही विशेषणाशिवाय, म्हणजे केवळ व्यक्ती म्हणून व्यक्ती. यालाच विनोबा पुढे जाऊन सर्वसंमती किंवा सर्वानुभूती म्हणतात. परंतु याचा अर्थ 'युनॅनीमिटी' नव्हे. 'युनॅनीमिटी' हा ऑलिव्हर क्रॉम्वेलचा शब्दप्रयोग आहे. ऑलिव्हर हा 'रम्प पार्लमेंट' चालवणारा हुकूमशहा होता. त्याने सर्वांना बोलावले व म्हणाला: तुम्ही सगळे आपापल्या अंतरात्म्याला विचारून मतदान करा...परंतु माझा कल बघून करा! यामुळे यात स्वतंत्रता राहिली नाही. प्रत्येक व्यक्तीचे स्वतंत्र मत हा लोकशाहीचा मुळाधार आहे. कॅबिनेटचे एकमत असूनही संसदेत मंत्रिमंडळातील प्रत्येक मंत्री आपले स्वतंत्र मत देतो. मंडळाचे असे एक मत संसदेत दिले जात नाही. एकेका व्यक्तीच्या मताचा अर्थ 'कलेक्टिव्ह व्होट' असा होत नाही. यामुळे लोकसत्ता ही पक्षसत्ता होत नाही. पंतप्रधान हा देशाचा असतो, कोण्या एका पक्षाचा नाही. उमेदवार हा कुठल्याही पक्षाचा असतो, परंतु तो लोकांचा प्रतिनिधी असतो. या संदर्भात लॉर्ड हॅलिफॅक्स् म्हणतो : 'पार्टी इज ए कान्स्पिरसी अगेन्स्ट द् पिपल'–'पक्ष हे लोकविरोधी षड्यंत्र आहे.' कारण लोकप्रतिनिधींवर जिथे लोकांची सत्ता चालायला हवी तिथे पक्षाची सत्ता चालते.

लोकसत्तेत लोकात्मा जागृत व्हायला हवा असे गांधींना नेहमी वाटत असे. 'लोकात्मा' हा शब्द लोकमान्यांचा आहे.

जनतात्मा–' कॉन्शंस ऑफ द् पिपल ' लोकांचा अंतरात्मा जागृत व्हायला पाहिजे तेव्हा त्याची अभिव्यक्ती काय असेल ?...मागे अमृतसर काँग्रेसमध्ये एक ठराव आला होता. तिथे लोकमान्य टिळक, अलिबंधू, चित्तरंजन दास. बिपीनचंद्रपाल आणि सत्यमूर्ती हजर होते. बिपीन-सत्यमूर्ती, चित्तरंजन यांनी असा ठराव मांडला की, ' जालियनवाला बागेत जो अत्याचार सरकारकडून केला गेला त्याचा ही काँग्रेस निषेध करते. ' तेव्हा गांधींनी ठरावात एक दुरुस्ती सुचवली.– ' लोकांकरवी जे अत्याचार होतात व झालेत त्याचा देखील ही काँग्रेस निषेध करते. ' ' ॲण्ड धिस काँग्रेस ऑलसो कंडेम्स् दी एक्सेसेस ऑन द् पार्ट ऑफ द् पिपल... ' राजकीय मंचावरून या प्रकारची ठरावदुरुस्ती तोपर्यंत कुणीही केली नव्हती. ही सूचना ऐकल्यावर सगळे अवाक् झाले ! सगळ्यांना वाटले, धर्म आणि राजकारण यात गांधी गल्लत करत आहेत. राजकारणात यापूर्वी अशी घटना कधी घडली नव्हती. त्यावेळी श्रीमती एलॅनॉर नॉरमेंटन् यांच्या संपादकत्वाखाली ' इंडिया 'नावाचे काँग्रेसचे मुखपत्र निघत असे. त्याच्या एका अग्रलेखात त्यांनी एक मोठी मार्मिक गोष्ट लिहिली. ' आजपर्यंत जगरहाटीचा असा नियम होता की लोकांकडून तुम्हाला जसा व्यवहार अपेक्षित आहे, त्यापेक्षा अधिक चांगला व्यवहार लोकांशी ठेवा. ' डू अनटू अदर्स मोअर दॅन यू वॉन्ट अदर्स डू अनटू यू ' हे एक तत्त्व लोकसत्तेत आणले गेले आणि याचा पुन्हा प्रत्यय आला. १९१६ मध्ये लखनऊला. हिंदू-मुसलमान तडजोड झाली तेव्हा ! त्यावेळी गांधी म्हणाले की, ' करारनामा का व्हावा ? जीन्हासाहेबांनी या कोऱ्या कागदावर त्यांना काय हवे ते लिहावे त्यावर मी माझी सही करीन. हा कोरा चेक आहे.'–पुटिंग द ॲडव्हर्सरी ऑन हिज ऑनर–हे प्रतिपक्षाच्या प्रामाणिकपणाचे आवाहन आहे म्हणून ही फार मोठी गोष्ट आहे. तर अशा रीतीने राजकारणात एक नवे मूल्य रुजवले गेले.

मित्रांनो, काही गोष्टी अशा असतात की, ज्या अनोख्या असतात. यामुळे गांधींच्या बाबतीत न आम्ही काही समजू शकलो, न इतर कुणी समजू शकले. त्यांची जी प्रतिमा या देशात होती, तसे वास्तविक गांधी होते की नाही कुणास ठाऊक. परंतु लोक एक प्रतिमा तयार करतात. तुम्हाला माहीत आहेच की नुकताच संसदेत एक ठराव करण्यात आला. हे लोक गांधींच्या नावाला काळिमा फासत आहेत. आता माझ्या मनात विचार आला की, गांधींच्या नावाला तर गांधींनीच काळिमा फासला आहे. जेव्हा बारडोलीचा सत्याग्रह मागे घेतला तेव्हा सगळे म्हणाले की, हे अ–गांधीवादी कृत्य आहे. म्हणजे गांधीनाच अ-गांधीवादी ठरविण्यात आले. गांधी हे गांधी होते. ते गांधीवादी कसे होऊ शकतात ? कार्ल मार्क्स कधीतरी मार्क्सवादी होवू शकला असता काय ? कारण तो स्वतःच मार्क्स होता. जो स्वतःच मार्क्स होता, तो मार्क्सवादी कसा होऊ शकतो ? तर, गांधींच्या नावाला तुम्ही-आम्ही काळिमा लावू शकत नाही. काळिमा लागलाच तर तो आपल्या नावाला लागेल. आता पैशांचा दुर्व्यवहार केला तर तो गांधींच्या नावावर केलेला व्यवहार आहे काय ? शिवाजीच्या नावावर विडी आहे म्हणून शिवाजीच्या नावाला काळिमा लागला का ? गांधींचा तर मुलगाच मुसलमान झाला; पण म्हणून काही गांधींच्या नावाला काळिमा लागला नाही. गांधींनी त्यावर लिहिले की, ' हा मुसलमान झाला तरी माझाच मुलगा आहे. त्यामुळे मी असे म्हणू शकत नाही की मी बापपणाचा राजीनामा देतो. ' या सगळ्या गोष्टी चुकीच्या आहेत. दारूचा व्यापार करणारे सरकार गांधींच्या नावाला काळिमा फासू शकत नाही तर इतर कुणी कसे काय फासू शकेल ? थोड्या वेळापूर्वी आमचे अध्यक्ष ठाकुरदास बंग म्हणाले की, काँग्रेसवाल्यांनी तर दारूच्या दुकानाचेही ठेके घेतले आहेत. दारूबंदी हा तर त्यांचाच ठराव होता, कार्यक्रम होता, तरीही

त्यांच्या या कृत्यामुळे गांधींच्या नावाला काळिमा बिलकूल फासला जात नाही. कारण गांधी हा गांधी होता आणि आम्ही आम्ही आहोत. खुज्या मनाचे. खुज्या बुद्धीचे! गांधींच्या नावाला काळिमा कोण फासतो व कोण फासत नाही हे ठरवावं तरी कुणी? यासाठी मी लहानतोंडी मोठा घास घेऊन म्हणतो की, विनोबा तशी व्यक्ती आहे. याबाबतीत याहून मोठी व्यक्ती कोण आहे? तेव्हा याबावतीत निर्णय त्यांनीच करावा. कृपलानी, राजाजी, विनोबा, आणि मोरारजीभाई हे चौघे गांधीजींचे शिष्य, परंतु ब्रह्मदेवासारखी त्यांची मुंडकी एकाच धडावर नाहीत. वेगवेगळी आहेत. डोकीही वेगळी अन् मेंदूही वेगळे. तरी कुणी कधी म्हणतं का की, त्यांनी गांधीच्या नावाला काळिमा लावला किंवा बट्टा लावला! मित्रांनो, असे म्हणणे चांगल्या नियतीतून पैदा होत नसते. माणसाची नियत कधी थोडी बिघडते. मी आधी म्हणालो त्याप्रमाणे लोकनीती–लोकसत्ता अवनत होऊन तिचे संख्येत रूपांतर होते. मतांच्या सत्तेची जागा संख्येची सत्ता घेते, यालाच ब्रूट मेजॉरिटी म्हणतात. वन हॅण्ड–वन व्होट, यापासून फारकत घेऊन. यामुळे आपण कुठे येऊन पोहोचतो बघा. एक किस्सा मी सांगतो. एक शिपाई शत्रूचे २००० हात कापून घेऊन आला. लोक म्हणाले, याने दोन हजार हात कापून आणले. हा फार शूर आहे. तेव्हा गावातलाच एक अडाणी माणूस म्हणाला, दोन हजार हात कापून आणले तर मग एक हजार डोकी का नाही आणली? तर त्याने डोकी नाही आणली कारण ती आधीच कापली गेली होती! ही आमची लोकसत्ता आहे. आधी होते 'वन् हेड-वन व्होट' नंतर विचार आला डोके काही कामाचे नाही, म्हणून मग 'वन हॅण्ड-वन व्होट' आणि शेवटी 'वन नोज वन व्होट!' जो श्वास घेतो त्याचेही एक मत आहे. विनोबा याला 'संख्यासूर' म्हणतात. लोकसत्तेला संख्यासूर खाऊन टाकतो. हा संख्यावाद म्हणजे लोकसत्ता नव्हे!

गांधींच्या व्रतांमध्ये ' स्पर्शभावना ' हे एक व्रत आहे. ज्यांना समाजात अस्पृश्य मानले गेले, त्यांच्यासाठी मनात स्पर्शभावना असायला हवी. म्हणजे स्पर्शाला पवित्र स्थान दिले आहे. आपल्या देशात मनुष्य-स्त्रीचा स्पर्श पवित्र समजला जात नाही, ही एक गैरलोकशाही बाब या देशात आहे. ' एव्हरी कॉन्टॅक्ट इज् कॉन्टॅजियन '– ' प्रत्येक संपर्क हा संसर्ग झाला. ' माणसाला आलिंगन देण्यात पवित्रता नाही, तर ती त्याला दूर ठेवण्यात आहे. यावर गांधी असे मानत की, माणसाचे शरीर पवित्र आहे आणि यात स्त्री व पुरुष दोघेही आले. आपल्याकडे ब्रह्मचर्यात असे शिकवले जाते की, दोघांनी एकटेपणात रहावे. महाभारतात व मनुस्मृतीत तर असेही म्हटले आहे की, आई–मुलगा आणि बाप व मुलगी यांनीदेखील एकांतात सोबत राहू नये. याचा अर्थ असा होतो की, स्त्री–पुरुष संबंधांशिवाय इतर संबंध मिथ्या आहेत. हा ' मॉर्डनिझम ' आहे. ज्याला आपण ' पर्मिसीव्ह सोसायटी ' म्हणतो ती याचे दुसरे टोक आहे. एका टोकाला ब्रह्मचर्य–स्त्री-निषेध तर दुसऱ्या टोकाला ' फ्री सेक्स ! ' दोन्हीही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. माझ्या लहानपणी आमच्याकडे एकदा एक प्रसिद्ध संन्यासी आले होते. त्यांना स्त्रियांचा स्पर्श वर्ज्य होता. बरेच लोक स्त्री–स्पर्श टाळतात. जैन साधू स्त्रियांना समोर येऊ देत नाहीत. या स्वामीनारायणांच्या ज्या कार्यक्रमात मी सहभागी झालो होतो तेथे माझ्यासोबत आलेल्या बायकांना दूर राहावे लागले होते. हे तेव्हा माझ्या लक्षात आले नव्हते. पवनारला बाळूभाई मेहता आहेत. आता त्यांचे वय ९२ वर्षांचे आहे. चालताना ते बरेचदा लटपटतात. मुली जेव्हा त्यांना आधार द्यायला धावतात तेव्हा त्यांना वाटते की अरेरे, हे मोठे पाप घडते आहे. साधूंनादेखील असेच वाटते. एका स्त्रीने जाऊन त्यांच्या पायाला हात लावून नमस्कार केला, तर साधू म्हणाला, मला विंचवाचा दंश झाला आणि लगेच जाऊन त्याने गंगेत स्नान

केले. आता हे बाळूभाईदेखील असेच करताहेत. ते दूरदूर राहात, तेव्हा विनोबा मला म्हणाले की, 'बघ ते बाळूभाई इतके म्हातारे झालेत व मुली त्यांना आधार द्यायला जातात, ते त्यांनाही दूर ठेवतात. ते बहुधा विसरले असावेत की त्यांनाही एका स्त्रीनेच जन्म दिलाय!' तर मी त्यांना म्हणालो की, 'त्यांच्या जन्माची घटना घडली ती चुकीने घडली. त्यावेळी ते बेसावध होते. नाही तर त्यांनी जन्मच घेतला नसता ..!' गांधींनी याबाबतीत बंड केले. गांधींनी आयुष्यभर जे प्रयोग केले त्यापैकी याबाबतींतला त्यांचा प्रयोग सर्वांत साहसी प्रयोग होता. 'स्त्रीच्या सान्निध्या-शिवाय ब्रह्मचर्य पूर्ण होऊ शकत नाही. नव्हे तर सिद्धदेखील होऊ शकत नाही.' हा फार जबरदस्त विचार मांडला त्यांनी. यासाठी आमचा समाज तयार नव्हता. आपल्याकडे दोन संकेत आहेत. दोन अद्भूत व्यक्ती आहेत. यांच्यासाठी कुठले शास्त्र वा विधि-निषेध नाहीत. एक श्रीकृष्ण अन् एक शंकर. अवकाशाला गवसणी घालणाऱ्या अशा या उत्तुंग विभूती आहेत. शुक्राचार्यांना परिक्षिताने प्रश्न विचारला होता, हा श्रीकृष्ण इथे धर्माची संस्था-पना करायला आला आहे आणि दुसऱ्यांच्या बायकांशी खेळतोय! हा काय प्रकार आहे? रामासोबत त्याच्या बायकोचे नाव घेतले जाते, शंकरासोबत पार्वतीचे नाव घेतले जाते, परंतु याच्यासोबत राधेचे नाव जोडले जाते. राधा त्याची पत्नीदेखील नव्हती तरीही लोक राधा-कृष्ण, राधा-कृष्ण असे भजन करतात. त्याला आठ बायका होत्या, परंतु एकीचेही नाव त्याला जोडले गेलेले नाही. शिवाय असेही म्हणतात की सोळा हजार एकशे आठ गोपीदेखील होत्या. तरीही यानंतर ब्रह्मचर्याची जी परीक्षा झाली त्यात या गृहस्थाने पहिला नंबर पटकावला! या बाबतीत जरा विचार करा. आपल्या पुराणकथांमधला हा एक संकेत आहे. गौरीशंकरा-पेक्षाही उत्तुंग संकेत आहेत. आणि हा शिव आपलं, शरीर याने बायकोला दिले तरीही याला कामदेवाचा संहारक मानतात. पण

जगभर लोक गांधींना म्हणाले की याने गांधींचे नाव घालविले. आणि आता ही संसद-पार्लमेंटदेखील आम्हाला बहुतेक हेच सांगतेय की, याने गांधींचे नाव बुडविले, 'द आयडॉल दॅट वुई वर्शिप हॅज् बीन डिस्ट्रॉईड'–ज्या प्रतिमेची आम्ही पूजा केली, ती गांधींची नाहीच मुळी !

तर मित्रांनो, हा एक अजब माणूस होता. बर्नार्ड शॉ जेव्हा साठ वर्षांचे झाले तेव्हा त्यांच्या सर्व मित्रांना चष्मा लागला होता, आणि याला चष्मा नव्हता. तर याला वाटले की आपलेच डोळे खराब झालेत, कारण सगळ्यांच्याच डोळ्यांवर चष्मे आहेत अन् माझ्याच डोळ्यांवर तेवढा नाही. हे कसं ? तडक गेला डोळ्यांच्या डॉक्टरांकडे. डॉक्टर म्हणाले, डोळे अगदी नॉर्मल आहेत. तेव्हा शॉ जास्तच गडबडले. जर माझे डोळे नॉर्मल आहेत तर, या सर्वांचे काय आहेत ? डॉक्टर म्हणाले, शंभरापैकी केवळ दोघा-तिघांचेच डोळे नॉर्मल असतात, उरलेल्या ९७–९८ लोकांचे नॉर्मल नसतात. तर गांधी 'ॲव्हरेज' नव्हते, आर्किटाईपदेखील नव्हते तर नॉर्मल होते. दुनियेत असा नॉर्मल, स्वस्थ मानव यापूर्वी निर्माण झाला नव्हता. त्यामुळेच त्याच्या सगळ्या गोष्टी आपल्याला चमत्कारिक वाटतात.

माणसाचा स्पर्श तर पवित्र आहेच, परंतु माणसात स्त्री-देखील सामील आहे. कारण नागरी जीवनात स्त्री व पुरुष असा भेद असू शकत नाही. मग सामाजिक ब्रह्मचर्याचे काय ? तर ते म्हणजे ज्यात स्त्री-पुरुषांचे पवित्र सहजीवन शक्य आहे ते ! काम नाही, तर प्रेम–काम–निरपेक्ष प्रेम. आणि माझी अशी प्रार्थना आहे की, याचा आरंभ पुरुष करणार नाही तर मुलींनाच हे करावे लागेल. हे कसे करायचे ते त्यांनीच ठरवावे. त्यांना पुरुषांवर, मुलांवर प्रेम करावे लागेल. कामरनिरपेक्ष प्रेम. ज्यांत सेक्स नसेल ते प्रेम. सेक्सला बंदीवान करा एक मुलापुरते व इतर सर्व मुलां-

वर प्रेम करा. नो लस्ट बट् लव्ह,–निव्वळ प्रेम. हाच यातून मार्ग आहे. नाहीतर स्त्रीजीवन आपल्या अंतिम पडावावर आहे– बलात्काराच्या पडावावर. याला जिंकण्याचा दुसरा कुठलाच उपाय नाही: आणि जर पुरुषाने हे केले तर स्त्री नेहमी त्याच्या रक्षणात, त्याच्या अधीन राहील. यासाठी त्याचा अभिक्रम तरुण स्त्रीकडूनच व्हायला हवा.

गांधीजींचे स्वत:चे असे एक 'अर्थविज्ञान' होते.

समाजाची अर्थरचना कशाप्रकारची असावी याविषयी गांधीजींची मतं जीर्ण-मतवादी व प्रतिगामी स्वरूपाची आहेत असा आभास उत्पन्न करण्याचा पद्धतशीर प्रयत्न कित्येक क्रांति-वाद्यांनी आज अनेक वर्षे बुद्ध्या चालविलेला आहे. गांधींना वैभवाचे वावडे आहे. भौतिक–शास्त्रात झालेली प्रगती त्यांच्या पुराणप्रिय प्रकृतीला खपत नाही. त्यांना बैलगाड्यांचे, गवता-मातीच्या खोपट्यांचे आणि पणत्याच्या प्रकाशाचे अस्तंगत होऊ घातलेले युगच हवे आहे, अशी हाकाटी करण्यात आलेली आहे. पण ही सारी टीका भ्रान्तिमूलक आहे. गांधी प्रगति-विरोधक होते की प्रगतिवादी होते, हे ठरविण्याकरिता आधी प्रगती कशात आहे याचा निर्णय झाला पाहिजे.

'लोहयुगात, प्रस्तरयुगाच्या मानाने मानवाची प्रगतीच झालेली आहे याविषयी निश्चित होकारार्थी उत्तर देणे कठीण आहे,' असे एक विधान गांधींनी केले आहे. या विधानाच्या आधारावरदेखील मनात आणल्यास त्याला गांधींवर प्रतिगामी-त्वाचा आरोप करता येण्यासारखा आहे. पण प्रश्न असा आहे की, त्यात गांधींना म्हणायचे काय आहे ? प्रस्तरयुगात तीक्ष्ण धारेच्या पाषाणाने आपल्या बांधवांचा जीव घेणारा माणूस आज त्याकामी तीक्ष्ण तलवारीचा प्रयोग करीत असेल, यावरून फार तर त्याच्या

उपकरणात प्रगती झाली एवढेच म्हणता येईल. पण त्याची हत्यावृत्ती म्हणजे हिंस्रपणा जर कमी झाला नसेल तर त्याची प्रगती झाली असे मात्र खात्रीने म्हणता येणार नाही. प्रगती कशात मानायची हा मूळ मुद्दा आहे. गांधींचे म्हणणे असे की, मानवजातीचे अंतिम साध्य सुनिश्चित आहे. त्या साध्याला उपकारक अशी साधने शोधणे व योजणे, अशी उपकरणे घडविणे व वापरणे ही भौतिक-शास्त्राची प्रगती आहे. साध्याच्या बाबतीत वादाला जागा नाही. अगदी कट्टा भौतिकवादीदेखील मानवी समाजातून विषमतेचा निरास झाला पाहिजे आणि तो होणार आहे, अशी प्रतिज्ञा करितो. वाद काय तो साधनांच्या स्वरूपाच्या व अनुरूपतेच्या बाबतीत आणि उपकरणांच्या उपयुक्ततेच्या बाबतीत असतो. साध्यानुरूप साधने व उपकरणे निर्माण करण्यात भौतिक-शास्त्राची प्रगती आहे असे गांधींचे म्हणणे. तेव्हा आर्थिक संयोजनांचे साध्य काय आहे हाच प्रश्न मुद्याचा आणि मूलभूत आहे.

या प्रश्नाचे उत्तर थोडक्यात असे–

१) आर्थिक विषमता नाहीशी करणे, म्हणजे मानवा-मानवांतील सम्पन्न व विपन्न हा भेद नाहीसा करणे.

२) विषमतेचा निरास म्हणजे समान विपन्नता नव्हे. सगळ्यांचेच जीवन सारखे कष्टमय, दैन्यमय व दुःखमय झाले म्हणजे मानवी समतेचा आदर्श सिद्ध झाला असे नाही. म्हणून आर्थिक संयोजनाचा दुसरा उद्देश जीवनाची समृद्धी हा आहे.

३) पण जीवन समृद्ध झाले म्हणजे ते सुसंस्कृत होतेच असे नाही. सांस्कृतिक विकास फक्त संपन्नतेत नाही. तो जीवनाच्या व्यापकतेत आहे. म्हणून आर्थिक संयोजनाचा परिणाम जीवनाच्या कार्पण्यात न होता जीवनाच्या औदार्यात किंवा व्यापकतेत झाला पाहिजे हा तिसरा उद्देश.

या तिन्ही उद्देश्यांच्या पूर्ततेकरिता जी अर्थयोजना साधनभूत होईल तीच प्रगतिकारक किंवा क्रांतिकारक म्हणता येईल. उत्पादनाच्या साधनांवर व उपकरणांवर उत्पादनाची पद्धती व उत्पादनाचे संबंध अवलंबून असतात आणि उत्पादनाच्या संबंधावर सामाजिक संबंध, म्हणजेच सांस्कृतिक विकास अवलंबून असतो, असा आधुनिक भौतिकवाद्यांचा एक सिद्धान्त आहे. त्यात बराच तथ्यांश आहे. सांस्कृतिक विकास कशाला म्हणायचे, याचा अगोदर निर्णय करणे आवश्यक आहे. संस्कृती म्हणजे इतरांबरोबर राहाण्याची कला. 'इतर' म्हणजे आपणांहून निराळे, स्वतःहून आणि स्वकीयांहून भिन्न जे परके असतील त्यांना स्वकीय बनविणे आणि जे लांबचे असतील त्यांना जवळ करणे हा जीवनाच्या व्यापकतेचा अभ्यास आहे. या अभ्यासाचा परिणाम म्हणून जीवनातील आपला व परका हा भेदच निघाला म्हणजे सबंध 'वसुधा' हेच कुटुंब झाले. चारचौघांत जगता येण्यालाच आपण 'सभ्यता' किंवा 'शील' म्हणतो. या चारचौघांबरोबर जगता येणे हीच सभ्य जीवनाची कला म्हणता येईल. हिलाच संस्कृती म्हणतात. संस्कृती म्हणजे वागण्याची रीत. ज्याची वागण्याची रीत चारचौघांबरोबर जगण्याला पोषक असेल त्याची संस्कृती उन्नत, प्रगतिशील आणि मानवतेच्या विकासाला अनुकूल. ज्याची वागण्याची रीत चारचौघांबरोबर वागण्याला बाधक त्याची संस्कृती हीन, प्रतिगामी आणि मानवाच्या विकासाला प्रतिकूल. अर्थात व्यापक जीवन म्हणजेच सुसंस्कृत जीवन हा सिद्धांत निष्प्रभ झाला. व्यापक जीवन म्हणजे स्वतःच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनाची कक्षा सारखी रुंद करीत जाण्याचा प्रामाणिक प्रयत्न. जीवनाची व्याप्ती वाढविण्याच्या दोन पायऱ्या आहेत. एक इतर माणसांना म्हणजे इतर धर्मांतील, सांप्रदायातील, प्रांतातील व जातीतील व्यक्तींना आपल्या जीवनात दाखल करून घेण्याची प्रक्रिया आणि दुसरी म्हणजे मानवेतर जीवांना आपल्या

संसारात सामील करून घेण्याची प्रक्रिया. इतर मानवांशी व मानवेतर जीवाशी संबंध जोडण्याच्या बाबतीत दोन प्रकारच्या प्रबल वृत्ती दिसून येतात. एक प्रभुत्व-वृत्ती आणि दुसरी मित्रत्व-वृत्ती. प्रभुत्वाकरिता किंवा मित्रत्वाकरिता इतरांशी नाते जोडण्याची आकांक्षा मानवमात्रात अत्यंत स्वाभाविक होऊन बसली आहे. इतरांवर आपला अंमल गाजविण्याची किंवा स्वतःच्या मर्जीप्रमाणे इतरांचा उपयोग करून घेण्याची जी भावना, तिचे नाव प्रभुत्व-भावना. एक व्यक्ती इतरांवर वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करते, पण ज्यांच्यावर ती आपले वर्चस्व गाजविते त्यांचाही स्नेह आणि कृतज्ञताबुद्धी संपादन करता यावी अशी आकांक्षा तिला असतेच. मानवेतर प्राण्याच्या बाबतीतही मानवाच्या ठिकाणी ही आकांक्षा असल्याचे नित्य प्रत्ययाला येते. माणसे राघू पाळतात, कुत्री पाळतात, हरिण पाळतात, फार काय कोंकरे खाणारे लोकदेखील एखादे आवडते कोंकरू बाळगतात. माणसाचा कुत्र्याच्या बाबतीतील सहृदभाव सार्वभौम व प्रसिद्धच आहे. माणूस ज्याला पोशीत नाही असा प्राणी नाही. सर्कशीत वाघ, सिंह, अस्वल, मुंगूस, माकड यांच्यासारख्या अनेक प्राण्यांवर आपला अंमल कसा चालतो हे दाखविण्यात माणसाला जसे भूषण वाटते त्याचप्रमाणे जेव्हा ते प्राणी आपापल्या पद्धतीने त्याच्याविषयीचा आपला स्नेहभाव व्यक्त करू लागतात तेव्हा त्याला धन्यता वाटते. प्रभुत्व भावनेत माणसाला 'अहंतृप्ती' लाभत असेल, पण मित्रलाभाने त्याच्या जीवनात प्रसाद निर्माण होतो. मनुष्येतर प्राण्यांना मानवी कुटुंबात अथवा समाज जीवनात बरोबरीच्या नात्याने दाखल करून घेता येणार नाही हे उघडच आहे. पण कुटुंबाच्या किंवा समाजाच्या संसारात मानवेतर प्राण्याची उपयुक्तता जितकी अधिक तितकेच त्याचे स्थान अधिक महत्त्वाचे व अढळ राहील. अर्थात जीवनात व्यापकतेच्या दृष्टीने मानवाच्या सांस्कृतिक विकासात मानवेतर प्राण्याचे स्थान अत्यंत महत्त्वाचे

ठरते. सांस्कृतिक उन्नती आर्थिक व्यवस्थेवर अवलंबून आहे हा सिद्धांत आपण मान्य केलेलाच आहे. म्हणून आर्थिक संयोजनात मानवेतर प्राण्यांचे स्थान असले पाहिजे हे क्रमप्राप्त ठरते. कारण एरवी मानवी जीवन यंत्रमय होईल आणि माणूसही यंत्राकार बनेल. गाईगुरात राहून राहून गोपालही 'गोमय' होतो. अशा अर्थाचे एक संस्कृत सुभाषित आहे–'गवां संसर्ग मात्रेण गोपो भवति बालिश:' त्याचप्रमाणे यंत्राच्या निर्जीव संसर्गाचा परिणाम यांत्रिक जीवनात होणे अशक्य नाही. शुष्क व जीवनविमुख धर्मशास्त्राने मानवाच्या जीवनात तांत्रिकता आणली. भौतिक-शास्त्रे 'यांत्रिकता' आणतील. तंत्रवादाने माणुसकीची गळचेपी केली. यंत्रवादही तिचा कोंडमारा केल्यावाचून राहाणार नाही. म्हणून यंत्राचे वावडे नाही. विज्ञानांचे तर नाहीच नाही. विज्ञा-नाच्या प्रगतीची मर्यादाही बाधायची नाही. विज्ञानाची अखंड व अबाधित प्रगती हवी आणि यंत्रशक्तीचाही अबाधित उपयोग बिनदिक्कत करावा. पण जीवनाच्या संपन्नतेच्या वादात जीवनाच्या व्यापकतेचा विसर पडू नये एवढीच गांधीजींची नम्र मागणी आहे. जीवनाच्या व्यापकतेत आर्यता आहे, सभ्यता आहे, जीवनाच्या संकोचात अनार्यता आहे, माणुसकीचा ऱ्हास आहे.

पण यंत्रवादाने माणसाला 'यंत्रजडत्व' येऊ नये आणि तंत्रवादाने त्याला 'तंत्रजडत्व' येऊ नये याबद्दल सावध राहाणे जितके आवश्यक आहे, तितकेच आवश्यक माणूस हा पशुनिष्ठेने जड पशुपूजेत रत होऊन मानवप्रेमाला पारखा होऊ नये हेही आहे. मानवी सहानुभूतीचा विकास भूतदयेत होणे निराळे आणि पशु-संगोपनाच्या नादी लागून मानवी बंधुभावाला मुकणे निराळे. पहिल्या प्रक्रियेत जीवनाची व्यापकता आहे, दुसऱ्या प्रक्रियेत जीवनाची परागती व अमानुषता आहे. 'गाय ही विधात्याने करुणेवर केलेली कविता होय.' या सुंदर काव्यमय शब्दांत

तिचा गौरव करणाऱ्या गांधीजींनी तिला मानवापेक्षा श्रेष्ठ कधीच मानले नाही.

अर्थयोजनेचा परिणाम मानवी संबंधावर होतो हे निर्विवाद आहे. ज्या अर्थव्यवस्थेत काही व्यक्तींकडे उत्पादनाच्या साधनांची मालकी असते त्या व्यवस्थेत सामान्य माणसाचे व्यक्तित्व नाहीसे होऊन तो केवळ एक साधन बनून जातो. सरंजामशाहीत भूमिधनाचे व पशूधनाचे महत्त्व असते. ज्याच्याजवळ जितकी भूमी व गोधन असेल तितका तो गबर. सरंजामशाही व्यवस्थेत शेतावर राबणाऱ्या माणसालाही जवळजवळ गुरांइतकेच महत्त्व असते. आर्थिक दृष्टीने तो पशुवत नसला तरी पशुतुल्य असतो. म्हणजे घोडा व बैल यांच्याप्रमाणेच तो एक उत्पादनाचे फक्त साधन बनून जातो. उत्पादन हे त्याच्या उपयोगाकरिता नसते. तो निर्माता असला तरी भोक्ता नसतो. सरंजामशाहीत जे धराधीश असतात तेच नराधीश बनतात. मानवाला आर्थिक योजनेत पशुत्वाच्या कोटीला पोचविण्यास सरंजामदारी पद्धती कारणीभूत झाली म्हणून तिचा नायनाट केल्याखेरीज गुरांची माणसे बनविता येणे अशक्य आहे आणि गुरांची माणसे बनविणे हे तर गांधीप्रणित अर्थविज्ञानाचे पहिले कलम आहे.

सरंजामी पद्धतीत माणसांची गुरे बनली तशी भांडवलशाही पद्धतीत माणसे अवजारे बनली आहेत. उत्पादनाची काही साधने अचेतन आहेत, आणि काही सचेतन आहेत. जी सचेतन साधने आहेत त्यांना आपण 'मजूर' म्हणतो. विज्ञानाची कितीही प्रगती झाली तरी जोपर्यंत 'मालकशाही' शिल्लक राहील तोपर्यंत माणूस हा साधनच राहील. अवजारांची माणसे बनविण्याकरिता भांडवलशाही पद्धतीचा म्हणजे मालकशाहीचा समूळ उच्छेद झाला पाहिजे हे उघड आहे. म्हणून गांधी-कल्पित आर्थिक स्वास्थ्याच्या

किंवा अर्थशास्त्रज्ञाच्या योजनेत सरंजामदारी किंवा भांडवल-दारीचा लवलेशही अवशिष्ट राहील हे शक्य नाही.

अवजारांची माणसे बनविणे याचा आणखी एक अर्थ आहे. अवजारांच्या प्रयोगात व यंत्राच्या शोधात मानवी जीवनाची प्रगती आहे हे इतिहासप्रसिद्ध आहे. पण अवजारांच्या व यंत्राच्या प्रयोगाने मानवी शरीराची कार्यक्षमता, तरतरी व प्रतिकारक्षमता कमी न होता त्या गुणात भर पडली तरच ती प्रगती यथार्थ ठरेल, एरवी नाही. हल्लीच्या परिस्थितीत परिश्रमही ' वेठ ' आहे. कारण तो बहुधा स्वतःच्या अभिमानाविरुद्ध, प्रवृत्तीविरुद्ध आणि मर्जीविरुद्ध करावा लागतो. श्रमाविषयी एकप्रकारची अरुची व कमीपणाची भावना निर्माण झाली आहे. श्रम जितका माणसाच्या आवडीला, त्याने प्राप्त केलेल्या विशिष्ठ योग्यतेला आणि सोयीला अनुकूल असेल तितका तो जीवनाचे तेज व क्षमता वाढवितो. आज परिश्रमात मौज किंवा गोडी तर वाटत नाहीच, पण त्याबद्दल कळकळही वाटत नाही. पोटाकरिता निराळ्या प्रकारचे श्रम करून शरीराचे सौष्ठव, चपळता आणि कार्यक्षमता वाढविण्याकरिता निराळ्या प्रकारचे श्रम शोधावे लागतात. त्यांना आपण व्यायाम आणि खेळ म्हणतो. स्वतःच्या मर्जीप्रमाणे व आवडीप्रमाणे माणूस जो उद्योग करतो त्याला आपण त्याचा ' नाद ', ' छंद ' (हॉबी) किंवा हौसेचा व्यवसाय म्हणतो. माणसाला पोहूनपोहून, धावूनधावून किंवा उठाबशा काढूनकाढून शरीर शिणविण्यात भूषण किंवा गम्मत वाटावी, पण उत्पादक किंवा उपयुक्त शरीरश्रमात वाटू नये, याला मुख्यतः भांडवलदारी सभ्यतेत रुढ झालेल्या सामाजिक प्रतिष्ठाच कारणीभूत आहेत. करमणूक व काम यातील अंतर कमी-कमी करावयाचे असल्यास या सामाजिक प्रतिष्ठा बदलल्यावाचून गत्यंतर नाही. एरवी उत्पादनाकरिता करायचा श्रम निराळा आणि शरीराची क्षमता व उपयुक्तता वाढविण्याकरिता करावयाचा श्रम निराळा, असे

दोन कप्पे पडून आर्थिक जीवनाचा सांस्कृतिक जीवनाशी अभेद्य संबंध राखता येणार नाही. आर्थिक जीवनाचा सांस्कृतिक जीवनाशी बेमालून सांधा जोडता यावा म्हणून अलीकडे समाजवादी वळणाच्या राष्ट्रात उत्पादक परिश्रम सुखकर व शिक्षणप्रद व्हावा असा प्रयत्न चालू आहे. असे झाले तरच यंत्राच्या साहाय्याने मानवाच्या कौशल्याचा व बुद्धीचा उत्कर्ष होईल. अन्यथा तो यंत्रवत् व यंत्रतुल्य बनून जाईल. म्हणून 'यंत्रविरोध' ज्याप्रमाणे प्रतिगामित्वाचा द्योतक आहे, त्याचप्रमाणे मानवी शरीराची व मानवोपयोगी पशूंची उपयुक्तता वाढविण्याची दखल न घेणारा यंत्रवादही आधुनिक असला तरी प्रतिगामीच. त्यामुळे गांधींनी भौतिकशास्त्राच्या विकासाशी शरीरश्रमाच्या प्रतिष्ठेचा समन्वय करण्याचा प्रयत्न केला. यंत्रांनी मानव व मानवोपयोगी पशूंचे स्थान न बळकावता त्यांच्या उपयुक्ततेत व आनंदात भर घातली पाहिजे, हा त्यांचा कटाक्ष होता.

माणसाला उपकरणाचे स्वरूप प्राप्त होऊ नये म्हणून आणखी एका बाबतीत दक्षता बाळगावी लागेल. कष्ट व कला यांच्यातील फरक कमी-कमी करावा लागेल. कारागिरी व मेहनत, हमाली अथवा कुशल श्रम व अकुशल परिश्रम, हुन्नर व हाडमारी यांच्यातील अंतर तोडण्याचे प्रयत्न अद्यतन समाजवादी अर्थयोजनेत होत आहेत असे म्हणतात. कारागिरी म्हणजे निर्मितीची कला. निर्मितीच्या व्यापारात माणसाच्या विशिष्ट गुणांचा विकास होतो. यालाच व्यक्तित्वाचा विकास म्हणतात. माणूस हा साधन न बनता साध्य राहावा, उपकरण न बनता व्यक्ती राहावा, हा आर्थिक संयोजनाचा हेतू आहे. म्हणून माणसाच्या व्यक्तित्वाच्या विकासाकरिता उपकरणेही त्याच्या इंद्रियाच्या कौशल्यात भर घालणारी असली पाहिजेत, तरच जीवनात वैभवाबरोबर सौंदर्य येईल आणि अर्थव्यवस्थेतून सांस्कृतिक उन्नती साध्य होईल.

सारांश, गांधीजींची गाईविषयी आस्था म्हणजे गोब्राह्मण प्रतिपालक क्षत्रियांचे गोप्रतिपालन किंवा गोपूजक वैश्यांचे गोरक्षण नव्हे. जीवनाची सुख-समृद्धी ही जीवनाच्या व्यापकतेला उपकारक व्हावी, नव्हे त्यांच्यात उत्तरोत्तर अभेद स्थापन व्हावा एवढाच काय तो गांधींचा कटाक्ष. त्यादृष्टीने त्यांचा आग्रह असा की, मानवाच्या अर्थ-व्यवस्थेत जेथे पशूंची आधीच योजना झालेली असेल, तेथे तो कायम ठेवूनच यंत्रीकरण करावे. कारण आर्थिक मूल्ये ही जीवनमूल्यांची साधने आहेत. जीवनमूल्येच अन्तिम व निरक्षेप आहेत.

‘ हातोडा व कोयता ’ यांच्याप्रमाणेच ‘ चरखा ’ हेही श्रम-प्रतिष्ठेचे प्रतीक आहे. उत्पादनाचे उपकरण हे उत्पादक–परिश्रमाचे प्रतीक आहे. केंद्रीकरण किंवा विकेंद्रीकरण हा काही अंतिम किंवा निरपवाद सिद्धांत नाही. आर्थिक समृद्धी व समविभाग यांची ती साधने आहेत. या दृष्टीने जुन्या जमान्यातील म्हाताऱ्या बाया, कुलीन कुमारिका किंवा सुखवस्तू गृहिणी यांच्या चरख्यात आणि गांधींच्या चरख्यात, भंग्यांच्या केरसुणीत आणि गांधींच्या केरसुणीत तात्त्विक व मूलभूत भेद आहेत. म्हणून त्यांचा ‘चरखा’ भगवान बुद्धाच्या ‘ धर्मचक्रात ’ विलीन होऊ शकला. आर्थिक स्वास्थ्याचा परिणाम सामाजिक स्वस्थतेत हमखास होणार या निष्ठेचे ते निदर्शक आहे. समृद्धी आणि स्वास्थ, पुष्टी आणि शांती यांच्यात अभेद स्थापन झाल्यावाचून ‘जीवन’ हेच सर्वश्रेष्ठ मूल्य सिद्ध होणार नाही.

विषमतेसारखे बंधुत्वाला विघातक दुसरे काहीही नाही. विषमतेमुळे परस्परविरोधी स्वार्थसंबंध अस्तित्वात येतात. एकाचे जे अन्न तेच दुसऱ्याचे विष ठरते. एकाचा उत्कर्ष हाच दुसऱ्याचा अपकर्ष ठरतो. त्यामुळे मत्सर व परोत्कर्षासहिष्णुता यांचा अंमल सुरू होतो. म्हणून विषमतेचा नायनाट करणे ही आर्थिक संयो-

जनाची पहिली प्रतिज्ञा असली पाहिजे. बुभुक्षेसारखे दुसरे पापप्रेरक कारण नाही. म्हणून बुभुक्षा नाहीशी करून क्षुधा लागण्यासारखी आणि ती तृप्त होण्यासारखी परिस्थिती निर्माण करणे ही आर्थिक संयोजनाची दुसरी प्रतिज्ञा असली पाहिजे. आणि मानवी जीवन हे जसजसे संपन्न होत जाईल, तसतसे ते व्यापकही करीत जाणे ही आर्थिक संयोजनाची तिसरी प्रतिज्ञा असली पाहिजे. म्हणजेच समता, सुबत्ता आणि बंधुता ही आर्थिक संयोजनाची साध्ये असली पाहिजेत.

गांधींचे अर्थविज्ञान थोडक्यात असे आहे. त्यात तंत्रनिषेध नाही. यंत्रीकरणालाही विरोध नाही. त्यात वैभवाचा निषेध नाही. पण जीवनाची समृद्धी जीवनाच्या व्यापकतेने मर्यादित व्हावी, विज्ञानाच्या प्रगतीची परिसीमा मानवी बंधुत्वाच्या स्थापनेत व्हावी म्हणून अर्थविज्ञान हे स्वार्थविज्ञान राहू नये, अर्थकारण अनर्थाचे मूळ ठरू नये, असा इषारा या मानवनीतीच्या प्रस्थापकाने दिला आहे. म्हणून त्याने फक्त अर्थसमृद्धी व अर्थसाम्याबरोबर अर्थशुद्धीचेही प्रतिपादन केले आहे.

गांधींची विभूती अनेक दृष्टीने अभूतपूर्व होती. जीवनाचा इतक्या समग्रतेने, जीवनातील सत्याच्या आविष्करणाच्या दृष्टीने इतका सांगोपांग विचार यापूर्वी इतर कुणी केला असेल की नाही याची शंकाच आहे. जीवन हेच परमसत्य आहे. त्याची सगळी अंगे व उपांगे मिळून एक अखंड पूर्णांक बनलेला आहे, हे सत्य माणसाच्या रोजच्या व्यवहारात साकार करण्याचा प्रयत्न गांधींनी केला. हीच त्यांची जीवनसाधना. या साधनेलाच त्यांनी 'सत्याचे प्रयोग' हे नाव दिले. गांधींनी कुठलेही आयते तत्वज्ञान स्वीकारून त्याचप्रमाणे जीवन घडविण्याचा प्रयत्न केला नाही. माणसा–माणसाच्या संबंधामध्ये जीवनाच्या एकतेकडे सारखी वाटचाल

म्हणजे सामाजिक प्रगती व प्रयोग म्हणजे त्या दिशेने केलेले सतत प्रयत्न. प्रयत्न म्हटला की यशापयश आलेच. पण प्रयोग ठरावीक दिशेने असला तर त्यातील अपयश, खरे म्हणजे अपयश नसून अल्पयश असते. प्रयोग-वीराच्या वाट्याला अल्पयश येते. अशा अल्पयशासही अनेक प्रयोगानंतर सिद्धी मिळते. सिद्धी म्हणजे पूर्ण यश. याचा अर्थ असा की गांधींचे सारे दर्शन त्या प्रयोगांतून त्यांना उमगले. म्हणून ते तत्वज्ञान नव्हे, ते दर्शन आहे.

माणसांच्या स्वार्थामध्ये विरोध असला म्हणजे त्यातून चुरस, चढाओढ व विरोध उत्पन्न होतो आणि शेवटी याचा परिणाम संघर्षात किंवा लढ्यात होतो. असा लढा निरंतर चालला तर माणसांचे एकमेकांबरोबर राहाणे अशक्य होते. संघटनेत किंवा संस्थेत एकत्र आले तरी मनात वितुष्ट असते, वैमनस्य असते. गांधींना हे खपले नाही. एकत्र राहाणे किंवा बरोबर राहाणे म्हणजे गुण्यागोविंदाने राहाणे, खेळीमेळीने राहाणे, एकमेकांस जगविण्यास जगणे असे गांधींचे सोपे व सुटसुटीत जीवनसूत्र होते हे सूत्र जीवनात साकार करायचे तर राज्यसत्ता, मालकी, मिळकत आणि हत्यार व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या गटाच्या हातांत असू नये हे सहज लक्षात येण्यासारखे आहे. कारण सत्ता, संपत्ती व शास्त्र ही माणसांना जोडणारी साधने नाहीत; तोडणारी आहेत. म्हणून माणसा-माणसांच्या संबंधात याची लुडबुड नको. हे गांधींनी ठामपणे ठरविले व त्यात यश मिळविण्याकरता उपाय शोधण्याच्या उद्योगास ते लागले. यातून माणसा-माणसाचा वैरभाव नाहीसा करावयाचा तर भांडण निर्माण करणाऱ्या साधनांच्या ऐवजी वेगळी साधने योजली पाहिजेत, हे ओघानेच आले. म्हणून प्रतिकाराचा असा मार्ग त्यांनी शोधला की, ज्याच्यायोगे भांडणाचे कारण नाहीसे करता येईल. पण ते करीत असताना माणसे मनाने एकमेकांच्या जवळ येतील. याचेच नाव सत्याग्रह. प्रति-

काराने वाईटाचा नायनाट होईल. समाजातील माणसांमध्ये जवळीक निर्माण होईल. मिळकतीची मालकी कुणाकडे नसली, ती देवाकडे म्हणजेच समाजाकडे असली, तर भांडणाचे मूळ नाहीसे होईल. समाज म्हणजे माणसांची गर्दी किंवा संख्या नव्हे. ज्या माणसांत गोडीगुलाबीचे, सलोख्याचे व आपुलकीचे संबंध असतात त्याचा समाज बनतो, मग ती संघटीत असोत किंवा नसोत. माणसामाणसांतील स्नेहसंबंध म्हणजेच समाज. या दृष्टीने समाजाची मालकी म्हणजे देवाची मालकी. हुकमत, मिळकत यांच्यावरील मालकी गेली की मग हत्याराचे प्रयोजनच नाही.

मिळकतीवरील ही मालकी नाहीशी करण्याकरिता गांधींनी सलोख्याचा जो मार्ग शोधून काढला, त्याचे नाव 'ट्रस्टीशिप. हा मालक, तो नोकर, हा मजूर, तो महाजन, हा राबणारा, तो काम घेणारा, हा कष्ट करणारा, तो कष्टाची किमत देणारा–हे संबंध माणसामाणसांतील आपुलकीला विघातक आहेत.

पण गंमत अशी आहे की, विघातक संबंधांमुळे कष्ट करणारा हैवान बनतो व कष्टाचे मोल देणारा सैतान बनतो. तरी दर एक कष्टकऱ्याला मालक बनण्याची भयंकर आकांक्षा असते. म्हणजे आजचा मजूर व आजचा गरीब हे मालक व श्रीमंत बनू इच्छितात. म्हणजे काय, की आपण सारेच सैतान बनू इच्छितो. याने माणुसकीचा विकास कसा होईल ? अमीर, गरीब, मालक, मजूर या काही जाती नाहीत. आजचा गरीब उद्या अमीर बनतो व आजचा अमीर उद्या भणंग भिकारी बनतो, हे आपण नेहमी बघतो. म्हणून अमीर म्हणज सैतान व गरीब म्हणजे हैवान हा समज पूर्णपणे चुकीचा आहे. दोघांनाही इन्सान बनण्याची तळमळ लागली पाहिजे. इन्सान बनण्याच्या दृष्टीने अमीरीदेखील संकटच आहे. कारण अमीराला नेहमी भीतभीत राहावे लागते म्हणून तो आपली अमीरी सांभाळण्याकरता व स्वतःची अब्रू सांभाळण्या-

करिता भाडोत्री माणसे ठेवतो व त्याचे त्यांना भाडे देतो. भाडोत्री माणसांच्या भरोशावर ज्या अमीराची, अमिराच्या इभ्रतीची राखणदारी होते, ती इभ्रत व ती मिळकत, खरे पाहाता, त्या राखणदारांचीच होऊन जाते. तिकडे राखण करणारा दुसऱ्याचे संपत्तीचे व प्रतिष्ठेचे ओझे वाहून शुद्ध हमाली करतो आणि केव्हा सुटका होईल, केव्हा आपण अमीर बनू याची आतुरतेने वाट पाहात असतो. हे काय जगणे झाले ? भित्रेपणा व लोभ काय माणसाचा स्वभाव आहे ? तसे असते तर त्याने त्यांचा इन्कार केला नसता. आपण कुणाला भित्रे अगर लोभी म्हटले, हावरा म्हटले तर तो म्हणतो, ' छे, छे, मी काही भित्रा नाही आणि मी लोभीही नाही ' असे म्हणून आपली फुशारकी मिरवण्याकरता आपली बहादुरीची व उदारपणाची काही उदाहरणे देतो. म्हणजे काय, की लोभ व भय माणसाचा स्वभाव नव्हे. ते विकार आहेत. दोष आहेत. पण माणसे गरीब-अमीरीचे ओझे वाहतात. यावर उपाय काय ?

सगळ्यांनी मिळून सुख व दुःख, काम व आराम, अमीरी आणि गरीबी वाटून घ्यायला पाहिजे. आजही कुणी सुख किंवा दुःख आप्पलपोटेपणाने भोगू शकत नाही. बारशाला वा मर्तिकाला, लग्नाला वा श्राद्धालाही आपण सारे अमीर–गरीब इतरांना बोलवून घेतो आणि जेवू घालतो; तेही त्यांचा सत्कार करून. आनंद असला, उत्सव असला तरी त्यात इतरांना सामील करून घेतो. हा स्वभाव आहेच. हा स्वभाव सत्ता व संपत्तीलाही लागू झाला पाहिजे.

पण यात एक अडचण आहे. आपल्याला स्वातंत्र्य तर हवे आहे, पण जबाबदारी नको. स्वातंत्र्य व जबाबदारी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. स्वातंत्र्य हवे असेल तर जबाबदारी टाळता येणे शक्य नाही. काम करणारा वेगळा व कामाचा हिशेब घेणारा वेगळा. एक मजूर व दुसरा मुकादम, हे नातेसुद्धा माणुस-

कीला मानवण्यासारखे नाही. कारण कामावर देखरेख ठवणारा व्यवस्थापक किंवा मॅनेजर होऊन बसतो आणि त्याच्या हाताखाली काम करणारा त्याचा ताबेदार होऊन बसतो. स्वातंत्र्याला मालकशाहीचे जसे वावडे आहे, तसेच व्यवस्थापकशाहीचेही आहे. मग काय करावे ? यातून मार्ग असा की, श्रमाचा संबंध उत्पादनाशी असावा. मोबदल्याशी किंवा उपभोगाशी नव्हे. श्रम सगळयांच्या उपभोगाकरिता, फक्त आपल्या उपभोगाकरता नव्हे. जे उत्पादन होईल ते सर्वांचे, त्याचे वाटपही गरजेप्रमाणे व शक्य झाल्यास आवडीप्रमाणे होईल. आपण घरात तसेच करतो. पुरुष लाकडे फोडतो, ते साऱ्या कुटुंबाकरिता. घरातील मुख्य बाई भाकरी बनवते, त्याही सगळयांकरिता. त्यातही गंमत अशी की फक्त हिशोबाप्रमाणे बनवत नाही. म्हणजे पाच माणसे व दहा माणसे असा हिशोब नाही करीत. पाच माणसांपैकी म्हाताऱ्याकरिता वेगळया प्रकारची एकच भाकरी. लहान मुलाकरिता चिमुकल्या चाणक्या पण वाटोळया गरगरीत आणि प्रौढांकरिता सामान्य भाकरी असा तिचा विवेक असतो. कारण हे काही नुसतेच उत्पादन नव्हे. एकमेकांच्या गरजेचाही त्यात विचार आहे. याचेच नाव कौटुंबिकता. सारा समाजच आपले कुटुंब बनला पाहिजे. म्हणजे आपला शेजारी, आपला नातलग आणि जगातील सर्व माणसे आपले शेजारी. म्हणजे सारे विश्वच आपले कुटुंब बनते. अशारीतीने रक्ताचे नाते व सोयरीकीचे नाते संपूर्ण होते. आपल्या घराचे आवार आभाळाएवढे होऊन जाते. कुंपणे व भिंती उरतच नाहीत. हे ट्रस्टीशिपचे भव्यदिव्य स्वप्न आहे.

आपण एखाद्या-दुसऱ्याची वस्तू सांभाळायला ठेवली म्हणजे तिला दुसऱ्याची ठेव मानतो. मोठ्या कसोशीने सांभाळून ठेवतो. तर ज्याच्याकडे वस्तू सांभाळायला सोपवली जाते त्याचे नाव ट्रस्टी, म्हणजे विश्वस्त. भरवशाचे माणूस. सांभाळायला जो ऐवज दिला जातो, त्या वस्तूला 'ट्रस्ट' म्हणतात. म्हणजे विश्वासाने

ठेवलेली ठेव. तेव्हा ठेवीदार किंवा ट्रस्टी हा झाला ' विश्वस्त. ' आणि जी वस्तू ठेव म्हणून दिली ती ट्रस्ट. ह्याचे नांव ' विश्वस्त योग.' गांधींची ट्रस्टीची योजना ती हीच. देवाने किंवा योगायोगाने ज्याचे हातात संपत्ती आली असेल त्याने ती समाजाची ठेव मानावी. स्वतःच्या मालकीची मानू नये. जे उत्पादन करीत असतील त्यांनी आपले श्रम व त्यातून होणारे उत्पादन हेही समाजाचेच मानावे. स्वतःचे नव्हे. अशी विलक्षण खुबी या योजनेत आहे. कर लावून संपत्तीचा क्षय करणे फार कठीण आहे. कारण कर देणारा युक्ती-प्रयुक्तीने कर चुकवतो. राज्याने संपत्ती जप्त करण्याचा घाट घातला तर त्यातूनही पळवाट काढता येते. गरीबांनी ती बळकावून घेण्याचा प्रयत्न केला तर बळकावणारेच अमीर बनतील व इतरांनी ती बळकावू नये म्हणून सतत काळजी घेतील. तेव्हा टॅक्स, जप्ती अगर बळजबरीने हिरावून घेणे, हे सारे मार्ग अपुरे आहेत. त्यांनी माणसांची मने विटतात व नासतात. अशा विटक्या–नासक्या मनाची माणसे कशाप्रकारचे जग बनवतील ? ते माणसाच्या जगण्याच्या लायकीचे तरी असेल काय ?

लोक म्हणतील हे स्वप्न मोठे गोंडस आहे, पण ते प्रत्यक्षात येणे अशक्य आहे. जे शक्य असेल तेवढेच करणे म्हणजे राजकारण. त्याने समाज–परिवर्तन होत नाही. आहे तीच व्यवस्था टिकून राहाते. पण आपल्याला तर समाज मुळापासून बदलायचा आहे. त्याचे सूत्र आहे–' अशक्य ते शक्य करणे. ' याचे नाव क्रान्ती. भारताचे स्वराज्य अशक्य वाटत होते, ते शक्य झाले. लोकांमध्ये पुरुषार्थाची प्रेरणा जागी झाली. गांधींच्या पूर्वीपर्यंत सर्व महापुरुषांनी प्रयत्न केले त्यांना थोडे थोडे यश आले. म्हणून शेवटी गांधींना यश येऊ शकले. काल जे अशक्य होते ते आज शक्य करून दाखवू, हा आहे क्रान्तिकारकाचा बाणा. तो आपण स्वीकारला तर यश लाभल्यावाचून राहाणार नाही.

# गांधींचे उत्तराधिकारी जवाहरलाल

देशासमोर आणि जगासमोर जे प्रश्न उभे असतात त्यांचा अभ्यास करण्याची माझी भूमिका असते. हा अभ्यास मी शक्यतो अत्यंत तटस्थतेने करतो. तुम्हा लोकांसमोर 'गांधींचे वारस जवाहरलाल' याविषयी मी काही मते मांडणार आहे. आपल्या हे लक्षात येईल की, या माझ्या निवेदनात मी कुठलाही निश्चित निष्कर्ष, परिणाम किंवा निर्णय व्यक्त करीत नाही. आपण एकत्रितरीत्या यावर विचार करू. जेथपर्यंत मी विचाराने पोचू शकतो त्याच्याही पुढे तुम्ही जाऊ शकाल, असा माझा प्रयत्न राहील.

जवाहरलाल नेहरूंना गांधीजींचे वारस किंवा उत्तराधिकारी म्हणत असताना मला एक गोष्ट आधीच स्पष्ट केली पाहिजे की, मी या निमित्ताने गांधी आणि जवाहरलाल यांची कुठलीही तुलना करत नाही. एका माणसाची दुसऱ्या कुठल्या माणसाशी तुलना होऊच शकत नाही. तशी ती होऊही नये. जे माणसांची तुलना

करतात ते एका मोठ्या अहंकारी भूमिकेचा स्वीकार करतात, असे मला वाटते. शेवटी मनुष्य कशाने मोजायचा ? त्याचे नेमके मोजमाप काय ? एका ग्रीक तत्त्वज्ञाने असे सांगितले होते की, बाकी सर्व गोष्टींचे मूल्यमापन मानवामुळे होऊ शकते, पण मानवाचे मूल्यमापन त्याच्या स्वत:च्यामुळे होऊ शकत नाही. एक माणूस दुसऱ्या माणसाचे मूल्यमापन बनू शकत नाही. ज्याला आपण युग किंवा काळ म्हणतो, त्याच्या दृष्टीनेही माणसाचे असे मोजमाप करणे योग्य होत नाही. मनुष्य म्हणजे केवळ एक ऐतिहासिक घटना नव्हे. त्याचे जीवन इतिहास निर्मिती करणारेही असते. एकदा इमरसन्‌ने सांगितले होते की, 'There is no history, there is only biography' जगाला इतिहास नाहीच, त्याला फक्त जीवनचरित्र आहे. मी आपल्याला हे सांगू इच्छितो की, जगाला केवळ जीवनचरित्रच नसते, तर जीवनचारित्र्यही असते आणि या जीवनचारित्र्याला आपण एखाद्या माणसाचे 'जीवनरहस्य' म्हणतो. गांधींच्या चारित्र्यात आणि जवाहरलालजींच्या चारित्र्यात कसलीही तुलना नाही. त्यांचा परस्परांशी जो हार्दिक अनुबंध होता, तेवढाच मला तुमच्यासमोर ठेवायचा आहे.

गांधीजी सत्यनिष्ठ होते, आणि जो सत्यनिष्ठ असतो त्याचा कोणी अनुयायी किंवा शिष्य नसतो. अनुयायी किंवा शिष्य, ज्याला आपण व्याकरणात 'उत्तमपुरुष' किंवा 'प्रथमपुरुष' म्हणतो, तसा नसतो. तो 'मध्यम पुरुष'ही नसतो. तो असतो 'अधम पुरुष'. कारण तो दुसऱ्याचा अनुवाद, त्याची प्रतिलिपी किंवा नक्कल असतो. असा माणूस मूळ पुरुष किंवा उत्तम पुरुष असूच शकत नाही. तसे पाहिले तर प्रत्येक माणूस मूळ पुरुष असतो. मला पुन्हा एकदा इमरसनची आठवण येते. '...Common man? There are no common men, every talent has its apotheosis.' माणसात जेवढे गुण असतात, जितकी शक्ती असते, त्या सर्वांचा कुठे ना कुठे तरी एक दैवी आविष्कार होतच असतो.

म्हणून कोणीही मनुष्य दुसऱ्या माणसाची नक्कल होऊ शकत नाही. प्रत्येक मनुष्य स्वतःच 'युनिक' असतो, अपूर्व, अद्वितीय असतो. गांधी जसे अद्वितीय होते, तसेच जवाहरलालजीही अद्वितीय होते. आणि तरीही त्या दोघांच्या जीवनामध्ये एक अनुबंध होता, सामंजस्य होते. Individual चा अर्थ आहे, जो divisible नाही तो. म्हणजे ज्याचे तुकडे होऊ शकत नाही असा. प्रत्येक मनुष्य या अर्थाने स्वतः एक पूर्णांक असतो. जवाहरलालजी स्वतः एक पूर्णांक होते, तर गांधीजीही स्वतः एक पूर्णांक होते.

रशियन भाषेत एक म्हण आहे. 'You cannot put one man's head on another man's shoulder.' तुम्ही एका माणसाचं डोकं दुसऱ्या माणसाच्या खांद्यावर ठेवू शकत नाही. पण आज सर्वत्र काय चाललेले दिसते ?....There is an attempt to put one man's head on everybody's shoulder' हेच की, एका माणसाचं मस्तक सगळ्यांच्या धडावर, सगळ्यांच्या खांद्यावर कशाप्रकारे ठेवले जाऊ शकेल ? याला Mass-indoctrination म्हणतात. म्हणजे लोकांच्या डोक्यात एक विशिष्ठ विचार ठासून भरण्याचा प्रयत्न. त्यामुळे ज्याला आपण efficient disciplined action म्हणतो, म्हणजे प्रवेग आणि कार्यक्षमता–ती सहजसुलभ होतात. म्हणून असा विचार दुसऱ्याच्या डोक्यात कोंबण्याचा प्रयत्न अधिक केला जात असतो. पण जो सत्यनिष्ठ असतो तो दुसऱ्यांच्या डोक्यांत आपला विचार अशा पद्धतीने ठासून भरण्याचा किंचितही प्रयत्न करीत नाही. तो सतत सत्याचा शोध घेत असतो. तो आपल्या विचारांचा विक्रेता नसतो. त्याच्याजवळ जर स्वतःचा असा एखादा सिद्धान्त, एखादा विचार, एखादे तत्त्वज्ञान असेल आणि ते तो दुसऱ्या लोकांवर लादू इच्छित असेल किंवा त्यांना विकू इच्छित असेल, तर तो विचारांचा व्यापारी होईल. तो सत्यनिष्ठ असणार नाही. गांधीजी सत्यनिष्ठ होते. जो सत्यनिष्ठ नसेल, तो आपोआपच व्यक्तिनिष्ठ होतो आणि जो व्यक्तिनिष्ठ

होतो त्याला स्वतःचे व्यक्तिमत्त्व उरत नाही. इब्सेनने आपल्या 'परिगिंट' नाटकामध्ये परिगिंटच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवले आहे. कसे होते त्याचे व्यक्तिमत्व? कांद्यासारखे! कांद्याचे पापुद्रे एकामागून एक काढत गेला तर शेवटी आत काहीही नसते. सगळा कांदा हा अशा पापुद्र्यांनी बनलेला असतो. अशा पद्धतीचे व्यक्तिमत्व केवळ पोकळ असते. रिकामे असते. ज्या-ठिकाणी एखादा विचार सर्वांच्या डोक्यात भरण्याचा प्रयत्न होतो, तेथे बाकी सगळ्यांची व्यक्तित्वे रिक्त, खोटी आणि पोकळ झालेली असतात.

सत्यनिष्ठेमध्ये विचारनिष्ठा नसते, बुद्धिनिष्ठा असते. विचारनिष्ठा आली की, संप्रदायवाद आला. संप्रदायवादाबरोबर मतवाद येतोच, आणि मतवादाबरोबरच शेवटी अहंवाद टपकतो. अशाप्रकारे दुसरी सारी माणसं स्वत्वहीन होऊन जातात. त्यांचे स्वतःचे असे म्हणणे काहीच शिल्लक राहात नाही. जवाहरलाल बुद्धिनिष्ठ होते, आणि बुद्धिनिष्ठेचे एक मोठे लक्षण असे असते की, त्या व्यक्तीमध्ये Cocksureness (मताग्रह) नसतो; तर आपल्या विचारांविषयी एकप्रकारची अनिश्चितता असते. त्याचे कारण असे की, सत्यनिष्ठ मनुष्य नेहमीच सत्याचा शोध घेत असतो. दुसऱ्यांचे विचार समजून घेण्याचा प्रयत्न करीत असतो. जो समजून घेऊ इच्छितो, त्याचे सर्वांत पहिले काम असते, समजून घेण्याचा प्रयत्न करणे. समजून घेण्याच्या प्रयत्नासाठी दोन गोष्टींची आवश्यकता असते : Attitude of enquiry आणि humility जिज्ञासा आणि विनयशीलता. या दोन गोष्टी नसतील तर सत्यनिष्ठा असूच शकत नाही. जेवढे बुद्धिनिष्ठ लोक असतात, त्यांच्यामधील एक गोष्ट आपल्या लक्षात येईल की, ते नेहमी स्वतःच्या विचारांविषयी साशंक असतात, अनिश्चित असतात. वस्तुस्थिती अशी असते की, ती अनिश्चितता नसते, ती असते बुद्धीची विनयशीलता. त्यांच्यामध्ये स्वतःच्या विचारांविषयी

कुठलाही दुराग्रह नसतो. अशीच सत्यनिष्ठा जवाहरलाल नेहरूंच्या भाषणांमध्ये, लेखांमध्ये, विचारांमध्ये आणि त्यांच्या मनोवृत्तीमध्ये स्पष्टपणे दिसून येत होती.

गांधीजी सत्य कशाला म्हणत होते ? त्यांची सत्तेची व्याख्या काय होती ? या सर्व वेगळ्या गोष्टी आहेत. मी आपल्यासमोर गांधीजींच्या जीवनाच्या आणि चारित्र्याच्या केवळ त्याच गोष्टी ठेवू इच्छितो की, ज्या तुमच्या आणि माझ्या कामाच्या आहेत. गांधीजींच्या चारित्र्यामधील जे गुण आणि जी वैशिष्ठ्ये माझ्या कामाची नाहीत, ती केवळ गांधीजींच्याच कामाची असू शकतील. ते गुण, ती वैशिष्ये, त्यांची अगदी स्वतःची होती. ती सार्वत्रिक असूच शकत नाहीत. सार्वत्रिक ती असू शकतात, ज्यांचा स्वीकार तुम्ही आणि मी आपआपल्या बुद्धीने करू शकतो. यातच लोकनिष्ठा येते. लोकनिष्ठ म्हणजे लोकांच्या मागे जाणारा, अनुनय करणारा नव्हे. बर्कने म्हटले आहे :...Bidders at an auction of Popularty ते लोकप्रियतेच्या लिलावामध्ये बोली बोलतात. लोकांच्या अग्रभागी नव्हे, तर लोकांच्या मागे त्यांचे शेपूट पकडून चालतात. हे 'लोक' कोण असतात ? कुणीतरी सांगितले आहे; The majority : the people ? ...a faceless amorphous, huge blot of population. कुठलाही रंग, रूप, आकार नसलेला मानवमात्रांचा एक ढीग, एक गोळा. 'मास' म्हणजे ही गर्दी ! But the masses are not tbe people. ज्याला आपण 'मास' म्हणतो तो 'लोक' नव्हे. लोकनिष्ठ मनुष्य तो असतो की, ज्याचा लोकांच्या बुद्धीवर विश्वास असतो; आणि जो लोकांच्या समजून घेण्याच्या शक्तीवरही विश्वास ठेवतो. असा विश्वास ज्या माणसांमध्ये असतो, त्याला आपण 'डेमोक्रॅट' किंवा लोकनिष्ठ मनुष्य म्हणू शकतो.

अशा लोकनिष्ठ माणसाचा स्वतःच्या बुद्धीवर जितका

विश्वास असतो. तितकाच, किंबहुना जास्तच दुसऱ्याच्या बुद्धीवर असतो. कॅथॉलिक लोकांच्या गिरीजाघरात 'सैतानाचा वकील' advocatus diaboli म्हणून एक अधिकारी असतो. एखाद्या माणसाला संतसिद्ध करावयाचे असेल, तर विचारले जाते की, 'कोणाची काही हरकत आहे का ?'...जेव्हा कोणीही उभा राहात नाही, तेव्हा हा ऑफिशियल वकील सैतानाच्या बाजूने कैफियत द्यायला उभा राहातो. कारण जोपर्यंत सैतानाची कैफियत ऐकली जात नाही, तोपर्यंत परमेश्वराचे सत्य, सत्य म्हणून सिद्ध होत नाही. लोकशाहीत याला official opposition म्हणतात. परंतु त्याचा खरा अर्थ आहे की, बुद्धीचे स्वातंत्र्य असायलाच हवे. आणि बुद्धीच्याच स्वतंत्रतेचा अर्थ हा आहे की, मी जेवढी श्रद्धा आणि विश्वास स्वतःच्या बुद्धीवर ठेवतो, तेवढीच श्रद्धा आणि विश्वास मी दुसऱ्यांच्या बुद्धीवरही ठेवावा. सत्यनिष्ठेच्या या संदर्भात जवाहरलालजी हे साऱ्या जगात एक विशिष्ट स्थान पटकावणारे आगळे गृहस्थ होते. जोपर्यंत शक्य होत असेल तिथपर्यंत ते अत्यंत आदबीने दुसऱ्यांचे म्हणणे ऐकण्याचा प्रयत्न करीत असत. त्यांचं स्वतःचं काही एक तत्त्वज्ञान होतं, काही एक सिद्धान्त किंवा वाद होता. आणि त्याविषयी ते आग्रही होते असे तुम्हाला यामुळेच म्हणता येणार नाही. यातूनच एक दुसरी गोष्ट प्रकट होते ती ही की, जर दुसऱ्यांच्या बुद्धीवर आपला विश्वास असेल, तर शक्यतोवर आपण दुसऱ्यावर जबरदस्ती करीत नाही. आपण दुसऱ्यांवर जबरदस्ती तेव्हा करतो, जेव्हा आपण असं मानतो की, समोरचा मनुष्य मी जे काही म्हणतो ते समजू शकत नाही. ते समजून घेण्याची त्याची योग्यताच नाही. मग मी अन्य साधनांचा वापर करतो. या अन्य साधनांमध्ये दोन मुख्य आहेत. एक सत्ता आणि दुसरी शक्ती. शक्ती, मग ती भलेही बौद्धिक असो, अध्यात्मिक असो, तलवारीची असो किंवा चमत्काराची असो; अध्यात्मिक क्षेत्रात चमत्कार आणि भौतिक क्षेत्रात

तलवार किंवा राजदंड हे सर्व शक्तीचेच प्रयोग आहेत. लोकशाही-मध्ये शक्यतोवर शक्तीचा प्रयोग किंवा बळाचा प्रयोग कमीत कमी केला जायला हवा. ज्या लोकसत्तेचे अधिष्ठान दंड आहे ती लोकसत्ता लोकनिष्ठ नसून दंडनिष्ठ असते. आणि ज्या लोकसत्ते-मध्ये दंडाची अधिसत्ता असते, त्या लोकसत्तेमध्ये लोकांची संमती ही नेहमीच गौण मानली जाते. लोकसत्ता जेवढी दंडशक्तीपासून दूर जाईल आणि संमतीच्या अधिक जवळ असेल तितकी ती अधिक लोकनिष्ठ राहील. म्हणून गांधीजी ज्यावेळी असं म्हणत होते की, अहिंसेशिवाय 'सत्याचा शोध' शक्यच होणार नाही, त्यावेळेस त्यांच्या कथनाचा अर्थ असा होता की, जर मी सत्याचा शोध करू इच्छितो, तर मला कुठल्याही बळाचा उपयोग कसा करता येईल ? जो बुद्धिनिष्ठ असेल तो कमीतकमी बलप्रयोग करील.

जवाहरलाल नेहरूंमध्ये लोकनिष्ठा जेवढी जास्त होती, तेवढीच दंडप्रयोगाविषयीची अप्रीती अधिक होती. आणि ही अप्रीती प्रारंभापासून होती. आपण ज्याला 'पॉवर माइंड' किंवा 'सत्तेची मनोवृत्ती' म्हणतो, ती जवाहरलाल नेहरूंमध्ये कधीच नव्हती. जेवढी सर्वंकष सत्ता नेहरूंच्या हातात होती, तेवढी हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी काही हुकुमशहांना सोडून जगात कुणाकडेही नव्हती. परंतु त्यांची प्रकृती सत्ताधाऱ्यांची, हुकुमशहाची नव्हती. त्याचे आणखीन एक कारण होते. ते हे मानत होते की, ज्याप्रमाणे शस्त्रबळाचे दिवस संपून गेले आहेत, त्याचप्रमाणे राजसत्तेचे दिवसही संपलेले आहेत. पण अजूनही राज्यसंस्था टिकून आहे. म्हणून जवाहरलाल नेहरू राजनेता तर होतेच, पण 'डिप्लोमॅट' मुत्सद्दी नव्हते. सहज विनोदात या डिप्लोमॅटची एक व्याख्या केली जाते. पोलीटिकल–सायन्सलासुद्धा अशा पद्धतीने एक सहज अंग असते. एकदा कुणीतरी विचारले, 'डिप्लोमॅट कुणाला म्हणतात ?', उत्तर मिळाले–'When a diplomat says

'yes', he means 'Perhaps'; when he says 'Perhaps', he means 'no'; and if he says 'no', he is not a diplomat' तुम्हाला कुणा डिप्लोमॅट किंवा मुत्सद्याने किंवा एखाद्या राजनीतिज्ञाने जर 'मी हे करीन' असे सांगितले, तर आपण त्याचा अर्थ 'नाही' असा घ्यायचा. आणि जर त्याने 'नाही' म्हटले तर असे समजायचे की तो मुत्सद्दी किंवा डिप्लोमॅट नाही. एक 'डिप्लोमॅट' आणि दुसरी 'वूमन'–स्त्री. When a woman says 'no', she mean 'Perhaps' जेव्हा ती 'नाही' म्हणते तेव्हा त्याचा अर्थ असतो 'बहुधा'. जेव्हा ती 'बहुधा' म्हणते तेव्हा त्याचा अर्थ असतो 'हो', आणि जर तिने 'हो' सांगितले तर सरळ समजावे की ती 'स्त्री'च नाही. जवाहरलाल नेहरूंमध्ये एक विशिष्ट पद्धतीचे खरेपण, इमानदारी होती, इंटेग्रिटी होती. त्यांच्या जे मनात असेल तेच ते सांगायचे. आणि त्यामुळेच ते लोकनेताही होऊ शकले व राज्यनेताही होऊ शकले. पण ते राजदूत होऊ शकले असते की नाही, याविषयी माझ्या मनात शंका आहे. कारण राजदूताविषयी असे म्हटले जाते : An Ambassodor is an honest man, sent abroad to lie on behalf of the common-wealth. एखाद्या प्रामाणिक माणसाला दुसऱ्यांना फसविण्यासाठी ज्यावेळी विदेशात पाठवतात त्यावेळी त्याला कुशल राजदूत म्हणतात. He knows very well what he wants. He understands very well what his opposite numbar wants and then he puts what he wants in terms of what his opposite number wants. कुशल राजदूतामध्ये असणारी ही वैशिष्टय जवाहरलाल नेहरूंमध्ये नव्हती.

गांधीजींची सत्यनिष्ठा आणि अहिंसा या दोघांचा प्रयोग एक राज्यनेता म्हणून राष्ट्रात आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात जितका करता येईल तितका जवाहरलालजींनी केला. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात

अहिंसा हे शांततेच्या किंवा पंचशीलाच्या रूपाने येते. The rule of Law in International affairs,–म्हणजे शक्तीचा प्रयोग तिथे होणार नाही; शस्त्रांचा प्रयोग होणार नाही; सभ्य जीवनातील नियमांचा प्रयोग होईल. कायदा आणि संविधान यांचे नियम पाळले जातील. गांधीजींच्या अहिंसेचा आंतरराष्ट्रीय क्षेत्रात विनियोग होतो. आणि या संदर्भात, मला वाटते की, जवाहरलाल नेहरू हे गांधीजींची कॉर्बन कॉपी नव्हते, नक्कल नव्हते, किंबहुना संशोधित संस्करण किंवा नवसंस्करणही नव्हते. ते त्या सिद्धान्ताचे उत्तराधिकारी होते; ज्या सिद्धान्ताचे प्रतिनिधित्व गांधीजी करत होते.

आता थोडे पुढे जाऊ या. मी काही गांधीजींच्या जीवनातले सर्व पैलू तुमच्यासमोर ठेवू शकत नाही. परंतु काही विशेष पैलू ठेवीन; ज्यांच्याविषयी गांधीजी आणि जवाहरलाल यांच्यामध्ये खूपच समानता होती, त्या पैलूंवर आधी विचार केला जाऊ शकतो. त्यातला एक पैलू आहे सत्यनिष्ठेचा. जो सत्यनिष्ठ असतो तो सांप्रदायिक, व्यक्तिनिष्ठ किंवा विचारनिष्ठ असू शकत नाही. या दोन्ही गोष्टी लोकसत्तेशी संलग्न अशा आहेत.

काही लोक असे म्हणतात की, लोकसत्तेतून कुठलीही शक्ती निर्माण होत नाही, कुठलेही काम व्यवस्थित रूपाने त्वरित केले जाऊ शकत नाही. एकदा चर्चिलला कुणीतरी असे विचारले की, 'पहा, दुसऱ्याच्या ठिकाणी किती लवकर सर्व कामे होतात, आणि ती अधिक चांगल्या पद्धतीने होतात. तर मग आता लोकशाहीबद्दल आपले मत काय आहे?' चर्चिलने उत्तर दिले की, 'It is the worst form of government except the others.' आपली जी लोकशाहीची पद्धती आहे ती अत्यंत वाईट आहे, पण इतर कुठल्याही पद्धतीपेक्षा कमीत कमी वाईट आहे. ती सर्वांत वाईट असेल, पण दुसऱ्या पद्धती हिच्यापेक्षा

अत्यंत वाईट आहेत आणि म्हणूनच या पद्धतीचा पाठपुरावा करतो. यात माणसाचं सत्व, माणसाचं मूल्य अबाधित राहाते. सुखी मनुष्य आणि मानवी मनुष्य या दोघांमध्ये अंतर आहे. जगात सुखी माणसं पुष्कळ असू शकतील, पशूसुद्धा आहेत. म्हणून मिल यांने एके ठिकाणी म्हटले आहे : It is better to be a man dissatisfied than a pig satisfied, a Socrates dissatisfied than a fool Satisfied and if the fool thinks otherwise, it is because he knows only his side of the case. मूर्ख माणूस जर असं म्हणत असेल की, संतुष्ट मूर्ख राहाण्यातच सुख आहे आणि असंतुष्ट राहाण्यात दुःख आहे, तर तो स्वतंत्रतेचे मूल्य जाणत नाही. लोकशाहीपद्धतीत मानवाची एक प्रतिष्ठा, एक मूल्य आहे. आणि म्हणून माझ्या या अभ्यासात मी इथपर्यंत येऊन पोहोचलो की, चांगल्यातल्या चांगल्या हुकुमशाहीपेक्षाही वाईटातील वाईट लोकशाही अधिक श्रेयस्कर असते.

यानंतर गांधीजींची एक तिसरी गोष्ट येते, ती म्हणजे स्वदेशी. स्वदेशीची व्याख्या गांधीजींनी आपल्या पद्धतीने केली होती. खरं तर तो अगदी वेगळाच माणूस होता ! ते काही गोष्टी अशा सांगायचे की, त्या ऐकायला फार विचित्र वाटायचं. एकदा त्यांनी सांगितलं, 'शेजाऱ्यांची सेवा करण्यातच स्वदेशी आहे.' सर्व धर्मांनी हेच सांगितलं. येशू ख्रिस्ताने सांगितले की, शेजाऱ्यावर प्रेम करा आणि ते इतके करा की जितके तुम्ही स्वतःवर करता. सगळ्या धर्मांनी शेजाऱ्यांवर प्रेम करण्याविषयी आग्रहाने सांगितले आहे. इंग्लंडमध्ये दोन मोठी मजेशीर माणसं झाली. दोन्ही लेखकच होते; तसे दोघेही थोडे सनकीच म्हणायला हवेत. पण गोष्टी मोठ्या लाख मोलाच्या सांगत असत. एक जॉर्ज बर्नार्ड शॉ आणि दुसरा जॉन बुलचा प्रतिनिधी जी. के. चेस्टरटन. जी. के. चेस्टरटनने 'नेबर'– 'शेजारी'–या शीर्षकाचा एक निबंध लिहिला आहे. त्यात त्याने

लिहिले आहे. ' We make our friende, we make our enemies. but God makes our next door neighbour. Hence he comes to us clad in all the careless terror of nature. He is as strange as the stars, as reckless and indifferent as the rain. He is a man, the most terrible of beasts...We have to love our neighbour because he is there–a much more alarming reason for much more scrious operation. He is the sample of humanity given us. Precisely because he may be anybody, he is everybody. He is a symbol because he is an aecident..' आपला मित्र आणि आपला शत्रू आपण आपल्या मनाने ठरवतो. ती आपल्या मर्जीतली गोष्ट असते, पण आपला शेजारी कोण असावा, हे तर परमेश्वरच ठरवतो; आम्ही काही ते ठरवू शकत नाही. परिभाषा करताना चेस्टरटन म्हणतो की, मनुष्य जगातली दुसरी सर्व संकटे सहन करू शकतो. कधी-कधी आपला जीवसुद्धा देतो, सर्व प्रकारचे कष्ट सहन करतो, क्लेश सहन करतो. पण या सर्व गोष्टी एकतर त्याला हौस असते म्हणून करतो किंवा त्याची सनक असते म्हणून करतो, पण परमेश्वराने दिलेला मानवतेचा एक नमुना योगायोगाने आमच्या शेजारी झालेला असतो. म्हणून आमच्या लेखी तो, म्हणजे मानवतेचे प्रतीक होय ! गांधीजी म्हणायचे तुझा शेजारी म्हणजे तुझ्या लेखी मानवतेचेच सगुण रूप आहे.

जवाहरलाल नेहरूंनी नेमका हाच संकेत आंतरराष्ट्रीय जीवनात रूढ केला आणि त्याचे नाव ठेवले 'पंचशील' Non-alignment ही एक व्यावर्तक, निषेधात्मक संज्ञा आहे. व्यवहार-चतुर लोकांची व्यावहारिक नीती आहे. Good fences make good neighbours घराच्या चारीही बाजूला कंपाऊंड जर चांगले व मजबूत असेल, तर शेजारी एकमेकांशी भांडण केल्याशिवाय तितक्याच चांगल्या पद्धतीने राहू शकतील, असा त्याचा अर्थ आहे. पण त्यामुळे परस्परांचे प्रेम निर्माण होत नाही.

प्रेम निर्माण व्हायला भावरूप शक्तीची आवश्यकता असते. आणि ही भावरूप शक्ती वैज्ञानिक असायला हवी. ही वैज्ञानिक शक्ती कोणती असू शकते? समाजविज्ञानाचा फार मोठा प्रवक्ता, फ्रान्सचा शार्डिन हा आधुनिक वैज्ञानिक आहे. त्याची दोन पुस्तके आहेत. 'Building the Earth' आणि 'Phenomenon of man.' तो म्हणतो, nuclear physics हे एनर्जीच्या, म्हणजे शक्तीच्याही पुढे निघून गेलेले आहे. The supreme energy is love. Love is the supreme cosmic energy–formidable, universal, mysterions. प्रेम ही अंतीम ऊर्जा आहे. शेवटची शक्ती आहे. आता काही भौतिक आणि आध्यात्मिक असा भेद राहिलेला नाही. तीच अंतीम शक्ती आहे. ही अंतिम शक्ती Cosmic आहे. सृष्टीतली हीच अंतिम शक्ती आहे. पण ती व्यक्त कशी होते? It expresses itself in relationship. मानवाचा मानवाशी असलेला संबंध! केवळ Co-existance सह-अस्तित्व नव्हे किंवा शेजार नव्हे, vicinity प्रतिवेशही नव्हे. एक दुसऱ्याच्या केवळ शेजारी राहाणेही नव्हे. तर एक दुसऱ्याच्या बरोबर राहाणे. प्रेमाची शक्ती ही नेहमीच संबंधांमधून व्यक्त होणारी शक्ती आहे. माझ्यात आणि माझ्या शेजाऱ्यांमध्ये नेमक्या कुठल्या कारणांमुळे संबंध असतो? आम्हाला बांधून ठेवणारी रज्जू कोणती असते? The bridge is love प्रेम दोघांनाही बांधून ठेवते. गांधीजी याला 'स्पर्श-भावना' असे म्हणतात.

या देशात वेगवेगळ्या भाषा बोलणारे, वेगवेगळे संप्रदाय मानणारे, वेगवेगळ्या मंदिरांमध्ये आणि मशिदीमध्ये पूजा करणारे लोक एकमेकांच्या शेजारी राहतात. ते एक–दुसऱ्याच्या बरोबर कशा प्रकारे राहू शकतील? गांधींनी त्याकरिता एक संकेत दिला आहे. तो म्हणजे 'सर्व–धर्म–समभाव!' जवाहरलाल नेहरू या निष्कर्षावर पोहोचले होते की, सर्वधर्मसमभाव असूच

शकत नाही. त्याचे मुख्य कारण असे की, धर्मातून ईश्वर, अध्यात्म आणि नीती काढून टाकली की मग जे काही बाकी राहाते त्याला लोक धर्म म्हणतात. ईश्वर, अध्यात्म आणि नीती सगळ्या धर्मात समान आहे, म्हणून त्याला कोणी धर्म म्हणत नाही. मी खरे बोलतो म्हणून आणि तुम्हीही खरे बोलता म्हणून मी हिंदू होत नाही आणि तुम्ही ख्रिश्चन होत नाही. माझी शेंडी असेल, जानवे असेल आणि तुमचा क्रॉस असला तर तुम्ही आणि मी दोघेही २४ तासांतून ४८ वेळेला खोटे बोलूनही हिंदू आहोत किंवा ख्रिश्चन आहोत; याला म्हणतात धर्म. म्हणजे धर्मातून ज्यावेळेला आपण नीती, सदाचार, ईश्वर आणि अध्यात्म काढून टाकतो, तेव्हा जे काही उरते त्याला धर्म म्हणतात. आणि म्हणून गांधीजींचे दुसरे उत्तराधिकारी विनोबा असे म्हणाले होते की, 'या विज्ञानाच्या युगात आता राजनीती आणि धर्माचे दिवस टळले आहेत. संप्रदाय संपायला आलेले आहेत. Religion आणि Politics यांना आता फारशी आशा नाही.' जवाहरलाल नेहमी हीच गोष्ट वारंवार सांगत असत.

आता आम्ही याला Secularism म्हणू शकतो. पण हा Secularism तो आहे, जो अगदी पहिल्यांदा होता किंवा ओरीजिनल होता. त्याचा प्रवर्तक, मला आठवते त्याप्रमाणे, होलीओक हा होता. होलीओक आणि चार्ल्स ब्रेडला वगैरे. ते असे सांगायचे की, धर्मातून ईश्वर, अध्यात्म आणि सदाचार हे तिन्ही काढून टाकल्यानतर जे काही बाकी राहते त्याविषयी आमची नाराजी आहे. आम्ही मानवाला एक दुसऱ्याच्या बरोबर कसे राहावे हे शिकवू इच्छितो. आणि त्यासाठी त्यांना एकमेकांवर प्रेम करायला शिकवावे लागेल. हे प्रेम कसे असावे ? तुमच्या आणि माझ्यातला तोच संबंध हा खरा संबंध असतो, की जो माझाही विकास करील आणि तुमचाही विकास करील. शार्डिनने यावर एक रूपक रचले होते. तो म्हणायचा की, ठीक आहे तुम्ही वेगवेगळे आहात. जीवन

हे एक आरोहण आहे असे समजा. चढायला सुरुवात करा. जेव्हा शिखरावर पोचाल तेव्हा सगळे एका जागी एकत्र आलेले असणार. शिखरावर काही वेगवेगळे राहाता येत नाही, All things that rise converge. ज्या ज्या गोष्टींचा उत्कर्ष असतो, त्या सर्वच शेवटी एकत्र होतात. आमच्यात असलेली विभिन्नता, आमची वेगवेगळी वैशिष्टये ही—reciprocally enriching—म्हणजे परस्पर समृद्धीची पोषक असायला हवी. माझे वैशिष्टय हे तुमच्या वैशिष्टयाला पोषक हवे. अशातऱ्हेने सर्वांची वैशिष्टये जेव्हा एकमेकांना पोषक होतात, तेव्हाच सगळे एका ध्येयाप्रत पोहोचलेले असतात. त्यालाच आम्ही मानवतेच्या, मानवाच्या विकासाचे इवोल्यूशन, अंतिम ध्येय म्हणतो. आणि तेथे मनुष्य पोहोचला की, आम्ही सांगतो, गांधीजीसारख्या मानवाचे आगमन झाले ! लोकांनी विचारले की, गांधीजीसारखा मनुष्य कसा निर्माण होऊ शकतो ? त्याचे उत्तर असे की, The whole cosmos became conscious जणू सगळी सृष्टीच चेतन झाली आणि चेतन झाल्या-नंतर ज्या आत्म्याने जे मानवरूप धारण केले ते म्हणजे गांधी. सारे आंतरराष्ट्रीय जगत ज्यादिवशी चेतन होईल त्यादिवशी हे सांगितलं जाईल की, जवाहरलाल नेहरू हे त्याचे प्रतीक आहे. हा माणूस सर्व आंतरराष्ट्रीय जगताच्या चेतनेचा-मानवीय चेतनेचा—प्रतीक होता. आणि म्हणून आपण असे म्हणतो की, ते गांधीजींचे उत्तराधिकारी होते.

एका लहानशा गोष्टीकडे तुमचे लक्ष वेधणे मला आवश्यक वाटते. आज सर्व जगात ज्याला 'four pronged thrust' म्हणतात. तसा चारीही दिशांनी एक चौमुखी मोर्चा सुरू आहे. पहिला आहे राष्ट्रीय मोर्चा. जे लोक गुलाम होते, परक्यांच्या दबावाखाली राहात होते, त्यांच्यात एक आत्मचेतना आणि आत्मप्रत्यय येऊ लागला आहे. जे काळे होते ते सांगू लागले की, आमच्या रंगाचीही ओळख ठेवावी लागेल, त्याचा

स्वीकार करावा लागेल. ज्यांच्या संस्कृती वेगवेगळ्या होत्या, ती मंडळी सांगत आहेत की, आमच्या संस्कृतीलाही स्थान द्यावे लागेल, आणि ज्या लोकांची या जगात विशिष्ट पद्धतीची राहाणी होती, ठेवण होती, स्वतःची काही वैशिष्टये होती, त्यांचे म्हणणे असे की, या वैशिष्टयांचाही स्वीकार करावा लागेल. तर हा एक मोर्चा, ज्याला आपण ' National Revolution ' म्हणू शकतो. क्रांतीचा दुसरा मोर्चा आहे Class Revolution.' जे दारिद्र्यावस्थेत आहेत, विपन्न आहेत, गरीब आहेत त्यांचे म्हणणे असे की, ज्यांचे जीवन समृद्ध आणि संपन्न आहे, ज्यांना कुठल्याही वस्तूंची कमतरता नाही, अशा लोकांच्या बरोबर आम्हाला एका समान पातळीवर यायचे आहे. तिसरा मोर्चा आहे ' Technological Revolution.' टेक्नॉलॉजी म्हणजे विज्ञान नव्हे, टेक्नॉलॉजी म्हणजे यंत्रविद्या. या यंत्रविद्येचा हा तिसरा मोर्चा असेल. जे मागासलेले समाज आहेत ते प्रगतीशील समाजाच्या बरोबरीला येऊ इच्छितात.

यात एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे. Technology विषयी कुणा एकाला विचारले गेले, तेव्हा त्याने सांगितले, It is the father of great organization and the grand–father of great Governments. मोठमोठे कारखाने, मोठमोठ्या संस्था, मोठमोठ्या संघटना यंत्रविद्येच्या पोटातून निर्माण झाल्या आणि म्हणून राज्यव्यवस्थेची रचनाही तशाच पद्धतीने करावी लागली. प्रचंडता ! ...पश्चिमेत प्रचंडतेचे प्रचंड वेड आहे हे तुम्ही बघू शकता. तो त्यांचा आजच्या युगाचा नारा आहे. लोकांच्या वस्त्या प्रचंड, वसाहती–कारखाने प्रचंड, राज्ये, राज्य सरकारे प्रचंड, सैन्य प्रचंड, त्यांचे आकडे ऐकले-वाचले तरी तुम्ही हैराण व्हाल. आजच्या सर्व गोष्टी astronomical figures मध्येच होतात. एका आकड्याचा दुसऱ्या कुठल्याही आकड्यावर विश्वास नसतो. They say fact is stranger than fiction, but statistics is

stranger still. वस्तुस्थिती ही कधीकधी कल्पनेपेक्षाही अधिक विचित्र असते. पण हे आकडे सर्वांत अधिक विचित्र आहेत. त्यांचा काहीच ठाव-ठिकाणा नाही खूप मोठेमोठे आकडे असतात, पण त्यांच्यामुळे मानवाचा मानवाशी असलेला संबंध मात्र क्षीण होताना दिसतो. माणसाचे जीवन 'Impersonal' म्हणजे 'व्यक्तिनिरपेक्ष होत जाते. व्यक्तिनिरपेक्ष म्हणजे मानव–निरपेक्ष. आणि जिथे जीवन मानव–निरपेक्ष असते, तिथे मनुष्य कुठलेतरी एक साधन, कुठलातरी एक आकडा किंवा कुठलेतरी एक नाव बनून जातो; तो मनुष्य राहात नाही. तो केवळ एक संकेत किंवा चिन्ह बनतो. एकदा मी एका रोटरी क्लबात गेलो होतो. तिथल्या लोकांनी सांगितले की, 'आमच्या क्लबामध्ये सरासरी उपस्थिती ८५·६ असते.' मी म्हणालो, '८५ ठीक आहे, पण हा .६ माणूस कुठून आला ? कसा आला ?' the average is a fiction ते एक मोजमाप आहे आणि मोजमाप हे नेहमीच एक fiction असते, कल्पना असते. Average हे माप आहे, ती काही वास्तविकता नाही. गयेत दरवर्षी कॉलरा होतो. एकदा तिथल्या म्युनिसिपालिटीच्या चेअरमनने सांगितले की, 'मागच्या वर्षी ५ टक्के माणसे मरण पावली, पण ह्यावर्षी २॥ टक्के माणसे मरण पावली.' आम्ही रेल्वेतून प्रवास करीत होतो. डब्यात एक स्त्री बसली होती. हे ऐकून ती रडायला लागली. मी विचारले, 'बाई, रडायला काय झाले ?' ती म्हणाली की, 'हे गृहस्थ २॥ टक्केविषयी बोलत होते. मागच्या वर्षी पाचच टक्के माणसे मेली असे सांगत होते. पण माझा पती तर १०० टक्के मरण पावला आहे. आता मी काय करू ? तो तर सगळा-सगळा नष्ट झाला....'

मी उदाहरण केवळ याचकरिता दिले की, मला ही गोष्ट मानव-विरोधी वाटते. एखाद्या संघटनेत सदस्यता असते, पण मानवता नसते. मी कुठल्याही संस्थेचा सदस्य होऊ शकतो, पण

मग मनुष्य राहू शकत नाही. मग ती भलेही माझी पार्टी असो, भले कॉंग्रेस पार्टी, कम्युनिस्ट पार्टी किंवा कुठलीही संस्था असो. संस्थेत सदस्यत्व आहेच. सेंट पॉलने एकदा सांगितले होते, ‘We are all members of one or another.’ मी त्या अर्थाने सांगत नाही. सदस्यता एक वेगळी वस्तू आहे. खरे तर तुमचे आर्थिक संयोजन कसे असायला हवे, ज्यात माणसा-माणसांचे संबध प्रस्थापित होतात, नाती कायम राहू शकतात असे. ज्याप्रमाणे कुटुंबात नाती-गोती कायम असतात, त्याप्रमाणे समाजातही नाती-गोती कायम राहायला हवीत.

चौथी वस्तू आहे, ‘International Revolution’ यात आहेत काही ‘आहेरे देश’ आणि काही ‘नाहीरे देश’. ‘Have got’ nations and ‘have not’ nations.—समान पातळीवर येण्यासाठी त्यांच्यामध्येही स्पर्धा आहे. या चारीही प्रकारच्या आघाड्यांमध्ये नेहरू सक्रीय रूपाने सामील व्हायचे. त्यांनी जे काही काम केले, ते परिणामकारक होते. म्हणजे भारताच्या परिस्थितीनुरूप जेवढा परिणाम ह्या वातावरणावर करता येईल तेवढा परिणाम त्यांनी केला. गांधीजींचे जे सिद्धान्त होते ते सर्व तर काही मी तुम्हाला सांगू शकलो नाही. उदाहरणादाखल २–४ सांगतो. एकीकडे गांधीजींचे सिद्धान्त ठेवा आणि दुसऱ्या बाजूला सार्वजनिक जीवनात राजनैतिक जीवनामध्ये नेहरूंनी त्याचा कसा विनियोग केलेला आहे, ते ठेवा. तुम्ही स्वतःच सांगाल की नेहरू गांधीजींचे उत्तराधिकारी होते !

आज परिस्थिती नागरिकांच्या हातून निघून राजनीतीज्ञांच्या हातामध्ये जात आहे. ही अत्यंत दुर्भाग्याची आणि दुर्दैवाची गोष्ट आहे. अवजारांबाबतीतसुद्धा नेमकी हीच परिस्थिती आहे. ती उत्पादकांच्याही हातात नाहीत आणि उपभोक्त्यांच्याही हातात नाहीत, ती मधल्या दलालांच्या हातात आहेत. ज्याला आपण

middle men म्हणतो. धर्मातही परिस्थिती पुरोहितांच्या हातात गेलेली आहे. राजनैतिक व सार्वजनिक जीवनातही एक मधला दलाल असतो. आजची राजनीती अशीच आहे.

There are interest groups. स्वार्थ संघटित होतात. विद्यार्थ्यांचा स्वार्थ संघटित झाला. शिक्षकांचा स्वार्थ संघटित झाला. युनिव्हर्सिटीतल्या अधिकाऱ्यांचा स्वार्थ संघटित झाला. मग युनिव्ह सटीतल्या नोकरांचा, काम करणाऱ्यांचा, डॉक्टरांचा, मजुरांचा स्वार्थ संघटित झाला. परंतु केवळ संघटित स्वार्थ कार्यान्वित होत नाही. तो कार्यक्षम किंवा परिणामकारक नसतो. मग तो परिणामकारक केव्हा होतो ? When this interest group becomes pressure groups. जेव्हा सर्व समाजावर दबाव आणण्याइतकी त्याची शक्ती वाढते, तेव्हा. हा दबाव केव्हा आणता येतो ? When this pressure group becomes veto group. जेव्हा तो समाजाची सर्व कार्ये बंद करू शकतो तेव्हा !

मी आता हे केवळ एक उदाहरण देत आहे. कोणावरही टीका करीत नाही. समाजामध्ये भंगी आहेत आणि त्यांची संख्या फारशी नाही. कॉलेजमधल्या प्राध्यापकांनी, शिक्षकांनी हरताळ पाडला तर फारसे नुकसान होत नाही. कारण दुसरे बरेच मिळतात. पण भंग्यांनी हरताळ पाडला, तर समाजाची नाडीच थंडावेल, त्यांच्यामध्ये ही 'व्होटो' ची शक्ती आहे. तेव्हा हे जे Interest groups, pressure groups आणि Veto groups असतात, ते संघटित स्वार्थाचे असतात. या संघटित स्वार्थामध्ये जो दलाल असतो, त्याचे नाव राजनीतीज्ञ आहे. And he has become the keyman आणि तोच आजच्या समाजातील सर्वात महत्त्वाचा माणूस झालेला आहे.

याचे कारण काय असेल ? The citizen is uncommitted. 'अनकमिटेड' तर त्याला राहायला हवं. कारण तो कुठल्याही

एका विचारसरणीचा किंवा कुठल्या एका पंथ, संप्रदाय किंवा पक्षाचा बांधलेला नाही. पण त्याचा अर्थ त्याने उदासीन राहावे, निष्क्रीय राहावे असा थोडासा आहे ? ज्या लोकशाहीत नागरिक निष्क्रीय किंवा उदासीन असतात, त्या लोकशाहीत प्राण नसतो. अशी लोकशाही त्या वरातीसारखी असते की, ज्यामध्ये वऱ्हाडी तर सर्व आलेले आहेत, पण नवरदेवाचाच पत्ता नाही. लोकशाहीतली मध्यवर्ती विभूती म्हणजे नागरिक. नागरिकांमध्ये विचारांचे सामर्थ्य, निर्णयाची शक्ती आणि पुरुषार्थ कसे उत्पन्न करता येतील, याचे सतत चिंतन व्हायला हवे. मला वाटते की, असे चिंतन गांधीजींच्या नीतीत होते. कारण गांधीजी असे सांगत की, सर्व मानवजात एका बाजूला असली आणि दुसऱ्या बाजूला केवळ एकच व्यक्ती असली तरी त्या एकट्या माणसाचा आवाज दाबून टाकण्याचा अधिकार मानवजातीला नाही. त्याप्रमाणे कुठल्या एका व्यक्तिलाही हा अधिकार नाही की त्याने सर्व मानव समाजाचा आवाज दाबून टाकावा. कुठली एक व्यक्ती जर सर्वांचा आवाज दाबून टाकत असेल, तर आम्ही त्याला हुकुमशहा म्हणतो किंवा अत्याचारी म्हणतो. पण आता कुठलाही एक समुदाय जर कुण्या एका व्यक्तीचा आवाज दाबून टाकत असेल तर तोही अत्याचारी आहे, इतकेच नव्हे तर अनेक पटींनी अत्याचारी आहे. हा तर अत्याचारांचा गुणाकार असतो. या दृष्टिकोनातून तुम्ही विचार केला तर आपल्या हे लक्षात येईल की, आपल्या अध्यात्मिक भूमिकेतून गांधीजींनी जे सिद्धान्त मांडले, त्याच सिद्धान्ताचा विनियोग राजनीती आणि समाजनीतीमध्ये स्वतःच्या एका स्वतंत्र भूमिकेतून करण्याचा प्रयत्न जवाहरलाल नेहरूंनी केला. Alice in wonderland मध्ये एक प्रसंग असा आहे. त्यातली रेडक्वीन एलीसला म्हणते, ' You see here, it has taken all the running you can do to keep in the same place. And if you want to get somewhere else, you will have to run at

least twice as much as that.' तू ज्या ठिकाणी आहेस त्या ठिकाणी राहाण्यासाठीसुद्धा तुला इतकी धावपळ करावी लागेल, हे तू पाहिलेस. तुला जर थोडे पुढे जायचे असेल तर तुला आत्ताच्यापेक्षा दुप्पटवेगाने धावावे लागेल....हा देश पंडित जवाहरलाल ज्या मुक्कामापर्यंत या देशाला आणून निघून गेले, तेथे स्थिर राहाण्यासाठीसुद्धा आम्हाला कठीण परिश्रम करावे लागतील आणि पुढे जायचे असेल, तर कमीतकमी दुप्पट परिश्रम करावे लागतील !

# विनोबांचे अद्वितीय विभूतिमत्त्व

जवळपास साठ वर्षांपूर्वीची गोष्ट !

राष्ट्रीय शाळेतील एका सहयोगी शिक्षकमित्राने विचारले, ' काय, तुम्ही अजून विनोबांना बघितले नाहीत ? तुम्हाला कल्पना नाही की, तुम्ही किती अमूल्य ठेव्याला मुकला आहात ? '

मी लगेच दुसऱ्याच दिवशी विनोबांच्या आश्रमात त्यांच्या दर्शनाला गेलो. आमची भेट फक्त पाच मिनिटे झाली, पण मी अगदी मुग्ध होऊन गेलो !

त्या पहिल्या भेटीतच माझी खात्री पटली की, विनोबा एक विभूती आहे. सर्वसामान्य माणूस जे असम्भवनीय समजतो ते काम जो माणूस करून दाखवतो, त्याला आपण निष्णात म्हणतो. परंतु निष्णात असलेली व्यक्तीदेखील जी गोष्ट असाध्य मानते, ती गोष्ट जो सहज लीलेने करवून दाखवतो, त्याला आपण ' विभूती ' मानतो.

विनोबा बहुश्रुत पंडित आहेत. श्रोत्रिय आहेत. त्यांची प्रतिभा अलौकिक आहे. आणि ते स्वयंप्रज्ञदेखील आहेत. जे ज्ञान त्यांनी प्राप्त केले आहे, त्याच्याशी ते अगदी एकरूप होऊन गेलेले आहेत. ज्ञान-विद्वता त्यांच्या जीवनापासून अलग करता येणार नाही. आणि हेच त्यांचे वैशिष्टय आहे !

विनोबांनी आपल्या पूर्वजांपासून पुष्कळ ज्ञान घेतले. त्याबद्दल ते त्यांचे ऋणही मान्य करतात. परंतु जे ज्ञान त्यांनी मिळविले, ते आत्मसातही केले. आणि ते इतके आत्मसात केले की, ते जणू त्यांचेच झाले. या ज्ञानाने त्यांच्या स्वतःच्या विभूती-मत्वात अधिकच भर पडली आणि ते समृद्ध झाले. या ज्ञानाला त्यांनी अधिक विकसित केले व त्याचे पुनर्जीवनही केले. अशाप्रकारे ज्याला लोकोत्तर म्हणता येईल अशा प्रतिभेचे दर्शन मला विनोबांच्या ठिकाणी घडले !

त्यावेळेस त्यांची जी छाप माझ्या मनावर पडली आहे त्याने मी आजदेखील मंत्रमुग्ध झालो आहे.

त्यांच्या संवादातून त्यांच्या प्रतिभेचे जे दर्शन घडले त्याने मी चकितच झालो !

मी पुष्कळशा प्रतिभावंतांना भेटलो आहे, पण विनोबांच्या ज्ञानाची उज्वलता काही अलगच भासली. त्यांचे शब्द समर्पक होते, वाक्ये अर्थगंभीर होती, आणि शैलीदेखील अत्यंत मनोहारी होती. पदलालित्य आणि अर्थवाहकता यांचा असा अपूर्व संगम मी यापूर्वी पाहिलाच नव्हता. म्हणून मी मंत्रमुग्ध झालो !

माझ्या चिंतनशीलतेवर व जीवनावर ज्या काही महान व्यक्तींचा खोलवर प्रभाव पडला आहे, त्यात विनोबा अग्रगण्य आहेत.

माझे पूज्य पिताजी, त्यांचे धाकटे बंधू भाऊसाहेब धर्माधिकारी, गांधीजी, विनोबा आणि जमनालालजी यांना मी

आपले आप्तपंचक मानतो. ज्यांना जीवनात आपण प्रमाणभूत मानतो त्यांना मी आप्त समजतो. 'आप्तस्तु यथार्थ वक्ता !'

माझ्या जीवनात कृष्णमूर्ती काही काळानंतर आले, परंतु त्यांच्या शिकवणुकीचा माझ्या जीवनावर सर्वांत अधिक प्रभाव पडला आहे. तथापि, सर्वसाधारणपणे पाहाता माझ्यामध्ये प्रपन्नता शक्तीच कमी आहे. मी स्वतःला समर्पित करू शकत नाही. कारण माझा अहंकार एवढा क्षीण कधीच झाला नाही. तरीदेखील माझ्या सर्वाधिक संस्कारक्षम आयुष्यात ज्यांच्यामुळे मी प्रभावित झालो, ते आप्तपंचक हेच होते.

या संदर्भातील एक आठवण अशी आहे की, माझी एक आत्या बालविधवा होती. तिचा तिच्या पतीशी कदाचितच परिचय झाला असेल–नसेल. आपल्या सासरची आठवण तिला अगदीच अंधूक होती. माझी आई आणि ही आत्या यांची घनिष्ट मैत्री होती. माझे वडीलही त्यांना फार मानीत असत व प्रेम करीत असत. माझ्या बालपणी बरीच वर्षे त्या आमच्या घरीच राहात होत्या. त्या साक्षर होत्या. शिक्षण फारच कमी झाले होते, परंतु बुद्धीने अत्यंत कुशाग्र होत्या. त्यांची आकलनशक्ती जबरदस्त होती. माझ्यावर त्यांचा अत्यंत लोभ होता. मला त्या एखाद्या समवयस्क मित्राप्रमाणे वाटत. त्यांच्यापासून मी पुष्कळ गोष्टी शिकलो व त्या आत्मसात करू शकलो. माझ्या जीवनात जी काही शुचिता आली, त्याचे सारे श्रेय या आत्याबाईंना आहे. म्हणूनच मी याप्रसंगी त्यांचाही उल्लेख करीत आहे.

श्री. भाऊसाहेब धर्माधिकारी यांनी मला सर्वात अधिक अभिभूत केले, परंतु सर्वात अधिक प्रभावित आणि अणुप्राणित विनोबांनी केले. म्हणूनच विनोबांचे आप्तत्व मी माझ्या संदर्भात काही वेगळेच मानतो.

गांधीजींच्या चळवळीमुळे मी असहकारितेच्या चळवळीत भाग घेऊ लागलो आणि त्यानंतर थोड्याच दिवसात विनोबांकडे आकर्षित झालो. ते दिवस विनोबांच्या कठोर तपस्येचे आणि उग्र साधनेचे होते. त्यांच्यात साधनेची तेजस्वीता तर होतीच, पण प्रखरता अधिक प्रकट होत होती. त्यावेळी त्यांची मुद्रादेखील उग्र आणि अनाकर्षक वाटे. त्यांना भेटणारे बहुधा रुष्ट व क्षुब्ध होऊनच परतत असत. कधी कधी तर विनोबा भेटीसाठी आलेल्यांकडे वर मान करूनदेखील बघत नसत.

माझ्या जीवनात साधनेला स्थान नव्हते आणि ज्या आदर्शांचा मी आदर करीत असे त्या आदर्शांचा क्वचितच अनुबंध राहिलेला आहे. परंतु तरीसुद्धा अगदी प्रथम क्षणापासून ते शेवटच्या क्षणापर्यंत विनोबांची माझ्यावर कारणरहित कृपाच राहिली आहे. ते माझे दार्शनिक, मार्गदर्शक आणि मित्रही आहेत. हे सख्यत्वाचे नाते माझ्या दृष्टीने अत्यंत सोयीचे होते. म्हणूनच मी धीटपणे त्यांच्याशी मैत्री व चर्चा करू शकत असे. मी त्यांचा कधीही अनुयायी वा शिष्य बनलो नाही. मी जसा होतो तसाच राहिलो. तरीसुद्धा त्यांनी माझ्यावर अकारण प्रेम करून सारे सहन केले.

असहकार आंदोलनाची गती काहीशी खुंटल्यासारखी झाली, तेव्हा माझ्या मनात असा विचार आला की, ज्या वेदान्ताच्या दर्शनासाठी हा देश प्रसिद्ध आहे, त्याचे अध्ययन करावे. राष्ट्रीय शिक्षणाचे काम सोडून मी मूळतापीला आमच्या काकांच्या पायाशी गेलो. त्यावेळेस विनोबांनी मला एक पत्र लिहून कळविले होते की, 'अकारणच मला तुमची आठवण येत आहे. तुम्ही प्रस्थानत्रयीचे अध्ययन आणि चिंतन जीवनाच्या दृष्टिकोनातून करा.' हे त्यांचे पत्र माझ्या हृदयाला स्पर्शून गेले. ही घटना आहे १९२५ किंवा २६ सालची. पण त्यापूर्वीच मी विनोबांचे

'महाराष्ट्र धर्म' हे मासिक व साप्ताहिक मोठ्या आवडीने व आस्थेने वाचू लागलो होतो. भगवद्गोता जितक्या श्रद्धेने व कादंबऱ्या जितक्या आवडीने वाचीत होतो, त्यापेक्षा अधिकच सश्रद्ध मनाने व आवडीने मी विनोबांची वचने वाचू लागलो. त्यांची वाणी माझ्या हृदयात प्रतिध्वनित होऊ लागली. तेव्हा-पासून माझी अशी धारणा आहे की, त्यांना जी प्रतिभेची देणगी लाभली आहे, तशी देणगी या देशातील कोणा अन्य व्यक्तीला क्वचितच लाभली असेल. त्यांच्या विद्वत्तेपेक्षा त्यांची मौलिकता आणि स्वयंप्रज्ञा यांचा माझ्या चित्तावर अधिकच खोल प्रभाव पडला.

विनोबांच्या विभूतिमत्वात ज्ञान, कर्म आणि भक्ती यांच्या सीमारेषा एकमेकात सहजपणाने मिसळून गेलेल्या आहेत. त्यांच्या हातावर बुद्धी आणि हृदय या दोहोंचीही रेषा एकच आहे. त्यामुळे त्यांच्या जीवनात ज्ञान, भक्ती आणि कर्म या तीन्हींचा केवळ समन्वयच झाला आहे असे नव्हे, तर त्यांनी संवाद साधलेला आहे. त्यांचे भूदान-आंदोलन हे याचे अनोखे उदाहरण आहे. आजची त्यांची कर्म-मुक्ताची अवस्था साधनोत्तर स्थितीतील आहे. ज्ञान आणि भक्ती कर्मात विलीन झालेली आहे. त्यामुळे त्यांचे जीवन अखंड व एकरस आहे. व्यक्तिगत व सामाजिक जीवन असा भेद त्यांच्या ठिकाणी राहिलेला नाही. जीवन-मरणाचा भेदही त्यांच्या जीवनात नाही.

अशाप्रकारे मी तत्त्वज्ञानाच्या अध्ययनासाठी सिद्ध झालो. त्याचवेळी मी अध्यात्माकडे वळण्याचा प्रयत्न केला. माझ्या जीवनातील ती एक भटकंती होती. कारण गांधी-विनोबांच्या सहवासाने व सानिध्याने मी हे समजून चुकलो होतो की, ईश्वर-प्राप्ती व समाजसेवा यात विरोध नाही. केवळ अभिन्नता आहे. म्हणूनच गांधी-विनोबांच्या प्रेरणेने मी असहकार आंदोलनात सामील झालो. देशसेवा आणि अध्यात्म यांच्या एकरूपतेचा

प्रत्यय मला गांधी–विनोबांच्या जीवनाचे वैशिष्ट्य वाटे. म्हणून मी माझ्या प्रयत्नाला भटकंती म्हटले आहे. 'प्रस्थानत्रयी'च्या सोबत मी विनोबांचा 'उपनिषदांचा अभ्यास'ही वाचू लागलो. त्यांचे प्रतिपादन मला आवडू लागले. माझ्या मानसिक द्वंद्वातून त्यांनी माझी सुटका केली.

इतके असूनही माझा–त्यांचा बरेचवेळा मतभेद होत असे; परंतु माझ्या मतभेदाचेही त्यांनी नेहमी स्वागतच केले. माझी चिंतनशक्ती कुंठीत करण्याचा प्रयत्न त्यांनी कधीही केल्याचे मला आठवत नाही. त्यांनी निरंतर माझ्या आत्मप्रामाण्यवादी बुद्धीला प्रोत्साहितच केले.

विनोबा क्रांतदर्शी कवी होते. त्यांचे क्रांतीदर्शन अपूर्वच होते ! विनोबा म्हणत असत की, 'विज्ञानाचे अहिंसेशी लग्न लागले पाहिजे आणि या लग्नाची शुभघटिका आजच्यापेक्षा कधीही चांगली नव्हती.' हे प्रतिपादन त्यांनी १९५५ साली केले होते, आज चाळीस वर्षे उलटून गेल्यावरही परिस्थिती कायमच आहे. विज्ञानाने परिस्थितीच अशी आणली आहे की, एक तर जगाला सर्वनाशाकडे गेले पाहिजे किंवा सर्वोदयाचा मार्ग धरला पाहिजे. हिंसा ही व्यापक होऊच शकत नाही. लाठी ही जशी सार्वत्रिक झाली की, ती नष्ट होते. तसेच हिंसेचेदेखील आहे. ती सार्वत्रिक झाली की नष्ट होते. म्हणून जगाला आता अहिंसेशिवाय तरणोपायच उरलेला नाही.

विनोबांना माहीत होते की, क्रांती अंकगणिताच्या हिशोबाने होत नाही. बीजगणिताच्या हिशोबाने होते. आकड्यांचे वजन व त्यांची किंमत मोजलेली–मापलेली असते. ती अल्प असते. बीजगणितात संकेत, चिन्हे व खुणा असतात. त्यांचे मूल्य व प्रतिष्ठा

अपरिमित असते. त्यांचे वजन व किंमतही अमर्यादित असते. म. गांधींनी चिमूठभर मीठ उचलले. लोकांना वाटले, या गतीनी किती दिवसांत समुद्र आटेल व किती दिवसांत मिठाच्या वखारी भरतील. पण तिकडे इंग्रजांचे सिंहासन मात्र डोलू लागले होते. म्हणूनच विनोबांनी भूदानाच्या क्रांतीतही मूठमूठभर माती एकत्रित केली. परंतु ती क्रांतीच्या संकेतांनी अभिमंत्रित होती. त्यांनी प्रारंभ जमिनीपासून केला. कारण भूक हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे आणि त्याचे उत्तर अन्न आहे. अन्न उत्पादन करण्याचे साधन जमीन आहे. आमच्या देशातले ७८ टक्के लोक जमिनीवर अवलंबून आहेत. म्हणून या देशात जमीन कसणारा किसानच क्रांतीची विभूती होऊ शकतो. जो कसत असेल त्याच्या हाती जमीन हवी आणि जो कसत नसेल त्याच्या हाती वीतभरही जमीन नसावी. उत्पादकांच्या मालकीचे मूलभूत सूत्र असे आहे की, उत्पादनाची साधने उत्पादकांच्या स्वाधीन हवीत! उत्पादनाच्या सर्व साधनांचे मूलभूत साधन म्हणजे अखंड–भांडार अशी ही वसुमती–धरित्री जमीनच आहे. कोळसा, लोखंड, लाकूड सारी सामग्री जमिनीतूनच निघते. म्हणून उत्पादनाच्या मालकीचा प्रारंभ जमिनीपासूनच झाला पाहिजे.

जे मेहनत करतील ते मालक बनतील, जे मालक बनतील ते मेहनत करतील. भूदानाची ही केवळ कष्ट निवारणाची वा दुःख निवारणाची चळवळ नव्हती, ती परंपरागत चालू असलेल्या दान-धर्माची चळवळ नव्हती. तर ती आर्थिक क्रांतीचा पाया घालणारी चळवळ होती. लोकशाहीच्या मार्फत क्रांती करायची तर कायदा लागतोच, पण त्या कायद्यासाठीसुद्धा सामाजिक वातावरण व अधिष्ठान यांची आवश्यकता असते. भूदान ही अशी क्रांती आहे की, जेणेकरून वर्गकलहाशिवाय वर्गनिराकरण होते आणि प्रतिक्रांतीस अवकाश राहात नाही. विनोबा म्हणत असत की, ' तुम्ही कालपुरुषाची पदचिन्हे ओळखा.'

भूमीचे न्याय्यवितरण म्हणजे भूदान. त्यात देणाराचे पापक्षालन होते व घेणाराचा सन्मान वाढतो. भूदानाच्या चळवळीत श्रीमंतापेक्षा गरिबांच्या पुरुषार्थाला अधिक वाव आहे. उत्पादक परिश्रम करणारे गरीब करोडो आहेत. या गरिबात परस्परांविषयी सहानुभूतीची आणि आत्मीयतेची भावना निर्माण करणे ही क्रांतीची पहिली अपरिहार्य अट भूदानात पूर्ण झाली आहे. भूदानयज्ञाची चळवळ ही नागरिकांत सहयोग निर्माण करण्याची व तो स्थिर करण्याची चळवळ होती. विनोबांनी सार्वत्रिक क्रांतीचा पांचजन्य भूदानयज्ञाच्या रूपाने फुंकला !

आमची कुटुंबसंस्था मानवीय स्नेहावर अधिष्ठित अशा सहजीवनाची प्रयोगशाळा आहे. कौटुंबिक जीवनातील मूल्यांचा विनियोग सामाजिक जीवनात करण्याची साधना विनोबांनी केली आणि मानवीय मूल्यांचे बीजारोपण केले. आजच्या विज्ञानयुगापासून आपण वेगळे राहू शकणार नाही, हे विनोबांना पुरेपूर माहीत होते. कारण ते म्हणत, विज्ञानयुग म्हणजे यंत्रयुग ही कल्पना चुकीची आहे. विज्ञान ही आत्मज्ञानासारखी एक शक्ती आहे. विज्ञानाचा योग जर लहान लहान अवजारांशी घडवून आणला तर मनुष्याची शक्ती वाढते व मोठ्या अवजारांशी घडवून आणला तर मनुष्याचा संहार होऊ शकतो. म्हणून विज्ञानाला आत्मज्ञानाची जोड हवीच यावर विनोबांचा भर होता.

विनोबांची प्रतिभा बहुमुखी आहे. गांधीजींप्रमाणेच विनोबांचे जीवनाचे दर्शनदेखील अखंडतेचे, एकतेचे व समग्रतेचे आहे. आजकाल या सर्वांना मिळून एक इंग्रजी शब्द वापरतात. 'HOLISM' समग्रतावाद. विनोबांचे जीवनदर्शन विविध असून संवादी आहे. जीवनाच्या विविध अंगांचे व उपांगांचे त्यांचे दर्शन सामंजस्याचे व संवादित्वाचे आहे आणि तद्नुसार त्यांच्या विभूतिमत्त्वाचे

विविध उन्मेषही त्यांच्या विविध प्रयोगांतून प्रकट होतात. गांधीजींनी सांगितलेल्या तीन प्रतिकांची गोष्ट घ्या. सामुदायिक प्रार्थना, सामुदायिक कताई व सामुदायिक सफाई–ही प्रतिके गांधीजींच्या दृष्टीने केवळ चित्रात्मक नव्हती, तर ती क्रियात्मक, क्रियाशील होती. म्हणून ती जिवंत प्रतिके होती. विनोबांनी या प्रतिकांना उपासनेचे रूप देऊन साऱ्या समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेलाच मुळी पारमार्थिक भूमिकेवर नेऊन ठेवले.

प्रथम प्रथम व्रतसंग्रहाच्यासमयी त्यांची भूमिका अन्य तपस्व्यांप्रमाणे अत्यंत प्रखर व उग्र असे. एका प्रसंगी त्यांनी स्वत:च सांगितले आहे की, ' काम जिंकण्यासाठी मी क्रोधाचा वापर केला. ' परंतु त्यांची ही उग्रता व कठोरता त्यांच्या स्वभावात नव्हती. ती तपस्येमुळे आलेली होती आणि या तपस्येचा परिपाठ शेवटी मधुर अशा भक्तिरसात झाला. त्यांचे हृदय तर करुणेने ओथंबलेले होते आणि या करुणेचे रूपांतरही सार्वजनिक प्रेमात परिणत झाले होते. गांधीजींनी सांगितलेल्या प्रतिकांची स्थापना त्यांनी उपास्यांच्या आसनावर केली आणि प्राणप्रतिष्ठेने त्यांची राखण केली. हाच विनोबांचे विभूतिमत्त्व साधणारा अभिनव जीवनयोग होता. जीवनाच्या साऱ्या साधनांना त्यांनी विभूतींच्या स्वरूपातच पाहिले.

गांधीजींचे पहिले प्रतीक आहे सामुदायिक प्रार्थना. गांधीजींच्यापूर्वी ब्राह्मो समाजाने, प्रार्थना समाजाने सामुदायिक प्रार्थना प्रचलित केली होती. परंतु गांधीजींना जी सामुदायिक प्रार्थना अभिप्रेत होती ती प्रार्थना जगातील ' सर्वसंप्रदायांचा समन्वय साधणारी ' प्रार्थना होती. म्हणून त्यांनी सामुदायिक प्रार्थनेला सर्वधर्म प्रार्थनेचे रूप दिले. प्रार्थनेच्या स्वरात ईश्वराबरोबर अल्लाचेही नाव सामील करण्यात आले. एकाअर्थी या सांस्कृतिक समन्वयाचा उपक्रम थिऑसॉफिकल सोसायटीने केला होता.

रामकृष्ण परमहंसांनी या उपक्रमाचे अनुष्ठान जीवनभर केले आणि त्यातील पारमार्थिक सत्याचा अनुभव घेतला. श्रीराम-कृष्णांच्यानंतर या दिशेने स्वत: अनुष्ठान करणारे विनोबा हेच पहिले होत. त्यांचे हृदय भक्तिभावाने उचंबळून येत असे. कारागृहात असताना पहाटेच्या समयी कुराणशरीफातील आयते उच्च स्वरात गाताना विनोबांना ज्यांनी ऐकले होते, ते त्या मंजूळ स्वराने अगदी मंत्रमुग्ध होऊन जात असत. ज्या श्रद्धेने, निष्ठेने विनोबांनी वेदांचे पठण केले, त्याच श्रद्धेने व निष्ठेने विनोबांनी कुराणशरीफ, बायबल, धम्मपद, जपुजी आदी धर्मग्रंथांचेही पठण केले. आणि आपल्या फलश्रृती म्हणून सर्व धर्मांच्या ग्रंथांचे सार नवनीताच्या रूपाने भारतमातेला अर्पण केले. त्यांनी आपल्या वैशिष्टचपूर्ण शैलीत नाममालाच्या तीन श्लोकातच जगातील सर्व प्रमुख संप्रदायाच्या उपास्यदैवतांच्या संग्रह केला आहे. हे श्लोक अतिशय लोकप्रिय ठरले असून कित्येक ठिकाणी त्यांचे प्रार्थनेत नित्य पठण होत असते. अशाप्रकारे विनोबांचे विभूतीमत्व नित्य उपासनेच्या व अनुष्ठानाच्या रूपात प्रकट झालेले आपल्याला दिसून येते.

विनोबांनी ‘ गीताई ’ मातेची ज्या निष्ठेने उपासना केली त्याच निष्ठेने त्यांनी टकळीचीदेखील उपासना केली, कुदळीची उपासना केली, कुऱ्हाडीची उपासना केली आणि झाडूचीदेखील उपासना केली. या उपासनेच्या संदर्भातच त्यांनी गृत्समद ऋषींचे वर्णन केले आहे. ज्या निष्ठेने त्यांनी या उपकरणांची उपासना केली त्याच निष्ठेने जणू त्यांनी वीणा, बासरी या वाद्यांची उपासना केली. मी तुकाराममहाराजांचे अभंग कित्येक प्रसिद्ध संगीतकारांच्या तोंडून ऐकले होते. परंतु प्रथम मी ते जेव्हा विनोबांच्या तोंडून ऐकले तेव्हा माझ्या हृदयाच्या तारा छेडल्या

गेल्या. मी रोमांचित झालो. आज त्याची आठवण झाली तरीदेखील माझ्या हृदयाच्या तारा छेडल्या जातात आणि मी रोमांचित होतो.

विनोबांनी श्रमाला उपासनेचे स्वरूप दिले. कर्माला पूजा मानले. उपकरणांना विभूतींचे स्थान दिले आणि सारे जीवनच कलात्मक बनविले. त्यांच्या विभूतिमत्त्वाला पूर्णत्व देणारी अशी ही रसिकता होती. श्रम, उद्योग, खेळ, कला, व्यायाम आणि हटयोग या साऱ्यात त्यांनी एक अद्‌भूत संवादित्व साधले होते. विनोबांचा हा संवाद-योग ' साम्ययोग ' या नावाने विख्यात आहे. साम्यवाद नव्हे, साम्ययोग ! साम्यात वाद कधीच नसतो, संवाद असतो.

विनोबा केवळ प्रज्ञावंत शास्त्री नव्हते. ते श्रेष्ठ कवी होते. कवीचे गुण कोणते, यावर त्यांचा एक सुंदर लेख प्रसिद्ध आहे. त्यांची प्रकृती खऱ्याखुऱ्या सूत्रकाराची होती. ' साम्यसूत्राणी 'मध्ये त्यांनी आपल्या जीवनाचे दर्शन ' स्वल्पाक्षर बव्हर्थ ' या खुमासदार शैलीत अत्यंत संक्षिप्त परंतु समग्रतेने प्रस्तुत केले आहे. त्यांच्या प्रतिभेचे विविध पैलू व मनोरम असा प्रतिभाविलास किती म्हणून वर्णावा ! विनोबांनी आपल्या संपूर्ण जीवनाला जणू एका महाकाव्यातच परिणत केले होते आणि हेच त्यांचे ' योगः कर्मसु कौशल्यम् ! ' होते.

अशाप्रकारे जीवनाच्या भिन्न भिन्न क्षेत्रात प्रत्यक्ष प्रयोग करून त्यांनी प्रपंचाला पारमार्थिक भूमिकेपर्यंत उन्नत करण्याचे कष्ट घेतले. जीवनात त्यांनी व्यावहारिक सत्ता आणि पारमार्थिक सत्ता अशा दोन भिन्न भिन्न सत्ता कधीच मानल्या नाहीत. व्यवहाराला परमार्थप्रवण करण्याचा त्यांनी सदैव प्रयत्न केला. गांधीजींच्या विधायक कार्यालाच त्यांनी नित्य अनुष्ठानाचे स्वरूप दिले. एकाअर्थी त्यांनी लौकिक जीवन संपविले होते. शरीराच्या,

चित्ताच्या काही स्वाभाविक क्रिया असतात, पण त्यात कशातच त्यांचे मन राहिले नव्हते.

विनोबा कोणत्याही विशिष्ट देशाचे अभिमानी नव्हते. कोणत्याही धर्माचे नव्हते, संप्रदायाचे नव्हते वा विशिष्ट जातीचे नव्हतेच नव्हते. जगतात उपलब्ध असणाऱ्या सर्व सद्विचारांच्या उद्यानात ते स्वाध्याय करीत. सद्विचारांना आत्मसात करणे हाच त्यांचा धर्म होता. विविध वैशिष्ट्यांत सामंजस्य, समन्वय घडवून विश्ववृत्तीचा विकास, हीच त्यांची वैचारिक साधना होती. म्हणूनच ते विश्वमानव होते. त्यांची साधना परिपक्व झाली होती. म्हणूनच ती परमात्म्यात विलीन होणे स्वाभाविकच होते. लो. टिळकांनी गीता रहस्याच्या समर्पण पत्रिकेत भगवंताच्या जनतात्म स्वरूपाला आवाहन केले आहे. त्यांचे उत्तराधिकारी म. गांधी यांनी विश्वात्म्याची आराधना केली. आता यानंतर परमात्माच शिल्लक राहातो. विनोबांनी शेवटी केवळ ' रामहरी 'चाच मंत्र दिला. ' जय हिंद, जय जगत् ' या मंत्राने चराचर विश्वाचाच संकेत केला आणि त्या निष्ठेनुसार ते तादात्म्य पावले. मृत्युसमयी त्यांची साधना संपूर्ण झाली होती. साधना परिपूर्ण झाली म्हणजे त्यात संकल्पाचा अंश उरत नाही. साधना स्वभाव बनतो. विनोबांच्या बाबतीत त्यांचा देह परमात्म्यात विलीन झाला. त्यांचा मृत्यु केवळ सदेह समाधी, संथारा वा शरीर-विसर्जन नव्हते, कारण या तिन्ही मरणांमध्ये मृत्यूचा संकल्प व प्रयत्न अंतर्भूत असतो. परंतु विनोबांच्या बाबतीत एखादे परिपक्व फळ वृक्षावरून गळून पडावे, सहजगत्या भगवंताला समर्पित व्हावे, तसे विनोबांचे, जर्जर नव्हे परंतु परिपक्व शरीर सहजगत्या समर्पित झाले. ही परिपक्व होण्याची प्रक्रियादेखील स्वाभाविकच असते. म्हणून विनोबांचे महानिर्वाण परमेश्वरापाशी विलीन होणेदेखील उच्चकोटीचे होते.

विनोबांचे शेवटचे दिवस ज्ञानोत्तर जीवनाचे दिवस होते. आपल्या प्राचीन परंपरेत याला प्रारब्धयोग म्हणतात. मराठी व्याकरणात ‘ भावे प्रयोग ’ प्रसिद्ध आहे. हा प्रयोग कर्तरीप्रयोगही नसतो आणि कर्मणीप्रयोगही नसतो. विनोबांचे आडनाव ‘ भावे ’च आहे. त्यांच्या जीवनाचा ‘ भावेप्रयोग ’ सुरू झाला तरी आपल्या क्षीण आवाजात आपल्या आचार्यांच्या शीलाला अनुरूप अशा पद्धतीनेच ते म्हणतात, ‘ विधायक लोकपराक्रम जागृत करा. ’ जनतेच्या जागृत पुरुषार्थानेच आमच्या समाजात इस्टं परिवर्तन घडून येऊ शकते. ‘ एषः आदेशः, एषः उपदेशः, एषानेदोषनिषित एतदनुशासनम् ’ आचार्यांचे मुकुटमणी, आचार्यांचे प्रवर विनोबा यांचे हे अनुशासन आहे. ‘ जयजगत ’चा घर्मघोष आणि लोक-पुरुषार्थाचा बोधमंत्र आकाशात–आसमंतात गुंजावा हेच त्यांच्या अंतरात्म्याचे आवाहन ! विनोबांना विनम्र प्रणाम !

# मी पाहिलेले जयप्रकाश . . . !

श्री. जयप्रकाश नारायणांचे विभूतिमत्व अद्वितीय आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वात सद्‌गुणांचे विविध पैलू आहेत. त्यामुळे त्यांचे जीवन अद्‌भुत्‌रम्य तर आहेच, पण त्याबरोबरच इंद्रधनुष्यासारखे मोहकही आहे. जनतेचे दूत असलेले जयप्रकाश केवळ या देशाचे एक अपक्ष नागरिकच नाही, तर निष्पक्ष लोकनिष्ठ जीवनाचे प्रतीक आहेत. केवळ विशाल जनसमुदायाचे ते उपासक नाहीत, तर लोकात्म्याचे एक दक्ष पहारेकरी आहेत. गेल्या काही वर्षांपासून लोकात्म्याचे आणि विश्वात्म्याचे स्वरूप प्रत्यक्ष लोकजीवनात उतरविण्याची ते पराकाष्ठा करीत आहेत. म्हणूनच भारतीय नागरिकांबरोबरच ते विश्वनागरिकही मानले जातात. त्यांचा स्वतःचा देशही आता क्षितीजव्यापी झाला आहे. याच कारणावरून ते जनतेचे अनिर्वाचित, स्वयंसिद्ध प्रतिनिधी मानले जातात.

श्री. चिंतामणराव देशमुख म्हणाले होते की, ‘जे. पी. हे लोकात्म्याचे पुजारी आहेत.’ इमर्सनने म्हटले आहे की, ‘जेवढे थोर

पुरुष होऊन गेले, त्यांच्यासंबंधी सदा गैरसमज पसरलेले असतात.' या अर्थाने जे. पीं. चे व्यक्तित्व वादग्रस्त असले तरी मोठे मनोहर आहे. त्यांना विरोधक किंवा शत्रू विरळाच आहे. प्रतिस्पर्ध्यांना नेहमी असेच वाटत असे की, ते आपल्याबरोबर असते तर फार बरे झाले असते. अशा विरोधामध्ये स्तुतीचाच भाग अधिक असतो आणि अशा टीकेनेही गौरवच होत असतो.

मला आठवते, मी जे. पीं. ना प्रथम १९३३ किंवा १९३४ मध्ये नागपूरला श्री. पी. वाय. देशपांडे यांचेकडे भेटलो. पहिल्या भेटीतच छाप पाडण्याचा गुण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आहे. खऱ्या अर्थाने ते रूपवान, देखणे नाहीत, परंतु एकूण त्यांच्या मुद्रेवर अतिशय मधुर व स्निग्ध भाव आहेत. त्यांचा नीळकमळ सावळा वर्ण त्यांच्या रूपाची शोभा वाढवितो. यानंतर जेव्हा जेव्हा त्यांच्याशी भेटण्याचा योग आला, तेव्हा तेव्हा त्यांची प्रथमदर्शनी पडलेली ही छाप अधिकाधिक दृढ होत गेली. श्री. पी. वाय. देशपांडे यांच्याकडे त्यांनी समाजवादाचे विवेचन करताना जे विश्लेषणात्मक भाषण केले, त्यामध्ये त्यांची प्रतिभा दिसून आली. त्यामुळे पहिल्या भेटीतच मला त्यांचे मंत्रमुग्ध करणारे अस्तित्व जाणवले.

या देशाचे सर्व नागरिक त्यांना वीरपुरुष म्हणूनच ओळखतात व मानतात. स्वातंत्र्य–आंदोलनात त्यांनी सैनिक व सेनापती या दोन्ही रूपांत जो अतुल पराक्रम व साहस दाखविले, त्याची कहाणी रोमांचकारी व हृदयस्पर्शी आहे. परंतु जो खरा वीर पुरुष असतो त्याच्या व्यक्तित्वात कारुण्य काठोकाठ भरलेले असते व तो लोण्याप्रमाणे मऊ व मृदुल असतो. जे. पीं. च्या स्वभावात इतकी निर्व्याजता आहे की, ती पाहाणाऱ्याला भेदून जाऊ शकते. प्रसंगानुसार त्यांच्यात क्रोध आणि आवेश जागृत होतो. परंतु मूलतः करुणेची प्रेरणाच अधिक असते. म्हणून त्यांच्या आवेशातून अथवा क्रोधातून अशुभ परिणाम कधीच होत नाहीत.

बुद्धी आणि हृदय, ऋजुता आणि प्रांजलता यांचे अद्भुत मिश्रण त्यांच्या व्यक्तित्वात उमटले आहे. ज्यावेळेस ज्या सत्याचे त्यांना दर्शन होते, त्या सत्याचे ते संपूर्ण चित्ताने ग्रहण करतात आणि प्राणपणाने त्या सत्याचा प्रत्यक्षात पाठपुरावा करण्यासाठी स्वतःला झोकून देतात. परंतु दुसऱ्याची भूमिका समजून घेण्यास ते नेहमी तयार असतात. याचा परिणाम असा झाला आहे की, कोणतीही राजकीय प्रणाली, संप्रदाय, संस्था यांच्या सीमांनी ते बंदिस्त होऊ शकले नाहीत. ते जुन्या राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये होते, साम्यवादी होते, समाजवादी होते आणि आता ते सर्वोदयी आहेत. परंतु कोणतीही विचारधारा त्यांचे व्यक्तित्व सीमित करू शकली नाही. आजही ते सर्वोदयाचे प्रतिनिधी आहेत, पण त्याहीपेक्षा ते अधिक मोठे आहेत. यामुळेच त्यांना नवीन विचार ग्रहण करताना व जुन्यापुराण्या विचारांच्या शृंखला तोडून टाकताना जड जात नाही. त्यांच्या जीवनातील सजीवता हीच या सर्वांमागील मूळ प्रेरणा-स्त्रोत आहे.

समाजवादाचे इंग्लंडमधील अग्रगण्य भाष्यकार श्री. मॅकडोनाल्ड याने समाजवादाच्या आपल्या पहिल्या पुस्तकात लिहिले आहे की, ' राष्ट्रातील थोर पुरुषांचा इतिहास रोमांचक असतो.' आमच्या देशातील समाजवादाचा इतिहास लिहिताना ज्या थोर पुरुषांचा उल्लेख करावा लागेल, त्यात जे. पीं. चे स्थान अग्रगण्य राहील. रंगून येथे समाजवादी व्यासपीठावरून बोलताना जे. पी. म्हणाले होते, ' भावी समाजवादी क्रांतीचा नायक मजूर राहणार नाही, तर किसान राहील. ' परंपरावादी समाजवाद्यांच्या विचारात आणि त्यांच्यात हा मोठा फरक दिसून येतो.

' वैज्ञानिक समाजवादाची प्रगती व्हावयाची असेल तर त्यात हिंसेला मुळीच स्थान राहणार नाही' अशी घोषणा देणारी जे.पी. हीच सर्वप्रथम व्यक्ती होती. लोकशाही समाजवादी नेत्यांनीही

ही घोषणा केली होती, परंतु वैज्ञानिक, क्रांतिकारी समाजवादी नेत्यांत जे. पी. हेच पहिले होते. समाजवादी आंदोलनाचे पुढारी या नात्याने त्यांनी सांगितले होते की, भौतिक वातावरणातून सदाचाराची प्रेरणा मिळू शकत नाही. भौतिक आकर्षणाव्यतिरिक्त अन्य मूलभूत मानवीय प्रेरणेच्या दिशनेच पावले उचलावी लागतील. यातच समाजवादाच्या आधुनिकतम वैज्ञानिक स्वरूपाचे दर्शन जे. पीं. नी दिलेले आहे. भारतीय समाजवादी पक्षाची स्थापना करताना जे. पीं. नी 'व्हाय सोशॅलिझम' हे पुस्तक लिहिले. यात गांधीवादावर टीका करतानाच समाजवादावरील आक्षेपांचे खंडन केले होते. एक आक्षेप असा होता की समाजवादाचा मनुष्यावर विश्वास नाही. उत्तर देताना जे. पी. म्हणाले, 'समाजवादाच्या मूलभूत धारणेत जर मनुष्यावर विश्वास नसता तर पूर्ण सत्ता व संपत्ती मूठभर लोकांच्या हाती सोपविलेली आहे, अशासारखे मुद्दे कसे उपस्थित होऊ शकले असते ? मनुष्याच्या मूलभूत सत्प्रवृत्तींवर जर विश्वास नसता, तर या गोष्टी कशा संभवल्या असत्या ?'

अशा तऱ्हेने जे. पीं. च्या व्यक्तित्वविकासात आमच्या देशाच्या समाजवादाच्या विकासाचे दर्शन घडून येते. आता प्रभावतीजींना जयप्रकाशजींच्या सहवासाची ओढ होती. त्या गांधीजींना म्हणाल्या, 'मुझे लगता है कि जयप्रकाश के साथ कुछ दिन रहूंगी तो आपके विचार उन्हे समझा सकूंगी।'

गांधीजी हसत हसत म्हणाले, 'विचार समझाने के लिये नहीं, सेवा के लिये उसके साथ रहो। उसे सेवा की जरूरत है। उसके स्वास्थ्य को संभालना।'

२९ जानेवारीला रात्री त्या पाटण्याला रवाना झाल्या आणि ३० जानेवारीला गांधीजींचा खून झाला.

जीवनाच्या या टप्प्यापर्यंत त्यांना गांधींची शीतल छाया लाभली होती. आणि आता तो आसरा कायमचा हरवल्यावर त्या अहिंसेवर श्रद्धा बसलेल्या जयप्रकाशजींकडे आल्या होत्या. त्यांच्या सेवेसाठी, त्यांना समजावण्यासाठी, अगदी कायमच्या त्यांच्या सहवासासाठी, त्यांना धीर देण्यासाठी.

आणि गांधीजींचे कार्य पुढे चालवण्यासाठी, त्यांचा संदेश फैलावण्यासाठी, त्यांनी दिलेला शेवटचा आदेश पाळण्यासाठी त्या आता कायमच्या बांधल्या गेल्या होत्या.

त्यांचे मार्क्सवादाचे अधिष्ठानच कोसळले होते. प्रभावती या चमत्काराकडे अतिशय प्रेमाने, हळुवारपणाने आणि तृप्ततेने पहात होत्या. त्यांच्या संघर्षाचे अधिष्ठानही कोसळले होते, नाहीसे झाले होते.

प्रभावती कृतकृत्य झाल्या होत्या. त्यांच्या व्रताची सांगता पूर्ण झाली होती. प्रसन्न सात्विक तेजाने त्या तळपत होत्या. तृप्त झाल्या होत्या. उणीव एवढीच की हे बघण्यास गांधी हयात नव्हते. ते त्यांचे अंःतस्थ दुःख होते.

भूदानासाठी लोकांनी जमिनीचे दान करावे म्हणून जयप्रकाश जेव्हा विराट सभांमधून भाषण देऊ लागले, तेव्हा त्यांना भारतीय जनमनाची कल्पनाही नव्हती. एकदा एका सभेत ते म्हणाले, ‘ यह कर्ण की, हरिश्चंद्र की भूमी है, अपनी हड्डियों का दान देनेवाले दधीचि की भूमी है। कोई देगा यहाँ भूदान, संत विनोबा को ? ’ सर्व सभा स्तब्ध झाली. एक फाटके मळके कपडे घातलेला शेतकरी उठला. व्यासपीठाजवळ आला आणि म्हणाला, ‘ माझी सहा बिघे जमीन आहे. सर्वच्या सर्व दान करतो आहे. लिहून घ्या. ’ ‘ सर्व जमीन देऊ नकोस, तू काय खाशील? ’ असे त्याला समजावण्याचा जयप्रकाश प्रयत्न करू लागले. पण तो म्हणाला,

'देवानं मला हातपाय दिले आहेत. मी कमावून खाऊ शकतो. आजपर्यंत मी जमीन असण्याचा आनंद भोगला. आता तो दुसऱ्या कुणा भूमिहिनाला भोगू दे.'

जयप्रकाश स्तंभित झाले! खरोखरच भोळेभावडे कर्णासारखे, हरिश्चंद्रासारखे लोक भारतात आहेत ह्याचा ते साक्षात अनुभव घेत होते. एक मार्क्सवादी, लोकांकडून अहिंसक क्रांतीची दीक्षा घेत होता. प्रभावतीजी ते दृश्य अंतःकरण भरून भरून पहात होत्या .

जयप्रकाशांचे भूदान–विश्लेषण-विवेचन ठिकठिकाणी चालू होते आणि त्याबरोबर चिंतनही. १९५४ च्या बोधगया येथील संमेलनात जयप्रकाशजींनी सांगितले, 'इस महान कार्य के लिये मैं अपना जीवनदान देता हूँ।'

प्रभावतीजींच्या डोळ्यांना खळ नव्हता. त्यांच्या उत्साहाला आता उधाण आले होते. त्यांचे कार्य द्विगुणित झाले होते. सोखो-देवरा आश्रमाचे काम आणि जयप्रकाशजींची काळजी. अनेक वर्षांपूर्वी प्रभावतींनी जयप्रकाशजींना लिहिले होते. '...हम दोनों साथ रहकर सहयोग से काम करे...' तो दिवस कधी उगवेल, असे त्यांना वाटले नव्हते. आज प्रभावती सर्वांच्या दिदी बनल्या होत्या, आणि जयप्रकाशांच्या तर दिदी, माता सर्व काही होत्या. आजपर्यंत जयप्रकाशांच्या कार्यात त्यांचा सेवाभाव पणाला लागत होता. आता त्यांच्या कार्याचीही कसोटी होती. दोघांच्या विचारातील तफावत सरली होती.

समाजवादाच्या वाटचालीत जयप्रकाशांना उसंत नव्हती. आज या गावात तर उद्या दुसऱ्या शहरात. आज दिल्ली तर उद्या मुंबई, परवा नागपूर, मद्रास, पाटणा अखंड प्रवास चालूच होता. आणि त्यांच्या या झंझावाती प्रवासात त्यांची तैनात प्रभावती तितक्याच तत्परतेने ठेवीत होत्या. गांधींच्या शिकवणुकीत तयार झालेल्या आणि जयप्रकाशांबद्दलच्या जिव्हाळ्याने जयप्रकाशांच्या

गरजा आणि मन त्यांनी सांगण्याआधीच ओळखणाऱ्या प्रभावती कुठेच कमी पडत नव्हत्या. सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे या सर्वांबरोबरच स्वतःच्या कार्यातही त्यांनी कधी खंड पाडला नाही. पाटण्याची महिला चरखा समिती प्रभावतींचेच अपत्य. स्त्रियांमध्ये जागृतीचे आणि विधायक रचनात्मक कार्य करणाऱ्या या समिती-साठी सर्व प्रकारचे कष्ट त्यांनी उपसले होते. मुंबईमध्ये जयप्रकाशजींचा मुक्काम असला की या कार्यासाठी देणगी मिळविण्याचे काम त्या वेळात वेळ काढून करीत. जयप्रकाशांची सेवा व त्यांच्या कार्यक्रमाची चोख व्यवस्था ठेवून चरखा समितीचे काम त्या केव्हा आणि कसं करू शकत असतील, याचे कोडे जय-प्रकाशांचा स्वभाव आणि कार्याचा उरक माहिती असणाऱ्यांना नेहमीच पडे. पण सेवा हा प्रभावतींचा सहजधर्म होता. चंदनाच्या सुवासाला वेगळं कसं दाखवणार ?

१९५२ सालच्या निवडणुकीसाठी समाजवादी पक्षाची मोहीम धुमधडाक्याने सुरू होती. जयप्रकाशांच्या पायाला फिरतीचा भोवरा बांधलेला होता. प्रचंड उत्साह, प्रचार सभा, बैठका आणि गर्दीही प्रचंड ! तितकेच प्रचंड नैराश्य, निकाल लागल्यावर ! रात्रंदिवस अनेक कार्यकर्ते, त्यांच्या चर्चा आणि हरण्याचे विश्लेषण ! त्यांजबरोबर जेवणखाण, नास्ता, चहा यांनाही काळवेळ नाही. प्रभावतीजी येथेही कमी पडल्या नाहीत. उदबत्तीचा सुवास दरवळत होता....

विनोबांची भूदानाची पदयात्रा अखंड चालू होती. अहिंसक क्रांतीचा विचार ऐकण्यास हजारो लोक जमत होते. उत्तर प्रदेशात बांदा जिल्ह्यात विनोबाजी पोचले. जयप्रकाश त्यांना भेटले. चर्चा झाली. विनोबा म्हणाले, 'क्या हिंसा कभी आम जनता की ताकद बन सकती है ? वह तो मुठ्ठीभर लोगों की ही ताकद है। आम जनता की ताकद है—अहिंसा।'

विनोबांशी तासन् तास चर्चा झाल्यावर, ऐकून समाधान झाल्यावर जयप्रकाशांनी भू-दानासाठी काही वेळ देण्याचे आश्वासन विनोबांना दिले.

प्रभावतीजी जयप्रकाशांचे हे वैचारिक परिवर्तन प्रत्यक्ष पहात होत्या. त्यांच्या श्रद्धा सफल होत होत्या. वर्षानुवर्षे अंत:करणात बाळगलेली आकांक्षा साकार होत होती.

पोस्टमन युनियनच्या मागण्यांच्या वेळी जयप्रकाशांनी आत्मशुद्धीसाठी केलेल्या २१ दिवसांच्या उपवासात जयप्रकाशांना आंतरिक शांती, अद्‌भूत आनंद, प्रसन्नता लाभली. त्यातून त्यांनी चिंतन केले. माणसानं चांगलं का असलं पाहिजे ? चांगल्याच्या पाठीमागची प्रेरणा कोणती ? त्यांना साक्षात्कार झाला की, डायलेक्टिकल मटिरियालिझम (विरोध-विकासवाद) याचे उत्तर देऊ शकणार नाही. केवळ भौतिकवादात या प्रश्नाचे उत्तर सापडणार नाही. याही पलीकडे काहीतरी आहे. या उपोषणात जयप्रकाशांभोवती प्रभावती छायेसारख्या वावरत होत्या. सेवेत चंदनासारख्या झिजत होत्या. त्याचा सुगंध जयप्रकाशांच्या अंतरात्म्यात भरून रहात होता आणि जयप्रकाशांना गीता म्हणण्याला आणि उपनिषदे वाचण्याला प्रेरणा देत होता.

सर्वोदयाचा विचार अधिक विज्ञाननिष्ठ, समृद्ध आणि केवळ मानवतावादी नव्हे, तर अधिक अध्यात्मिक झालेला आहे.

त्यांच्या एका नामवंत मित्राने लिहिले आहे की, 'जय-प्रकाशांची जीवनगाथा म्हणजे गमावलेल्या संधीची कहाणी आहे.' परंतु सत्य हे आहे की त्यांनी कधी संधी प्राप्त करून घेण्याचा प्रयत्नच केला नाही. संधी आपोआप वेळोवेळी त्यांच्याकडे चालून आली. परंतु त्या संधीचा फायदा घेण्याची कल्पना जे. पीं. च्या मनातही आली नाही. येशूने म्हटले आहे, 'जो आपल्या जीवनात त्याग करतो, वैराग्य पत्करतो, त्यालाच जीवनाची सार्थकता

लाभते.' लोक असेही म्हणतात की, 'जे. पी. नेहमी बस चुकतच आले आहेत.' पण खरी गोष्ट अशी आहे की, जे. पीं. नी बसची प्रतिक्षाच केली नाही. तिबेट, काश्मीर, नागालँड, बांगला देश, भारत, पाकिस्तान यांबाबतच्या समस्यांची सोडवणूक व्हावी म्हणून त्यांनी आपले प्राणही पणाला लावले, एवढेच नव्हे तर आपली सारी प्रतिष्ठा व राजकीय जीवनच पणाला लावून टाकले होते. अशा तऱ्हेने स्वार्थाचे जिथे भानच नाही, तिथे संधी प्राप्त करून घेण्याची, अवसर शोधण्याची गरजच काय ?

जे. पीं. ची पराक्रमयात्रा जितकी उदात्त, रम्य व मनोज्ञ आहे, तेवढीच विचारयात्रा देखील आहे. पराक्रमयात्रेत क्रांतिकारी जे. पीं. ची बुद्धी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाचा स्वीकार करताना कधी कुंठित झाली नाही, तशी शांतीमय क्रांतीचा शुद्धीपूर्वक पुरस्कार केल्यावर त्या मार्गातील वीरवृत्तीही केव्हाही कुंठित झाली नाही; अकुतोभय–वृत्ती हे वीरतेचे लक्षण आहे. जेव्हा काश्मीर व अक्साई चीनच्या मामल्यात लोकमताच्या विरोधात ते आपली मते प्रकट करू लागले, तेव्हा दिल्ली येथे सार्वजनिक सभेत त्यांना धडा शिकविण्याचा काही लोकांनी विचार केला. त्या सभेत क्षुब्ध, तापलेले वातावरण पाहून काही शांतिसैनिकांनी आपले पिवळे दुपट्टे लपविण्याचा प्रयत्न केला. परंतु जे. पी. थोडेसुद्धा विचलित झाले नाहीत, असाच दुसरा एक प्रसंग काश्मीरमध्ये झाला. तेव्हा त्यांनी शेख अब्दुलांच्या उपस्थितीत काश्मीरातील जनतेला सांगितले की 'काश्मीरच्या भवितव्याचा विचार भारतीय संघराज्याच्या बाहेर जाऊन होऊच शकत नाही.'

अशा तऱ्हेने त्यांची ही अकुतोभयवृत्ती त्यांच्या कर्मकांडाबरोबर त्यांच्या विचार–यात्रेलाही स्पर्शून गेली आहे. ते विचार करतात, त्या विचारांचे संपूर्ण निष्ठेने ग्रहण करतात,. परंतु

त्यांच्या निष्ठेने जिज्ञासेचा अंत होत नाही. त्यांची जिज्ञासा सतत कायम राहते. यामुळे मतांचा अभिनिवेश असूनही त्यांच्या वृत्तीत आग्रह नसतो. अनाग्रह हेच बुद्धिमंताचे खरे लक्षण आहे. दुसऱ्याची भूमिका समजून घेण्याची तत्परता जे. पीं. च्या बुद्धिनिष्ठेचा स्थायीभाव आहे. परिणामतः त्यांच्या स्वभावात उत्कटता असूनही असहिष्णुता नाही. याचा शुभ परिणाम असा झाला आहे की, त्यांची नवे विचार ग्रहण करण्याची क्षमता केव्हाच कमी झाली नाही.

अनाग्रहामुळेच त्यांचा स्नेह व सहृदयता मतभेदांना बाजूला सारून प्रतिस्पर्ध्याच्या हृदयाला स्पर्शून जाते. जे. पीं. चे स्वतःचे समर्थन कधी कधी आवेशपूर्ण झाल्याने असहिष्णुतेच्या सीमारेषेवर पोहोचल्यासारखे भासते. परंतु त्यांच्या हृदयाची उदारता साऱ्या मतभेदांना ओलांडून मानवी स्नेहसंबंधांना परिपुष्ट करीत असते. डॉ. लोहियांशी त्यांचे कैकवेळा मतभेद झाले. कटुता आली. परंतु मनात खोलवर असलेले सौहार्द जसेच्या तसे कायम राहिले व ते मृत्युसमयी प्रकट झाले. कोणत्याही प्रसंगी सत्याचा शोध घेण्याची दुर्दम्य आकांक्षा त्यांच्या मनात वसत असल्यामुळे क्षुद्र मताग्रहापासून ते नेहमीच बचावतात. साधारणतः कम्युनिस्टांवर त्यांचा फारसा विश्वास व श्रद्धा नाही, परंतु मागच्या निवडणुकीनंतर ज्योति बसूंनी सत्तारूढ पक्षावर जेव्हा गंभीर आरोप केले, तेव्हा ते सत्यपरिस्थितीचा शोध घेण्यासाठी आढेवेढे न घेता एकदम तयार झाले.

परंपरागत अर्थाने जे. पी. अशा व्यक्तींमधील नाहीत की ज्यांनी सत्याचा शोध हेच आपले जीवनाचे प्रयोजन मानले. परंतु वस्तुनिष्ठ व सत्यनिष्ठ विषयांबाबत त्यांची भूमिका नेहमी प्रशंसनीय राहिली आहे. परिणाम असा झाला की, जेव्हा जेव्हा त्यांनी सत्याचे ग्रहण केले तेव्हातेव्हा त्यांची अहंमन्यता कधीच

आड आली नाही. चांडिल येथे १९५३ साली भरलेल्या सर्वोदय संमेलनात विनोबांचे अविस्मरणीय प्रवचन ऐकल्यानंतर त्यांनी एकदम भर सभेत जाहीर केले की आता माझ्या साऱ्या शंका दूर झाल्या आहेत. मी स्वतःला विनोबांचा शिष्य म्हणवून घेण्यास तयार आहे. अशी निरहंकारिता दर्शविणारे कैक प्रसंग त्यांच्या जीवनात आलेले आहेत.

परिस्थितीजन्य आव्हान जेव्हा त्यांच्यासमोर उभे राहते, तेव्हा ते सहज प्रेरणेने त्याचा स्वीकार करतात. तेव्हा ते उत्तेजित होत नाहीत. त्यांच्या जीवनात स्थित्यंतरे आली तेव्हासुद्धा त्यांनी आपल्या अंतःप्रेरणेचे दूरगामी निर्णय अगदी सहजतेने घेतले. विनोबांच्या आंदोलनात सामील झाल्यावर जेव्हा त्यांना वारंवार पार्टी सोडण्याबद्दल विचारणा होऊ लागली, तेव्हा ते म्हणाले, 'माझ्या जीवनातील कोणतेही महान निर्णय, कोणतेही स्थित्यंतर करणारे संकल्प मी ठरवून घेतलेले नाहीत, ते निर्णय मी सहज प्रेरणेने घेतले आहेत.'

१९५४ साली बोधगया येथील सर्वोदय संमेलनात त्यांनी जीवनदानाची घोषणा केली तेव्हा त्यांना स्वतःलाही माहीत नव्हते की पुढच्या क्षणी ते अशी घोषणा उच्चारणार आहेत. त्यांच्या निर्णयामागे कधीही नफ्यातोट्याचा हिशोब नव्हता किंवा नफानुकसानीचा मापतोल नव्हता.

अशाच तऱ्हेने कोणत्याही सामाजिक अथवा राष्ट्रीय संकटाच्या वेळी त्यांनी जे निर्णय घेतले, ते असेच उत्स्फूर्त होते. ज्याला आपण दातृत्व अथवा उदारता म्हणतो, ती त्यांना कधी जाणीवपूर्वक, प्रयत्नपूर्वक जोपासावी लागली नाही. यामुळेच इलेस्ट्रेटेड विकलीच्या संपादकांनी लिहिले होते की, 'हा माणूस सतत देतच जातो, परत घेणे याला माहीतच नाही.'

बंगलोरमध्ये एका साधू पुरुषाच्या दर्शनाला जाताना मला त्यांच्याबरोबर राहण्याची संधी प्राप्त झाली होती. त्या साधूने वारंवार एकच गोष्ट सांगितली की, 'आपले हृदय अत्यंत शुद्ध आहे.' जे. पीं. च्या बाबतीत हे त्रिवार सत्य आहे. कारण समाजात असे अनेक साधुवेषधारी पुरुष आहेत की ज्यांची हृदये ही राजकारण्यांची व मुत्सद्यांची आहेत. परंतु जे. पीं. चे हृदय खरोखरच संताचे आहे.

जे. पीं. च्या हृदयात जशी संततुल्य शुचिता आहे, तशी स्वभावामध्ये बालसुलभ ऋजुता व निरागसता पण आहे. ते सर्वोदय आंदोलनात आले तेव्हा त्यांना आपल्या राहणीमुळे खूप संकोच वाटत असे. त्यांच्या राहणीत विलासिता किंवा प्रसाधन-प्रियता मुळीच नाही. परंतु सद्भिरुची व रसिकता भरपूर आहे. त्यामुळे त्यांच्या राहणीचा ढंग 'ऐटबाज' वाटे. हे पाहून काही सर्वोदयी कार्यकर्ते कुजबुजत. धीरेंद्रभाईंनी हुजूर-मजूर शब्द वापरले तेव्हा जे. पी. फार संकोचले व बेचैन झाले व मोठ्या मुष्किलीने त्यांनी त्यांची बेचैनी दूर केली. ते स्तुतिपाठकांना हाताशी धरणारे नाहीत. लवकरच प्रसन्न होतात. बालकाप्रमाणे लवकरच रागावतात व लवकरच प्रसन्न होतात. त्यांची प्रांजलता स्फटिकाप्रमाणे आहे. त्यांच्या व्यवहारातील सौंदर्य व सभ्यता अनुकरणीय आहे. त्यांच्या स्वभावात औपचारिकता नाही. त्यामुळे त्यांचे स्वभावदोष दुसऱ्याला दुःखदायक नाहीत.

दुर्दम्य पराक्रमशीलता असूनही महत्त्वाकांक्षेने जे. पीं. च्या जीवनाला स्पर्शही केला नाही. म्हणूनच त्यांच्या मित्रांनी त्यांच्या जीवनाला 'गमावलेल्या संधीची कहाणी' म्हटले आहे. प्रत्यक्षात अशी दोन-तीन उदाहरणे तर मला माहीत आहेत की जेव्हा त्यांना जनतेने व मान्यवर व्यक्तींनी पंतप्रधान व राष्ट्रपती होण्यासाठी गळ घातली होती व त्यांनी नम्रतापूर्वक व दृढतेने

नकार दिला होता. आणि असेही म्हटले होते की, 'अहिंसेच्या ठिकाणी माझ्या मनात जी निष्ठा निर्माण झाली आहे, ती लक्षात घेता मी या पदांचा स्वीकार करू शकत नाही.' याच जे. पीं. नी बांगला देश प्रकरणी निःसंकोचपणे म्हटले होते की, 'कदाचित माझी अहिंसा एखाद्या शांतिसैनिकाइतकी संपूर्ण नसेलही, म्हणून मी शांतिसेनेतून निवृत्त होण्यास तयार आहे.' त्यांच्या एका निकटतम समाजवादी मित्राने त्यांना सांगितले की, तुम्ही परिस्थितीशी मुकाबला करण्यालायक राहिले नाही, तेव्हा त्यांनी अत्यंत शांतपणे सांगितले की त्यांचे राजकीय सत्तेपासून दूर रहाणे कसे योग्य आहे. त्यांच्या व्यक्तित्वात अंतर्बाह्य प्रामाणिक-पणा व वीरवृत्ती या अभिन्न सहचारिणी होत्या.

जे. पीं. ची हृदयशुचिता, असिम व्यापकता आणि अबाधित उदारता, चंबळ घाटीच्या व बुंदेलखंडातील डाकूंनी आत्मसमर्पण केले तेव्हा प्रत्ययास आली. डाकूंना समजाविण्यासाठी अथवा मनविण्यासाठी जे. पी. गेले नव्हते. दरोडेखोर आपणहून त्यांच्या-कडे आले होते. ३१ मे १९८२ मध्ये जेव्हा बुंदेलखंडातील दरोडेखोरांच्या आत्मसमर्पणाचा समारंभ जे. पीं. च्या अध्यक्षते-खाली व्हावयाचा होता व त्यांच्या आजारपणाच्या कारणास्तव तो समारंभ पुढे ढकलण्याचा प्रसंग आला तेव्हा दरोडेखोरांनी सांगितले की जे. पीं. शिवाय दुसरा माणूस आम्हाला चालणार नाही. आम्ही जेथे ते असतील तेथे जाऊन त्यांना शस्त्रे समर्पित करू. जे. पी. जे काम घेतात, त्यात स्वतःला पूर्णपणे झोकून देतात, त्यात काही कसर ठेवीत नाहीत. परंतु त्यांची एकाग्रता एकांत-वासात लुप्त होत नाही. एकनिष्ठेतेसोबत निरंतर सार्वत्रिक सावधानताही असते. म्हणून या जगात घडणाऱ्या कोणत्याही महत्त्वपूर्ण घटनेबाबत ते आपले मत निर्भयतेने, विनासंकोच प्रकट करतात व काही सक्रिय पावले उचलावयाची असतील तर तेथेही मागे राहात नाहीत.

काही लोक त्यांच्यावर आरोप करतात की, जे. पी. राजकारणात हस्तक्षेप करण्यात रस घेतात. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की जे. पीं. नी संकुचित राजकीय क्षेत्राच्या मर्यादा सोडून विशाल लोकनीतीच्या क्षितीजव्यापी समाजप्रबोधनाच्या कार्यास स्वतः वाहून घेतले आहे. तलावातून समुद्रात प्रवेश केला आहे. पंतप्रधान वा राष्ट्रपती यांमारखी पदे महान आहेत यात शंका नाही. परंतु निरुपाधिक नागरिकता त्याहूनही महत्त्वाची आहे आणि त्यादृष्टीने जे. पीं. चे व्यक्तित्व अधिक व्यापक बनत चालले आहे. स्वर्गीय हिंदी साहित्यिक श्री. रामवृक्ष बेनीपुरी यांनी अत्यंत सुंदर शब्दांत त्यांचे चरित्र लिहिले आहे. परंतु जे. पी. म्हणतात 'त्यांनी अतिशयोक्ती केली आहे.' हाच त्यांच्या जीवनाचा मापदंड आहे.

जे. पीं. च्या जीवनात व्रत व संकल्प यांना स्थान नव्हते. परंतु प्रभावतीजींनी ब्रह्मचर्याचे व्रत घेतले व जे. पीं. नी ते सहयोगी म्हणून अंगिकारिले. त्यात त्यांना कोणतेही प्रयास पडले नाहीत. सहजस्फूर्त दांपत्य–ब्रह्मचर्य स्वीकारण्यात ' जय-प्रभा 'ची जोडी अद्वितीय आहे. जे. पीं. च्या काही घनिष्ठ मित्रांना वाटते तेवढे प्रभावतीजींचे व्यक्तित्व भव्यदिव्य नसेलही, परंतु गुणात्मकतेच्या बाबतीत ते निःसंशय श्रेष्ठ होते. अशी दुर्दम्य सत्यनिष्ठा आणि अंतर्बाह्य शुचिता विरळाच दिसते. खरं तर त्यांना माहीतच नव्हते की, ' जय-प्रभा ' ही एक दुसऱ्याहून अधिक सरस ठरणारी जोडगोळी होती. असे दुसरे उदाहरण माझ्या पाहाण्यात नाही. जे. पीं. च्या विचारयात्रेचे हे दर्शन निःसंशयच उदात्त व उद्बोधक आहे.

# महात्मा ज्योतीराव फुले

माझे अठरा-एकोणवीस वर्षांपर्यंतचे आयुष्य महाकोशलमध्ये गेले. ज्ञानबा-तुकाराम प्रभृती संतांखेरीज शिवाजी-तानाजी, लोकमान्य टिळक, नामदार गोखले, न्या. रानडे एवढीच महाराष्ट्रीय पुढाऱ्यांची नावे मी ऐकली होती. म. ज्योतीबा फुले ऐकूनही माहीत नव्हते. १९१७ साली नागपूरला आलो, त्यावेळी 'ब्राह्मणेतर चळवळ', 'सत्यशोधक समाज' इत्यादी नावांशी परिचय झाला.

म. फुले यांच्या नावात जादू आहे. महाराष्ट्रातील लक्षावधी लोकांना त्या नावाने भारून टाकले आहे, असे जेव्हा दिसून आले तेव्हा ब्राह्मणेतर चळवळीचा अभ्यास करू लागलो. त्या चवळीचे महत्त्व व औचित्य लक्षात आले. तिच्याविषयी अनुकूलता वाटू लागली. म. फुले यांच्याविषयीचे ज्ञान जसजसे वाटू लागले, तसतसा त्यांच्याविषयीचा आदर वाढू लागला. सावित्रीबाई व ज्योतिबा या दांपत्याची गणना पुण्यश्लोक व्यक्तींमध्ये करू

लागलो. समग्र सामाजिक क्रांतीच्या क्षेत्रात या पती-पत्नींचे स्थान अद्वितीय आहे. शिवपार्वतीप्रमाणे !

आपल्या परंपरेत शिवाची विभूती जितकी भव्य, तितकीच अद्भुत आहे. तुळसीदासांनी 'रामचरित्र मानसात' शिवाच्या वरातीचे जे वर्णन केले आहे, ते जितके विनोदी, तितकेच हृद्य आहे. त्या वरातीत वऱ्हाडी म्हणून अपंग, विद्रूप, दलित, पीडित, उपेक्षित, तिरस्कृत व बहिस्कृत यांचाच भरणा आहे. शिवाचे हेच वऱ्हाडी आणि हेच मानकरी ! यांचे जीवन सुसह्य नव्हे, तर सुखी व्हावे, त्यांना जगात मानाने जगता यावे, अशी तळमळ ज्योतीबांना लागली, हाच त्यांच्या आयुष्याचा वसा होऊन बसला.

सामान्यत: समाजातील ज्या जातींना किंवा गटांना समाज-परिवर्तनाची गरज असते, त्याच जातीत किंवा गटात क्रांतीचा स्फूर्तीदाता किंवा प्रवर्तक सहजी उत्पन्न होत नाही. ज्योतीबा त्याला अपवाद आहेत. ज्या जातीला समाजपरिवर्तनाची गरज होती, रूढ परंपरांनी करकचून आवळली गेल्यामुळे जिला काचणी जाणवली, अशा माळी जातीत त्यांचा जन्म झाला. त्यांनी हिंदुसमाजातील शूद्र व अस्पृश्य जातींना क्रांतीचे दर्शन व क्रांतीची प्रेरणा दिली. जो सर्वांत मागासलेला, दडपलेला व खालचा त्याचा उद्धार म्हणजेच क्रांती ! त्या क्रांतीची मूल्ये ज्योतीबांनी आपल्या जीवनात जिरविली. त्यादृष्टीने महात्मा ज्योतिबा फुले हा सामाजिक क्रांतीचा मंत्रद्रष्टा ऋषी व नैष्ठिक अनुष्ठाता कर्मयोगी होता.

इतिहासात दोनप्रकारचे क्रांतिदर्शन आढळून येते. एक, संदर्भ बदलला म्हणजे क्रांती घडून येते. संदर्भ बदलणे हेच क्रांतिकारकांचे नियोजित कार्य आहे. त्यात वैयक्तिक आचरणाचे महत्त्व नाही. दोन, वैयक्तिक आचरणाने क्रांतीत जिव्हाळा उत्पन्न

होतो. क्रांतिनिष्ठेत जीवंतपणा येतो. या दुसऱ्या प्रकारच्या क्रांतिकारकात म. गांधी होते. गांधींचे क्रांतिदर्शन, फुल्यांनी आपल्या क्षेत्रात गांधींच्या जन्माआधीच साकार केले. म्हणून म. फुले हे आद्य महात्मा होत. बुद्ध, महावीर, नानक, मार्टिन लुथर यांचे ते उत्तराधिकारी होते. कार्ल मार्क्सने जगातील मजुरांच्या उद्धाराचा उद्‌घोष केला. ज्योतिबांनी त्यात शेतकऱ्यांच्या उद्धाराची भर घातली व सर्वांगीण क्रांतीचा शुभारंभ केला. पुरोहितांचे प्रस्थ मोडले. धनिकांच्या वर्चस्वाला आव्हान दिले. स्त्री, शूद्र, कामकरी, शेतकरी यांना हाक देऊन जागे केले. सर्वतोमुखी क्रांतीचे शिंग फुंकले. ज्योतिबा क्रांतीच्या निशाणाचे वैजयंतिक म्हणून पुढे आले !

शूद्र, अतिशूद्र, अस्पृश्य व गुलाम यांच्यापेक्षाही स्त्री ही अधिक दीन व दलित आहे. गुलामाची गुलामी, भंग्याची भंगीण, म्हणजे त्याच्याही खालची. सावित्रीबाई मात्र ज्योतिबांची सहधर्मिणी, सहयोगिनी व सहचारिणी बनल्या. प्रेरणा ज्योतिबांची, पण प्रताप सावित्रीबाईंचाच ! उभयतांची जीवने एकमेकात गुंफली गेली. पण सावित्रीबाई ज्योतिबांच्या समकक्ष आल्या. त्या 'स्त्री–महात्मा' झाल्या. हा संगम गंगा-यमुनेचा संगम नव्हता, तो गंगा-ब्रह्मपुत्राचा संगम होता ! ब्रह्मपुत्रा व गंगा यांचा संगम होऊन पुढे पद्मा झाली. दोघांचेही नाते बरोबरीचे होते.

आज हिंदूसमाजासमोर जीवन-मरणाचा प्रश्न आहे. भारतात मुसलमान, ख्रिस्ती, शीख हे आधुनिक संप्रदाय व प्राचीन बौद्ध आणि जैन संप्रदाय, हे सगळे हिंदू समाजातील निर्यातीमुळेच फोफावले. ही निर्यात आता थांबण्याऐवजी वाढण्याची लक्षणे दिसू लागली आहेत. मला वाटते, हा हिंदू समाजाच्या समोरचा यक्षप्रश्न आहे. याची संपूर्ण जबाबदारी सवर्ण हिंदूंवर आहे. त्यातही ब्राह्मणांवर मुख्य जबाबदारी आहे. भारतीय उज्वल

परंपरेचे श्रेय आत्तापर्यंत त्यांनी घेतले, पण समाजाच्या उन्नतीचे श्रेय जसे समाजधुरीणांचे असते, तसा अवनतीचा दोषही मुख्यत्वेकरून त्यांचाच असतो. तो दोष पत्करून निस्तरण्याच्या उद्योगास लागणे, हेच जबाबदार नेतृत्वाचे लक्षण आहे. पण सुदैवाने व ज्योतिबांच्या पुण्याईने ब्राह्मणांची सद्दी आता संपुष्टात आली आहे. इतर सवर्णांची सद्दी सुरू झाली आहे. गांधीहत्येच्यावेळी याचा प्रत्यय आला. खेड्यापाड्यात आता ब्राह्मणांची घरे विरळाच आहेत. शहरातदेखील त्यांचे वर्चस्व फारच कमी झाले आहे. भिक्षुकी करणाऱ्या ब्राह्मणांना तर मुळीच प्रतिष्ठा उरली नाही. आता इतर सवर्णांची जबाबदारी वाढली आहे. त्यांनी म. फुल्यांचा कित्ता गिरविला पाहिजे. तो जर त्यांनी मन:पूर्वक व निष्ठेने गिरविला, तर अस्पृश्यांचे नष्टचर्य नाहीसे होईल आणि हिंदू समाजातून होणाऱ्या निर्यातीला आळा बसेल.

महाराष्ट्रात आज ब्राह्मण सत्तेवर नाहीत. खेड्यात व शहरात त्यांची प्रतिष्ठा क्षीण झाली आहे. त्यांनी परंपरेचा अभिमान कितीही धरला तरी समाजपरिवर्तनाच्या लाटेत त्यांचा टिकाव लागणार नाही. हे समाजपरिवर्तन करण्याची आकांक्षा व उत्कंठा जर हिंदू समाजातील धुरीणांना असेल तर त्यांनी जातीसंस्थेला संकल्पपूर्वक व्यवस्थितरीतीने मूठमाती दिली पाहिजे. त्यावर एकच उपाय आहे—सजातीय विवाह निषिद्ध मानणे.

सामाजिक मूल्य बदलण्याकरिता गांधींनी चरख्याबरोबर झाडूचे प्रतीक दिले. हे प्रतीक काही महाभागांनी आपल्या जीवनात कार्यान्वित केले. सेनापती बापट, 'केरसुणी, खापर, खोरे, ही सुंदर अवजारे' असे म्हणत. मुंबई–पुण्याच्या रस्त्यांवर सफाईची फेरी काढीत असत. सेनापतींची सेना एका माणसाचीच होती. तोच सेनापती व तोच सैनिक ! अप्पा पटवर्धन यांनी तुरुंगात

उपवास करून भंगीकाम मागून घेतले. विनोबांनी सूरगावात कितीतरी वर्षे भंगीकाम केले. गोपाळराव वाळुंजकरांनी मेलेली गुरे सोलून स्वतःच्या हाताने जोडे बनविले. अशारीतीने हे महाभाग भंगी व चांभार यांच्या जीवनाशी समरस झाले. 'शिवो भूत्वा, शिवम् यजेत्' हा मंत्र त्यांनी सार्थ केला. याचे नाव क्रांतीचा कर्मयोग !

जोपर्यंत हिंदुसमाजात जातपात व अस्पृश्यता आहे, तोपर्यंत आमची राष्ट्रीयत्वाची कल्पना फोल आहे, व आमची एकतेची घोषणाही पोकळ आहे. ज्या राष्ट्रीयतेत सर्वांचा समावेश होऊ शकत नाही, ती एकदेशी राष्ट्रीयता भ्रांतिमूलक व मिथ्या आहे. प्राचीन ग्रीसमध्ये गुलाम व नागरिक मिळून समाजाची कल्पना करण्यात येत असे. अमेरिकेत काळे व गोरे मिळून एक राष्ट्र मानले जाते. अशी एकता मिथ्या नव्हे, तर दांभिक आहे. हिंदू समाजातील जाती म्हणजे हवाबंद कप्पे आहेत. त्यांचा फापट-पसारा म्हणजे हिंदू समाज ! तरी आजही हिंदू समाज बाजारात एक आहेच. जी अस्मिता सर्वसमावेशक व व्यापक नाही, ती क्षुद्र परिमित अस्मिता म्हणजे राष्ट्रीयता नव्हे. इंग्लंडचा एक माजी पंतप्रधान डिझरेली म्हणाला होता, 'लंडनमध्ये वेस्टलॅन्ड व इस्टलॅन्ड म्हणजे हवेल्या व झोपडपट्टी अशी दोन राष्ट्रे आहेत.' ज्योतिबांनी आमच्या भ्रांत एकतेची दांभिकता लोकांसमोर मांडली. ते म्हणाले, 'भारतात जो भिन्न समाज आहे, जेथे एकमेकांच्या बरोबर राहण्याचा संकल्प नाही, तेथे राष्ट्रीयत्व कसचे ?'

समाजातील जे लोक मानव्याच्या वारशाला पारखे झाले आहेत, दलित, पीडित, परिवंचित व गहाण झालेले आहेत, त्यांना माणुसकी व्यतिरिक्त अन्य धर्म उरत नाही. त्यांची आकांक्षा व गरज माणूस म्हणून जगण्याचीच असते. म्हणून मार्क्सची

विदारक दृष्टी राष्ट्रीयत्वाला छेदून क्षितीजव्यापी बनली. तशीच भव्य दृष्टी मानवधर्माचा प्रणेता ज्योतिबा फुले यांचीही होती. म्हणून त्यांना राष्ट्रीयत्वाची फारशी तमा वाटली नाही. इंग्रज आला नसता तर या हरवलेल्या मानवाला शिक्षण व मतही मिळाले नसते. खुद्द ज्योतिबांचेही व्यक्तित्व विकसित झाले नसते. म्हणून त्यांना इंग्रजांबद्दल कृतज्ञता वाटली, यात काय नवल ?

ज्योतिबांच्या काळची परिस्थिती पाहिली असता, त्यांनी सामाजिक क्रांतीच्या दिशेने आणखी एक पाऊल उचलले होते. कोणा एका ब्राह्मण स्त्रीचा जारज मुलगा त्यांनी दत्तक घेतला व पोटच्या पोराप्रमाणे त्याचे संवर्धन व शिक्षण केले. ही गोष्ट थोर हृदयाची साक्ष देते. खुद्द ज्योतिबांच्या मातोश्री वारल्यानंतर जेव्हा त्यांचा सांभाळ करण्याकरता कुणीच नव्हते, तेव्हा त्यांच्या वडिलांना अतिशय चिंता वाटू लागली. अशावेळी त्यांच्या नात्यातील एक विधवा सगुणाबाई क्षीरसागर आपण होऊन लहानग्या ज्योतिबाचा सांभाळ व संगोपन करावयास पुढे आली. स्वतःच्या मुलाप्रमाणे तिने ज्योतिबांना जिव्हाळ्याने, दक्षतेने सांभाळले. त्यादृष्टीने सगुणाबाईंचे महाराष्ट्रावर फार उपकार आहेत. त्याही ज्योतिबांच्या कार्याशी समरस झाल्या. अशा या थोर स्त्रीला आमचे प्रणाम !

सावित्रीबाई ज्योतिबांना सर्वथाने अनुरूप अशाच होत्या. ज्योतिबा दिवंगत झाल्यानंतर त्या सातआठ वर्षे जगल्या. पण त्यांनी ज्योतिबांचा वसा नेटाने व निष्ठेने पुढे चालविला. सावित्रीबाईंना ' अकरकी ' येत होती की नाही ते मला माहीत नाही. पण ' एकोत्री ' मात्र त्यांनी आपल्या जीवनात गिरविली. सावित्री व ज्योतिबा मिळून ' ज्योतिबा ' झाला. सावित्रीबाई भारतातील पहिली व थोर क्रांतिकारक स्त्री होती. दोघेही

आपापल्यापरी क्रांतीचे अग्रदूत होते. पतीनिधनानंतर ज्योतिबा जणू सावित्रीबाईंत विलीन झाले. ज्योतिबांचे कर्तृत्व व ऊर्जा सावित्रीबाईंच्या अंगी बाणली. पुराणातल्या सावित्रीने यमापासून पतीचा प्राण परत मिळविला. या सावित्रीने पतीचा प्राण आपल्या प्राणात समाविष्ट करून घेतला आणि संयुक्त विभूतीमत्व शिल्लक राहिले.

दलित, शोषित व अप्रतिष्ठित मानवाचा पैगंबर, मानवाच्या निरपेक्ष मूल्याच्या महायागाचा अध्वर्यू म्हणून ज्योतिबांना आमचा मुजरा ! सर्वांगीण बंडाचा झेंडा उभारणारा वैजयंतिक म्हणून ज्योतिबांना मानवंदना ! सावित्री–ज्योति या लोकोत्तर युग्माला आमचा कुर्निसात !

भारतीय अस्मितेचे प्रतीक :

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

आधुनिक भारतात समाजाला ललामभूत होणाऱ्या ज्या थोर व्यक्ती झाल्या, त्यांच्यातील अग्रगण्य व्यक्तींपैकी डॉ. आंबेडकर हे एक होत. अग्रगण्य व्यक्तीतही त्यांचा क्रमांक फार वरचा लागेल. इंग्रजांच्या आगमनापूर्वी हिंदूसमाज म्हणजे फूटपाथवरील एकाद्या मोठ्या चटईवरील फुटकळ वस्तूंच्या दुकानासारखा फापटपसारा होता. इंग्रजांनी त्याला एका जमातीचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्या साम्राज्याच्या रुळाखाली या देशातील विविध समाजाची अस्मिता भरडली गेली आणि एका अभावरूप ऐक्याचा आभास निर्माण झाला. पण या अभावरूप, आभासात्मक अस्मितेतही एक प्रकारचे व्यापकत्व होते. अखिल भारतीयतेची काहीशी अंधुक व काहीशी स्पष्ट जाणीव या देशात इंग्रजी भाषेमुळे उत्पन्न झाली. या जाणिवेतूनच राष्ट्रीय पुनरुज्जीवनाचा आरंभ झाला. अनंत जाती व उपजातींमुळे विस्कळीत

झालेल्या हिंदू समाजाच्या आवाराबाहेर अस्पृश्यांचा व दलितांचा जो अनामिक समाज होता, त्यालाही कायद्याने शिक्षणाची दारे मोकळी झाली आणि त्या समाजातूनही काही नररत्ने–स्वतःच्या अंगभूत तेजाने तळपणारी निपजली. त्यांच्यापैकी डॉ. आंबेडकर यांना अग्रपूजेचा मान द्यावा लागेल. त्यांनी दलित समाजाच्या उद्धाराप्रीत्यर्थ आपली अलौकिक प्रतिभा व अदम्य पराक्रम यांचा विनियोग केला. सर्वांत खालच्या व मागासलेल्या समाजाला वर आणण्याचा भगीरथ प्रयत्न केल्यामुळे त्यांचे तेज आसमंतात फाकले व अखिल भारतीय जनतेला ज्यांच्याविषयी अभिमान वाटावा असे थोर पुरुष ते बनले. त्यांच्या पुरुषार्थाचे क्षेत्र साऱ्या भारतवर्षाइतके व्यापक बनले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यामुळे फक्त दलितांच्या अस्मितेचेच प्रतीक म्हणून ओळखले जाणार नाहीत. त्यांचे नाव भारतीय अस्मितेचे प्रतीक म्हणूनही इतिहासात कायम होईल. जुन्या पिढीतील महात्मा ज्योतिबा फुले व मागच्या पिढीतील डॉ. भीमराव रामजी आंबेडकर या दोन व्यक्तींचे आधुनिक भारताच्या इतिहासातील योगदान या दृष्टीने अनुपम आहे. फुल्यांचे नाव आंबेडकरांप्रमाणे अखिल भारतात गाजले नाही याचे कारण ते ज्या काळात जन्मले व जगले त्या काळातील भिन्नता हेच होय.

आंबेडकरांचा जन्म ज्या समाजात झाला, त्या समाजाच्या वाट्याला ज्या हालअपेष्टा, अपमान व उपमर्द अनेक शतके आला होता, ते सारे आंबेडकरांच्याही वाट्याला आले. त्यातून मार्ग काढून समाजाचे शिखर गाठायला ज्या पराक्रमाची आवश्यकता होती तो आंबेडकरांच्या ठिकाणी होता. त्याची कांती त्यांच्या व्यक्तित्वावर स्पष्ट दिसत होती. प्रतिकूल परिस्थितीतून वर आल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर त्या परिस्थितीचे व्रण व ओरखडेही दिसत होते. पण त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे तेज कमी झाले नाही.

डॉ. आंबेडकरांच्या मनात उच्चवर्णीय समाजाविषयी संताप असल्यामुळे त्यांच्या ठिकाणी देशभक्ती व भारतीय राष्ट्रीयत्वाची भावना नसावी, असा भास साहजिकच होत असे. पण त्यांच्या अंतःकरणात खोल कुठेतरी जाज्वल्य देशभक्त व राष्ट्रीयत्वाची भावना दडली होती याचा प्रत्यय स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी आला. घटनापरिषदेच्या सुरुवातीला काँग्रेस पक्षाच्या सभा भरत असत. जवाहरलालजींनी त्या सभा काँग्रेसजनांपुरत्याच मर्यादित ठेवल्या नव्हत्या. देशातील निरनिराळ्या पक्षांच्या व निरनिराळ्या वर्गातील प्रमुख नागरिकांचाही समावेश त्यांनी घटना परिषदेत केला होता. देशातील प्रमुख घटनापंडित व घटनातज्ज्ञ यांचाही, अर्थात, त्यात अंतर्भाव होता. अशा एका सभेत डॉ. आंबेडकर अचानक उभे राहिले व यांनी जे भाषण केले त्यावरून त्यांच्या अखिल भारतीय भूमिकेचा व विशद राष्ट्रीय भावनेचा प्रत्यय तिथे उपस्थित असलेल्या प्रमुख भारतीयांना आला. त्यांच्या प्रतिभेची छाप देशातील थोर लोकांच्या मनावर आधीपासूनच होती. या भाषणानंतर त्यांच्याकडे बघण्याचा प्रमुख नेत्यांचा दृष्टिकोन पार बदलला. आणि घटना-समितीने नियुक्त केलेल्या लेखन-समितीच्या अध्यक्षत्वाची सूत्रे त्यांच्याकडे सोपविण्यात आली. अशा रीतीने मनुस्मृतीची होळी करणारे आंबेडकर भारताच्या घटनेचे स्मृतिकार बनले! त्या घटनेचा गौरव 'भीमस्मृती' म्हणून विनोबा करीत असत.

दलितांच्या जीवनाची प्रतिक्रिया त्यांच्यासारख्या तल्लख वृत्तीच्या माणसाच्या अंतःकरणावर झाल्यावाचून अर्थातच राहिली नाही. पण त्या प्रतिक्रियेमुळे त्यांचा तोल ढळला नाही किंवा झोकही गेला नाही. हिंदू समाजात दलितांना स्वाभिमानाने जगता यावे म्हणून त्यांनी प्रयत्नांची शर्थ केली. ते आस्तिक होते व धर्मनिष्ठही होते. त्यांच्या या गुणांची साक्ष काळचा राम-

मंदिरात प्रवेशासाठी त्यांनी केलेल्या सत्याग्रहावरून पटते. सामाजिक भूमिकेवरून अशाच प्रकारचा दुसरा सत्याग्रह म्हणजे महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह. त्यांचे हे प्रयत्न निकराचे व कळकळीचे होते यात शंकाच नाही. पण शेवटी ते अशा निष्कर्षाप्रत पोचले की चातुर्वर्ण्याने सीमित झालेल्या हिंदू समाजाच्या चौकटीत राहून दलितांना मानाचे जिणे जगता येणार नाही. म्हणून त्यांनी अखेरीस धर्मांतर करण्याचा संकल्प नाइलाजाने केला. कारण समाज सोडल्यावाचून जात सोडण्याचा अन्य मार्गच नाही हे त्यांच्या निदर्शनास आले. पण याही बाबतीत आपल्या देशभक्ती व राष्ट्रीयत्वाच्या भावनेला अप्रतिकूल निर्णय कसा करता येईल या विषयी गंभीरपणे त्यांनी चिंतन केले. विवेकाची कास सोडली नाही.

भारतात बौद्ध, जैन, शीख, इस्लाम, ख्रिस्ती, यहुदी असे जगातील जवळजवळ सारे संप्रदाय एकत्र झाले आहेत. त्यांच्यापैकी इस्लाम व ख्रिस्ती या संप्रदायांचा हिंदू समाजातील दलित जातीच्या मनावर बराच पगडा आहे. इतर संप्रदायांच्या मानाने या संप्रदायांची शक्ती व प्रतिष्ठाही मोठी आहे. इस्लामचा दरारा तर औरच आहे. पण आंबेडकरांनी इस्लामचा स्वीकार केला नाही. तसे म्हटले तर इस्लामी समाजात जितकी समानता आहे, तितकी जगातल्या इतर कुठल्याही समाजात नाही. त्या समाजात रंगभेदालादेखील वाव नाही. तरी आंबेडकरांनी इस्लामचा स्वीकार केला नाही. शिवाय भाषा व संस्कृतीच्या बाबतीतही त्यांची भूमिका भारतीय भावनेला मानवण्यासारखी नाही. ख्रिस्ती व्हावे तर ख्रिस्ती लोकांत काळे व गोरे हा भेद विकोपास गेलेला आढळतो. म्हणून त्यांनी त्या संप्रदायाचा स्वीकार केला नसावा. एरवी ख्रिस्ती संप्रदायात बरीच आकर्षक लक्षणे असल्याचे दिसून येते. मानवनिष्ठा हे त्या संप्रदायाचे वैशिष्ठ्यच आहे.

काही काळ त्यांनी शीख होण्याकडे कल दाखविला. पण त्या संप्रदायात गुरूमुखी भाषेचा व लिपीचा आग्रह आहे, ही अडचण त्यांना वाटली. ती अडचण लक्षात येताच शीख धर्माच्या नेत्यांनी ग्रंथसाहेबाची एक आवृत्ती नागरी लिपीत प्रसिद्ध केली. परंतु घटना परिषदेत जेव्हा अस्पृश्यांना विशेष सवलती देण्याच्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली तेव्हा एका प्रमुख शीख प्रतिनिधीने उठून मागणी केली की, शिखांतील अस्पृश्यांनाही या सवलती देण्यात याव्यात. ते ऐकून सरदार पटेल व आंबेडकर चकित व स्तिमित झाले ! अर्थात शीख होण्याचा विचारही संपुष्टात आला.

अशारीतीने प्रमुख संप्रदायांची वासलात लागली. मंदिर-प्रवेशाचा कायदा झाला. त्यावेळी आपण हिंदू नसल्यामुळे आपल्या देवळांना हा कायदा लागू होऊ नये, अशी हरकत काही प्रमुख जैन धर्मीयांनी घेतली होती. त्यामुळे जैन होण्याचा प्रश्नच नव्हता. जैन धर्माचा सोवळेपणाही आंबेडकरांना मानवण्यासारखा नव्हता.

शेवटी उरला बौद्ध संप्रदाय. त्याचे फक्त अवशेषच या देशात उरले होते. सर्व दृष्टींनी तोच सोयीचा वाटला. जगातील धर्म-संस्थापकांपैकी सर्वधर्माच्या अनुयायांना वंदनीय वाटणारी एकच विभूती म्हणजे गौतम बुद्ध. त्या धर्मात कमीत कमी गुंतागुंत आहे. सोवळेपणाही त्यामानाने कमीच. बुद्धाच्या धर्माचे नवसंस्करण आंबेडकरांनी केले. सिद्धार्थाच्या चरित्रावरही नवीन भाष्य केले. त्यांचा 'Buddha and his Dhamma' हा ग्रंथ नवीन संहिता बनला. आंबेडकरांच्या धर्मपरिवर्तनात त्यांच्या विवेकाची साक्ष पटल्यावाचून राहात नाही त्यांच्या धर्मपरिवर्तनाची ही अशी माझी नम्र मीमांसा आहे.

घटना परिषदेत त्यांच्या व्यापक व मूलगामी प्रतिभेचे दर्शन देशातील निवडक बुद्धिमंतांना झाले. त्या परिषदेत

जवाहरलालजींच्या खालोखाल आंबेडकरांचा मान व लोकप्रियता होती. कोणत्याही कलमावर विशद भाष्य ते करू लागले म्हणजे सभासद माना डोलवू लागत व हा माणूस असंदिग्धपणाची प्रतिमूर्तीच आहे, असे उद्‌गार भल्याभल्यांच्या तोंडून निघत. हा प्रतिभाशाली व पराक्रमी वीर या देशातील दलितांना नेता म्हणून लाभला, त्यांच्या अस्मितेचे प्रतीक बनला, पण दुर्दैवाने दलितांचे नष्टचर्य मात्र अजून संपलेले नाही. त्यांचे पांग कधी फिटतील, देवा, तुलाच माहीत !

# एक अद्‌भुत - सेनापती

सेनापती बापट हे एक अभूतपूर्व सेनापती होते. म्हणूनच त्यांचे जीवन एक अद्‌भुत कहाणी आहे. एका अर्थाने प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीपेक्षा भिन्न असते म्हणूनच ती ओळखताही येते व तीमध्ये दैवी आणि मानवीच विभूतीमत्त्वाची ज्योत अव्यक्त रूपाने वास करते. त्यात विशेष गुण प्रकर्षाने प्रकट होतात. अशा विभूतीमत्वालाच आपण वीर म्हणून संबोधतो. टॉमस कार्लाईलने 'वीर' व्यक्तींचे विविध प्रकार सांगितले आहेत व त्यांची गौरवगाथा विविधरागात गायिली आहे.* परंतु ए. जी. गार्डिनर याने तर एका आगळयाच ढंगाने वीरांचे वर्गीकरण केले आहे. तो म्हणतो,

There are good heroes and there are bad heroes in History. Sir Edward Carson is a bad hero.

---

*विच्छापतीने आपल्या 'पुरुष परीक्षे'त दानवीर, युद्धवीर इ. अनेक प्रकारच्या वीरांची गाथा सांगितली आहे.

रावण, कुंभकर्ण, कंस, शिशुपाल, मुसोलिनी, हिटलर हे इतिहासातील खलनायक मानले जातात. परंतु ते वीरच असतात. प्रत्येक वीर पुरुषात, मग तो सद्वीर असो वा असद्वीर असो, त्यांत असाधारण गुण व दोष असतातच. त्याचे दोषदेखील असामान्य व प्रचंड असतात, म्हणूनच जो समाजवादी विचारांचा पुरस्कर्ता जे. रॅमसे मॅकडोनॅल्ड्ने लिहूनच ठेविले आहे की, 'वीर पुरुषांची जीवनगाथा म्हणजे रोमांचक इतिहासच असतो.'

प्रत्येक वीर पुरुषाच्या असामान्यतेतही एक आगळे वैशिष्टय असते. तसेच सेनापती बापटांच्या असामान्यतेतही एक आगळेपण होते. ते वेगळ्या स्वरूपाचे सेनापती होते. ते युद्धवीर तर होतेच, परंतु त्यांच्यासाठी जीवनातील सर्व क्षेत्रे व विश्वातील सर्व प्रदेश जणू रणक्षेत्रच होते. कुरुक्षेत्र व धर्मक्षेत्र असा कोणताही फरक त्यात नव्हता. इतकेच नव्हे तर या क्रीडापटू योद्ध्याला समरांगण, क्रीडांगण, रणभूमी व रंगभूमी यातदेखील फरक वाटत नव्हता. कंसाच्या रंगभूमीत कृष्णाने प्रवेश केला त्यावेळच्या कृष्णाच्या रूपाचे मोठे हृदगगंम असे वर्णन शुक्राचार्यांने केलेले आहे. 'रंगे गतः केशवः ।' ज्या रुचीने श्रीकृष्ण बासरी वाजवीत असे त्याच रुचीने तो गायीही चारीत असे आणि 'मल्लानां अशनिः' या वृत्तीनेच त्याने कंसाच्या रंगभूमीतही प्रवेश केला होता.

हा श्रीहरी सेनापती बापटांचे उपास्य दैवत होता. हा सारा सृष्टिविस्तार ही त्या श्रीहरीची लीला आहे, क्रीडा आहे, खेळ आहे. श्रीहरीने ही विश्वरूप माया निर्माण केली, त्यात तो सर्वांना भुलवितो, सारी दुनिया हा त्याच्याकरिता एक खेळ आहे. निर्मिती आणि नाश ही सारी प्रभूची लीला ! म्हणूनच जीवनाच्या सर्व क्षेत्रात सेनापती बापट हे एखाद्या खेळाडूचे हृदय घेऊनच वावरले. जसे ते उमद्या मनाचे होते, तसेच दिलदारही होते. संघर्ष हादेखील त्यांचा एक सांस्कृतिक कार्यक्रम होता. आजकाल खळ

आणि मनोरंजनाच्या कार्यक्रमानाही संजीवन ह्याच नावाने संबोधले जाते. मनोरंजन ते आहे जे नवजीवन प्रदान करते. यालाच सांस्कृतिक कार्यक्रम असे नाव दिले जाते. त्यात नैपुण्य, कला आणि पावित्र्य असले पाहिजे. ज्या खेळात धर्मनिष्ठेचे पावित्र्य असते, तोच खेळ मनुष्याच्या जीवनाचा विकास घडवून आणण्याचे साधन बनतो. अर्थात, ती जीवनसाधनाही ठरते. हाच सेनापती बापटांचा बाणा होता. ' क्षुद्र कामाय नेण्यते ' हे त्यांचे बोधवाक्य होते. वीरवृत्तीमध्ये वैरवृत्तीला यत्किंचितही थारा नसतो. सेनापती बापटांच्या जीवनात संघर्ष होता, आवेश होता, परंतु क्षुद्रतेचा लवलेशही नव्हता. म्हणूनच त्यांच्यासाठी जीवन-व्यापी संघर्ष हा जीवनसत्त्व किंवा ' टॉनिक ' ठरते.

In world's broad field of battle, in the bivouac of Life, be not eike dumbdriven cattle, be a hero in strife.' या जीवनस्त्रोत प्रदान करणाऱ्या ओळीतील विचार हे सेनापती बापटांच्या जीवनात चरितार्थ झाले. प्रत्यक्ष आचरणात आले. झाडू, लेखणी, वीणा व तलवार ही सर्व उपकरणे त्यांच्या जीवनाचे वैभव वाढविणारी साधने ठरली. त्यांच्या जीवनसाधनेची उपकरणे होती. तुकारामाने म्हटलेच आहे, ' रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग '.

युद्धाच्या वार्ता आणि युद्धभूमीवरील जीवनाचे आकर्षण जीवनाच्या सर्व क्षेत्रात दुर्धर प्रसंग ओढवून आणते, हे सत्य आहे. आध्यात्मिक साधना करतानादेखील षड्रिपूंच्याबरोबर सतत संघर्षच करावा लागतो. आध्यात्माच्या क्षेत्रातच जर संघर्षाचे प्रसंग येतात तर मग इतर क्षेत्रांची काय कथा ? आमच्या अहिंसक आयोजनांमध्येसुद्धा स्वयंसेवकाच्या पोषाखापासून तो तहत त्याच्या कवायतीपर्यंत आम्ही सैनिकाचेच अनुकरण करतो. आग विझविण्याचे काम असो, पाण्यात जाऊन जीव

वाचविण्याचे काम असो, गिर्यारोहण असो, सामाजिक समस्यांचे निराकरण असो, वा आजाऱ्यांची शुश्रुषा करण्याचे काम असो, सदासर्वदा सैनिकाची स्फूर्ती, तत्परता आणि शिस्त याच गोष्टींचे अनुकरण करावे लागते. सेनापती बापट आपल्या जीवनातील प्रत्येक क्रियेमध्ये सैनिकांच्या या गुणांचे दर्शन व्यक्त करण्याची शिकस्त करीत. तीच स्फूर्ती, तीच तत्परता, तीच शिस्त ते पाळीत. आध्यात्मिक क्षेत्रातसुद्धा याच वीरवृत्तीच्या अभिव्यक्तीस व प्रयोगास साधना हे नाव दिले आहे. म्हणूनच जैन तीर्थंकरांना महावीर म्हणतात.

गांधीजींनी कुरुक्षेत्रावरील युद्धालाही रूपककथा मानली व म्हटले की हे मनुष्याच्या अंतर्द्वंद्वांत चाललेल्या चांगल्या व वाईटाच्या लढाईचेच एक प्रतीक आहे. सेनापतींनी आपल्या साऱ्या जीवनालाच छावणीचे स्वरूप दिले व जीवन एक संघर्ष मानला.

पुस्तकात त्यांनी मुळशीच्या सत्याग्रहाचे सविस्तर वर्णन केलेले आहे. सेनापती बापट स्वतः सेनापती होते व सैन्यही होते. त्यांच्या व्यक्तित्वात या दोन्ही वृत्तींचा मिलाप झालेला होता. म्हणूनच ते बिनासैन्याचे सेनापती म्हणून राहू शकले. आमच्या राष्ट्रीय शाळा जेव्हा निस्तेज होऊ लागल्या, तेव्हा विनोबांनी एक अद्भुत लेख लिहिला. पहिले वाक्य होते, 'काल मी हिंगणघाटच्या राष्ट्रीय शाळेचा समारोप समारंभ करून आलो आहे' आणि पुढे समजाऊन सांगितले की, राष्ट्रीय शाळा बंद झाल्या असल्या तरी राष्ट्रीय शिक्षक मात्र राष्ट्रीय शिक्षकच राहणार आहे. कारण सारा समाज हीच आता लोकशाळा झालेली आहे. सेनापती बापटांचे बाबतीतही असेच घडले.

मुळशीच्या आंदोलनात त्यांनी सर्वप्रथम सामुदायिक सत्याग्रहाचा प्रयोग केला. गांधींच्या या साधनांचा त्यांनी अत्यंत इमानदारीने स्वीकार केला. ते सदैव साधनशुद्धीचा आग्रह धरीत.

परंतु साधनाच्या मर्यादा मानीत नसत. मुळशी सत्याग्रहाचा प्रारंभ त्यांनी साम सत्याग्रहापासून केला. त्यासंबंधात ते नागपूरला आले होते. विद्यार्थ्यांची मोठी सभा होती. मी अध्यक्ष होतो. सेनापतींच्या सोबत वासुदेव विठ्ठल (अण्णासाहेब) दास्ताने व अकोल्याच्या राष्ट्रीय शाळेचे बापूसाहेब सहस्त्रबुद्धे होते. सेनापतींचा चेहरा अगदी शांत होता. आवाजही सौम्य पण प्रवाही होता. परंतु त्यांचे शब्द मात्र निखाऱ्यासारखे दाहक होते. ते म्हणाले की, साम सत्याग्रहात आम्ही कोणत्याही प्रकारे शांती व अहिंसेवर अतिक्रमण होऊ देणार नाही. आम्ही 'पांडवांसारखी शिस्त पाळू व मनीच्या मनी आपला क्रोध जाळू.' पांडवाप्रमाणेच आम्हीही धर्मराजाची आज्ञा पालन करू आणि मनातला क्रोध मनातच ठेऊ. आणि या गोष्टी त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे व काटेकोरपणे प्रत्यक्ष आचरणात आणल्या. त्यांच्यासोबत बापूसाहेब सहस्त्रबुद्धे होते. ते म्हणाले की, आमची भूमिका तर भक्त प्रल्हादासारखी आहे. आम्ही सारे अत्याचार आणि छळ प्रार्थनापूर्वक सहन करू. परंतु आम्ही ज्याचे भक्त आहोत, तो भगवान जर नरसिहाचे रूप धारण करून आला तर मात्र आम्हाला माहीत नाही ! मग मात्र आम्हास कुणी दोष देऊ नये.

बापूसाहेबांच्या भाषणात सेनापतींच्या भूमिकेचे मर्म साठलेले होते. सेनापती शुद्ध सत्याग्रहाचे प्रवक्ते होते. त्यांचे म्हणणे होते की, सत्यात फक्त शुद्ध सत्याचाच आग्रह असला पाहिजे. अहिंसेचा आग्रह त्यास शबल सत्य बनविते. गांधीजींनी म्हटले होते की हिंसा आणि सत्य यांचा कधीच मेळ होऊ शकत नाही. कारण त्यांचा सुसंवाद (जोड) होऊच शकत नाही. हिंसा ही मूढ असते. सेनापतींनी उत्तर दिले — There is a stupid non-violence just as there is a stupid violence. सेनापतींची अशी श्रद्धा होती की, निःस्वार्थ व निर्वैर बुद्धिने जो शस्त्रप्रयोग केला जातो तो पुण्यकारक असतो. या विषयावर गांधी व टिळक यांचा

जसा यंग-इंडियात झाला होता, तसाच गांधी व सेनापती बापट यांच्यातही झाला होता. दोन्हीही बाजू आपापल्यापरी स्वयंप्रज्ञ व अजोड होत्या. या विषयावर काही अधिक लिहिण्याचा माझा अधिकार नाही. याचे विवेचन लो. टिळकांच्या गीतारहस्यातील 'सिद्धावस्था आणि व्यवहार' या प्रकरणात त्यांनी केलेले आहे. सेनापती बापटांनी आपल्या 'गीतासेवका'त याविषयाचे प्रतिपादन केलेले आहे. त्यांचे 'मुळशीचा स्वल्पविराम' हे निवेदन अद्वितीय साहित्याचा एक उत्तम नमुना आहे. ते बुद्धिग्राही व हृदयस्पर्शी आहे.

सेनापतींच्या साहित्यात लालित्य फारच अल्प प्रमाणात आहे. त्यांची वाणी पुष्कळशी समर्थ रामदासस्वामींशी मिळती-जुळती आहे. असे म्हणतात की, मनुष्याची सर्वप्रथम अभिव्यक्ती चित्राच्या माध्यमातून झाली व नंतर कवितेद्वारा झाली. हिंदी-मध्ये एक म्हण आहे की, 'रोना और गाना सब कोई जानते हैं' म्हणून सेनापतींच्या अभिव्यक्तीचे माध्यमही कविताच आहे. परंतु जेथे भावनेचा उद्रेक शब्दात उतरला आहे तेथे त्यांचे शब्दच प्रज्वलित निखाऱ्यासारखे तेजस्वी व दाहक आहेत.

एका प्रसंगाची आठवण होते. १९१७ सालची गोष्ट. हिंगणघाटला वडिलांच्या अलमारीत एक पुस्तक शोधीत होतो. शोधता शोधता एक लहानशी पुस्तिका हाती लागली. पुस्तिका लहान होती पण तिचा आकार मोठा होता. पुस्तिकेचे नाव होते 'ब्रिटीश रुल इन इंडिया.' कुणा एका पी. एम. बापटांच्या लंडनमध्ये दिलेल्या भाषणाचा वृत्तांत होता. माझे वडील सरकारी नोकरीत होते. मला वाटले या पुस्तिकेत इंग्रजी राज्याची प्रशंसा केली असेल, परंतु त्या पुस्तिकेतील पहिल्याच वाक्याने मला आकृष्ट करून घेतले. त्यातील प्रत्येक वाक्य एक रमणीय सूत्र होते आणि पूर्ण पुस्तिका ब्रिटीश राज्यावरील टीकेचा एक

उत्कृष्ट नमुना होती. त्यातील एक सूत्रवाक्य मला अजूनही आठवते व ते माझ्या हृदयावर कोरलेले आहे. – Failures are but the stepping stones to better selven. पूर्ण पुस्तक वाचल्यानंतर साऱ्या शरिरातून जणू एक वीजच चमकून गेली.

मुळशी सत्याग्रहात माझ्या राष्ट्रीय शाळेतील काही सहशिक्षक सामील झाले होते. त्यामध्ये आमचे मित्र श्री. माधवराव कानेटकर होते. माधवरावांची प्रतिभा मोठी विदारक आणि व्यंगप्रिय होती. काही अंशी जॉर्ज बर्नाड शॉसारखी होती. कानेटकर गणिती होते. आपले म्हणणे गणितीमय सूत्रात चटपट मांडण्यात ते अगदी सिद्धहस्त होते. मुळशीच्या सत्याग्रहातील कारावासात त्यांचा सेनापतींशी सहवास घडला. तेथून बाहेर आल्यावर ते म्हणाले की, ‘ सेनापतींची प्रतिभा अगदी लो. टिळकांच्या बरोबरीची वाटते. विलक्षण बुद्धिमत्ता आणि अद्‌भुत तितिक्षा यांचा पवित्र संगम सेनापतींच्या व्यक्तिमत्वात झाला होता.’

तितिक्षा आणि क्लेश सहन करण्याची त्यांची क्षमता अगदी अपार होती. संकट आणि आपत्ती यांच्याशी त्यांचे जणू सख्यच झाले होते. त्यांना ते आपणहून बोलाविन असत. संकटाशी सामना करण्यात, झुंझण्यात त्यांना आनंद वाटत असे. गोवामुक्ती सत्याग्रहात खूप मार खाल्ल्यानंतर ते विश्रांतीसाठी अहमदनगरला श्री. सप्तर्षी यांच्याकडे आले असता योगायोगाने माझी–त्यांची गाठ पडली. त्यांना भेटायला गेलो. ते अत्यंत प्रसन्नचित्त दिसले. मी विचारले, ‘ आपल्याला इतका मार लागला, काही दुःख जाणवले नाही काय ? आपल्या चित्ताला वेदना झाल्या नाहीत. काय ?’ तेव्हा ते हसून म्हणाले, ‘ हे पहा, थोडावेळ तर दुःख होते. जाणवते. पण मग मी शरीराला मनापासून दूर करून टाकतो. मग माझी देहबुद्धी लोप पावते. त्या वेदनेचा मनाला स्पर्शच होत

नाही. मग तटस्थपणे बघत बसतो. त्यामुळे माझ्यावर त्याचा काही परिणाम होत नाही. ही सर्व श्रीहरीची लीला आहे. तो मारणारा आणि मार खाणारा या दोन्ही भिन्न भूमिकांचा अभिनय करीत असतो.' ज्या सहजतेने त्यांनी आम्हाला हे सांगितले ते ऐकून आम्ही विस्मयचकित व स्तिमितच झालो. नेपोलियनने म्हटलेच आहे. The School of difficulty is the school of great men.

महापुरुषांच्या चित्ताची गती महापुरुषच जाणोत !

सेनापतींच्या वृत्तीत स्वच्छतेसाठी नितांत आदर वसत असे. स्वच्छता म्हणजेच पवित्रता अशी त्यांची धारणा होती. परंतु अस्वच्छ मनुष्याचा अथवा घाणीचा ते तिरस्कार करीत नसत. रोग्याची शुश्रुषा व अस्वच्छता निवारण-कार्य ही दोन्ही त्यांना पुण्यकर्म वाटत. ज्यातऱ्हेने कुष्ठरोग्याची ते घृणा बाळगत नसत, त्याचप्रमाणे गलिच्छ माणसांबद्दलही तिरस्कार दाखवीत नसत. उलट त्याला प्रेमाने जवळ घेत असत. दुष्टता, पाप, अन्याय, अत्याचार, अस्वच्छता आणि घाण या सर्वांचा प्रतिकार ते समान भूमिकेतून करीत असत. एकप्रकारे याच वृत्तीला ' ब्राह्मी वृत्ती ' म्हणता येईल.

कित्येक वर्षापूर्वी विनोबांनी ' महाराष्ट्र धर्म 'त एक लेख लिहिला होता, ' स्वच्छतेचे इंद्रिय आवरा. ' स्वच्छतेच्या इंद्रियावर नियंत्रण ठेवा. आता आपली आई कॉलऱ्याच्या रोगाने आजारी आहे. नखशिखान्त घाणीने भरलेली आहे. तिची घाण साफ करणे हे आपले पुण्यकर्तव्य आहे. सेनापती बापटांचीही हीच जीवननिष्ठा होती.

यालाच आम्ही सार्वत्रिक निर्वैरता म्हणतो. तीव्र आणि मूलगामी स्वरूपाचे मतभेद असतानाही सेनापती आवेशात

असतानाही माणसे तोडीत नसत. गांधी, सावरकर यांच्याशी त्यांचे तीव्र मतभेद होते. सेनापती आपल्या स्पष्ट व फटकळ वाणीत ते प्रकटही करीत. परंतु या कारणास्तव या दोन महा-पुरुषांच्याबद्दल त्यांच्या मनात कधीही अनादर निर्माण झाला नाही. प्रत्येक वीर पुरुषात एखादा गुण प्रकर्षाने जाणवतो व बाकीच्या गुणांचा सख्यभाव असतो. एका गुणाबरोबर दुसरा गुण पाठीवर येणाऱ्या भावासारखा पाठोपाठ येत असतो.

मोठ्यातल्या मोठ्या व्यक्तीलासुद्धा लहानातल्या लहान माणसाच्या समग्र व्यक्तीमत्वाचे आकलन कधीच होत नसते. या अर्थाने मनुष्य नेहमी 'अविज्ञात' Man the unknown च राहत असतो. मानव एक रहस्य आहे, एक कोडे आहे आणि त्याच्यातच त्याच्या जीवनाचे चैतन्य भरलेले आहे. म्हणूनच सेनापती बापटांसारख्या व्यक्तिमत्वाचे विवेचन करणे खरोखर कठीण आहे. त्यांचे व्यक्तिमत्व आकाराने विराट नसले तरी आशयाने व्यापक होते. 'हे विश्वचि माझे घर' हे त्यांचे शील होते. जणू 'शीवतांडव' स्तोत्रच ! सेनापती योद्धे, तपस्वी व पंडीतही होते !

# साने गुरुजी नावाचे सत्त्व !

विश्ववात्सल्याला आकांक्षा स्फुरली, आपण साकार व्हावे ! साने गुरुजींचे विभूतिमत्व आकारास आले. निर्भेळ प्रेमाच्या मुशीत ओतलेले, भारलेले, झपाटलेले, मंतरलेले व्यक्तिमत्त्व ! नित्य प्रज्वलित, त्याला संकल्प माहीत नाही, व्रताची चाड नाही, विवेकाला अवकाश नाही. म्हणतात ना 'प्रेमाबाई वेडे, त्या विवेक नावडे.' प्रेमामुळे, निव्वळ प्रेमामुळे जे साहजिक घडेल ते घडेल. निखळ प्रेमाने जे घडते ते शुभच असते. कल्याणकारी असते.

एकदा काही मुले विहिरीत पोहत होती. विहीर प्रशस्त होती. एक बाई वर पाणी शेंदत होती. जवळच तिची चिमुरडी मुलगी खेळत होती. सारखी आईजवळ वटवट चालू होती. तेवढ्यात झोक गेला. मुलगी आडात पडली. तशी आईने विहिरीत उडी टाकली. पोहोणाऱ्यांपैकी काही जणांनी दोघींनाही सांभाळले.

मोटेवरून दोघींनाही वर काढण्यात आले. मुले विचारू लागली, 'तुला पोहायला येते का ?' ती म्हणाली 'नाही.' 'मग विहिरीत उडी कशी टाकलीस ?' आई उत्तरली, 'अरे, हे काय विचारता ? मुलगी विहिरीत पडली असताना मला राहवेल कसे ? पोहायला येते की नाही हा विचार करायला, हा विचार यायला अवकाशच कुठे होता ? '

हा प्रेमाचा स्वभाव आहे. त्या रसायनात विवेकही विरघळून जातो. प्रेमाला सावधगिरी माहीत नाही. जिथे प्रीती असते तेथे भीती फिरकतच नाही. प्रेमाला शीण जाणवत नाही. कष्टाचे भान राहात नाही. दमणे हा शब्दच प्रेमाच्या कोशात नाही. म्हणून गुरुजी कधी थकले भागलेले दिसायचे नाहीत. यंत्राप्रमाणे सतत उद्योग चालू असायचा. जे करीत त्यात तल्लीन होऊन जात. डॉ. जॉन्सन म्हणाला होता, 'जीनियस इज द कॅपसिटी टू टेक इन्फिनिट पेन्स.' असीम कष्ट करण्याची शक्ती म्हणजे विभूतिमत्त्व ! असे विभूतिमत्व जेथे असते ती माणसे लोकविलक्षण असतात. त्यांच्या ठिकाणी भगवंताच्या तत्त्वाचा अविष्कार होतो. खरे म्हणजे गुरुजी काही करत नसत. साहजिकच जे घडत असे ते घडत असे. 'पडले वळण इंद्रिया सकळां.'

आपल्याकडे गुरु माऊली म्हणण्याचा प्रघात आहे, संत परंपरेत फक्त ज्ञानोबांना माऊली म्हटले आहे. पण खरा गुरु हा माऊलीच असतो. मातेसारखा वत्सल हे त्याचे ब्रीद, नव्हे हे त्याचे शील. विद्येशी समरस झालेला गुरु म्हणजे विद्येची प्रतिमूर्ति ! त्याच्या ठिकाणी शिक्षक आणि शिष्य दोन्ही एकमेकात विलीन असतात; असे ते मधुर संपन्न व्यक्तिमत्त्व एखाद्या देखण्या जोडाक्षरासारखेच. गुरु हा व्युत्पन्न जिज्ञासू असतो. विद्येविषयी एक सुभाषित आहे.

'मातेवरक्षती पितेवहिते नियुंक्ते
किम् किम् न साधयती कल्पलतेव विद्या।'

गुरु म्हणजे पितृत्व आणि मातृत्व यांचा एकमेव द्वंद समास. कालिदासाने म्हटलेच आहे. 'जगतः पितरौ वंदे,' म्हणजे पित्याच्या ठिकाणी माता ही आलीच. आणि मातेच्या ठिकाणी पिता आला. अर्धनरेश्वर नव्हे किंवा अर्धनारीश्वरही नव्हे. संपूर्ण नारी–नरेश्वर ! माता–पिता एकमेकात ओतप्रोत, हे वात्सल्याचं वैशिष्टय आहे. गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वात वात्सल्य साकार झाले होते. त्यांच्या जीवनाचे ते उपादान होते. महाराष्ट्रातील तरुण–तरुणींना ते आईबाप, कल्पवृक्ष सारे काही होते. वात्सल्याला लिंगभेद नाही. ज्या लेखणीतून 'श्यामची आई'सारखे काव्यमय मातृसूक्त प्रगट झाले. त्या लेखणीच्या मागे वात्सल्याने ओथंबलेले समृद्ध हृदय होते.

या प्रेमाला जसे भयाचे वावडे आहे तसे लोभाचेही वावडे आहे. माया–ममता आहे. पण लोभमोह नाही. आसक्ती नाही. वैषयिकतेचा मागमूसही नाही. गुरुजींचे ब्रह्मचर्य म्हणजे अंगिकारलेले व्रत नव्हते. व्रतात संकल्प करावा लागतो. मन आवरावे लागते. पण सख्यत्वाच्या भावनेत साऱ्या स्त्री–पुरुषांची शरीरे पवित्र असतात. त्या भगवंताच्या विभूतीच ! तेथे व्रताला किंवा संकल्पाला शिरायला जागाच नाही. गुरुजी एकदा लग्नही करायला तयार झाले होते. पण त्यात वैषयिकता नव्हती. कारुण्य होते. मायाळू व कनवाळू माणसाला व्रतांचीही चाड नसते. करुणा व प्रेम यांचा संबंध शंभू आणि अंबिकासारखा अभेद्य आहे. कोणाच्याही शरीराला आपल्या भोगाचा विषय मानणे करुणेला खपत नाही. करुणेला एकच माहीत. संकट निवारणे.

गुरुजींना जसा प्राणीमात्राविषयी कळवळा होता, तशीच अन्यायाची चीड होती. याबाबतीत सेनापती बापट व गुरुजी

दोघेही समानधर्मी. दोघेही तल्लख. कोणी म्हणायचे हे आक्रस्ताळी घायकुते, उतावळे आहेत. पण करुणेला धीर निघत नाही. दुःखार्ताची हाक कानी येताच क्षणाचाही उशीर खपत नाही. सबूर हा शब्द करुणेला माहीत नाही. सेनापती अन्याय किंवा दुःख यांच्या प्रतीकाराकरता गुरुजींप्रमाणेच जीव द्यायला तळमळत असत. पण सेनापती जीव घ्यायलाही कचरत नसत. त्यांच्या लेखी लोक–कल्याणाचा प्रश्न जेथे असेल तेथे आपला जीव व दुसऱ्याचा जीव सारखाच. जनहिताकरता आपला स्वतःचा जीव जर देता येत असेल तर दुसऱ्याचा घ्यायला कसली हरकत ? हा त्यांचा सोपा, सुटसुटीत युक्तिवाद होता. त्यांच्या 'गीत सेवकात' याचे विवेचन आहे. पण जीव घेणे गुरुजींना मानवत नव्हते. म्हणून त्यांचा बाणा प्राणयज्ञाचा. प्राणयज्ञ म्हणजे आपले प्राण !

गुरुजींचे अंतःकरण सतत उदात्त भावनेने थबथबलेले, सतत ओसंडत असायचे, पूरच लोटायचा जणू ! आणि मग ते शिगेवरी भरलेले अंतःकरण शब्दरूपाने प्रवाहित व्हायचे. हेच त्यांचे वाङमय. जणू वाणीच्या व लेखणीच्या द्वारे अंतःकरणाचा पान्हाच वाहू लागायचा. ते अंतःकरण नितांत सुंदर होते. म्हणून ते वाङमयही विलोभनीय व पथ्यकर असे उतरत असे; त्यात आईच्या दुधाचे सत्त्व व तेजही असे. निखाऱ्याप्रमाणे धगधगणारे ते त्यांचे शब्द, पण हा सारा संताप करुणेच्या कुशीतून जन्माला यायचा. 'विकारोऽपिश्लाध्यो भुवनभय भंग व्यसनीनाः' पृथ्वीचे भय निवारण करायचे हेच ज्यांचे व्यसन. त्यांचा विचारही उदात्त असतो. तसे गुरुजींचे होते. म्हणून त्यांच्या साहित्यात स्फूर्ती आहे, कार्यप्रेरक शक्ती आहे आणि तेजस्वितेचे सौंदर्य आहे. ते प्राणवान साहित्य आहे. जिवंत आहे. त्यातील अश्रूतही स्फुल्लिंग आहे.

खाडिलकरांनी एका पदात म्हटले आहे. 'खरा तो प्रेमा ना धरी लोभ मनी.' खऱ्या अर्थाने प्रेमळ माणूस निस्पृह आणि

निर्लोभी असतो. फार काय प्राणाचाही लोभ त्याला नसतो. जीव देण्यात मोठे शौर्य आहे असे त्याला वाटत नाही. आता आपण तोकडे पडतो. असे भासू लागले म्हणजे जीवाचा लोभ सुटून जातो. सहज गळून पडतो. वरवर दिसायला ती आत्महत्या वाटते, पण खरे म्हणजे तो प्राणांचा मोहच संपुष्टात आलेला असतो. गुरुजींचे सारेच विजेच्या वेगाने व्हायचे. साने गुरुजी नावाचे हे सत्त्व विद्युलतेप्रमाणे मुहूर्तमात्र चमकून गेले. आम्ही सारे दिपलो. स्तंभित व चकितच राहिलो. त्यांचे प्रेम संक्रामक होते. त्याची लागण अनेक तरुण–तरुणींना लागली. तिची कांती अजून तळपते आहे.

# अखिल भारतीय व्यक्तिमत्त्वाचे लोकनायक अणे

लोकनायक बापूजी अणे यांचा व माझा निकट संबंध कधीच आला नाही. काही प्रसंगी त्यांची भेट झाली. एवढाच त्यांचा माझा परिचय. पण १९१७ साली मी नागपूर येथील पटवर्धन शाळेत शिकत असताना, 'होमरूल' चळवळीच्या संदर्भात इतर विद्यार्थ्यांबरोबर बापूजी अण्यांचीही भाषणे ऐकायला मात्र जात असे. ती भाषणे फारच ओजस्वी असत आणि आम्हा तरुण मुलांची अंत:करणे त्यांच्या भाषणांनी पेटून जात असत ! वीर वामनरावदादांच्या आधी मी बापूजींची भाषणे ऐकली आणि त्या भाषणांचा माझ्या मनावर ठसा उमटला. याचे कारण ती भाषणे नुसतीच पाणीदार नव्हती. बापूजींच्या भाषणात बराच युक्तिवाद आणि विधायक प्रतिपादनही राहत असे. त्यांची विद्वत्ताही त्या भाषणातून चमकत असे.

पुढे १९२० साली गांधीजींची चळवळ सुरू झाल्यानंतर लोकमान्य टिळकांची शिष्यमंडळी मनःपूर्वक गांधींना पाठिंबा देऊ शकली नाहीत. त्याच सुमारास नागपूर येथील राजाराम लायब्ररीमागच्या पटांगणात बाबासाहेब खापर्डे यांचे अत्यंत ओजस्वी, मुद्देसूद व सुश्राव्य असे गांधींच्या चळवळीविरुद्ध भाषण झाले होते. त्या भाषणावरून मला स्पष्ट दिसून आले की, टिळक पक्षाचा विरोध तत्त्वाचा व मूलभूत धोरणांचा होता. गांधीजींचे धोरण त्यांना वीरवृत्तीला पोषक वाटत नव्हते.

परंतु लोकमान्य टिळकांच्या अंतेवासी सहयोग्यांपैकी दोन प्रमुख सहयोगी मात्र गांधीचे समर्थक होते. विदर्भाचे बापूजी अणे आणि बेळगावचे गंगाधरराव देशपांडे. त्यांच्या टिळक-भक्तीच्या पोटी त्यांच्या अंतःकरणात गांधीनिष्ठेचा जन्म झाला. दादासाहेब खापर्डे यांच्या नंतर जी काही बोटावर मोजण्याइतकी टिळकपक्षीय मंडळी पुण्याच्या गायकवाडवाड्यात उतरत असत, त्यांच्यापैकी बापूजी अणे हे प्रमुख होते. या ऐकीव गोष्टीवरून बापूजींच्या भूमिकेची स्पष्ट कल्पना येते. त्यांच्या मनात टिळकां-विषयी इतकी उत्कट भक्ती होती की, त्यांनी टिळकांवर संस्कृतात एक महाकाव्य आपल्या आजारात लिहून टाकले. आणि असे असूनही गांधींच्या भूमिकेतील सरसपणाकडे त्यांचे दुर्लक्ष झाले नाही. गांधींशी त्यांचे मतभेद अनेक प्रसंगी झाले, पण एकंदरीत त्यांनी गांधींच्या भूमिकेचे समर्थन मोठ्या चिकाटीने, सुसंगतपणे व शारीरिक आणि आर्थिक झीज सोसूनही केले.

गांधीजींनी ' यंग इंडिया ' त काँग्रेसच्या वर्किंग कमिटीवर एक ऐतिहासिक लेख लिहिला, त्यात वर्किंग कमिटीतील व वर्किंग कमिटीच्या बाहेरील महाराष्ट्रीय गटाचे मोठे मार्मिक व हृदयग्राही वर्णन केले आहे. त्याचा आशय असा :

'महाराष्ट्रीय पक्ष हा एक मातब्बर पक्ष आहे. त्यात एकाहून एक खंदे वीर आहेत. व्यवहारनिष्ठ, मुत्सद्दी केळकर आहेत. आपल्या घणाघाती वक्तृत्वाने छाप पाडणारे अभ्यंकर आहेत आणि शांतपणे युक्तिवाद करणारे तर्कनिष्ठ अणेही आहेत.' या शब्दांत गांधींनी बापूजी अण्यांचा गौरव केला आहे.

दोन व्यक्तींमध्ये एखाद्या विषयासंबंधाने कितीही तीव्र मतभेद असला तरी इतर अनेक बाबतींत त्यांच्यात एकमत असू शकते, हे सामुदायिक पराक्रमाचे रहस्य बापूजींनी ओळखले होते. त्यामुळे त्यांच्या ठिकाणी पक्षाभिनिवेश कधीच दिसून आला नाही. त्यांच्या राष्ट्रनिष्ठेपुढे इतर कुठलीही निष्ठा टिकू शकली नाही.

काही प्रसंगी गांधींशी त्यांचे तीव्र मतभेद झाले. एकदा नागपूरमधील टाऊन-हॉलच्या पटांगणात एका जाहीर सभेत ते भाषण करीत असता, कुणी तरी टाऊन-हॉलच्या गच्चीवरून त्यांच्यावर चप्पल फेकली. त्यांनी आपले भाषण तसेच चालू ठेवले. जणू काही घडलेच नाही. अशा समतोल वृत्तीने मतभेदामुळे कोण-त्याही व्यक्तीविषयी कटुतेची किंवा तिरस्काराची भावना त्यांच्या चोख व सालस वृत्तीला कधीच शिवली नाही. एकदा प्रतिपक्षावर अश्लाघ्य व खोटे आरोप केल्याचे त्यांच्यावर कुणीतरी कुंभाड रचले. वर्तमानपत्रातून बरीच प्रखर व प्रतिकूल टीका झाली. त्यावेळी त्यांनी तळतळून एक संस्मरणीय लेख लिहिला. त्यात असे म्हटले की, 'कदाचित माझ्या ठिकाणी काही मूलाग्रह असतील, पण सज्जन-निंदेचे पातक मात्र मी कधीच केलेले नाही.' हा लेख बापूजींच्या सार्वजनिक जीवनावर आणि त्यांच्या दानतीवर लख्ख प्रकाश पाडणारा आहे.

येरवडा तुरुंगातील पुणे-करारानंतर गांधींची तुरुंगातून सुटका झाली. त्यावेळी बापूजी अणे हे काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष

होते. हा मान तोपर्यंत कुठल्याही महाराष्ट्रीय गृहस्थाला मिळाला नव्हता. मुधोळकर व गोखले हे जुन्या काँग्रेसचे अध्यक्ष झाले होते. पण गांधींच्या, झुंजार काँग्रेसच्या कार्यकारी अध्यक्षपदाचा मान बापूजींनाच पहिल्यांदा मिळाला. म्हणून नागपूर येथे डॉ. खऱ्यांच्या बंगल्यात नागपूर प्रांताच्या काँग्रेस कमिटीतर्फे त्यांचा गौरव केला आणि 'बापूजी या मानाला पात्र झालेले आपण आमच्यापैकी पहिले आहात, म्हणून आम्हाला भूषण वाटते.' या शब्दांत अभ्यंकरांनी बापूजींचा गौरव केला.

आधुनिक पद्धतीची साहेबी थाटाची राहणी बापूजींना मानवत नसे. या बाबतीत राजाजी व बापूजी यांच्यात अद्भुत साधर्म्य होते. बिहारातील अनेक सार्वजनिक कार्यकर्ते बिहारचे गव्हर्नर या नात्याने बापूजींच्या राहणीचा मोठ्या अभिमानाने उल्लेख करीत असत. गव्हर्नरांच्या कोठीत सोवळे नेसून, पाटावर बसून, चित्राहुती घालून जेवणारे ते एकमात्र गव्हर्नर होते.

अशा काही किरकोळ आठवणी या प्रसंगी मला आल्या. या किरकोळ गोष्टींचे थोर व्यक्तींच्या जीवनात मी फार महत्त्व मानतो. महत्त्वाच्या प्रसंगी लहान माणसेदेखील मोठी कामे करून जातात. त्या प्रसंगांचा थोरपणा त्यांनाही थोर बनवतो. पण दररोजच्या किरकोळ बाबतीत ज्या माणसांच्या मनातील थोरवी प्रगट होते, ती खरी थोर माणसे. या दृष्टीने वरील उल्लेख केला.

लोकनायक बापूजी अणे यांच्या आयुष्यातील आणखी एक महत्त्वाचा प्रसंग आठवतो.

१९३५ सालानंतर देशात काँग्रेसची प्रांतिक सरकारे स्थापन झाली. त्यावेळी मध्यप्रांताचे मुख्यमंत्री (त्यावेळी त्यांना पंतप्रधान म्हणत असत) डॉ. ना. भा. खरे होते. पुढे खऱ्यांनी

काँग्रेस वर्किंग कमिटीला न विचारता गव्हर्नरकडे आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा पाठविला. त्यामुळे त्यांच्यावर शिस्त-भंगाचा आरोप ठेवण्यात आला. त्यावेळी काँग्रेसचे अध्यक्ष नेताजी सुभाषचंद्र बोस होते. या प्रकरणातून बरेच वादंग माजले व डॉ. खरे यांनी बंडाचे निशाण उभारले. एकंदर सारे प्रकरण 'खरे-प्रकरण' म्हणून ओळखले जाते.

या प्रकरणात जमनालालजी, किशोरलालभाई अशा काही गांधीजींच्या अंतेवासियांना खऱ्यांच्याविषयी व्यक्ती या नात्याने सहानुभूती व अगत्य वाटत होते म्हणून हे दोघे सरदार वल्लभ-भाईंना भेटायला गेले आणि आपल्याबरोबर मलाही घेऊन गेले. खऱ्यांच्यावर काँग्रेस सोडण्याची पाळी येऊ नये, त्यांना आम्ही नागपूर प्रा. काँग्रेसचे अध्यक्ष नेमू इच्छितो, असे जमानालालजी व किशोरलालभाई सरदारांजवळ बोलले. सरदारांनी ते ताबडतोब मान्य केले, पण डॉ. खरे यांना ते मान्य झाले नाही, हा भाग वेगळा.

त्याच बैठकीत सरदार असे म्हणाले की, 'कोणी तरी जबाबदार व वजनदार महाराष्ट्रीयाने ही जबाबदारी पत्करावी असे मला वाटते. त्या दृष्टीने मला बापूजी अणे सगळ्यांत योग्य दिसतात.' तेव्हा आम्ही म्हणालो की, 'मग आपण अण्यांना तसे का सुचवीत नाही. आपल्या विनंतीचा अव्हेर ते करणार नाहीत.' त्यावर सरदार म्हणाले, 'अहो, त्यांनी माझे ऐकले नाही म्हणून तर मी तुम्हाला सांगत आहे. तुम्ही त्यांचे मन वळवा.' असे सांगून सरदारांनी एक गमतीचा प्रसंग आम्हाला सांगितला. ते म्हणाले, 'मी बापूजींना बोलावून घेतले आणि त्यांना आग्रह केला की या वेळी ही जबाबदारी स्वीकारणे आपले कर्तव्य आहे. आपल्यासारख्या अखिल भारतीय थोर पुढाऱ्यांचीच यावेळी आपल्या प्रांताला गरज आहे. आपण पुढे झालात तरच हा वाद

मिटेल.' त्यावर बापूजी आपली पगडी घालून, उपरणे सावरून हात जोडून मला म्हणाले, 'मला या फंदात पाडू नका.' आणि नमस्कार करून निघून गेले.

या घटनेनंतर आम्हा मंडळींना असे वाटले की, आपण बापूजींचे मन वळवून पहावे. म्हणून आम्ही प्रयत्न करण्याचा विचार केला. मी त्यावेळी वर्ध्याला बजाजवाडीतच राहात होतो. सरदारांची भेटही आम्ही बजाजवाडीतच घेतली होती. कुणा तरी महाराष्ट्रीय व्यक्तीने ही जबाबदारी स्वीकारावी, हे सरदारांचे म्हणणे आम्हाला योग्य वाटत होते, म्हणून माझ्या बिऱ्हाडी बापूजींना येण्याची विनंती केली. त्याप्रमाणे ते आले. आम्ही त्यांच्या पाया पडून त्यांना आग्रहाची विनंती केली. त्याही वेळी बापूजींनी सरदारांकडे जशी गंमत केली होती तशीच अक्षरशः केली व ते निघून गेले.

या घटनेचा उल्लेख केवळ एक हकिगत म्हणून केला आहे. यावरून कोणीही तर्कवितर्क काढण्याचे कारण नाही. बापूजींच्या मनात हा महाराष्ट्रीय आणि हा महाराष्ट्रीयेतर असा भेद मुळीच नव्हता. वर्किंग कमिटीचा निर्णय त्यांना योग्य वाटत होता. तरी पण त्यावेळी दोन गटात भांडण होते. त्यांच्यापैकी कोणत्याही एका गटात आपण सामील व्हावे हे त्यांना इष्ट वाटले नाही. वर्किंग कमिटी व गांधी यांनी स्वीकारलेले धोरण न्याय्य वाटत असूनही आपल्या तटस्थ व निःपक्ष भूमिकेला बाध येऊ नये म्हणूनच त्यांनी त्यावेळी हे पद नाकारले. जेथे तत्त्वाचा प्रश्न नसेल तेथे ते बहुधा वादात पडत नसत. हे त्यांचे शील होते.

# बॅ. अभ्यंकरांची तात्विक भूमिका

He is the tonic of his time; – bitter to the taste but stimulating '

A. G. Gardmer on ' George Bernord Shaw. '

जीवनाचे नियामक तत्त्व न्याय आहे की दया आहे, विनिमयांतील चोखपणा आहे की दान आहे, औदार्य आहे की काटेतोलपणा आहे हा फार प्राचीन कालापासून अत्यंत वादाचा आणि गुंतागुंतीचा प्रश्न आहे. विचारप्रवर्तक तत्त्वज्ञ, विचार-प्रसारक उपदेशक आणि आचारसंपन्न कर्तबगार पुरुष यांच्यात या मुद्याबद्दल तीव्र मतभेद असून दरेकाच प्रामाणिक समजुतीचा ठसा त्याच्या एकंदर चारित्र्यावर स्पष्टपणे उमटलेला दिसून येतो. अभ्यंकर कर्तृत्ववान व पुरुषार्थवान होते याबद्दल मतभेद नाही, पण त्यांच्या कर्तृत्वाच्या मुळाशी एक विशिष्ट व सुसंगत विचारसरणी होती. त्यांच्या आचाराला सिद्धांताचे अधिष्ठान

होते. त्यांची वागणूक भरमसाट व प्रवाहपतित अगर ध्येयशून्य नव्हती. ही गोष्ट बऱ्याच लोकांना माहीत असण्याचा संभव आहे. परंतु त्यांच्या एकंदर चारित्र्यावर त्यांना महनीय वाटणाऱ्या तत्त्वज्ञानाचा ठसा स्पष्टपणे दिसून येतो हे मात्र त्रिवार सत्य आहे.

अभ्यंकरांची भूमिका विचारप्रवर्तक तत्त्वज्ञाची, विचार-प्रसारक उपदेशकाची किंवा कल्पक जिज्ञासूचीही नव्हती; त्यांची भूमिका प्रतिभाशाली किंवा बहुश्रुत विद्वानाची नव्हती तर विचारशून्य व अविद्वान सैनिकाचीही नव्हती. अभ्यंकर अत्यंत कुशाग्र बुद्धीचे होते. तत्त्वविश्लेषणाची शक्ती त्यांच्या ठिकाणी फार दांडगी होती. विचारांचे पृथःकरण करण्यात त्यांची गती अकुंठित होती. त्यांची विद्वानाची रचनात्मक बुद्धिमत्ता नव्हती तर हुशार वकिलाची चिकित्सक बुद्धिमत्ता होती. वादविवादाचे त्यांचे कौशल्य वाखाणण्यासारखे होते. समर्पक युक्तिवादाने आपली बाजू मुद्देसूद मांडण्याचा गुणही त्यांच्या बुद्धीत भरपूर होता. पण त्यांची वादपद्धती मुख्यत्वेकरून खंडनात्मकच होती. प्रतिपक्षाची दोषस्थळे बिनचूकपणे ओळखून त्यांच्यावर निकराचा हल्ला करण्यात त्यांचा हातखंडा होता. मंडनात्मक व विद्वत्तापूर्ण प्रतिपादनापेक्षा खंडनात्मक व आवेशयुक्त आक्रमणाचाच बहुजन-समाजावर अधिक परिणाम होतो ही गोष्ट त्यांच्या व्यवहारकुशल बुद्धीला पटली होती. म्हणूनच 'सनातन धर्मा'च्या अनुशासना-तील 'प्रियं ब्रूयात्' या अंशाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून 'सत्यं ब्रूयात्' एवढ्याच वाक्यार्धावर त्यांचा सगळा भर असे. कर्णमधुर पण गुळमुळित प्रतिपादन शैलीपेक्षा कर्णकटू पण खरेखडतर बोलणेच त्यांच्या प्रामाणिक मनोवृत्तीला अधिक परवडत असे. राजकारणी व्यक्तीचा संबंध बहुजन समाजाशीच विशेष येत असल्यामुळे राजकीय चळवळीची मूलभूत तत्त्वे लोकांना कळतील व पटतील

अशा पद्धतीनेच मांडणे योग्य व आवश्यक आहे असा त्यांचा आग्रह होता. म्हणून ते नेहमी लोकांचीच 'बोली' (dialect) बोलत असत आणि दरेक गोष्ट अगदी घरगुती दृष्टांतानी पटवून देण्याचा बुद्धिपुरःस्सर प्रयत्न करीत असत. याचमुळे त्यांची भाषा साहित्यिक, सौष्ठवपूर्ण किंवा वर्तमानपत्री घाटाची नसे तर अगदी लौकिक (populur) घरगुती पराकाष्ठेची फटकळ व शुद्ध नागपुरी असे. 'विद्वत्तापूर्ण शब्दांची व विचारांची बुद्धीला दिपवून टाकणारी घोडदौड' असा त्यांच्या व्याख्यानाचा परिणाम कधीच होत नसे. स्वतःबद्दल आदरयुक्त कौतुक निर्माण करणे हा त्यांचा इरादाही पण नसे. आपल्या भाषणाची अनुकूल व प्रतिकूल चर्चा प्रत्येक चव्हाटयावर मोठया आवेशाने व्हावी असे त्यांना वाटे. आणि म्हणूनच फटकळपणा व ग्राम्यपणाचा आरोप पत्करूनही त्यांनी एका विशिष्ट प्रतिपादनपद्धतीचा स्वीकार केला होता. तो अनुकरणीय नसला तरी अगदीच असमर्थनीय खात्रीने नव्हता. अत्यंत सुसंस्कृत मनाला देखील सात्विक आनंद व्हावा असाही भाग त्यांच्या प्रतिपादनात बराच असे. लोकोत्तर कल्पना देखील लौकिक भाषेत मांडण्याचा त्यांचा आग्रह आवश्यकच नव्हे तर इष्टही होता. बोजड भाषा त्यांना मुळीच खपत नसे. एका सभेत प्रस्तुत लेखकाने त्यांना 'obstinate' या शब्दाचे 'दुराग्रही' असे भाषांतर सुचविले ते त्यांना रुचले नाही. दुसऱ्या कोणी 'हटवादी', 'हेकट', 'जिद्दी' हे शब्द सुचविताच त्यांना अत्यंत आनंद झाला. अभ्यंकरांच्या प्रतिपादनपद्धतीचा हा गुण अनुकरणीय नाही असे कोण म्हणेल ?

हे झाले त्यांच्या प्रतिपादनाबद्दल. आता त्यांच्या जीवनाला आधारभूत असलेल्या सिद्धांताकडे वळू या. सुरुवातीला ज्या तात्त्विक वादाचा उल्लेख केला आहे त्याचाही अभ्यंकरांनी आपल्या विवेचक बुद्धीने पृथःकरणात्मक विचार करून त्यातील

एका पक्षाचा स्वीकार केला होता. जीवनाचे नियामक तत्त्व दया, दान किंवा दम नसून शुद्ध न्याय हेच होय असा त्यांचा अविचल विश्वास होता. ' मनुष्य त्रिकालज्ञानी नाही म्हणून त्याच्याकरता तर दया-क्षमा हाच न्याय होय, तो स्वतः निरंतर न्यायाला पात्र होऊन क्षमेचा याचक बनतो. त्याला दुसऱ्याचा न्याय क्षमेनेच चुकता करता येतो, ' हे तत्त्वज्ञान त्यांच्या स्वभावाला विजातीय होते. दया अपेक्षिणे व दया करणे त्यांना कमीपणाचे वाटे. दान घेणे त्यांच्या स्वाभिमानाला खपत नसे. त्याचप्रमाणे दान देणेही त्यांच्या न्याय बुद्धीला रुचत नसे. दया करणे म्हणजे दुसऱ्याला आपल्यापेक्षा कमी लेखणे होय, दान करणे म्हणजे दुसऱ्याला दीन बनवणे होय अशी त्यांची निष्ठा होती. प्रतिग्रह जर आपल्या मानी स्वभावाला खपत नसेल तर दान करून दुसऱ्याला मिंधे करून सोडणे तरी आपल्याला का पत्करावे ? अशी त्यांची विचारसरणी होती. ज्या समाजरचनेत दया, दान, परोपकार यांचे स्तोम माजविण्यात येते ती समाजरचनाच अन्यायमूलक व म्हणून टाकावू असली पाहिजे अशी त्यांची समजूत होती, म्हणून स्वकीयांशी व त्याचप्रमाणे परक्यांशी त्यांच्या वागणुकीत दयेच्या कोमलतेपेक्षा न्यायाची निष्ठुरता अधिक असे. दानाच्या औदार्यापेक्षा विनिमयाची दिलदारी अधिक असे, सेवा-धर्माच्या आत्मोत्सर्गापेक्षा समान हक्काची देवाणघेवाणच विशेष असे.

वादविवादाच्या भरात ' नवऱ्यावर वर्चस्व गाजविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या बायका आम्हाला नाही आवडत. ' असे एकदा अभ्यंकर सहज बोलून गेले, त्यावेळी ' तुम्ही जुन्या सत्तालोलुप, मातृद्रोही, जीर्णमतवादी पुरुषांच्या परंपरेतील दिसता. ' असा प्रस्तुत लेखकाने त्यांस टोला दिला. तेव्हा ते कळवळून म्हणाले, ' नाही हो. माझा तसा अर्थ नाही. मला पुरुषांवर सत्ता गाजविणाऱ्या बायका नकोत पण गुलाम स्त्रिया

तर त्याहून नकोत. दोघांनीही पूर्णपणे स्वतंत्र रहावे. कोणाचाही जुलूम कोणावर चालू नये एवढेच माझे म्हणणे.' स्त्रीपुरुष-संबंधात देखील दाक्षिणयुक्त सद्व्यवहारापेक्षा न्यायपूर्ण समान-व्यवहारच त्यांना अधिक पटत असे.

या विचारसरणीचा परिणाम त्यांच्या वागणुकीवर कसा झाला होता हे दाखविणारा एक प्रसंग आठवतो. श्री. पी. मुन्ना-स्वामी नायडू धन्तोली वार्डतर्फे म्युनिसिपालिटीकरिता उमेदवार होते. ते एकदा अभ्यंकरांकडे आले आणि त्यांच्याजवळ त्यांच्या पत्नी, कन्या व नोकर यांच्या मताची याचना करू लागले; तेव्हा अभ्यंकर चिडून म्हणाले, 'नायडू, तुम्ही मला रानटी आणि अरेराव समजता काहो ? माझी बायको, माझी मुलगी किंवा माझे नोकरचाकर हे काही माझे गुलाम नव्हेत. त्यांच्या मताचा मालक मी नाही. तुम्ही त्यांना आपले म्हणणे पटवून मते मिळवा.'

त्यांच्या न्यायबुद्धीचे असे अनेक दाखले देता येतील. एकदा त्यांनी प्रत्यक्ष आपल्या मुलीचीही माफी मागितल्याचे ते स्वतः सांगत असत. आपली चूक झाली असता तिच्याबद्दल शिक्षा भोगण्याचे टाळणे किंवा माफी न मागणे स्वाभिमानशून्यतेचे लक्षण आहे असे त्यांस वाटत असे, याचा अनुभव त्यांच्या निकटवर्ती लोकांस अनेकदा आलेला आहे.

प्रतिपक्षीयांसी वागताना देखील त्यांची वृत्ती हीच असे. त्यात दया माया नसे. त्यांच्या दृष्टीने कोणताही प्रतिपक्षी क्षुल्लक नसे. ते समतावादी असल्यामुळे अमुक मोठा व अमुक लहान असा भेद ते आपल्या विरोधकांत करीत नसत. सर्वांवर सारखेच निकराचे हल्ले करीत असत. वार करावयाचा तोही कधी हलका करावयाचा नाही. ते मर्मावर मारण्यास कचरत नसत पण पाठी-

वर किंवा कंबरेखाली वार करणे त्यांच्या स्वभावातच नव्हते. प्रतिपक्षाकडूनही ते दयेची अपेक्षा कधीच करीत नसत. 'माझ्या खाजगी अगर सार्वजनिक जीवनाबद्दल हवे ते बरेवाईट प्रश्न मला अगदी खुशाल विचारा' असे आव्हान त्यांनी सार्वजनिक सभांतून अनेकवार दिलेले पुष्कळांना आठवत असेल. हे आव्हान त्यांच्या उद्दामपणाचे द्योतक नसून जागृत न्यायबुद्धीचे निदर्शक होते.

अभ्यंकरांच्या तात्त्विक भूमिकेचा विचार विरोधकांच्या सांप्रदायिक दोषदृष्टीने न करता तिऱ्हाइताच्या पण साधकाच्या गुणग्राही आणि पूज्य बुद्धीने करायचा प्रयत्न केला आहे. दोष-दर्शनच स्वतःच्या जीवनाचा उद्देश ठरविल्यास जगातील अत्यंत थोर महात्म्यांच्या ठिकाणीसुद्धा असंख्य दोष पहाणे सामान्य बुद्धीला देखील सोपे आहे. पण दोषदर्शनापेक्षा गुणग्राहकताच स्वातंत्र्याच्या उन्नतीला अधिक पोषक आहे, अशा बुद्धीने वरील विवेचन केले आहे.

अभ्यंकर थोर होते की सामान्य होते याचा निर्णय कर-ण्याचे काम अधिकारी माणसाचे आहे. पण त्यांच्या अंगी थोर पुरुषास योग्य असे अनेक गुण होते. त्यांची बुद्धीमत्ता श्रेष्ठ प्रतीची होती आणि त्यांचा पराक्रम स्फूर्तिदायक होता ही गोष्ट त्यांच्या प्रतिपक्षीयांस देखील मान्य करावी लागेल. त्यांच्या ठिकाणी साधु पुरुषाच्या वागणुकीतील विनयशीलता नसेल पण न्यायी पुरुषाच्या व्यवहारातील दिलदारपणा मात्र भरपूर होता. दरबारी मुत्सद्याच्या वागणुकीतील आकर्षक सौंदर्य नसेल पण वीर पुरुषाचे सौजन्य मात्र ओतप्रोत होते, साधकाच्या आचरणातील सहनशीलता नसेल पण स्वाभिमानी क्षत्रियाची प्रखर तेजस्विता मात्र पराकाष्ठेची होती. त्यांचा त्यागाच्या तत्त्वज्ञानावर विश्वास नव्हता पण कर्तव्याच्या यज्ञकुंडात आपल्या शरीराची देखील

आहुती देताना त्यांचे करारी अंतःकरण कचरले नाही. त्यांना दानाचे तत्त्व पटत नव्हते तरी प्रतिपक्षाशी झुंजताना आपल्या उपजीवनाची सुद्धा दरकार त्यांच्या बाणेदार मनाला वाटली नाही; त्यांना दयाधर्म आवडत नव्हता तरी आपल्या देशबांधवांवर होत असलेला जुलुम त्यांच्या तल्लख न्यायबुद्धीला सहन झाला नाही.

समाजाचे आधारभूत तत्त्वन्याय हेच असावे हा प्राचीन ग्रीक तत्ववेत्त्यांचा निर्णय अभ्यंकरांस पटलेला होता. त्यांची देशभक्ती, त्यांचा धीरोदात्तपणा, त्यांचा पराक्रम आणि त्यांची तितिक्षा या त्यांच्या गुणांच्या मुळाशी हाच सिद्धान्त होता. शॉने आपल्या 'सैतानाचा शिष्य' या नाटकाचा नायक पराकाष्ठेचा सद्वर्तनी, न्यायी आणि त्यागी दाखविलेला आहे. शॉचा 'सैतानाचा शिष्य' परंपरागत ईश्वरभक्तापेक्षा अनंत पटीने श्रेष्ठ आहे. तीच गोष्ट अभ्यंकरांची. दम, दान व दया या तत्त्वत्रयीचा कंठरवाने धिःकार करणाऱ्या अभ्यंकरांचे जीवन त्याग, परोपकार व सेवामय पुरुषार्थांचे एक उज्वल उदाहरण होते हे कोण नाकबूल करील ? म्हणूनच शिरोभागी उधद्धृत केलेले ए. जी. गार्डिनरचे वाक्य नागपूरच्या नरकेसरीला लागू पडत नाही, असे कोण म्हणेल ?

# समन्वयाचे उद्गाते काका कालेलकर

लहानपणी मी ऑयझॅक वॉल्टन यांचे एक पुस्तक वाचले. त्यातील एका वाक्याची आठवण येते. 'द ॲप्रिसिएशन ऑफ म्युझिक इज लार्जली द रिझल्ट ऑफ लिबरल एज्युकेशन' संगीत समजण्यासाठी उदार शिक्षणाची आवश्यकता असते. म्हणूनच आकाशवाणीवर अथवा दूरदर्शनवर शास्त्रीय संगीत ऐकणाऱ्याची संख्या फारच कमी असते. पण चित्रपट संगीताचे षौकीन मात्र भरपूर आढळतात. तद्वतच मोठ्या लोकांचे व्यक्तिमत्त्व समजून घेण्यासाठी स्वतःचे व्यक्तिमत्त्वही प्रगल्भ असावे लागते. शृंगारिक भाषेत म्हणावयाचे झाल्यास 'लैलाचे सौंदर्य पहायला देखील मजनूचे डोळे असावे लागतात!' तसे पाहिले तर कोणत्याही व्यक्तीला संपूर्ण समजून घेणे असंभवच आहे. एलेकसिस कुरेलने एक पुस्तक लिहिले आहे. 'मॅन द

अननोन.' त्याने महत्त्वाची गोष्ट सांगितली. अज्ञात असूनही आपण एकमेकांशी व्यवहार करतच असतो. संबंधांशिवाय जीवन असंभवच आहे म्हणूनच आम्ही आमच्या मनात आपल्या शेजाऱ्याची अथवा इतर संबंधितांची प्रतिमा घडवून घेतो. आणि मग त्या प्रतिमेच्या बरहुकूम आमचा सर्व व्यवहार चालू राहातो. अशाच प्रकारे थोर व्यक्तींच्या प्रतिमाही आमच्या चित्तावर अंकित होतात व त्या प्रतिमांच्या आधारे आम्ही आपले जीवन घडवतो. महान व्यक्तींना समजून घेणे जितके कठीण असते, पण त्यांच्या प्रतिमा मनात अंकित करणे मात्र फार सोपे असते. जे प्रथम श्रेणीचे संगीत गायक असतात, त्यांच्या संगीतात जो शास्त्रीय भाग असतो. तो मला मुळीच समजत नाही, परंतु त्यांच्या आवाजातील सुरेलपणा व रागदारीचे सूर आणि लय मला मंत्रमुग्ध करून टाकते. हा आनंद चाखायला संगीताचे शास्त्रीय ज्ञान असलेच पाहिजे असे नव्हे थोर व्यक्तींच्या बाबतीतही हा न्याय लागू पडतो. आंधळ्या माणसाला देखील त्यांचे मोठेपण उमजू शकते. आणि आपल्या सामर्थ्यानिशी तो त्यांची प्रतिमा मनात घडवतो. पूज्य काकासाहेब कालेलकर यांची अशी प्रतिमा मी देखील आपल्या मनात आपल्यापुरती घडविली आहे.

माझ्या आठवणीनुसार १९२१ मध्ये नागपूरला मी प्रथम काकासाहेब कालेलकरांना पाहिले. त्यावेळेस मी राष्ट्रीय शाळेत सहाय्यक शिक्षक होतो. काकासाहेब राष्ट्रीय शाळेचे परीक्षण करण्यास आले होते. बापूनींच त्यांना मुद्दाम पाठविले होते. त्या दिवसात नागपुरात महात्मा भगवानदीनजी एक असहयोग आश्रम चालवित. तेच आश्रमाचे संस्थापकही होते. त्याच आश्रमात काकासाहेब थांबले होते. त्यावेळेस ते गांधी टोपी घालीत असत. पोषाख अगदी साधा होता, पण अत्यंत स्वच्छ

व नीटनेटका होता. मला वाटले त्यांचा हा पोषाख जणू त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंबच आहे. त्यांच्या साधेपणातही उदात्तता होती. त्यांची भेट झाल्याबरोबर त्यांच्या विद्वत्तेचीही माझ्यावर छाप पडली. काकासाहेब एक चतुरस्त्र विद्वान होते. ही त्यांची प्रतिमा आजतागायत माझ्या हृदयावर कोरलेली आहे. त्यांची बुध्दीमत्ता जीवनाच्या सर्व क्षेत्रांना स्पर्शून जाणारी होती. आणि असा कोणताही विषय नव्हता की, ज्यास त्यांच्या प्रतिभेने स्पर्श केला नसावा.

त्या दिवसात काकासाहेबांनी आमच्या शाळेत एक भाषण केले. त्या भाषणात त्यांनी जे सांगितले, ते मला आजही आठवते. त्यांनी बोलताना म्हटले की, मी इंग्रजीकाव्याचा प्रेमी आहे. इंग्रजी साहित्याचा रसिक भोक्ता आहे. आणि तरीही मी तुम्हाला आग्रहाने सांगतो की, इंग्रजीचा बहिष्कार करा. या बहिष्काराचे प्रतिपादन त्यांनी अत्यंत सडेतोड शब्दात केले. मी प्रथमपासूनच इंग्रजी बहिष्काराचा विरोधक होतो. त्या दिवसांमध्ये मी राष्ट्रीय शाळेत इंग्रजीच शिकवित असे आणि एक लोकप्रिय शिक्षक होतो. मी आपली भूमिका नम्रतापूर्वक काकासाहेबांसमोर मांडली. त्यांच्या मनात तीव्र विरोध असूनही त्यांनी माझे म्हणणे उदारपणे व शांततापूर्वक ऐकले. या बौद्धिक उदारतेला मी बुद्धिनिष्ठेचे प्रमुख लक्षण मानतो. त्याच प्रवासात मी काकासाहेबांबरोबर भंडाऱ्याच्या राष्ट्रीय शाळेत गेलो. त्यांचे तेथील भाषण ऐकल्या-नंतर काकासाहेबांची राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना किती व्यापक व विशद होती हे मला समजून आले. त्यानंतर १९३० साली साबरमतीला गुजरात विद्यापीठात काकासाहेबांनी एक राष्ट्रीय शिक्षण संमेलन आमंत्रित केले. या संमेलनाचे मार्गदर्शक व प्रेरक काकासाहेबच होते. त्या जमान्यात गुजरात विद्यापीठ आपल्या संपूर्ण ऐश्वर्यासह दिमाखात वावरत होते. तेथे आचार्य

कृपलानी, किशोरलालभाई मश्रुवाला, नरहरीभाई पारीख आदि अनेक नामवंत शिक्षणतज्ञ उपस्थित होते. त्या संमेलनाचे संचालन करताना काकासाहेबांनी राष्ट्रीय शिक्षणाच्या विविध अंग-प्रत्यंगाची व्याप्ती व विश्लेषण याचे जे विवेचन केले, त्यामुळे मी फारच प्रभावित झालो.

यानंतर बापूजी वर्ध्यास रहावयास आले. तेव्हा मीदेखील १९३५ साली नागपूर सोडून वर्ध्याच्या बजाजवाडीत राहण्यास आलो. बजाजवाडीचे केन्द्रस्थान व विभूती पुण्यश्लोक जमना-लालजी बजाज होते. जमनालालजी एक अलौकिक यजमान होते. त्यांचे अतिथ्य सर्वतः लोकोत्तर व वैशिष्टयपूर्ण होते. कारण या अतिथ्यामुळे अतिथी व यजमान या दोहोंमध्ये पारस्पारिक विकास घडवून आणण्याची योजना होती. त्याकाळात बजाजवाडी खरो-खरच एक चालते बोलते तीर्थक्षेत्र होते. मला तर असे वाटत असे, खरोखरच पुराणात वर्णन केलेल्या त्या विभूतीच आधुनिक रुप घेऊन अवतरल्या आहेत आणि त्यांच्या सोबत राहाण्याचे सहभाग्य मला लाभत आहे. त्या परिसरात प्रत्येक घरात एक स्वनाम-धन्य व्यक्तित्त्व निवास करीत होते.तपोधन श्रीकृष्णदास जाजू, योगारुढ किशोरलालभाई मश्रुवाला, स्नेहमूर्ती अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे व कार्यकुशल व नित्यदक्ष असे भाई धोत्रे सामील होते. या सर्वांवर पूज्य बापूजींच्या सहवासाचे तेज फाकलेले असे. आत्मसमर्पणाची प्रतिमूर्ती असलेले महादेवभाई देसाई देखील काही दिवस तेथे रहात होते. बजाजवाडीच्या जवळच हरीजन छात्रालयात काकासाहेबांचे निवासस्थान होते.

हरीजन व गिरीजनांसाठी काकासाहेबांच्या मनात विशेष जिव्हाळा होता म्हणूनच त्यांनी राहण्यासाठी हरीजन छात्रालयाची निवड केली होती. तो त्यांच्या जीवन संकल्पाचा एक भाग होता.

त्यादिवसात मी काकासाहेबांसोबत ‘सर्वोदय’ मासिकाच्या उपसंपादकाचे काम करीत असे. मी जवळपास रोजच मजकूर लिहून घेण्यास काकासाहेबांकडे जात असे. माझ्या असे अनुभवास आले की, त्यांच्याजवळ ज्ञानाचा अखंड स्रोत होता. कामधेनूप्रमाणे त्यांची वाग्धारा अविरत प्रवाही होती. त्यांना क्षणभरसुद्धा विचार करावा लागत नसे. जेवढ्या काही मजकूराची आवश्यकता असेल, तो अंदाजे पूर्ण करून देत असत. लेखक या नात्याने त्यांचे हे जे वैशिष्ट्य होते. ते पाहून मी फार प्रभावित झालो होतो.

त्याच काळातला एक प्रसंग मला आठवतो. १९३६ अथवा १९३७ सालची गोष्ट असावी. श्री. बाबू कामत नीरा प्रचाराचे काम करीत असत. सेवाग्रामहून एका डब्यातून त्यांनी काकांसाठी व त्यांच्या सोबत्यांसाठी नीरा भरून आणली. दुर्भाग्याने जितक्या व्यक्ती ती नीरा प्यायल्या त्यांना कॉलऱ्यासारखे जुलाबउलट्या होऊ लागले. काकासाहेबांचा होमियोपॅथीवर फार विश्वास होता. त्यांनी नागपूरहून प्रसिद्ध होमीओपॅथीचे डॉक्टर भाऊजी दप्तरी यांस बोलाविले. भाऊजी उपचार करून करून थकले. काकासाहेब मरणासन्न स्थितीला आले. त्यांना काहीतरी पोषक द्रव्य देण्याची नितांत आवश्यकता होती, कारण त्याच्याअभावी मृत्यू अटळ होता. भाऊजी दप्तरींनी काकासाहेबांना सांगितले की, या अवस्थेत अंड्याच्या आतील जो पांढरा भाग असतो, त्याशिवाय दुसरा कोणताही पर्यायी पोषक आहार नाही. काकासाहेब म्हणाले की, जर कोणताही पर्यायी आहार नसेलच तर मग मृत्यूचे स्वागत आहे. हा प्रसंग काकासाहेबांच्या व्रतनिष्ठेचा द्योतक होता म्हणून लक्षात राहिला. अशाच प्रकारे एक दुसराही प्रसंग आठवतो. परंतु त्याचा आशय अगदी वेगळा आहे. तो प्रसंग देखील काकासाहेबांच्या व्रतनिष्ठेचीच आठवण करून देणारा आहे. १९४० सालचे दिवस होते. आम्ही

कराचीत होतो. संध्याकाळी एका चर्चमध्ये काकासाहेबांचे ' हिंदी हिन्दोस्तानी ' या विषयावर इंग्रजी भाषण होते. काकासाहेबांचा असा नियम होता की ते संध्याकाळचे जेवण बरोबर सात वाजता घेत असत. योगायोगाने असे घडून आले की, आयोजक व अध्यक्ष यांची भाषणे संपता संपता पावणेसात वाजले. काकासाहेबांनी भाषण सुरू केले, सात वाजता भाषण बंद केले, तेथेच जेवण करून घेतले व पुन्हा भाषण चालू केले. व्रतनिष्ठा हा काका-साहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक आगळाच पैलू होता.

काकासाहेबांच्या सोबत हिंदीचा प्रचार करण्यासाठी मला सिंध, आसाम, दक्षिण भारत व अनेक प्रांतातून हिंडण्याचा सुयोग प्राप्त झाला. काकासाहेबांचे व्यक्तित्त्व एखाद्या जीवंत चालत्याबोलत्या शब्दकोषासारखे वाटे ते नित्य प्रगतीशील होते. असा चालताबोलता संदर्भ ग्रंथ फारच दुर्लभ असतो. शिवाय ते भाषाकोविद होतेच. जन्माने महाराष्ट्रीयन असले तरी गुजराती भाषेतील उच्च कोटीचे साहित्यिक व विचारक मानले जात. त्यांच्या ठिकाणी अदम्य रसिकता होती. शब्दांचा उपयोग विलक्षण चपखल असे. ' नगरपालिका ' या शब्दाचे जनक काकासाहेबच आहेत. नद्यांना त्यांनी लोकमातेची उपमा दिली. ते एक अद्वितीय प्रवासी यात्रिक होते. संस्कृतीचे परिव्राजक होते. समन्वय शब्द त्यांना फार आवडत असे. तेच त्यांच्या जीवन-दृष्टीचे प्रतिक होते. सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय समन्वयाचे ते उद्‌गाते होते.

काकासाहेबांची गणना मी त्या थोर व्यक्तींमध्ये करू इच्छितो की ज्यांनी भारतीयत्त्वात आवश्यक तो आशय भरण्याचे प्रयत्न केले. आणि त्यासाठी ते अखेरपर्यंत प्रयत्नशील राहिले. त्याचमुळे त्यांना आम्ही भारतीयतेचे आचार्य मानतो. काका-साहेबांचे व्यक्तिमत्त्व जणू खऱ्या अर्थाने ' आचार्य ' होण्यासाठीच

साकार झाले होते. जणू नियतीने यांना यासाठीच जन्माला घातले असावे.

त्यांचा जन्म कारवार येथे झाला. कारवारची भाषा कोकणी आहे. तो प्रदेश कर्नाटकाचा एक भाग आहे. कर्नाटकची भाषा कानडी आहे. त्यांचे शिक्षण इंग्रजीत झाले. पूर्वी कर्नाटकाचा उत्तरी प्रदेश मुंबई व गुजराथसोबत जोडला होता. त्याला जुना मुंबई प्रदेश म्हणत असत. परंतु काकासाहेबांना कुठल्याही एका गावाचे अगर प्रांताचे रहिवासी म्हणता येणार नाही. त्यांचे नाव दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर होते पण त्या नावापुढे अमुक एका गावाचे रहिवासी आहेत असे लिहिले जाऊ शकत नाही. तसे लेबल त्यांच्या व्यक्तित्त्वावर चिकटविता येणार नाही.

काकासाहेब संस्कृतीचे अश्रान्त परिव्राजक लोकदूत होते. 'लोकदूत' ही कल्पना पूर्वी कधी अस्तित्त्वात नव्हतीच. पूर्वी प्रजा होती, राजाही होता. परंतु 'लोक' ही संज्ञा नव्हती. राजा–प्रजा हे शब्द सापेक्ष आहेत पण 'लोक' हा शब्द सापेक्ष नाही. जुना शब्दच वापरावयाचा झाला तर काकासाहेब 'बशीर' होते असे म्हणता येईल. जो शुभ समाचार एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहचवित असे त्याला 'बशीर' म्हणत. काकासाहेबांनी सारे प्रदेश व भाषा यातील चांगल्या बाबी व चांगुलपणा एका प्रदेशातून व भाषेतून अन्य प्रदेशात व भाषेत पोहचविल्या आहेत. सांस्कृतिक मूल्यांच्या देवाणघेवाणीचे अगर विनियोगाचे कार्य काकासाहेबांनी केले, देवाण–घेवाण अगर विनीयोग म्हणजे सौदा नव्हे. त्याला 'बारगेन' अगर 'बार्टर' म्हणता येणार नाही. इंग्रजीत एक सुरेख शब्द आहे. Osmosis यासाठी मला चपखल मराठी शब्द सुचत नाही. पाण्याने भरलेली दोन मडकी एकावर एक ठेवली तर एका माठातले पाणी झिरपत जाऊन दुसऱ्या माठात शिरते व त्या मडक्यातील पाण्यात मिसळते. या ऑसमॉ-

सिसच्या प्रक्रियेची भारत ही फारच सुपीक अशी प्रयोगभूमी मानली गेली. काकांनी याचमुळे भारताला विश्वमानवतेची प्रयोगभूमी मानले. त्यांनी दोन महान विभूतींकडून दीक्षा घेतली. ते शांतिनिकेतन येथे पंडित रविंद्रनाथ टागोर यांच्या सोबत राहिले. तेथे त्यांनी बंगालीसाहित्य, बंगाली मानस व लोकजीवनातील मूल्यांचे अध्ययन केले. काका शिक्षणशास्त्रीही होते. शिक्षणात ' शांती ' असावी व त्याचा संबंध मानवनिरपेक्ष म्हणजे विशिष्ट प्रांत, भाषा, क्षेत्र यावर आधारित भावनेच्या निरपेक्ष अशा मानवीय कल्पनेशी असावा म्हणजेच मानवीय मूल्यांचा विकास होऊ शकेल अशी दीक्षा त्यांना शांतिनिकेतनातच मिळाली या देशात जेवढी विविधता आहे तेवढी जगात इतरत्र कुठेच नाही. त्यामुळे भारतीयता ही अखिल मानवतेची सख्खी बहिणच वाटते. ही शिकवण त्यांना म. गांधींपासून मिळाली. ही मानवनिष्ठा ते गांधीजींपासून शिकले. यासाठी सांस्कृतिक सामंजस्य व समन्वय याची आवश्यकता आहे. हे काकांनी पूरेपूर जाणले होते. हा देश मानवतेचा महासागर असून विश्वात्म्याचे स्वरुप आहे, हेही त्यांनी ओळखले होते.

आचार्य या शब्दाचा खरा अर्थ असा आहे की, जो जीवन मूल्यांचे अध्ययन करतो. त्यांचे प्रतिपादन करतो आणि स्वतः तसे आचरणही करतो या अर्थाने दर्शन आणि आचार या दोन्ही बाबतीत काका गांधींचे सहयोगी बनले. म. गांधी जेव्हा हिंदी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष झाले. तेव्हा त्यांनी राष्ट्रभाषा हिंदुस्थानीचा विचार मांडला. काकासाहेब गांधींचे अनुयायी नव्हते, ते सहयोगी होते. म्हणून ते स्वतःला Cochanger म्हणवीत. गांधीजींच्या प्रतिपादनाप्रमाणे आपलेही व्यक्तिगत परिवर्तन घडवून आणावयाचे असे त्यांनी ठरवले होते. गांधीजी म्हणत की, या देशाला जर एका सूत्रात गुंफावयाचे असेल तर विविधतेत

संवाद निर्माण करण्यासाठी एक समान भाषा असावी लागेल. हिंदी भाषेत हा गुण आहे. पण हिन्दी भाषिकांची भूमिका काही अंशी टोकाची होती म्हणून गांधीजींनी हिंदी–हिंदुस्तानीच्या प्रचाराचे काम अहिंदी भाषिकांवर सोपविले. काका या मोहिमेचे अध्यक्ष झाले. मीही त्या समितीचा एक सदस्य होतो यानिमिताने मी काकासाहेबांसोबत संपूर्ण भारतभर फिरलो. काकासाहेब हे अश्रान्त प्रवासी होते. ते संस्कृतीचे परिव्राजक होते. चिरयात्री व चिरपथिक होते. परंतु यासोबतच ते सौंदर्याचे उपासक होते. 'सत्यं व शिवं 'चे पूजक होते, तर 'सुंदरम् 'चे उपासक होते. देशात जेथे जेथे म्हणून ललित कला निदर्शनास येई, तेथे ते त्या कलेचे अध्ययन करीत त्यांना शास्त्रीय व सुगम अशा दोन्ही प्रकारच्या संगीताचे ज्ञान होते. जगातील भिन्न संस्कृतीची वैशिष्टये व चांगुलपणा वेचून घेऊन तो दुसरीकडे पोहचविण्याचे काम काकासाहेबांनी केले. या सर्व उत्कृष्ट गोष्टींचा संग्रह करून त्यांचा 'सुमनगुच्छ 'तयार करण्याचे काम त्यांनी जीवनभर केले. यातच त्यांची महानता साठविली आहे.

मराठीत 'माता व पिता' यासाठी तीर्थरुप हा शब्द वापरतात. भारत ही आपली मातृभूमी व पितृभूमी आहे, असे काकासाहेब मानीत. म्हणून ते या देशाला 'तीर्थरूप' मानीत. तीर्थयात्रेच्या भावनेनेच त्यांनी अखंड परिभ्रमण केले. या यात्रेला आध्यात्मिक, सामाजिक व सांकृतिक आयाम होते. कृतार्थ जीवन जगणाऱ्या व लोक जीवनात ' पूर्णांक ' म्हणून गणल्या जाणाऱ्या महान व्यक्तींमध्ये काकासाहेबांची गणना करावी लागेल. ते सर्वार्थाने परिव्राजक आचार्य होते.

# अद्वितीय व्यक्तिमत्त्वाचे मनोहर दिवाण

१९२० साली मी आणि मनोहरजी एकाच महाविद्यालयात शिकत होतो. मी दुसऱ्या वर्षाला शिकत असताना ते चौथ्या वर्षाला होते. महाविद्यालयात असताना ते बुद्धिमान, अभ्यासू व सुशील विद्यार्थी म्हणून ओळखले जात. मीदेखील महाविद्यालयात विविध प्रकारच्या चळवळीत भाग घेऊन विविध समस्या उभ्या करण्यात प्रसिद्ध असल्याने विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये परिचित होतो. मनोहरजी अभ्यासू विद्यार्थी असल्याने ते अशा प्रकारच्या चळवळीपासून दूर राहात. म्हणून माझा त्यांचा प्रत्यक्ष परिचय घडण्याची संधी मला मिळाली नाही. परंतु माझ्या मनात त्यांच्याविषयी आदर वसत असे. महाविद्यालय सोडून ते व त्यांच्यासारखी निवडक मंडळी असहकार आंदोलनात सहभागी झाली तर आंदोलनाला प्रतिष्ठा लाभेल असेच सर्वांना वाटत असे. अशा अभ्यासू वृत्तीच्या विद्यार्थ्यांची प्रतिष्ठा आंदोलनाला खूपच उपकारक ठरेल असेच मानले जात असे. आपल्या आईवडिलांनी

अत्यंत कष्ट करून, वेळप्रसंगी पोटाला चिमटा घेऊन आपल्याला शिक्षण दिले आहे. त्यामुळे ते मधेच सोडून देणे बेजबाबदारपणाचे आहे. कृतघ्नतेचे लक्षण आहे, आपल्या आईवडिलांना धोका देण्यासारखे आहे या भावनेने मनोहरजीसारखे विद्यार्थीदेखील महाविद्यालय सोडण्यास मागे ढे पहात. आपली सद्सद्विवेक-बुद्धी काय म्हणते हे जाणून घेण्याचा ते सदैव प्रयत्न करीत होते. त्यांच्या मनोदेवतेने त्यांना शिक्षणावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेणे भाग पाडले आणि आपल्या साऱ्या भविष्यावर तिलांजली देऊन या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षणाचा त्याग केला. आमच्यासारख्या वारंवार आंदोलन करणाऱ्या आणि फजीत होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत या विद्यार्थ्यांचा त्याग फारच मोलाचा व भरीव होता.

मनोहरजींचा माझा प्रथम परिचय ते विनोबांच्या आश्रमात आले तेव्हांच प्रथम झाला. विनोबांच्या प्रतिभेचे आकर्षण मला Love at first sight सारखे होते. त्यामुळे मी मधूनमधून विनोबांकडे जात असे. कधीकधी मनोहरजींना भेटण्या-साठी माझे मित्र डॉ. दादासाहेब बारलिंगे बरोबर येत असत. त्यावेळेस माझ्या ध्यानात आले की, मनोहरजींचा स्वभाव एक-मार्गी आहे. जो मार्ग पत्करला त्यावर झापड बांधलेल्या घोड्या-सारखा मार्ग आक्रमित निष्ठापूर्वक पुढे चालायचे. त्यासाठी आवश्यक अध्ययन व कार्य करीत राहावयाचे हा त्यांचा स्वभाव होता. त्यांच्याविषयी माझी ही जी धारणा बनली होती, ती पुढे अधिकच दृढ होत चालली. विनोबांच्या सोबत जी एकनिष्ठ व प्रमुख मंडळी होती त्यात मनोहरजीही होते. त्यांच्या स्वभावात थोडीशी विक्षिप्त तऱ्हेची लकेर होती. परंतु प्रतिभा व विक्षिप्तता यातील सीमारेषा पुष्कळदा अंधुक असते. विक्षिप्तता केव्हा संपते आणि प्रतिभा केव्हा सुरू होते हे समजणे फार

कठिण आहे. म्हणून सामान्य माणसापेक्षा वेगळ्या पद्धतीने वागणारी व्यक्ती प्रतिभावान असू शकते, असेमानण्याकडे माझा अधिक कल आहे. हे सर्व गृहीत धरुनहि असे म्हणता येईल की मनोहरजींच्या मनावर भारतीय परंपरेचा खोलवर प्रभाव होता. ' ईश्वर साक्षात्कारासाठी आत्मज्ञान प्राप्त करून घेण्यातच परमोच्च पुरूषार्थ असून त्यादृष्टीने साधना करीत राहण्यातच नरदेहाचे परमहित आहे.' ही भावना हिंदू मनात पक्की रुजलेली आहे. मनोहरजींच्या मनातही या संस्काराची पकड खोलवर रुजलेली होती. आणि त्याच दिशेने त्यांची साधनाही चालू होती. त्याच साधनेच्या प्रवाहात गांधी आणि विनोबांचे विचारप्रवाह मिसळून गेले. एक प्रवाह होता देशभक्तीचा व दुसरा प्रवाह होता मानवनिष्ठेचा. गांधी व विनोबांच्या मार्गात या दोन्ही प्रवाहांचा हृद्य संगम झालेला होता. त्यामुळे त्या मार्गावर चालणाऱ्या यात्रिकाच्या जीवनाला तीर्थराजाचे पवित्र रूप प्राप्त झाले होते. रावणाचा वध केल्यावर श्रीरामचंद्राचे पुष्पक विमान ज्यावेळेस अयोध्येच्या दिशेकडे निघाले, तेव्हा प्रयागकडे इशारा करून रामचंद्र सीतेला म्हणाले, ' पश्यानवद्यांगि विभाति गंगा भिन्न प्रवाहा यमुना तरंगे' यानुसार प्राचीन आध्यात्मिक परंपरेत देशभक्तीच्या यमुनेचा गुप्त व मानवनिष्ठ प्रवाह मिसळून गेल्याने गांधी विनोबांच्या जीवनात एक विलोभनीय त्रिवेणीसंगम घडून आला आणि त्या तीर्थक्षेत्री मनोहरजी दाखल झाले. वस्तुत: मानवानिष्ठा हा एक आधुनिक जीवनयोग आहे. परंपरागत धार्मिक अथवा आध्यात्मिक दृष्टिकोनातून पाहिल्यास जीवनयोगाचा त्याच्याशी काही संबंध नाही. परंतु या अर्वाचिन प्रवाहाला परमार्थाची जोड देण्याचे काम गांधी–विनोबांनी केले. परामार्थातून स्वार्थ प्रकटला आणि परमार्थाच्या कारणाने स्वार्थ आणि परार्थ दोन्ही व्यापक व धन्य झाले.

अशा विशिष्ट परंपरामध्ये मनोहरजींचे उपनयन झाले. मानवनिष्ठेचा हा अर्वाचीन प्रवाह या देशात येशुख्रिस्ताच्या शिकवणूकीनुसार आस्तित्वात आला. विवेकानंदांनी त्याला आत्मसात केले. श्री अरविंदाचा व्रतबंधही त्याच क्षेत्रात झाला. लालालजपतराय यांनी त्याला 'वेदांतिक नॅशनॅलिझम्' असे यथार्थ नाव दिले. या राष्ट्रधर्मात रुग्णाची सेवा, कुष्ठरोग्यांची सेवा आदि नवनव्या गोष्टी दाखल झाल्या. या सर्वांत कुष्ठरोग्यांची सेवा करणे सर्वांत कठिण व धोकादायक होते. परंतु गांधीजींच्या आदेशानुसार मनोहरजींनी स्वतःला त्यात सर्वस्वी झोकून दिले. त्यांची कार्यनिष्ठा इतकी खरी व प्रबळ होती की जणू त्यांचा तो स्वभावधर्मच होता, असे वाटू लागले. वस्तुतः त्यांनी त्या कार्याचा जाणीवपूर्वक स्वीकार केला होता. परंतु त्यांची निष्ठा एवढी वाढत गेली की ते काम त्यांचा जणू छंदच बनले. परंपरावादी लोक म्हणतात, 'ईश्वर हेच ध्येय आहे.' परंतु अज्ञेयवादी आधुनिक लोक म्हणतात, 'ध्येय हाच ईश्वर आहे.' अशा दोन्ही प्रकारच्या वृत्तीच्या लोकांचा संगम ज्यांच्या जीवनात झाला होता, अशा लोकांमध्ये मनोहरजी प्रथम श्रेणीत होते.

जीवनात दुसरे काही ध्येय असूच शकत नाही, किंवा दुसरे काही प्रयोजन असले तर ते अनिष्ट असते असे मानणाऱ्यांचा मार्ग मनोहरजींना मान्य नव्हता. 'उपनिषद्-सार' ते 'ताओ उपनिषद्' पर्यंत अनेक ग्रंथ त्यांनी लिहिले. परंतु त्या सर्वांचे सार व सूर एकच आहे. विवेक, वैराग्य आणि साधन चतुष्टी यातूनच मनुष्याला मोक्ष प्राप्ती होऊ शकते, यावरच मनोहरजींची उत्कट निष्ठा होती. म्हणूनच 'ब्रह्मचर्या देव प्रव्रजेत।' ब्रह्मचर्यानंतरच संन्यास घेता येतो असे त्यांना तीव्रतेने वाटत असे. अखेरच्या दिवसात त्यांच्याठायी संन्यास घेण्याची उत्कट आकांक्षा निर्माण

झाली होती. अशा तऱ्हेचे 'वेडेपण' काही भाग्यवंतानाच प्राप्त होत असते. अशा व्यक्तींच्या 'वेडेपणातही' उदात्तता असते. या छंदाइतकाच त्यांचा विश्वास विनोबांच्या अंतःप्रेरणेवर देखील होता. म्हणून विनोबांनी त्यांना जेव्हा सांगितले की, तुम्ही खऱ्या अर्थाने संन्यासीच आहात, आता आश्रम संन्यास घेण्याची तुम्हाला गरज नाही. तेव्हा त्यांनी ते ऐकले व स्वतःचा संन्यास घेण्याचा आग्रह सोडून दिला.

'त्यज धर्मम् अधर्मम्‌च, उभे सत्यानृज त्यज
उभे सत्यानृते त्यक्ता येन त्यजसि तत् त्यज'

या अनुशासनानुसार त्यांनी आपल्या दैहिक जीवनाचा उपसंहार केला.

# लोकसत्तेचा नित्य जागरुक लोकपाल
# कै. किशोरीलालभाई मशरुवाला

जेव्हा मृत्यू हे जीवनातील शाश्वत सत्य असते तेव्हा जीवनाचे महात्म्य प्रस्थापित करण्यासाठी परमात्म्याचे गुण काही व्यक्तीत प्रकट होत असतात. अशा व्यक्तींना आम्ही विभूती म्हणतो. भगवानाची विभूती ज्या शरिरात प्रकट होते ते आमच्या श्रद्धा, आस्था आणि स्नेहास पात्र ठरते. किशोरीलालभाईंचे शरीर ईश्वराच्या विभूतीचे आलंबन होते. ते सर्व प्रकारची शुचिता आणि पावित्र्य यांची मूर्ती होते. ' शुचि, अमोल, सुंदर सब भांति.'

आम्ही पुराणातील महात्म्यांचे वर्णन वाचले आहे. परंतु त्यांना आम्ही नेहमीच काल्पनिक आदर्श मानले. जीवनातील आदर्शाबाबत मानवीय मनाच्या कायकाय उच्च कल्पना असू शकतील हे जर पहावयाचे असेल तर पुराणातील आदर्शांकडे

बघावे अशीच आमची धारणा होती. परंतु बजाजवाडीत आल्यावर पहिल्यांदा हे अनुभवास आले की पुराणातील चित्रित केलेल्या व्यक्ती केवळ कविकल्पनेतून जन्मास आलेल्या नाहीत. सदाचाराचे चालते बोलते जीवंत आदर्श आम्ही येथे प्रत्यक्ष पृथ्वीवर चालताना पाहिले आहेत. अशा महापुरुषांमध्ये कै. किशोरीलालभाई मशरुवालांचे स्थान फार महत्त्वाचे होते.

बापूंची ही विशेषता होती की त्यांच्या सहयोग्यांमध्ये त्यांचे कुणीही शिष्य नव्हते. त्यांचे सारे सहयोगी, सहविचारक व सहप्रयोगीच होते. म्हणूनच किशोरीलालभाईंच्या ' गांधी विचार दोहन ' पुस्तकाच्या प्रस्तावनेत गांधीजींनी लिहिले त्याचा आशय असाच होता की किशोरीलालभाई माझ्या विचारांचा अनुवाद करीत नाही. ते समान भूमिकेतून स्वतंत्रपणे विचार करतात. बापूंच्या सहयोग्यांमध्ये स्वतःची वैशिष्टयपूर्ण भूमिका व दृष्टी असणाऱ्या सर्वच व्यक्ती महान होत्या. सिद्ध पुरुषांच्या बाबतीत एक जुना श्लोक आहे.

कृष्णो भोगी, शुकस्त्यागी, नृपौ जनकराघवौ ।
वशिष्ठः कर्मकर्ता च त अेते ज्ञानिनः समाः ।।

कृष्ण भोगी मानतात, शुकाला त्यागी समजतात, जनक व रामचंद्र राजे मानले जातात, वशिष्ठ कर्मकर्ता मानले गेले, परंतु हे सर्व सिद्ध पुरुष सारखेच अधिकारी मानले जातात.

आजच्या आधुनिक लोकसत्तेच्या युगात किशोरीलालभाईना आम्ही वशिष्ठ परंपरेचे प्रतिनिधी मानतो. प्रचलित आर्थिक, राजकीय व नैतिक समस्यांबाबत ज्या निःस्पृहतेने, निरपेक्षतेने आणि विनययुक्त स्नेहशीलतेने ते सल्लामसलत करीत त्यामुळे सरकारी पक्ष व जनतेचा पक्ष या दोहोंना मार्गदर्शन मिळत असे. त्यांच्या शब्दात उत्कटता होती. भावनेची तीव्रता होती

पण विकाराचा स्पर्शदेखील नव्हता. त्यामुळे त्यांना आम्ही बापू-नंतर या युगातील वशिष्ठ–सत्तेचे प्रतिनिधी मानत होतो.

सतत दोन वर्षे ते म्हणत असत की मला 'हरिजन' च्या कामातून मुक्त करा, कुणीतरी हे सांभाळा, परंतु मामुली काम असते तर कुणीही तो भार सांभाळला असता. आपली सारी शक्ती पणाला लावून हा गोवर्धन उचलण्याची जिम्मेदरी कोणता व्रज-वासी घेऊ शकणार ? 'हरिजन' च्या एक एक शब्दाला जे वजन होते, जो डौल होता, तो त्यांच्या संपादकाच्या तपस्येचा, अनु-भूतीचा आणि अद्भूत आत्मप्रत्ययाचा परिणाम होता. कल्चर मोत्याला असली मोत्याची सर कशी येणार ? यामुळे त्यांच्या सहयोग्यांना हिंमत झाली नाही आणि अखेरीस 'हरिजन'चे संपादक म्हणूनच त्यांचे देहावसान झाले.

ज्या दिवशी त्यांचा देहान्त झाला, त्यादिवशी सुमारे अकरा वाजता ते अशा तऱ्हेने गप्पा मारीत बसले होते की, त्यांना काही आजार आहे असे वाटलेही नव्हते. म्हणाले, 'सप्टेंबरच्या शेवटी मी 'हरिजन' सोडणार आहे. मी निर्णय घेतला आहे व सूचना देखील दिली आहे.' त्यांनी 'हरिजन' सोडण्याचा संकल्प केला पण 'हरिजन' त्यांना कसा सोडेल ? 'हरिजन' लाही आपला अधिकार माहित होता.

किशोरीलालभाईंच्या प्रतिभेची देखील काही वैशिष्ट्ये होती. ते फक्त तत्त्ववेत्ते आणि चिंतनशील बुद्धिजीवी नव्हते तर त्यांनी आपल्या जीवनात प्रत्यक्ष सदाचाराचे उन्नत आदर्शही प्रस्थापित केले होते. त्यांच्या व्यक्तिमत्वात विवेक, विज्ञान आणि तत्वज्ञान यांचा पवित्र संगम होता. त्यांची व्यावहारिक अंतर्दृष्टी देखील अद्भुत होती. याचस्तव प्रचलित राजकीय आणि आर्थिक समस्यांच्या बाबतीत देशातील धुरंधुर पुढारीदेखील आस्था-

पूर्वक त्यांचाच सल्ला घेत म्हणूनच आम्ही त्यांना 'वसिष्ठाचे प्रतिनिधी' मानले. ही पोकळी दुसरा कुणीही भरुन काढू शकत नाही.

त्यांच्या प्रतिभेचा दुसरा गुण होता, अशेषता म्हणजे संपूर्णता. ज्या विषयाबाबत विचार करीत त्याबाबत बारिकातला बारिक तपशील ते माहित करुन घेत, त्यामध्ये कोणतीही कसर शिल्लक ठेवित नसत. टाईपरायटर असो, चरखा असो, कोणतेही यंत्र असो वा जीवनोपयोगी काही उपकरण असो त्याबाबत त्यांचे ज्ञान कधीही ढोबळ अथवा अपूर्ण नसे. ते गायनवादन जाणत नव्हते परंतु साहित्य, संगीत आणि कला याबाबत त्यांना वैज्ञानिक माहिती भरपूर होती. विनोबांनी मराठीत 'गीताई' लिहिली तर किशोरीलालभाईंनी गुजरातीत 'गीताध्वनी' लिहिली. जुन्या तत्त्ववेत्त्यांचा परिपाठ असा की ते सृष्टीच्या रचनेपासून तो तहत पदार्थविज्ञान आणि पदार्थविश्लेषणापर्यंत सर्व विषयांचा विचार आपल्या सिद्धांताच्या प्रस्थापनेसाठी करीत असत. किशोरीलाल-भाईंनी देखील जीवन-संशोधनासाठी जीवनातील सर्व क्षेत्रांचा साधकाच्या भूमिकेतून अभ्यास केला होता. म्हणूनच त्यांची प्रतिभा सर्वस्पर्शी होती. त्यासाठी कोणताही विषय वर्ज्य नव्हता.

किशोरीलालभाईंसारखी तितिक्षेची चालतीबोलती जीवंत मूर्ती यापूर्वी आम्ही कधी पाहिलीच नव्हती. ते विदेही नव्हते. आपले शरीर ते अतिशय स्वच्छ ठेवीत. पोषाखही व्यवस्थित असे. आपल्या शरिराची उपेक्षा अथवा अवहेलना ते कधीच करीत नसत. परंतु त्यांची मन:स्थिती नेहमीच देहातीत असे. आपल्या देशात शरिराला गौण मानून त्याज्य करण्याच्या गोष्टी करणारे अनेक लोक मी शारिरीक पीडेने कण्हताना आणि व्याधींनी तळमळताना पाहिले आहेत परंतु किशोरीलालभाईंच्या परा-

काष्ठेच्या तितक्षेंचे दर्शन आम्हाला घडले. दम्याचा जोम कितीही जोराचा वाढलेला असला तरी त्यावेळेस देखील प्रश्नांचे उत्तर देताना त्यांचा विवेक व ज्ञान कायम असे. आणि त्यातून त्यांचे नैपुण्य व प्रज्ञा प्रकट होत असे. ते रुग्ण होते ! जर्जर शरिरातही अशा प्रकारची बौद्धिक तत्परता व ज्ञान मी कधीही पाहिली नव्हती. यालाच जीवन्मुक्त स्थिती म्हणतात.

मृत्यूच्या दिवशी त्यांनी पत्र लिहिले की, मी अखेरपर्यंत कामाला जुंपून घेऊ इच्छित नाही. याचा अर्थ असातर होऊच शकत नाही की ते लोकविन्मुख होऊ इच्छित होते. त्यांचे सारे अस्तित्वच सेवामय होते. लोकसेवा त्यांच्या जीवनश्वासोश्वासासारखी होती. परंतु त्यांच्या चित्तात कर्माची आकांक्षा उरलेली नव्हती. ‘ लोभ: प्रवृत्तिरारंभ: कर्मणामशम: स्पृहा ’ ही रजोगुणाची लक्षणे त्यांच्या व्यक्तित्वात शिल्लक राहिली नाहीत. म्हणून ते म्हणाले की, मी घोड्याच्या पाठीवर बसलो असताना मरू इच्छित नाही. भगवद्गीतेची योगमुक्तावस्था त्यांच्या व्यक्तिमत्त्वात परिपक्व झाली होती.

‘ आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्चते ।
योगारुढस्य तस्यैव शम: कारणमुच्यते ।।

अशाप्रकारे शांत चित्ताची ही एक भावरूप स्थिती असते, ती निष्क्रीयता नव्हे.

त्यांच्या मृत्युने आम्ही एक जाणकार, ज्ञानी, वयोवृद्ध गमावला आहे. आमचे छायाछत्रही गेले आणि आम्हाला जाब विचारणाराही गेला. एक वेदनामय रिक्तता आम्ही अनुभवत आहोत. बापूंच्यानंतर त्यांनाच आम्ही आपले पालक मानत होतो. वयाने व अधिकाराने त्यांच्यापेक्षा लहान असलेली आम्ही मंडळी त्यांना बाबूकाका म्हणत असू. पुण्यश्लोक जमनालालजी देखील सर्व लहान मंडळींमध्ये ‘काकाजी’ याच नावाने परिचित

होते. तपोधन जाजूजींनाही काकाजी म्हणत. काका कालेलकर तर प्रसिद्धच आहेत. अशा पितृतुल्यांचे संरक्षण आणि स्नेह बापूंच्या प्रत्यक्ष आशिर्वादाच्या रुपाने आम्हाला मिळाला होता. त्यातून पू. जमनालालजी गेले आणि आता बाबूकाकाही गेले.

बाबूकाकांच्या जीवनात त्यांची अनन्यसाधारण सहयोगिनी व सहधर्मचारिणी गोमतीकाकी यांचे स्थान अतुलनीय आहे. आमच्याकडे विवाहविधीसमयी नववधुला अरुंधतीचा आदर्श दाखविला जातो. अरुंधतीप्रमाणे अविचल निष्ठा आणि अपरंपार प्रेमाने गोमतीकाकींनी आपल्या पतीची जीवनयात्रा सफल आणि यशस्वी करण्यात कोणतीही कसर शिल्लक ठेवली नाही. त्या दोघांचे व्यक्तित्वपृथक् भलेही वेगवेगळे असो पण त्या दोघांचे व्यक्तिमत्व एकच होते. पार्वती–परमेश्वरासारखे त्यांचे संयुक्त व्यक्तिमत्व पवित्र व कल्याणकारी होते. बाबूकाकांचे पुरुषत्व जसे महामानव्यात विलीन झाले होते तसेच गोमतीकाकींचे स्त्रीत्वही महामानव्यात विलीन झाले होते. त्या दोहोपैकी एकही जीवित राहीला तरी त्याला 'एकशेषद्वंद्व' असेच म्हटले जाते. कालिदासाने पार्वती आणि परमेश्वर या दोघांनाही 'जगतः पितरौ' म्हटले आहे. दोघांनाही जगताचा पिता मानले. संयुक्त मानव्याचा जो आदर्श बाबूकाकांनी आमच्यासमोर ठेवला त्यानुसार आम्ही 'जगतो मातरौ' देखील म्हणू शकतो. पार्वतीचे मातृत्व ज्या प्रकारे परमेश्वराच्या पितृत्वात विलीन होते, त्याचप्रकारे आमच्या बाबूकाकांचे पितृत्वही त्यांच्या सहयोगिनी गोमतीकाकूंच्या मातृत्वात विलीन झाले आहे.

विवाहित ब्रह्मचर्याचा बापूंचा आदर्श त्यांच्या जीवनात जसा सफल झाला होता, तसा फारच कमी लोकांच्या जीवनात

सफल झाला असेल. स्त्रीचे भय अथवा स्त्रीद्वेष याचा त्यांना स्पर्शही झाला नव्हता. स्त्रीला ते पुरुषाच्या अध:पतनाचे कारण मानत नसत. 'लग्न–प्रपंच' नामक पुस्तकाच्या भूमिकेत त्यांनी या विषयाचे जे विवेचन केले आहे ते स्त्रीपुरुषांच्या संयुक्त मानव्याचे एक अपूर्व व वैज्ञानिक दर्शन आहे. गोमतीकाकू व बाबूकाका यांची जोडी अविभाज्य होती. त्यांचे परस्पर प्रेम अनुकरणीय होते. त्या प्रेमात शारीरिकता नव्हती व आसक्ती देखील नव्हती. उदात्त ब्रह्मचर्याच्या भावनेने परिष्कृत झालेले ते प्रेम वैवाहिक जीवनाच्या मांगल्याचे प्रतिक होते.

ते शांतीच्या शोधात होते, शांतीची प्रतिक्षा करीत होते. जेव्हा त्यांनी निर्णय घेतला की 'हरिजन' चे काम सोडून द्याव-याचे, त्यावेळेस त्यांच्या चित्तावरील चिंतेचे ओझे कमी झाले. अंतिम क्षणी, त्यांचे प्राण जात असताना देखील ते सावध होते, त्यांची बुद्धी जागृत होती. काही मिनिटापूर्वीच पू. जाजूजी त्यांना भेटून स्टेशनकडे रवाना झाले होते. थोडा वेळ आधीच त्यांनी सर्व सेवासंघाच्या मित्रांना सल्लाही दिला होता. पत्रव्यवहारादि कामकाज तर दिवसभर चालूच होते. अंतसमयी त्यांनी रामनाम' घेतले. 'अंतकालेच मामेव स्मरन् मुक्ता कलेवरम्'.

अशाप्रकारे त्यांनी ईश्वराच्या नामस्मरणाने देहविसर्जन केले. आम्हाला त्यांची चिंता वाटत नाही, आमची हानी झाली त्यामुळे व्यथित आहोत म्हणून शोकावेगात केवळ विनयानेच त्या पुण्यात्म्याला वंदन करतो. 'नम: परम ऋषिभ्यो, नम: परमऋषिभ्य: ।'

# तत्त्वनिष्ठ, व्यवहारकुशलतेची मूर्ती कै. जमनालालजी बजाज

कै. जमनालालजी आज आपल्यात नाहीत. त्यांचे पार्थिव शरीर अग्नीत भस्मसात होताना मी प्रत्यक्ष पाहिले आहे. तरीदेखील त्यांचे अस्तित्व आपल्यात नाही हे मला खरे वाटत नाही. वर्ध्याच्या आसपासचे सारे वातावरण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने भारावले आहे आणि त्यांच्या पुण्यमय कार्याने सुगंधित झाले आहे. ज्या काही थोडयाफार व्यक्तींचा माझ्या जीवनावर प्रभाव पडला आहे, त्यात कै. जमानालालजींचे स्थान अत्यंत वैशिष्टयपूर्ण आहे. त्यांची माझी गाठभेट अधूनमधूनच होत असे. माझे कार्य-क्षेत्रच असे होते की शिक्षामंडळ अथवा महिला सेवा मंडळ यांच्या बैठकांव्यतिरिक्त वर्षभरातून आठदहा वेळेस मुष्कीलीने माझी त्यांची गांठभेट होत असे. म्हणूनच त्यांचे शरीर भस्मीभूत होताना पाहूनही मला असे वाटत नाही की, कै. जमानलालजी

आपल्यात नाहीत. सारे वातावरण त्यांच्या समृद्ध व पवित्र जीवन प्रभावाने ओथंबलेले व ओतप्रोत आहे.

११ तारखेला कै. जमनालालजींचा कनिष्ठ पुत्र रामकृष्ण सुमारे तीन वाजता 'घनचक्कर' समाजाच्या सोबत्यांसोबत गप्पा करीत बसला होता. इतक्यात एका नोकराने बातमी आणली की एकाएकी 'काकाजी' फार आजारी झाले आहेत. मला ही बातमी सव्वातीन वाजता समजली. लगेच आम्ही सर्व तिकडे निघालो. परंतु दारातच समजले की जमनालालजींचा देहांत झाला आहे. केवळ पाऊण घंट्याच्या आजारातच सारा खेळ संपला होता.

ज्या खोलीत त्यांचा देह ठेवला होता, तेथे पोहोचताक्षणी आम्ही जे अद्‌भुत व विलक्षण दृश्य पाहिले, त्याचे वर्णन करणे अशक्य आहे. ते दृश्य जितके करुण होते, तितकेच उदात्तही होते. जितके गंभीर होते, तितकेच प्रेरणादायी होते. जमनालाल-जींच्या प्रेताजवळ बसून (म. गांधी) बापू व जानकीदेवी चर्चा करीत होते. शोकावेगाने दोघांची हृदये विदीर्ण झाली होती. तथापि दोघांनाही चिंता वाटत होती की त्यांचे कर्तव्य काय? जानकीदेवी आपल्या श्वशुरसदृश व गुरुतुल्य बापूजींना विचारत होत्या, 'आता माझे काय कर्तव्य आहे? सतीधर्माचे आचरण करण्यासाठी आता मी काय करू?' त्या गंभीर व शोकदायक प्रसंगी जमनालालजींच्या मृतदेहाजवळ बसून बापू सतीधर्माची व्याख्या आपल्या अनुपम शब्दात, साध्यासुध्या घरगुती भाषेत करीत होते. ते म्हणाले, 'ज्या कार्यासाठी जमनालालजींनी आपले प्राण वेचले, ज्या कामाचे परिपालन आणि चिंतन करीत त्यांनी देहत्याग केला, त्या कामासाठी आपले सारे आयुष्य व संपत्ती समर्पित करणे हेच खऱ्या अर्थाने सहगमन आहे, यथार्थाने हाच खरा सतीधर्म आहे, हेच खरे सहधर्माचरण आहे.'

अशा शोकाकुल मन:स्थितीतही जानकीदेवींनी आपल्या पतीच्या नश्वर शरिराच्या साक्षीने नम्रतापूर्वक अत्यंत संकोचून हा पवित्र व गंभीर संकल्प केला. बापू आणि विनोबांना त्यांनी विनंती केली की, 'तुम्ही भगवंताला प्रार्थना करा की, त्यांची शक्ती, बुद्धी आणि गुण त्याने मला द्यावेत म्हणजे त्याच्या सहाय्याने मी त्यांचे अपुरे राहिलेले काम पूर्ण करण्याचा व तडीस नेण्याचा प्रयत्न करू शकेन.' हा सारा संवाद माझे समाजवादी मित्र डॉ. राममनोहर लोहिया ऐकत होते. ते म्हणाले, 'खरोखरच गांधी म्हणजे एक अजब व्यक्तिमत्त्व आहे.' म. गांधी म्हणत, 'जमनालालजी एक दमंग व ताकदवान पुरुष होते.' हे दृश्य जेव्हा जेव्हा आठवते तेव्हा तेव्हा माझ्या मनात येते, 'जानकीदेवी देखील दमंग स्त्री होती. आपल्या अनुरूप साहस, निष्ठा व त्याग बघून जमतालालजींच्या आत्म्याला देखील कृतकृत झाल्या-सारखे वाटत असेल.'

हे दृश्य खरोखरच पुराणकाळची आठवण करून देणारे होते. यानंतर विनोबांच्या मधुर गंभीर आवाजातील श्रीमद्-भगवद्गीतेच्या बाराव्या अध्यायाचे पठणाने त्या प्रसंगाला एका पुण्यपर्वाचे स्वरूप प्राप्त झाले. पुण्यात्म्याचा प्रमाणकाल देखील एक शुभमुहुर्तच ठरतो. म्हणूनच तो पुण्यतिथीच्या रुपाने साजरा करण्यात येतो.

गांधीजींनी म्हटलेच आहे की, जमनालालजी एक दिग्गज-पुरुष होते. कितीही गर्दीत उभे राहिले तरी त्यांची मान व डोके दूरूनच दिसत असे. त्यांच्या शरीराचा डामडौल भरभक्कम, दणकट होता. म्हटलेच आहे की, दणकट शरिरातच निकोप मनाची वाढ होते. जमनालालजींच्या उंच्यापुऱ्या व दणकट देहातील त्यांचा आत्माही तितकाच विशाल व उन्नत होता. त्यांच्या हृदयाच्या विशालतेत स्वाभाविकताही होती. त्यांचे

शरीर कसरत, व्यायाम आदीने कमावलेले नव्हते. तशीच त्यांच्या बुद्धीतही आधुनिक शिक्षणाची चमक धमक नव्हती. तरीदेखील त्यांच्या बुद्धीत स्वाभाविक संस्कार, कुशाग्रता आणि मूलग्राही वृत्ती यांची कमी नव्हती. त्यांच्या बुद्धीचे औदार्य आणि शक्ती त्यांच्याबरोबर संस्थांमध्ये काम करणारे त्यांचे सहकारी चांगले जाणून होते आणि त्यांच्या हृदयाच्या विशालतेचा अनुभव तर साऱ्यांनाच येत असे. त्यांच्या शरिराची उंची ही जणू त्यांच्या विचाराच्या उच्चतेची द्योतकच होती.

एका अर्थाने या जगात जन्मास येणारी प्रत्येक व्यक्ती अपूर्व व अद्वितीय असते. एकासारखा दुसरा नसतोच म्हणूनच आपण प्रत्येकाला ओळखू शकतो ज्याप्रकारे प्रत्येक व्यक्तीचे बाह्यरूप एकसारखे नसते, तद्वतच त्यांचे हृदय व स्वभावही एकसारखे नसतात. परंतु जमनालालजी हे खरोखरच एक आगळ्या ढंगाचे, वैशिष्टचपूर्ण व अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते. ते केवळ दानवीर नव्हते, तर तपोवीर व सेवावीर देखील होते. चांगल्या कामाकरिता आर्थिक मदत करण्यापुरतीच त्यांची सत्कार्यनिष्ठा सीमीत झालेली नव्हती तर त्यासाठी ते एका साधकाच्या भावनेने, तळमळीने व तत्परतेने काम करू लागत व सेवा आणि सदाचार सदैव आपल्या आचरणात आणण्यासाठी निरंतर व अविरत प्रयत्नशील असत. त्यांनी वर्ध्याच्या सत्याग्रहाश्रमाला केवळ द्रव्यदान देऊन त्याचा पाया रचला, एवढेच नव्हे तर सत्याग्रहाच्या व्रताचे परिपालन आपल्या प्रत्यक्ष जीवनात आचरणात आणून प्रामाणिकपणे आयुष्य कंठण्याचा सदैव प्रयत्न केला. संसारात राहूनही ते कित्येक वर्षे ब्रह्मचर्याचे पालन करीत. आणि जीवनात साधेपणा, कष्ट सहन करण्याची शक्ती आणि वैराग्य पालन करीत असणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना आपल्या वागणूकीने चकित करून सोडीत. त्यामुळे असे म्हणणे अतिशयो-

क्तीचे ठरणार नाही की जमनालालजी खरोखरच जनकासारख्या राजर्षीचे प्रामाणिक शिष्य होते व खरेखुरे बंशज होते.

जमनालालजींच्या व्यक्तिमत्वात व्यवहारज्ञान व तत्त्वनिष्ठा, दातृत्व आणि हिशोबीपणा, सज्जनता आणि विवेकशीलता यांचा एक मोठा मधुर संगम झालेला होता. या जगात संपन्नता आणि सुचिता, वैभव व पावित्र्य, कांचन व चारित्र्य यांची एकरूपता क्वचितच आढळून येते.

जमनालालजींच्या व्यक्तिमत्त्वात या परस्परविरोधी गुणांचा मधुर मिलाप झालेला होता. ते जेव्हा एखाद्या पुण्यमय सत्कर्मासाठी रक्कम अथवा पैसे देत, तेव्हा त्याला दान मानत नसत. उपनिषदाच्या आज्ञेनुसार ते अतिशय संकोचाने व विनयपूर्वक देत असत– 'ह्रियादेयम् ' म्हणूनच त्यांचे दान निरपेक्ष व जवळपास निर्दोष वाटे. ते म्हणत, 'ज्या संपत्तीची व्यवस्था पाहण्याचा भार मजवर सोपविण्यात आला आहे, त्याचा सदुपयोग करण्याची संधी ज्या संस्थांनी, व्यक्तींनी अथवा या कार्यांच्या रूपाने मला मिळते, त्यांची माझ्यावर फार कृपा आहे. म्हणूनच ते जेव्हा एखाद्या कामासाठी श्रद्धापूर्वक आर्थिक सहाय्य करीत तेव्हा त्यांना सत्ता वा यशाची थोडीदेखील अभिलाषा वाटत नसे. उलट ते असाच प्रयत्न करीत की प्रत्येक संस्थेचे काम एखाद्या जबाबदार व योग्य व्यक्तीकडे सुपुर्त करावे आणि आपण दुसरे एखादे काम करावे. त्यामुळे त्यांच्या धनाने कुणीही व्यक्ती आश्रित अथवा पंगू बनत नसे. संस्थाच्या संचालकाची आत्ममर्यादा व आत्मनिष्ठा हाच त्याचा खरा प्राण असतो, हे ते पूर्णपणे जाणून होते.

मी म्हटलेच आहे की, जमनालालजी अतिशय हिशोबी व व्यवहारचतुर होते. विनोबा नेहमी म्हणत की परमार्थ हाच एक

उत्कृष्ट हिशेब आहे. केवळ आर्थिक दृष्टीने हिशेब अपूर्ण, अपरिपक्व राहतो. परमार्थ साधण्यातच खरी आर्थिक दृष्टी व वृत्ती आहे. जमनालालजी स्वतःला एक कुशल बनिया मानीत म्हणूनच ते म्हणत की, 'मी जर पैशाने प्रतिष्ठा, प्रशंसा व सत्ता खरीदू लागलो तर माझे पतन होईल. देशाची हानी होईल आणि जनतेशी प्रतारणा होईल. जर मी माझ्या आजूबाजूला केवळ चापलूसी करणाऱ्या व मतलबी लोकांना एकत्र केले, तर माझ्या आत्म्याचा कधीच विकास होणार नाही.' म्हणूनच एका दूरदर्शी व विचारपूर्वक वागणाऱ्या व्यापाऱ्यानुसार ते आपल्या संपत्तीचा विनियोग अशा संस्थांवर, कार्यांवर करू इच्छित असत की, ज्या त्यांना आत्मोन्नती साधण्यास सहाय्यक ठरतील. या कारणामुळेच ते इतक्या त्यागी, तपस्वी समाजसेवकांचा संग्रह करू शकले. त्यांच्या लोकसंग्रहाच्या अद्भुत शक्तीचे खरे रहस्यही यातच सामावलेले आहे. ज्या संत आणि कर्मयोगी व्यक्तींना जमनालालजींच्या निष्ठेने व निर्व्याज प्रेमाने वर्ध्याला ओढून आणले, त्या व्यक्तींना केवळ धनाच्या बळावर कुबेरसुद्धा खरेदी करू शकला नसता या दृष्टीकोनातून पाहिल्यास कै. जमनालालजी केवळ आदर्श अतिथीसेवीच नव्हे तर, आदर्श यजमान–यजन करणारे–देखील होते. त्यांनी ईश्वराची उपासना आणि माणुसकीची आराधना व उपासना, संतांच्या, सेवकांच्या व सत्प्रवृत्त सज्जनांच्या रुपानेच केली. ही गोष्ट त्यांची उत्कृष्ट हिशेबीवृत्ती आणि सच्चे व्यवहारकौशल्य सिद्ध करीत नाही काय ?

त्यांचा दानशूरपणा त्यांच्या जीवनव्यापी निष्ठेचा केवळ एक अंश होता. त्यांच्या चारित्र्याने त्यांच्या साऱ्या कुटुंबीयांत क्रांती घडवून आणली आहे. त्यांची पत्नी, मुलगे, मुली साऱ्याच त्यांची जीवननिष्ठा मानणारे आहेत. त्यांच्या मुलांनी केवळ कारावासच भोगला एवढेच नव्हे तर विनोबांच्या आश्रमात राहून

संडास साफ करण्यातसुद्धा आपला गौरव आहे असे मानले. त्यांच्या मुलींनी देखील विनोबांच्या पायाशी बसून रामायण, ज्ञानेश्वरीचे अध्ययन केले व साफसफाई आणि शरीरश्रमाचे पाठ गिरविले आहेत. जेव्हा जेव्हा बापू व विनोबा एखादा नवा प्रयोग करू इच्छित तेव्हा तेव्हा जमनालालजी व त्यांचे कुटुंबीय त्यांच्या सेवेत हजर होत असत. राधाकृष्ण बजाज यांच्यासारखा चारित्र्यवान, उद्यमशील व कुशल समाजसेवक ही त्यांचीच देणगी आहे. अशाप्रकारे जमनालालजींचे कुटुंबीय त्यांचे अनुयायीही बनले, हे थोडेथोडके नव्हे. देशात अशी किती कुटुंबे निघतील ?

जमनालालजींच्या एका आणखी वैशिष्टयाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. त्यांनी आपल्या कर्मभूमीला आणि सेवा-भूमीला आपल्या जन्मभूमीपेक्षा अधिक प्रिय व सेव्य मानले. वर्ध्यावर त्यांचे जे प्रेम होते व त्या शहराची शोभा वाढावी, त्याला महत्त्व प्राप्त व्हावे म्हणून त्यांनी जे अविरत प्रयत्न केले, ते देखील त्यांच्या या वृत्तीचाच परिचय करून देतात. नागपूर प्रांताची भाषा व जनता याविषयीही त्यांना खास प्रेम वाटे. विनोबांना ते आपला गुरु मानीत आणि त्यांच्या सर्व मुलांनी विनोबांच्या पायाशी मराठीच्या अनुपम काव्य–ज्ञानेश्वरीचे–अध्ययन केले आहे. परंतु ते आपल्या जन्मभूमीलाही कधी विसरले नाहीत. जयपूर राज्य प्रजा मंडळासाठी त्यांनी जे कार्य केले आहे ते त्यांच्या जन्मभूमीप्रेमाचे चालतीबोलती साक्ष आहेत.

जमनालालजी हे संस्थांची संस्था होते. सत्याग्रहाश्रम, महिला सेवा मंडळ, मारवाडी शिक्षा मंडळ, कॉमर्स कॉलेज, गोसेवा चर्मालय, गोसेवा संघ, ग्राम–उद्योग संघ, चरखा संघ, गांधी सेवा संघ इ. अनेक संस्थांचा पाया त्यांनीच घातला. अर्थात त्यांची प्रेरणा व आद्यप्रवर्तक म. गांधी असत. परंतु जमनालालजी

केवळ या संस्थांचे प्रतिष्ठाते व आश्रयदातेच नव्हे तर त्या संस्थांशी त्यांचा प्रत्यक्ष संपर्क असे. महिलाश्रमातील स्त्रिया व मुली त्यांना ' काकाजी ' म्हणून आपल्या पित्या व पालकांसमानच मानत. त्यांच्यासाठी जमनालालजींचे निधनाने झालेली पोकळी कधीच भरून निघणार नाही.

ज्यांचे जीवन अशातऱ्हेने अत्यंत समृद्ध आणि उपयोगी होते, त्यांचा मृत्युदेखील अत्यंत वैभव संपन्नावस्थेत व ईर्षा वाटण्यासारखाच झाला. मृत्युसमयीदेखील त्यांनी आपली बनिया-वृत्तीच जोपासली--आजारी झाले नाहीत, लाचार झाले नाहीत आणि कोणाची सेवा घेतली नाही. त्यांचे जीवन हे एक तत्त्वनिष्ठ, व्यवहारकुशल आणि असाधारण जीवनाचा आदर्श आहे.

# भारताचा सहृदय लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल

आमची अशी श्रद्धा आहे की ईश्वराची कृपा असीम आहे आणि मानवतेचे सामर्थ्य अनंत आहे. आमची अशीही धारणा आहे की भारताच्या पवित्र भूमीत पुण्यवान व पराक्रमी पुरुष उत्पन्न करण्याची अपार शक्ती आहे म्हणूनच आम्ही असेही मानतो की आम्हाला निराश व हतबल होण्याची गरज नाही. तथापि यात यत्किंचितही शंका नाही की कै. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या मृत्युने आमच्या राजकीय जीवनात जी पोकळी निर्माण झाली आहे, ती कधीही भरून निघणार नाही. आजतरी असे वाटते आहे की त्यांच्या निधनाने झालेली हानी भरून काढण्यासही वेळ तर लागेल, एवढेच नव्हे तर त्याची वास्तवता व गंभीरता याची जाणीव होण्यास देखील बराच अवधी लागेल. सरदारांची अनुपस्थिती आम्हाला प्रत्येक राष्ट्रीय संकटाच्यावेळी तीव्रतेने जाणवल्याखेरीज राहणार नाही.

सरदार वल्लभभाई पटेल भारतीय राष्ट्राच्या रुद्रतेची विभूती होते. आमच्या परंपरागत धारणेनुसार रुद्रतेत केवळ उग्रपणा व प्रखरता यांचाच समावेश असतो असे नव्हे तर त्यात चांगुलपणा, सौजन्यही असते व जीवनदानाची शांती अंतर्भूत असते. श्रुतीमध्ये असे वर्णन केले आहे की, तो रडला आणि 'रडला' म्हणून त्याला रुद्र म्हटले आहे. त्याच्या अश्रूतून रजताची-चांदीची उत्पत्ती झाली. म्हणूनच रुद्राच्या वेदनेलाही चांदीची चमक असते. कै. बापूंच्या मृत्यूसमयी सरदार अत्यंत व्यथित झाले होते. त्यांचा स्वर दाटून आला, गळा भरून आला होता तरीही जनतेला हे माहीत होते की, त्यांच्या शोकातही तेजस्विता-धैर्य आहे. तो एखाद्या असहाय्य व दीन व्यक्तीचा आर्त स्वर नव्हे, ती एका वज्रनिश्चयी, लोहपुरुषाची, लोकनेत्याची संयमित वेदना आहे. म्हणूनच बापूंच्यावेळी आकाशाएवढ्या व्यापक शोकातही ते आम्हाला धीर देऊ शकले. अशातऱ्हेने ज्या पुरुषाच्या शोकातही साहस आणि पराक्रमाची बीजे लपलेली असतात, ते पुरुष सामान्य जनतेचे आश्रयस्थान बनतात. ज्यावेळेस आपण हिंमत हरू लागतो, पाय लटपटू लागतात, हृदय कंपित होते, त्यावेळेस अशा पुरुषांचे अस्तित्व देखील आपल्याला धीर देण्यास, हिंमत बांधण्यास पुरेसे ठरते. सरदार पटेल आमच्या राष्ट्राचे मेरुदंड होते.

अनेक व्यक्तींनी म्हटल्याप्रमाणे, लिहिल्याप्रमाणे माझाही असा अनुभव आहे की सरदार वल्लभभाई पटेल हे एक अत्यंत सहृदय व विनोदी व्यक्तिमत्त्व होते. जेवणाच्यावेळी जमानालालजी व जानकीदेवीजींच्या बरोबर आश्रम, रचनात्मक संस्था अथवा राजकीय सभांच्यावेळी ज्यांनी त्यांचे विनोदी संभाषण ऐकले असेल ते त्यांची विनोदप्रियता कधीच विसरू शकत नाहीत. त्यांच्या विनोदात कधी कधी उपहास व व्यंग असे परंतु ते

बोचणारे अथवा घायाळ करणारे नसे. असा हा सहृदयी पुरुष आपल्या केवळ सहृदयतेसाठी जितका प्रसिद्धीस पावला नाही तितका न्यायनिष्ठुरतेसाठी आणि दृढ निश्चयासाठी प्रसिद्ध होता. त्यांच्या दृढनिश्चयी स्वभावामुळे ते क्वचित कठोर वाटत. राज्याचा गाडा हाकण्यासाठी, शासनाच्या यंत्रणेसाठी, काँग्रेस-मधील शिस्त टिकविण्यासाठी त्यांना अत्यंत दृढनिश्चयाने व कठोरतेने काम करावे लागे. जनतेच्या प्रशंसेपेक्षा जनतेच्या हिताकडे त्यांचे अधिक लक्ष असे. म्हणून ते लोकांच्या रागालोभाची पर्वा न करता त्यांचा रोष पत्करूनही त्यांच्या हिताचा विचार सोडून देत नसत. पित्याप्रमाणे ते जनतेच्या हिताचीच चिंता व व योजना सदैव करीत.--' पितेव हिते नियुक्ते '--परिणामस्वरूप त्यांना पुष्कळदा जनतेच्या प्रेमाऐवजी जनतेच्या रोषास व अप्रियतेस पात्र व्हावे लागले. त्यांच्या कल्याणकारी वृत्तीतच हे विष पचविण्याची शक्ती सामावलेली होती. आमच्या पुराणात शंकराने हलाहल पचवून आपल्या शिवात्मकतेचा प्रत्यय आणून दिला. शिवाचे नाव अखिल मांगल्याचे प्रतीक म्हणून ओळखले जाते. सरदारांच्या विभूतीमत्वात अशा रुद्र-भद्र वृत्तीची अलौकिकता होती. ' विकारोऽपि श्लाघ्यो भुवनभय भंगव्यसनिनः । ' अखिल ब्रह्मांड कृपया ' ज्यांनी आनंदाने विष प्राशन केले त्या परममंगलदायक शिवाच्या ठिकाणीच अशी शक्ती होती की त्यांचा विखार देखील प्रशंसनीय ठरला, कारण जे विष शंकराच्या व्यक्तित्त्वात भिनल्यामुळे तत्त्व बनते, त्यात जीवनदानाची शक्ती निर्माण होते. पित्याप्रमाणे असलेल्या सरदारांना काही लोक घाबरत, काही वचकून असत. परंतु ज्यावेळेस मदतीची गरज भासे, त्यावेळेस त्यांच्यावरच भरवंसा वाटे. अमंगल व राष्ट्र-विघातक शक्तींकरिता ते वज्रासारखे कठोर व भयंकर भासत. परंतु राष्ट्रहितकारक स्वपक्षीय लोकांसाठी हा लोहपुरुष पर्वता-सारखा अकंपनीय आधार भासे. मित्रांचा आधार आणि

प्रतिपक्षियांसाठी भीतीदायक अशा दोन्ही तत्त्वांचा मिलाप झाल्याने त्यांचे व्यक्तिमत्त्व अद्भुद्रम्य होते. त्यांना या देशाचा 'लोहपुरुष' मानीत. परंतु ज्या द्रवरसाने त्यांचे व्यक्तिमत्त्व बनले होते, ते लोह लौकिक नव्हते. ते लोह असे होते की ज्यात सुवर्णाची कांती आणि परसाच्या दगडाची सुवर्णीकरण करण्याची शक्ती सामावलेली होती. सरदार मामूली लोहपुरुष नव्हते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात शुद्ध सोन्याची झाक होती. आणि दुसऱ्याचे सोने बनविण्याची परसाच्या दगडाची अद्भूत किमया होती. म्हणूनच ते आमच्या देशात आत्मविश्वास आणि संकल्पशक्तीचे वातावरण निर्माण करू शकले. अशा पुरुषाशी संघर्ष करणे राजकारणपटू लोकांना, कपटी-कारस्थान्यांना, आणि सत्ताकांक्षी लोभीजनांना प्राणसंकट वाटत असे. परंतु स्वजनांसाठी आणि आत्मीय जनांसाठी त्यांची मैत्री, प्रेम आणि सहकार्य हा आश्वासनाचा शाश्वत स्रोत होता.

सरदार पटेल वस्तुनिष्ठ आणि व्यवहारकुशल राजपुरुष होते. परंतु छलकपट आणि षड्यंत्र कारस्थान करण्याची त्यांना कधी आवश्यकताच भासली नाही. कारण ही नीती त्यांच्या वीरवृत्तीला कधीच भावली नाही. याच कारणास्तव त्यांचा कट्टरातला कट्टर वैरीदेखील त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवीत असे आणि त्यांच्या वागणूकीबद्दल त्यांचे प्रतिपक्षीदेखील निश्चित अनुमान काढू शकत असत. प्रत्येक व्यक्तीला हे पुरेपूर माहीत असे की सरदार कसे आहेत आणि ते कसे वागतील. त्यांच्याबद्दल प्रतिपक्षियांना भीती जरूर वाटत असे परंतु संशय कधीही वाटत नसे. सरदार भित्रे नव्हते आणि कमकुवतही नव्हते. म्हणूनच त्यांना कधीही खोट्याचा आणि कपटाचा आधार घ्यावा लागत नसे. त्यांच्यामध्ये योजनाचातुर्य व युक्तिकौशल्य भरपूर होते. परंतु त्यांच्यावर कुटीलतेचा आरोप त्यांच्या विरोधकांनीदेखील क्वचितच केला असेल.

भारताच्या सांस्कृतिक आणि भावनात्मक एकतेचे मूल्य ते जाणून होते, मानत होते. परंतु त्या भावनात्मक एकतेसाठी वास्तविक आधार शोधणे आवश्यक मानत होते. या लोहपुरुषाच्या भृकुटीविलासानुरूप (भिवयाच्या इशाऱ्यावर) सिंहासने डोलत होती, साम्राज्ये लडखडत होती. परंतु भय, धाक, दहशत दाखविण्यात त्यांना रुची नव्हती. संस्थांनी देशी राज्यांचे विलीनीकरण त्यांनी डलहौसीच्या साम्राज्यतृष्णेने थोडेच केले होते ? ते कोणाचीही तसुभर जमीन न स्वतःसाठी मागत, किंवा आपल्या राज्यासाठी मागत असत, ते तर भारताची अखडता, एकतेची भावना वस्तुनिष्ठ, व्यवहारस्वरूप करण्यासाठी झटत होते. सरदार पटेल बिस्मार्कची प्रतिकृती नव्हते, डलहौसीचे राष्ट्रीय संस्करण नव्हते किंवा रुडयार्ड किपलिंगसारखे साम्राज्य-तृष्णेचे भाबूकही नव्हते.

प्रत्येक कुटुंबात दोन प्रकारचे कुटुंबवत्सल पुरुष असतात. दोघेही कुटुंबाच्या मर्यादा पाळतात व कुटुंबाची शान वाढवितात. त्यापैकी एकाजणाची दृष्टी कुटुंबातीत असते. त्याला साऱ्या गावाची चिंता अधिक असते. आपल्या कुटुंबाच्या सुखाचे भान त्याला कमी असते. त्यामुळे गावात त्याच्या कुटुंबाबद्दल अधिक स्नेहभाव व आदर वाढलेला असतो. अशातऱ्हेने गावात त्याच्या कुटुंबाला सुखप्रतिष्ठा लाभलेली असते.

दुसरा आपल्या कुटुंबाचा योगक्षेम वहातो, कुटुंबाची जबाबदारी सांभाळतो व कुटुंबियांच्या सुखाची स्वास्थ्याची व्यवस्था पाहतो. मराठीमध्ये याला घरचा ' कर्तापुरुष ' म्हणतात. मराठीत याला दुसरा शब्द ' कारभारी ' हा आहे. हा भरताच्या निःस्पृहतेने आणि आत्मीयतेने कामाची धुरा मोठ्या दक्षतेने सांभाळतो. त्याला पहिल्या क्रमांकाची अथवा सत्तेची आकांक्षा

नसते, पर्वा नसते. कार्यकर्त्याच्या नम्र भूमिकेतही तो संतुष्ट राहू शकतो. पदाचे वा स्थानाचे गौणत्व त्याच्या कार्यतत्परतेत वा कार्यकुशलतेत काही उणीव राहू देत नाही. जागतिक क्रांतीच्या भावनेचा त्याग न करताही स्टॅलिनने रशियाचा योगक्षेम हे आपले प्रथम कर्तव्य मानले, जबाबदारी मानली. आपल्या देशात समाजवाद आणणे हाच त्याने स्वधर्म मानला. भारतात सुख, स्वास्थ्य आणि स्थैर्य आणणे हेच आपले आद्य कर्तव्य आहे असे सरदार पटेलांचे उद्दिष्ट होते, तोच त्यांनी स्वधर्म मानला होता. म्हणूनच सरदारांच्या भूमिकेत एकप्रकारचे वैशिष्टय होते, एक मर्यादा होती. परंतु त्याला संकीर्णता अथवा संकुचितता याचा स्पर्शही नव्हता, म्हणून सरदार कधीही राज्यवादी नव्हते.

भारतसेवक गोखले, लो. टिळकांच्या बाबतीत एकाप्रसंगी म्हणाले होते की, जर लो. टिळक दुसऱ्या एखाद्या जमान्यात वा दुसऱ्या एखाद्या देशात जन्मले असते, तर त्यांनी आपल्यासाठी एखाद्या राज्याची स्थापना केली असती. यात श्री. गोखले यांनी टिळकांच्या पराक्रमाचीच प्रशंसा केली आहे. टिळक हे भारतीय स्वराज्याचे दृष्टे होते. त्याबाबत जनतेची भूमिका बांधणारे अग्रदूत होते. गांधीजी हे स्वराज्याचे प्रणेते होते, ते आमचे राष्ट्रपिता होते आणि सरदार पटेल हे आमच्या स्वराज्यातील लोकसत्तेचे निर्माते होते–कारागिर होते.

भारताच्या विभाजनानंतर कुणीतरी पटेलांना म्हणाले की, 'तुम्ही तर देशाचे तुकडे करून टाकले.' तेव्हा त्यांनी उत्तर दिले, 'तुकडे तर आधीच होते, पण ते सर्व तुकडे इंग्रजांच्या कबजात होते. आम्ही त्यापैकी बारा आणे देशाचा हिस्सा आता तुमच्या हातात दिला आहे, तेवढा एकसंध व अखंड ठेवणे तुमचे काम आहे, तुमच्याच हाती आहे. आम्ही बारा आणे हिस्सा देश तुमच्या हाती सोपविला हा काय आमचा गुन्हा झाला ?

पाकिस्तानव्यतिरक्त सारा भारत देश एकत्र करून, संघटित करून, त्याला स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी सर्व भारतीयांची मने सांधून देशाला मजबूत बनविणारे कै. सरदार पटेल हे भारतीय गणराज्याची स्थिरता, प्रगल्भता, आणि दृढनिश्चय यांची मूर्तीमंत वज्रविभूती होते, प्रतीक होते. म्हणूनच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आमचे शतशः प्रणाम !

# अध्यात्मवीर कै. रविशंकर महाराज

माझे सौभाग्य म्हणा वा दुर्भाग्य, पण कुणाही महापुरुषाच्या अधिक निकट राहण्याची संधी मला आयुष्यात कधीही मिळाली नाही. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिगत जीवनाची मला फारशी माहिती नसते. फक्त त्यांच्या विभूतीमत्त्वाचा सामाजिक जीवनात जो आविष्कार असतो, त्याच्याशी माझा परिचय होतो आणि त्यासाठीच मी त्यांना विनम्रपूर्वक अभिवादन करीत आलो आहे.

पू. रविशंकर महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात दोन अशी वैशिष्टचे होती की ज्यांनी माझ्या हृदयाला स्पर्श केला आहे. त्यांचे पहिले वैशिष्ठ्य–कालिदासाच्या भाषेत सांगावयाचे झाले तर–'अशिक्षितपटुत्व.' सुशिक्षित लोक बहुश्रुत असतात, त्यांच्यात पांडित्याचे वैभव दिसून येते. इंग्रजीत त्यांना 'मेन ऑफ लेटर्स' म्हणजे 'साक्षर मनुष्य' असे म्हणतात आणि ते संयुक्तही आहे. परंतु जीवनात नवनव्या आयामांचा शोध व आविष्कार करण्या-

साठी साक्षरतेपेक्षा सार्थकतेची अधिक आवश्यकता असते. अशी 'सार्थक' माणसेच आत्मवान असतात. अशा सूज्ञ (मॅन ऑफ सेन्स) व आत्मवान (मॅन ऑफ स्पिरीट) व्यक्ती जीवनात काही संदेश वा प्रयोजन घेऊन येत नसतात. ते काही प्रेषित नसतात, त्यांचे काही जीवित ध्येय नसते. तरीदेखील ते जीवनातील अंधःकार आणि अंधेरे रस्ते सहजतेने प्रकाशित करतात. अशी ही प्रतिभाशाली माणसे अखिल मानवजातीला ललामभूत ठरतात.

पू. रविशंकर महाराजांचे दुसरे अनन्यसाधारण वैशिष्टय म्हणजे समाजाने झिडकारलेल्या, कायद्याने बहिष्कृत केलेल्या व्यक्तींशी असलेली त्यांची पवित्रपूर्ण मैत्री. काही व्यक्ती समाजातीत असतात, त्यांच्या जीवनात सामाजिक जीवनातील सारी शाश्वत मूल्ये अव्यक्तपणे प्रकट झालेली असतात. त्यांच्यासाठी 'को विधिः को निषेधः' हे सूत्र लागू पडते. अशा व्यक्ती 'लॉ अन्टू देमसेल्व्हज' म्हणजेच स्वभावतःच सामाजिक मूल्यांच्या प्रतिमूर्ती असतात. दुसऱ्या काही व्यक्ती समाजबाह्य, समाजाने बहिष्कृत केलेल्या असतात म्हणून समाजविरोधी असतात. त्यांना 'आऊट लॉज' म्हणतात. अशी माणसे नैतिकदृष्टया सर्वसाधारण अपराध्यांइतकी पतित नसतात. उलट त्यांना अभिमान वाटत असतो की आपण चोरी, व्यभिचार वा बलात्कारांसारखे गुन्हे करीत नाही. आपल्या समाजाच्या मूळ रचनेत जे सामाजिक व आर्थिक दोष आहेत, ज्या उणिवा आहेत त्याची प्रतिक्रिया साकार होऊन या व्यक्तींच्या रुपाने समाजात प्रकट होत असते. समाजातील सर्वसाधारण जनतेला अशा व्यक्तींविषयी एकप्रकारचा सुप्त व अप्रकट आदर वाटत असतो. परंतु कुणाच्याही मनात त्यांच्याविषयी सहानुभूती निर्माण होत नाही. सर्वसाधारण गुन्हेगारासंबंधी करुणा, प्रेम व सहानुभूती

फक्त संताच्याच हृदयात वसत असते. परंतु समाजाने बहिष्कृत केलेल्या ज्या व्यक्ती समाजात अत्याचारी व हिंसक कृत्यांनी सर्वत्र आतंक निर्माण करीत असतात. त्यांच्याकरिता देखील अशा लोकांच्या हृदयामध्ये करुणा व प्रेम जागृत होते, ती व्यक्ती केवळ संत नसते, तर 'अध्यात्मवीर' असते. येशूने म्हटले होते की, 'ज्याने कोणतेही पाप केले नसेल, तीच व्यक्ती या व्यभिचारी स्त्रीवर पहिला दगड मारेल.' हा संताचा सहज नम्रभाव असतो. 'मो सम कौन कुटिल खल कामी', संताचे नैसर्गिक, स्वाभाविक साधुत्व असेच असते. संत नेहमी पतितातील पतित व हीन माणसाला आपल्या बरोबरीचा मानतात. त्यांचा हा प्रत्यय असतो, परंतु समाजविरोधी अत्याचारी व्यक्तींना देखील जो सहजभावाने आपले मानतो, त्या माणसाच्या व्यक्तिमत्त्वात साधुत्वापेक्षा अधिक काही गुण असतात. त्यालाच म्हणतात 'अध्यात्मवीरता' साऱ्या समाजाला दहशतवादाने आतंकित करणाऱ्या व्यक्तींनासुद्धा अंत:करणाच्या सहजप्रेरणेने आपलेसे करतो, आत्मीय मानतो, त्याची करुणा वीरवृत्तीने समृद्ध होत असते. या आध्यात्मिक बळामध्ये कोणत्याही प्रयोजनाचे वा स्वधर्माचेही भान उरत नाही. मानवतेचा हा झरा घटनांच्या आघाताने प्रकट होत असतो. तो केव्हा प्रकट होतो हे त्या निर्झरासही माहीत नसते, काय होत आहे याचे त्याला भानही नसते. कारण त्याला हेतूचेही भान नसते व परिणामाचे ज्ञानही नसते.

म्हणून पू. महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात एक प्रकारची अशिक्षित निरहंकारिताय–'अन्कल्टिव्हेटेड ह्युमिलेटी' आहे. बायबलमध्ये म्हटलेच आहे–'ब्लेसेड आर दि मीक इन् स्पिरिट, फॉर दे शॅल इन्हेरिट द अर्थ.' असे विनम्र आत्मे खरोखरच धन्य होत. कारण तेच खरे या पृथ्वीचे उत्तराधिकारी आहेत. महाराजांच्या बिरादरीला या पृथ्वीचा उत्तराधिकार प्राप्त होवो, हीच या प्रसंगी आकांक्षा व प्रार्थना आहे.

# सप्तधातूंची मूर्ती डॉ. राममनोहर लोहिया

डॉ लोहियांना स्वतःचे मित्र मानण्यात मला गौरव वाटतो. १९३३--३४ सालच्या सुमारास ते जर्मनीहून नुकतेच स्वदेशात परत आल्यानंतर कै. जमनालालजींकडे आले होते. कुठल्याशा प्रवासात आम्ही सगळे बरोबर होतो. आमचे मित्र श्री. गोपाळराव काळे यांच्याशी लोहियांचा अखंड संवाद चालत असे. परंतु अलीकडे माझी व लोहियांची भेट क्वचित्च योगायोगाने झाली तरच होते. पण त्यांच्याविषयीचा माझा आदर व सौहार्द कायम आहे. अर्थात् त्यांच्या मताशी किंवा वागणुकीशी या मैत्रीचा संबंध नाही आणि आपल्या मित्राची दरेक वागणूक आपल्याला आवडते असे नाही. आणि मतांचा तर 'बदलणे' हा अनिवार्य धर्म आहे, म्हणून मैत्रीचा व मतांचा संबंध अविभाज्य असू शकत नाही. पहिल्या परिचयाच्या वेळीच लोहिया हे गृहस्थ तल्लख व

कुशाग्र बुद्धीचे असल्याचा प्रत्यय मला आला होता. कुठल्याही प्रश्नासंबंधाने विचार करण्याची व वागण्याची त्यांची काही स्वतःची अशी निराळीच पद्धत असल्याचे दिसून आले. हिलाच मौलिकता असे नाव आहे.

आपल्या देशाच्या राजकीय क्षेत्रात जी प्रमुख माणसे आहेत त्यांच्यांत लोहियांचे स्थान पहिल्या रांगेत मानता येईल. त्यांचे व्यक्तिमत्व प्रखर व लक्ष वेधून घेणारे आहे. निरनिराळ्या लोकांच्या मनात ते आपल्या विचारांनी व वागणुकीने परस्पर-विरोधी पण उत्कट भावना उत्पन्न करतात. अर्थात् एका दृष्टीने त्यांचे व्यक्तित्व प्रक्षोभकारकही म्हणता येईल. समकालीनांसमोर ते आव्हानाच्या रूपानेच प्रकट होतील. काही लोकांना यात पुरुषार्थाच्या व सक्रीय सहयोगाच्या आवाहनाची प्रतीती येते, तर इतर काही जणांना युद्धाच्या पाचारणाचा भास होतो. एवंच काय, की लोहियांविषयी उपेक्षेची, उदासीनतेची किंवा दुर्लक्षाची वृत्ती स्वीकारणे अशक्य होऊन बसते. ज्या ज्या क्षेत्रात ते प्रवेश करतील तेथे तेथे त्यांच्या जिवंतपणाचा, मौलिकतेचा व उत्कटतेचा ठसा उमटल्याशिवाय राहात नाही. या उत्कटतेमुळे त्यांच्या भाषेतही तीव्रता येते, त्यांच्या शब्दांना तीक्ष्ण धार असते व त्यांच्या उपरोधांना अणकुची असते. परखड भाषेत आपल्याला दिसत असलेले सत्य मांडावे हा त्यांचा कटाक्ष. स्वतःच्या धोरणाची निदर्शक म्हणून लोहियांनी तुरुंग, फावडे व व्होट ही तीन प्रतीके अंगीकारली आहेत. फावडे हे प्रतीक मानले असले तरी त्वेषाने बोलू लागले म्हणजे ते त्या फावड्याला फावडोबा किंवा फावडोजी म्हणतील असे मात्र नाही. अंतःकरणात भावनेची तीव्रता बेसुमार वाढली म्हणजे माणसाचे फावड्याला फावडे म्हणण्याने समाधान होत नाही; मग आवेशाच्या भरात फावड्याला ‘ फावडे ’ न म्हणता ‘ फावड्या ’ आणि ‘ फावडि-

टल्या ' म्हणण्याचा मोह होतो. स्पष्टवक्तेपणा फटकळपणापर्यंतच न थांबता त्याची मजल क्वचित तोंडाळपणापर्यंत आणि एखादे वेळी शिवराळपणापर्यंतही जाते. भावनेचे ओज शब्दांच्या तीक्ष्णतेत प्रकट होते आणि त्यामुळे लोहियांसारख्या स्नेहाकांक्षी व्यक्तीला देखील मित्रवियोगाचे दारुण दु:ख वारंवार सोसावे लागते. डॉ. लोहियांसारख्या प्रामाणिक व आत्मनिरीक्षणशील विचक्षण व्यक्तीच्या ध्यानात एवढी साधी गोष्ट आल्यावाचून कशी राहील ? म्हणून स्वत:च्या पक्षाच्या कार्यकारिणीला एकदा प्रांजळपणाने त्यांनी सांगितले, ' माझी तिखट भाषा आणि मी सांगतो तो सिद्धांत यांची गल्लत आपण करू नये '

लोहियांनी कोर्टासमोरील आपल्या एका जबानीत इतिहासातील तीन प्रमुख सत्याग्रह्यांचा उल्लेख केला आहे. सॉक्रेटीस, थोरो आणि गांधी. या संदर्भात सॉक्रेटीसची आठवण झाल्यावाचून राहात नाही. अ‍ॅथेन्सच्या लोकांना उद्देशून तो म्हणत होता की, ' तुम्ही सगळे सुस्त व गळाठलेल्या घोड्यासारखे स्वस्थ लोळत पडला आहात ..गोमाशी बनून तुम्हाला जागे करायला आलो आहे.' सॉक्रेटीस हा सत्याग्रही खरा ! आपल्या वाग्बाणांनी कोणाला जर्जर अगर घायाळ करावे किंवा जायबंदी करावे असा त्याचा हेतू असणे शक्य नव्हते पण लोकांना चेव आणण्याकरिता प्रखर वाक्प्रहार करून त्यांना कासावीस करण्याची लकब मात्र त्याच्या ठिकाणी होती. त्यामुळे त्याच्या वाणीतील परुशता लोकांना जाणवली आणि तो प्रतिपादन करीत असलेल्या लोककल्याणकारी तत्त्वांकडे त्यांचे लक्ष गेले नाही. परंतु जे प्रिय असते ते हटकून असत्यच असते असे नाही. लोहियांनी आईन्स्टीनजवळ बोलताना असे म्हटल्याचा उल्लेख आहे की, आमच्या शतकात फक्त तीन महान माणसे झाली. गांधी, बर्नार्ड शॉ आणि आपण (आईन्स्टीन). त्यांपैकी बर्नार्ड शॉने एपिलॉग (भरतवाक्य)

म्हणून जो निबंध लिहिला त्यात सत्याच्या प्रतिपादनाकरिता ज्यांना छळ किंवा देहान्त शासन सोसावे लागले, त्या सत्यवीरांच्या वृत्तीची मीमांसा केली आहे. त्यात शॉ असे म्हणतो, की हे सत्यवीर हुतात्मा जर कलावंत असते तर यांच्याविषयी एवढा तीव्र संताप लोकांच्या मनात उत्पन्न झाला नसता. सत्याचे प्रतिपादन जेव्हा अहिंसेच्या अनुसरणातून होते. तेव्हा त्याला कलात्मकता प्राप्त होते. लोहियांच्या प्रकृतीत कलात्मकता व रसिकता भरपूर आहे. चित्रकलेच्या किंवा शिल्पकलेच्या कृतीचे अवलोकन करण्यात स्वत:ला विसरून जाताना त्यांना ज्यांनी पाहिले आहे, त्यांना त्यांच्या रसिकतेची साक्ष पटते. त्यांनी मनात आणले म्हणजे त्यांच्या भाषेतही त्यांची ही रसिकता व कलात्मकता मोठ्या मनोज्ञ स्वरुपात व्यक्त होते. सत्याची अभिव्यक्ती कलात्मकतेत झाली म्हणजे ती सर्वत्र धन्यताच धन्यता प्रसवते.

आपल्या द्वेषमूलक, मत्सरप्रेरित, स्पर्धात्मक क्रांती नको आहे; क्रोधयुक्त, करुणाप्रेरित, प्रतिकारात्मक क्रांती हवी आहे असे लोहियांनी वारंवार असंदिग्धपणे प्रतिपादन केले आहे. भारतीय परंपरागत देव्हाऱ्यातील तीन विभूती सामाजिक उपासनेकरिता लोहियांनी निवडल्या आहेत. राम, कृष्ण आणि शिव. या तीन विभूतींपैकी शिवाच्या विभूतीत अद्‌भुत भव्यता आहे. विध्वंस हे शिवाचे कार्य आहे, पण भव आणि शिव या अभिधानांनी ध्वनित होणारे मांगल्य हे त्याचे शील आहे. समस्त विश्वाच्या संहाराकरिता होणारे त्याचे प्रचंड तांडवही कलात्मक आहे. स्मशानातही तो जीवनाची बीजे पेरतो. म्हणून शीघ्रकोपी शिवाचा कोपदेखील 'वरेण तुल्य:' वरदान बनून जगाचे कल्याण करतो. क्रांतीचे प्रेरक तत्त्व म्हणून लोहियांना हाच मंगलकारी क्रोध अभिप्रेत असला पाहिजे. त्यांच्या अंत:करणात दलित, दीन

व दरिद्री यांच्याविषयी असीम कणव आहे आणि म्हणूनच त्यांनी आवर्जून असे म्हटले आहे, की देशातील ६० टके अधिकाराच्या जागा गुणवत्तेचा विचार न करता आदिवासी, हरिजन, शूद्र व स्त्रिया यांच्यासाठी राखून ठेवल्या पाहिजेत. दलितांचे आणि पीडितांचे हाल पाहून करुणावान् माणसाच्या अंतःकरणात जी तीव्र प्रक्षोभाची संवेदना उठते तिलाच लोहियांनी क्रोध ही संज्ञा दिली असली पाहिजे. हा क्रोध जर करुणेच्या पोटी निपजला असेल तरच तो श्रीरामाच्या शीलाला अनुसरून मर्यादेत राहील. सहृदय माणसाला अन्यायाची चीड येणे स्वाभाविक आहे. अन्याय व जुलूम होत असताना मूग गिळून बसणे म्हणजे काही शांती नव्हे. पौराणिक स्त्रियांपैकी लोहियांच्या आदराला पात्र झालेल्या द्रौपदीने अशा अमर्षशून्य बत्थडपणाचा मोठ्या कठोर शब्दांत निषेध केला आहे. म्हणून अन्याय व छळ होत असताना ज्याच्या हृदयात खळबळ माजत नाही तो मनुष्य कसला? अशा वेळी प्रतिकार हा मर्दुमकीचाच नव्हे, तर माणुसकीचाही धर्मच आहे. त्या प्रतिकारात अंतःकरणाच्या ज्या तीव्र भावनेने उत्कटता व वेग येतो तिला क्रोध असे येथे म्हटले आहे. हा क्रोध करुणाजन्य नसला, तर विश्वकल्याणकारी ठरणार नाही. नीलकंठाने त्रिभुवनाच्या कल्याणाकरिता हलाहल प्राशन केले. त्याचा कंठ निळा झाला. पण पुष्पदंत गंधर्व म्हणतो, की त्यामुळे शिवाच्या विभूतीची शोभाच वाढली. 'विकारोऽपि श्लाघ्यो भुवनभयभंग-व्यसनिनः।' विश्वात व्यापलेले भय नाहीसे करणे हेच ज्यांचे व्यसन त्यांचा विकारदेखील श्लाघ्य आहे. परंतु हा विकार करुणामूलक असला तरच वरदान ठरेल. क्रोध आणि कारुण्य यांचे संतुलन सांभाळणे म्हणजे असिरधाराव्रतच आहे. दोन महिन्यांचा बेकायदेशीर बंदिवास सोसावा लागल्यानंतर लोहियांनी सहज नम्रतेने वार्ताहरांजवळ अशी कबुली दिली की दोन महिन्यांच्या बेकायदा तुरुंगवासामुळे मी संतापाने होरपळून गेलो

आहे. माझ्या मनातील क्रोध आणि करुणा यांचे संतुलन ढळले आहे.

असे असताही त्यांना साम्यवादी क्रांती नको आहे. समाजवाद तिरस्काराचे आणि द्वेषाचे रूप घेऊ शकतो, प्रखर क्रोधाचे वा करुणेचे घेत नाही, अशी त्यांनी तक्रार केली आहे. म्हणून आम्हाला क्रोध आणि करुणेने भरलेली क्रांती अभिप्रेत आहे, घृणा आणि स्पर्धायुक्त क्रांती नको आहे असा त्यांचा बाणा आहे. साम्यवाद = समाजवाद – लोकशाही + केंद्रीकरण + गृहयुद्ध + रशिया असे समीकरण मांडून मानवी संस्कृतीच्या दृष्टीने हेन्री फोर्ड व जोसेफ स्टालीन दोघेही सारखेच अप्रस्तुत आहेत. म्हणून साम्यवाद व पूंजीवाद यांचा आम्ही पराभव करू असा संकल्प त्यांनी जाहीर केला आहे. अहिंसात्मक क्रांतीत अहिंसेइतकेच महत्व क्रांतीला आहे, असे लोहिया आवर्जुन म्हणतात आणि त्या क्रांतीच्या साधनाविषयी व्होट की गोळी असा प्रश्न केला असता सत्याग्रह की गोळी असा उत्तरादाखल प्रतिप्रश्न ते करतात. याचाच अर्थ असा की, प्रतिकारात क्रोध व कारुण्य यांचे सामंजस्य न साधल्यास अनर्थ होण्याचा संभव आहे. लोहियांच्या प्रक्रियेला शिवाच्या विभूतीतील अखंड मांगल्य, श्रीकृष्णाच्या विभूतीतील अनासक्त कौशल्य आणि श्रीरामाच्या विभूतीतील मनोज्ञ आत्ममर्यादा या तिन्हींची अपेक्षा आहे.

मानवीय सहानुभूती, अदम्य प्रतिकारप्रवृत्ती, राष्ट्रनिरपेक्ष लोकनिष्ठा, स्वयंप्रज्ञा आणि अविरत कर्मशीलता या पांच तत्त्वांनी लोहियांचा पिंड संपन्न झालेला आहे. त्यात अकुंठित प्रतिभा व तर्ककर्कश वादपटुता यांची भर पडल्यामुळे त्याला सप्तधातूंच्या पुतळ्याचे स्वरूप आलेले आहे. प्रतिभा व मौलिकता यांच्या बाबतीत लोहियांना मानवेंद्रनाथ रॉय, विनोबा व जयप्रकाश यांच्या पंक्तीला बसवता येईल. येथे तुलनेचा प्रश्न नाही. माझी

भूमिका समीक्षकाची किंवा टीकाकाराची नाही. सामान्य माणसाची गुणग्राही भूमिका आहे. थोर माणसांचा दाखला देण्यापुरताच येथे या व्यक्तींच्या नावांचा उल्लेख केला आहे. मार्क्सोत्तर क्रांतीच्या विज्ञानात व समाजशास्त्रात मानवेंद्रनाथ रॉय यांनी कौतुकास्पद भर घातली आहे. त्यांच्या नवमानवतावादाने व अभिनव क्रांतितंत्राने अनेक बुद्धिमंतांना भारून टाकले. विनोबांनी आर्थिक क्षेत्रात अहिंसेच्या क्रांतितंत्राचे अपूर्व प्रयोग केले. सत्याग्रहाच्या विचारात अमूल्य भर घातली. जयप्रकाशांनी समाजवादाचे विकसित स्वरूप सर्वोदयाच्या रूपाने कसे आविर्भूत झाले याची तर्कशुद्ध मीमांसा केली. लोहिया म्हणतात, आमच्या युगात फक्त दोनच विचार पुढे आले–गांधी आणि अणुशक्ती. गेल्या सहाशे वर्षांत जगात गांधींच्या तोडीचा दुसरा थोर पुरुष झाला नाही, या शब्दांत गांधींविषयीची आपली श्रद्धा व्यक्त केल्यानंतर ते आत्मप्रत्ययपूर्वक असेही सांगतात की, मी मार्क्सवादी नाही किंवा मार्क्सवादाचा विरोधकही नाही. त्याचप्रमाणे मी गांधीवादी नाही किंवा गांधीवादाचा विरोधकही नाही. स्वतः मार्क्स किंवा गांधी कुठे मार्क्सवादी अगर गांधीवादी होते? लोहिया लोहियाच आहेत आणि म्हणूनच त्यांना महत्त्व आहे. पंचमढीचा प्रबंध जेव्हा त्यांनी आपल्या सहयोगी मित्रांपुढे मांडला, तेव्हा समाजवादाच्या त्या नवदर्शनाचे जयप्रकाश यांनी एक महान् विचारयज्ञ या शब्दात वर्णन केले आणि पुन्हा एका प्रसंगी जयप्रकाशांनीच पंचमढीच्या त्या प्रबंधाचे वर्णन 'नवविचारांची ही अभिजात सृष्टी' असे केले. या देशात वर उल्लेखिलेल्या तीन महान् व्यक्तींखेरीज राजाजी व आचार्य कृपलानी याही दोन व्यक्ती सर्वतंत्र स्वतंत्र आहेत. कुठल्याही संघटनेत, संस्थेत, संप्रदायात अगर पक्षात त्यांचे व्यक्तिमत्व मावणे शक्य नाही. त्यांच्या व्यक्तिमत्वाला आवाराचे व सीमांचे वावडे आहे. लोहियांचे व्यक्तित्व त्याच जातीचे आहे. विश्वनागरिकत्व व

विश्वसरकार ही त्यांची स्वप्ने नव्हेत, ही त्यांची व्यावहारिक आकांक्षा आहे. जगातील समाजवाद्यांनी विश्वमन आणि विश्व-दृष्टिकोण यांचा स्वीकार केला पाहिजे, अशी त्यांनी मागणी केली आहे. आपल्या अभीष्ट क्रांतितंत्राला अनुरूप अशी त्यांनी इतिहासाची अभिनव मीमांसा केली आहे. अखिल मानवीय संघटनेची प्रमेये आणि गोऱ्या व बिनगोऱ्या लोकांच्या परस्पर-व्यवहाराचे निकष त्यांनी वेळोवेळी विचारप्रवर्तक सूत्रांत मांडले आहेत. त्यांची पुस्तके व 'मनकाईंड'मधील त्यांचे लेख मला अत्यंत उद्‌बोधक व रोचक वाटले, इंग्रजी भाषेवरील त्यांचे प्रभुत्व विलक्षण आहे. मी काही भाषाकोविद नाही, पण त्यांच्या इंग्रजीच्या मानाने त्यांचे हिंदी कमी संपन्न व कमी रुचिर वाटले एवढे मात्र खरे. सर्वतंत्र स्वतंत्र या शब्दात दोन्ही अर्थांनी लोहिया हे सर्वतंत्र स्वतंत्र आहेत. सर्वशास्त्र पारंगत असा त्या शब्दाचा एक अर्थ आहे. सर्व शास्त्रात आपल्या प्रयोजनापुरती गती असा त्याचा मर्यादित अर्थ मी करतो. कुठल्याही तंत्राचा किंवा संविधानाचा लगाम ज्याला कह्यात ठेवू शकत नाही तो सर्वतंत्र स्वतंत्र असा त्या शब्दाचा दुसरा अर्थ आहे. ह्या दोन्ही अर्थांनी लोहिया सर्वतंत्र स्वतंत्र आहेत. ते आत्मप्रामाण्यवादी आहेत. म्हणून त्यांनी एके वेळी 'प्रसोपाने पक्षहित व राष्ट्रहित यांत भेद आहे असे मानण्याचे कारण नाही.' हा सल्ला कितीही गंभीरपणे दिला असला, तरी प्रसंग आला म्हणजे पक्षाची बंधने ताडकन् तोडून 'स्वस्य च प्रियमात्मनः' या न्यायाने वागू लागतात. आपल्या पक्षबांधवांसमोर त्यांच्या लहानमोठ्या दोषांचे मोठे विदारक आविष्करण त्यांनी केलेले आहे. कोचीन राज्याच्या पट्टम् थानु पिल्ले सरकारने जेव्हा गोळीबार केला तेव्हा लोहियांनी जे नैतिक शौर्य दाखविले तसे या देशातील थोराहून थोर गांधीवाद्यांनीही दाखविले नाही. स्वपक्षाच्या सरकारने केलेल्या गोळीबाराचा कडक शब्दांत निषेध करून त्यांनी त्या सरकारच्या

राजीनाम्याची मागणी केली होती. त्या उदात्त प्रसंगी आचार्य कृपलानींनी गांधीजींचे सिद्धान्त लोहिया व्यवहारात चरितार्थ करताना एक पाऊल पुढे टाकीत आहेत, अशा अर्थाचे गौरवपर उद्‌गार काढले होते. राजाजी व लोहिया यांनी पक्षस्थापनेचा उपक्रम का करावा हे अल्पमती, अप्रबुद्ध, सामान्य माणसाला एक कोडेंच आहे: त्यात लोहियांचा विश्वलोकसभा हा आदर्श आहे, विश्वनागरिकत्व हे ब्रीद आहे आणि विश्वलोकसभेच्या स्थापनेकरिता आपल्या सरकारच्या विरुद्ध अहिंसात्मक सत्याग्रह करण्याचा सुप्रसंग आपणास लाभावा अशी आकांक्षा आहे. त्यामुळे घरकुले बांधण्याचा त्यांचा हा हव्यास त्यांना फारसा मानवण्यासारखा नाही.

माझे व लोहियांचे एक सामान्य मित्र नेहमी मला सांगत असतात, 'हे बघा, या ससंध देशात दोनच शाबूत डोक्याची माणसे आहेत : एक मी आणि दुसरा लोहिया.' अप्रतिहत कल्पनावैभव, अद्‌भुत मौलिकता व विक्षिप्तपणा किंवा निरपवाद आत्मप्रामाण्य व तऱ्हेवाईकपणा यांच्यामधील सीमारेषा अत्यंत अस्पष्ट आहेत, असे एक सुभाषित आहे. ते सिद्ध करण्याकरिता लोहियांच्या आवडत्या बर्नार्ड शॉने आपल्या एका नाटकाच्या प्रस्तावनेत येशू ख्रिस्तासकट अनेक भल्या भल्या प्रतिभावंतांचे मनोविश्लेषण केले आहे. लोहियांना आपल्या काही जुन्या सोबत्यांच्या बाबतीत त्यांचे डोके शाबूत नसल्याची जशी शंका येते तशीच त्यांच्या काही जुन्या सोबत्यांना लोहियांच्या बाबतीत येते. पण भल्या-भल्यांच्या या वादात निवाडा देण्याचा आपला अधिकार नाही. विनोदाचा भाग सोडून दिला तरी, लोहियांनी प्रतिपादन केलेली काही प्रमेये आणि त्यांच्या मनातून निष्पन्न झालेले काही सिद्धान्त कधी परस्परविरोधी किंवा लोकविलक्षण भासले तरी विचार-प्रवर्तक व मननीय आहेत हे खरे. परिस्थित्यनुरूप त्यांच्या वर्तनात

व धोरणात अनेकदा जी विसंगती दिसून येते त्यामुळे अनेकदा त्यांच्याविषयी गैरसमज होतो. जो मोठा झाला त्याच्याबद्दल गैरसमज व्हायचाच, असे एका तत्त्वज्ञान्याचे प्रसिद्ध वचन आहे. ते काही प्रमाणात लोहियांनाही लागू आहे. व्हॉल्टेअरविषयी लिहिताना मोर्लेने एका ठिकाणी म्हटले आहे की, सौम्य, मधुर युक्तिवादाने मूठभर माणसांचीच मने वळवता येतात. लोकसमूह हलवून सोडायला आत्यंतिकता लागते. त्यामुळे रान उठविण्याकरिता ज्या भाषेचा लोहिया प्रयोग करतात ती भाषा प्रगल्भ नागरिकाला खटकते. म्हणून गैरसमाजाला अधिक वाव मिळतो.

प्रसंगानुरूप लोहियांच्या मनात व धोरणांत वेळोवेळी जे परिवर्तन झाले त्याचा येथे विचार करण्याचे कारण नाही. युद्धविरोध व निःशस्त्रीकरण आणि सत्याग्रहात हिंसेचा निषेध ही लोहियांच्या मूलभूत नीतीची ध्रुवतत्त्वे मानली पाहिजेत. त्याचप्रमाणे जागतिक लोकसभा व विश्वनागरिकत्व हे त्यांच्या वृत्तीचे स्थिर भाव आहेत. परंतु प्रसंगोपात्त त्यांनी सक्तीच्या लष्करभरतीचेही प्रतिपादन केलेले आढळते. विरोधी पक्षांची संयुक्त आघाडी उभारणे म्हणजे राजकीय चांचेगिरीला संधी देणे होय, असे ज्या लोहियांनी एके वेळी प्रतिपादन केले, त्याच लोहियांनी, 'रथ्याचर्पटविरचितकंथः पुण्यापुण्यविवर्जितपंथः' अशा संयुक्त आघाड्यांचे हिरीरीने पुढे समर्थन केले आणि दक्षिणपंथियांचे अग्रणी मिनू मसानी यांना पंतप्रधानपद देण्यात यावे असे सुचविले. तेव्हा कालानुरूप व प्रसंगानुरूप बदलणाऱ्या तात्पुरत्या धोरणांचा विचार बाजूला सारून आपण इतस्ततः विखुरलेल्या त्यांच्या राष्ट्रीय व परराष्ट्रीय नीतिविषयक सुभाषितांचा संग्रह करू या. वानगीदाखल येथे काही देत आहे.

'व्यक्तीची उपेक्षा करून तो (मार्क्सवाद) परिस्थितीला अधिक महत्त्व देतो. मानवाची उपेक्षा आणि मानवतेचे प्रेम

शिकवणाऱ्या या निर्गुण सिद्धान्तापायी क्रूर हुकूमशाहीला प्रोत्साहन मिळते.'

'स्वदेशात रशियावादी आणि परदेशी व्यवहारात अमेरिकावादी, हाच सिद्धान्त गौरेतर राष्ट्रांना, विशेषतः भारताला उपयोगी पडेल.'

'रोम ते होनोलुलूपर्यन्त पसरलेली अशी एक आणि टोकिओ ते काहिरापर्यंत दुसरी–अशा दोन दुनिया आहेत.'

'यंत्रोत्पादनाचे नवे तंत्र आणि त्याच्याशी सुसंगत अशी मालकी हक्काची नवी पद्धती शोधावी लागेल.'

'प्रत्येक क्षण महाकालप्रवाहात एक दुवा आहे; पण तो स्वतःदेखील शाश्वत आहे. क्षणाचे हे द्विविध रूप विसरल्यामुळेच भौतिक व आध्यात्मिक असे खोटे द्वंद्व निर्माण झाले आहे.'

'रचनेशिवाय संघर्ष म्हणजे क्रियापदाशिवायचे वाक्य होय.'

'संत (गांधीवादी) बिघडले तर ढोंगी होतात आणि ऋषि (मार्क्सवादी) बिघडले तर क्रूर होतात.'

'आमच्या राजकारणातील पेचप्रसंगांचे मुख्य कारण सिद्धान्ताला सगुण रूप दिले जात नाही हेच आहे.'

'मन बदलले की राजकारणाचा पाया बदलेल आणि मग देश बदलेल. डावपेच लढवून काय देश बदलणार आहे? जो लांबचा वाटतोय तोच जवळचा रस्ता आहे. जवळची पायवाटच खरे म्हणजे लांबची आहे. पायवाट म्हणजे वाळवंटातील मृगजळ.'

आता याच संदर्भात हे गंमतीचे प्रमेय बघा. 'सत्ताप्राप्तीची इच्छा ही राजकीय पक्षाची मोठी कसोटी आहे.

सत्ताकांक्षा लपविण्याचा प्रयत्न करणे आणि सत्ता हे पाप मानण ही गोष्ट राजकीय पक्षाच्या अस्तित्वाच्या विरुद्धच आहे. मात्र आपली सत्ताकांक्षा असत्य, धोकेबाजी यांपासून दूर ठेवणे आवश्यक आहे.'

ही सारीच सूत्रे व त्यातील प्रमेये सर्वांना मान्य होतील असे नाही. पण ती विचारप्रवर्तक मात्र अवश्य वाटतील. संत आणि ऋषि भ्रष्ट झाले तर त्यांचे काय होते हे ज्याप्रमाणे परखड भाषेत लोहियांनी मांडले, त्याचप्रमाणे सत्ताकांक्षी भ्रष्ट झाला तर काय होते याचाही निर्देश केला असता तर सद्य:स्थितीत तो मोठा उद्‌बोधक ठरला असता. लोहियांची चौखम्भा राज्याची कल्पना व त्यांचा समान पृथकत्वाचा सिद्धान्त सर्वविदित असल्यामुळे त्याचा उल्लेख मुद्दामच केला नाही.

१९३३ ते ४१ पर्यंत लोहियांची व माझी भेट जमनालालजी व गांधीजी यांच्याकडे लोहिया येत असल्यामुळे वारंवार होत असे. बहुतेक दरेक वेळी त्यांचे अतिथ्य करण्याचा मान आम्हालाच मिळत असे. त्या अवधीत त्यांचे निर्व्याज प्रेम व निरुपाधिक मोकळेपणा यांचाच प्रत्यय मला आला.

एका अमेरिकन गृहस्थाने लोहियांना प्रश्न केला असता त्यांनी उत्तर दिले होते, 'माझ्या आयुष्यात दोन माणसांनी माझ्यावर प्रभाव पाडला आहे. मी इतकेच म्हणू शकतो की, नेहरूंचा स्वभाव फारच सहृदय आहे.' 'दोन माणसे' हा शब्दप्रयोग गांधी व नेहरू यांना अनुलक्षून केलेला आहे. खुद्द माझ्याजवळ लोहिया स्वत: एकदा असे म्हणाले होते की, या देशात फक्त दीडच माणसे आहेत, संबंध माणूस म्हणजे गांधी आणि पन्नास टक्के माणूस म्हणजे जवाहरलाल.'

# रवींद्रदर्शन

रवींद्रदर्शन या मथळ्याचे अर्थ दोन. एक रवींद्रांचे दर्शन, म्हणजे रवींद्रांना जीवन व जग कसे दिसत असे ते. दुसरा, माझे रवींद्रांचे दर्शन, अर्थात रवींद्रांकडे पाहण्याची माझी दृष्टी ! आजचा काळ हा विशिष्ट दृष्टिकोणांचा काळ आहे. जिकडे तिकडे तज्ज्ञांच्या शास्त्रीय दृष्टीची प्रतिष्ठा आहे. असामान्याचेच कौतुक आहे. सामान्याला जीवनात जागाच नाही, जणू ! त्यामुळे सामान्यच असामान्य होऊन बसले आहे. माझी दृष्टी सामान्य माणसाची आहे. ' तुला रवि ठाकुरांविषयी बोलण्याचा अधिकार काय ? ' या प्रश्नाला माझे उत्तर असे की, मला वाङ्मय कळत नसले तरी एक सामान्य माणूस या नात्याने मी पुस्तके वाचतो आणि त्या पुस्तकांचे माझ्या मनावर ठसेही उमटतात. त्यामुळे ' रवींद्र वाङ्मय मीमांसा ' करण्याचा अधिकार मला नसला तरी रवींद्रांचे वाङ्मय वाचल्यानंतर माझ्या मनावर त्याचा काय संस्कार झाला, हे सांगण्याचा अधिकार मला आहे. आणि

साहित्यिकांचे वाङ्मय विवेचन मला कळत नसल्यामुळे माझ्या त्या अधिकाराला आणखीच बळकटी येते. एवढा अधिकारवाद पुरे.

मी हा अधिकारवाद उगीच गंमत म्हणून केला नाही. तो सहेतुक आहे. मानवनिष्ठा, सामान्य माणसावरील निस्सीम विश्वास, हे मी थोर कवींचे वैशिष्टय मानतो. जुन्या भाषेत कवी हा 'आस्तिक' असतो. त्याला मानवमात्राच्या एकतेचे व दिव्यतेचे दर्शन झालेले असते. नर आणि नारायण यांचे ऐक्य त्याच्या अनुभवाला आलेले असते. ज्या सामान्यजनाची उपासना लोकसत्तावादी लोकमान्यांनी 'जनतात्मा' म्हणून केली, सेवाव्रतधारी साम्ययोगी गांधींनी ज्याला आपल्या दरिद्रीनारायणाच्या रूपाने आपले सेव्य दैवत मानिले, तोच ज्ञानदेवांच्या काव्यप्रतिभेला 'विश्वात्म्या'च्या स्वरूपात दिसला आणि तोच रवि ठाकुरांच्या काव्य-दृष्टीला 'मानुषेर नारायणाच्या'–'नराच्या नारायणाच्या' रूपात दिसला. त्यामुळे मी रवींद्राला विश्वात्म्याचा एकनिष्ठ वैतालिकही म्हटले आहे.

आज वैशिष्टयांचे अवास्तव स्तोम माजले असल्यामुळे व्यावर्तक दृष्टीला भलतेच व भयावह महत्त्व आलेले आहे. विज्ञान व कला, शास्त्र व भावना, यांच्यात विरोध कल्पिण्यात आला आहे. त्यामुळे भावनाशून्य, निष्ठूर विज्ञानसंहारपटुत्वात जीवित साफल्याचे समाधान अनुभवीत आहे; आणि अवैज्ञानिक भावना निष्क्रीय आणि दुबळी होऊन बसली आहे. या दोन्हींचा समन्वय करणे हा आमचा आजचा सांस्कृतिक प्रश्न आहे, असे मला वाटते.

हे समन्वयात्मक दर्शन रवि ठाकुरांच्या काव्यात आणि एकंदर वाङ्मयात आढळून येते, असे मला वाटते. मानवनिष्ठा हा त्यांच्या साहित्याचा आत्मा आहे आणि म्हणून जे मागासलेले

असतील, पददलित असतील, दीनदुबळे असतील त्यांच्या ठिकाणी, म्हणजे त्यांच्या अंत:करणाच्या देव्हाऱ्यात दडून बसलेल्या ईश्वराचे आवाहन करण्याचा प्रयत्न त्यांच्या काव्यात पदोपदी आढळून येतो. ज्यांनी माणुसकीचा उपमर्द केला, त्यांनी ईश्वराचाही अपमान केला. त्यांच्यासारखे नास्तिक व धर्मद्रोही दुनियेत दुसरे नाहीत, असे त्यांनी खडखडीतपणे सांगितले आहे :

मानुषेर परशेरे प्रतिदिन
ठेकानिया दूरे ।
घृणा करियाछ तुमि
मानुषेर प्राणेर ठाकुरे ।

शतेक शताब्दि धरे
नामे शिरे, असम्मान भार
मानुषेर नारायणे तब ओ
करो ना नमस्कार ।

नेमे छे धूलार तले
हो नो पतितेर भगवान्
अपमाने होते हवे शे था
तोरे सबार समान ।

या शब्दांनी त्यांनी अपमानित, दलित व उपेक्षित जनतेची उपासना करण्याचा वरिष्ठ वर्गाला, म्हणजे कष्टावाचून विश्रांतीचा भोग करणाऱ्या वर्गाला संदेश दिलेला आहे. या वर्गाला 'लेझर्ड क्लास' म्हणजे 'फुरसतवाला वर्ग' असेही म्हणण्याची पद्धत आहे. रविबाबूंनी आपल्या नेहमीच्या वैभवशाली भाषेत त्याला 'अवकाशभोगी' असे नाव दिले. अवकाश म्हणजे उभय अर्थांनी रिकामपण हाच ज्याचा भोग त्याला अस्तिकतेचा

धडा द्यावयाचा तर दलित मानवाच्या उपासनेपासूनच सुरुवात करायला हवी. म्हणून रवींद्र आम्हाला निक्षून सांगतात, 'अरे, डोळे उघडून पहा, देवळात देव राहिलेला नाही.'

येथाय थाके सबार अधमं दीनेर हत दीन
सेई खाने जे चरण तोमार राजे
सबार पीछे सबार नीचे
सब हारादेर माझे

जेथे सगळ्यात अधम, दीनाहून दीन असे लोक बसतात तेथे, हे देवा, त्या मागासलेल्या, सगळ्यांत खालच्या थरातल्या, सर्वस्वाला पारख्या झालेल्या, लोकांत तुझे चरण विराजमान आहेत.

हा जो मानवात्मरूपी भगवान तोच कवित्रयींचे आराध्य दैवत होय. तोच त्यांचा प्रियकर. सृष्टीच्या अद्‌भुत सौंदर्यात त्यांना त्याचेच सौंदर्य व्यक्त झालेले दिसते. एकांतात, अंतः-करणाच्या खोल गाभाऱ्यात त्यांच्या हृदयतंत्रीची तार तोच छेडतो आणि त्यांना बेचैन करून सोडतो.

गुंजरिया गुंजरिया प्राण उठिल पुरे
जानि ना कौनि विपुल बानी बाजे व्याकुल सुरे
कौन वेदनाय जानि नारे हृदयभरा अश्रुभरे

अशी सारखी तळमळ आणि उत्कंठा त्यांच्या काव्यात दिसून येते. मानवात्म्याच्या दर्शनाची ही अनंत तळमळ रवि ठाकुरांच्या काव्याचे असाधारण आकर्षण आहे. सृष्टी जेव्हा सौंदर्याने नटलेली असते, त्यावेळी आपला हृदयवल्लभ विश्वात्मा आता यायला निघाला आहे, असा त्यांना भास होतो.

शिउलि तलार पाशे पाशे
झरा फुलेर राशे राशे

शिशिर–भेजा घासे घासे
अरुण–रांगा चरणफेले
नयन–भूलानो एले

माझ्या डोळ्यांना मोहिनी घालणारा तो झाडाखाली विखुरलेल्या फुलांवरून, दंवाने ओथंबलेल्या गवतावरून, आपली रक्तकमलासारखी पावले टाकीत येत आहे, असे दर्शन कविवर्यांना होते. त्यामुळे कवीच्या त्या प्रेममय दृष्टीला भगवंताची ही सगळी सृष्टी दिव्य, भद्र आणि सुंदर दिसू लागते. सृष्टीवर आक्रमण करून तिला आपल्या सुखाची दासी बनवायची का तिच्याशी सख्य करून तिच्याशी समरसतेचे व सहयोगाचे अद्‌भुत सुख अनुभवावयाचे, हा प्रश्नच त्यांच्यासमोर उभा रहात नाही.

कालिदासाची शकुंतला भूषणप्रिय आहे तिला नटण्यासजण्याची हौस आहे तिच्या ठिकाणी वैराग्याची रुक्षता किंवा अरसिकता नाही. पण असे असूनही कण्व तिच्याविषयी म्हणतो :

नादत्ते प्रियमण्डनाऽपि भवतां स्नेहेन या पल्लवम् ।

प्रियमंडना असूनही झाडाचे पान तोडावे असे तिच्या कोमल हृदयाला वाटत नाही. यात तुळशीचे पान तोडण्याची केवळ धार्मिक भावना नाही. त्याचप्रमाणे सारी गुलाबाची फुले कुस्करून त्याचा गुलकंद करून खाण्याची अरसिक भोगवृत्तीही नाही. जीवमात्राविषयीची हळुवार आत्मीयता आहे. सृष्टीविषयीची ही आत्मीयता म्हणजे आस्तिकतेचे दुसरे कलम. विज्ञान म्हणते सृष्टीवर विजय मिळवा. प्रतिसृष्टी निर्माण करा. विज्ञानाच्या या विश्वामित्री अहंकारापेक्षा सृष्टीशी समरस होऊन तिला आपली सखी व सहयोगिनी बनविण्याची कवीची दृष्टी अधिक सरस व मनोज्ञ नाही असे कोण म्हणेल? आहे त्या सृष्टीत ज्याला सर्वत्र मांगल्याचे दर्शन होते तो कवी, तो क्रांतदर्शी आणि

तोच क्रांतीचा द्रष्टा. त्याला अमंगल, अशुचि, असुंदर असे काही दिसतच नाही.

The poet gathers fruit from every tree
Yea, figs from thorns and grapes from thistles he
Touched by his hand the meanest weed that grows
Towers to a lily, reddens to a rose !!

असे कवीच्या करामतीचे वर्णन एका इंग्रज कवीने केले आहे ते किती यथार्थ आहे ! ज्याच्या सौंदर्योपासक दृष्टीला सौंदर्याच्या नित्यध्यासामुळेच असुंदरातही सौंदर्याची बीजे दडलेली दिसतात, दुर्जनांच्या हृदयातही लपून बसलेल्या सज्जनतेचे दर्शन होते आणि सैतानाच्या हृदयातील ईश्वराचा साक्षात्कार होतो तो दिव्यदर्शी कवीच खरा आस्तिक, तोच मानवनिष्ठ—जुन्या भाषेत ब्रह्मनिष्ठ ! ब्रह्मनिष्ठाचे वर्णन करताना आचार्यांनी 'तो आपल्या योगसिद्धीच्या बळावर विद्यमान सृष्टीचे रूप बदलवून टाकतो' असे कोठेच म्हटलेले नाही; 'त्याला सर्वत्र दिव्यता दिसते' असे म्हटलेले आहे. हे जे सुदर्शन, शुभदर्शन सर्वतो भद्रदर्शन ते हृदयाच्या व जीवनातल्या गोडीतून प्रकट होते. ही शुभदृष्टी सज्जनाचे वैशिष्टय आहे. वाल्मीकीने थोर स्त्रियांचे वर्णन करताना ठिकठिकाणी शुभदर्शना असे विशेषण दिले आहे. काही अरसिक टीकाकारांनी त्याचा अर्थ सुंदर दिसणारी असा केला आहे. सुंदर पाहणारी असा अर्थ मला करावासा वाटतो. जिचे दर्शन, म्हणजे रूप शुभ आहे, हा अर्थ टाकून देण्याचे कारण नाही, पण त्यापेक्षा जिचे दर्शन म्हणजे डोळे शुभ आहेत असा अर्थ अधिक जवळचा वाटतो. आणि जिचे दर्शन म्हणजे पाहणे किंवा दृष्टी शुभ आहे हा अर्थ सगळ्यात समर्पक वाटतो. जो शुभ असतो त्याला शोभनीयता दिसते. त्यामुळे ब्रह्मनिष्ठाचे वर्णन करताना आचार्य म्हणतात, त्यांच्या दृष्टीला :

संपूर्ण जगदेव नन्दनवनं सर्वेपि कल्पद्रुमाः।
गांगंवारि समस्तवारिनिवहः पुण्याः समस्ता क्रियाः॥
वाचः प्राकृतसंस्कृताः श्रुतिशिरो वाराणसी मेदिनी–

दिसू लागते. हे सर्वतो भद्रदर्शन आपल्याला रवि ठाकुरांच्या काव्यात दिसून येते. त्याचाच ठसा त्यांच्या राष्ट्रधर्मावर आणि समाजधर्मावरही स्पष्टपणे उमटलेला आढळून येतो. म्हणूनच आधुनिक भारतात रवींद्र हा पहिला आंतरप्रांतीय कवी झाला व या देशाच्या इतिहासात पहिला आंतरराष्ट्रीय कवी झाला.

सृष्टीतून व जीवनातून ज्ञानच नव्हे, तर आनंद शोधून घेण्याची अलौकिक शक्ती रविबाबूंच्या ठिकाणी होती. रसिकता तीहीच. सृष्टीतून ज्ञान ग्रहण करण्याची शक्ती शास्त्री व विद्यार्थी यांचे वैशिष्टच होय. पण कवीला सृष्टीतून फक्त ज्ञान संपादन करून संतोष वाटत नाही. जीवनातून व सृष्टीतून प्रसाद म्हणजे प्रसन्नता मिळविल्यानेच तो कृतार्थ होतो. केवळ 'दगडावर प्रवचने' 'झाडांना जिभा', 'निर्झरात पुस्तके' पाहून त्याला समाधान वाटत नाही. तर त्यांच्या जोडीला सर्व वस्तूंत चांगले–सर्व मांगल्य–पहाण्याचे सामर्थ्यही त्याला हवे असते. किंबहुना हेच त्याचे वैशिष्टच म्हणता येईल. प्रसादाकांक्षी रवि ठाकूर म्हणतात.

Let whose wil, with shut and brooding eyes
If earth be real or more drem surmise !
Meanwhile let me with thirsty vision drink
Its beauty, ere my sun of life shall sink.

कवींचे ज्ञान, विज्ञान, त्याचे व्यावहारिक शहाणपण या उक्तीत साठविले आहे.

रवींद्रांचा राष्ट्रधर्मही त्यांच्या या व्यापक मानवनिष्ठेचे अपत्य आहे. आमचे राष्ट्र हा आमचा किल्ला नाही. ती आम्ही

आपल्याच सुखाकरिता राखून ठेवलेली 'भोगभूमी' नाही. मानवदेवतेच्या उपासनेकरिता आम्हाला प्राप्त झालेली ती यज्ञभूमी आहे. आमचे घर हे आमचे राऊळ असेल, पण ते मुख्यत्वेकरून आमचे देऊळ आहे. म्हणून भारतीय राष्ट्राचे दर्शन रवि ठाकुरांना विश्वभारतीच्या पवित्र मंदिराच्या स्वरूपात झाले. त्याला त्यांनी 'महा मानवेर सागर' म्हणून गौरविले. येथे मानवाचे संमेलन होईल, संस्कृतीचा समन्वय होईल, धर्मांचे सहानुष्ठान होईल, राज्यांच्या व राष्ट्रांच्या अव्यक्त सीमा येथील सहराष्ट्रीत्वाच्या व विश्वराष्ट्रीयत्वाच्या भावनेत विलीन होऊन जातील आणि मग क्रांतीकारकांच्या 'राष्ट्रांच्या सीमा पुसून काढण्या'च्या ('वाइप आऊट स्टेट-बाऊंडरीज्'च्या) आदर्शाला चिरस्थायी व वास्तविक अधिष्ठान लाभेल. रवींद्रांची विशाल व बृहत्तर भारताची कल्पना ही अशी भव्य, रम्य व स्फूर्तिदायक आहे. त्यांचा भारतवर्ष आर्यांचे स्वागत करील, अनार्यांचे करील, हिंदूंचे करील, मुसलमानांचे करील, एवढेच नव्हे तर इंग्रजांचेही करील. पण समान भूमिकेवरून व समाजाच्या भावनेने म्हणून भारत-मातेच्या मंगल अभिषेकासाठी ब्राह्मणाला पाचारण करताना ते म्हणतात :

'एसो ब्राह्मण, शुचि करि मन, धरो हात सवाकार'

ब्राह्मणा तू ये, पण आपले अहंकारकलुषित चित्त शुद्ध करून समत्वाच्या भावनेने सगळ्यांचा हात धरून! ब्राह्मणाला जो इषारा तोच इंग्रजालाही. आपण 'राज्यसत्तेचे अंश' (फ्रॅगमेन्ट्स ऑफ रायल्टी) आहोत अशा ताठ्याने येणाऱ्याला या पवित्र मंदिरात मज्जाव आहे. मन शुद्ध करून आलेल्या ब्राह्मणाचे व राज्यसत्तेची मलिन वस्त्रे काढून येणाऱ्या इंग्रजांचे मात्र स्वागत होईल. अशा देशातीत व धर्मातीत राष्ट्रधर्माचा विकास करण्याची शक्ती या देशातील जनतेत आहे ही रवींद्रांची निष्ठा होती.

जनतेवरील हा विश्वासच लोकशाहीचे अधिष्ठान आहे. रवींद्रांची अशी निष्ठा होती की, भारतीय राष्ट्र ही मानवराष्ट्राची किंवा विश्वराष्ट्राची प्रतिकृती होईल. या विशाल भारताचे दर्शन त्यांच्या अंत:चक्षूला झालेले होते. भारतवर्षाला ते याच अर्थाने पुण्यभूमी मानत होते. पुण्यभूमी म्हणजे व्यापक मानवनिष्ठेच्या अनुष्ठानाची पवित्रभूमी–धर्मक्षेत्र ! !

मानवनिष्ठेला संकुचित राष्ट्राभिमानाचे वावडे आहे. मानव्यनिष्ठ राष्ट्र निर्भय असते. त्याच्या जीवनात अशत्रुत्वाची अथवा निर्वैरत्वाची भावना ओतप्रोत भरलेली असते. याच्या उलट सार्वत्रिक सावधगिरीची व सार्वत्रिक संशयाची भावना अहंनिष्ठ राष्ट्रीयत्वातून निष्पन्न होते. ती आत्मप्रत्ययशून्यतेची द्योतक आहे. तिच्यातून कड्याकुलपांचे व अभेद्य भिंताडाचे जीवन निष्पन्न होते. त्या जीवनाचे प्रतिक किल्ला ! हे तत्त्वज्ञान दुर्बलतेचे, आत्मविश्वासाच्या अभावाचे अपत्य आहे, हे सत्य क्रांतदर्शी कविवर्यांना दिसले, म्हणून त्यांनी भारतीय जनतेत आत्मप्रत्यय व आशानिष्ठा जागृत करण्याचा प्रयत्न केला. आधुनिक राष्ट्रवादाच्या नावाखाली धुडगूस घालणाऱ्या राष्ट्र-विग्रह वादावर विदारक टीका करून मानवनिष्ठ व विश्वधर्माला पोषक अशा व्यापक राष्ट्रधर्माची दीक्षा कविवर्यांनी भारतवर्षाला दिली. त्याचप्रमाणे भारतीय राष्ट्रधर्माच्या प्रतिष्ठेसाठी त्यांनी सांस्कृतिक समन्वयाची आणि धार्मिक अविरोधाची भूमिकाही तयार करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या 'घरे बाहिरे' नावाच्या कादंबरीतला गोहत्तेविषयीच्या चर्चेचा प्रसंग यादृष्टीने फार महत्त्वाचा आहे.

सांस्कृतिक समन्वयाची, सर्वधर्मसंमीलनाची व मानवतेच्या एकीकरणाची ही पुण्यभूमी म्हणजे जगाचे शांतिनिकेतन आहे आणि श्रीनिकेतनही आहे असे कवीच्या विधायक प्रतिभेला

दिसले. ज्याला जनतेच्या दुर्गुणाच्या व दुर्बलतेच्या आवरणाखाली दडलेल्या तिच्या सद्‌गुणाचे व सामर्थ्याचे दर्शन घडते, तोच तिच्यावर प्रेम करू शकतो. तिचे उद्‌बोधन करून तिचा वैतालिक बनू शकतो. तोच जनतेत प्रखर आत्मप्रत्यय, आशा-निष्ठा व तेज उत्पन्न करू शकतो. यादृष्टीने रवींद्र हे जनतानिष्ठ कवी होते.

अशा दिव्य भारतभूचे दर्शन रवींद्रांना झालेले होते म्हणूनच त्यांच्या दृष्टीने भारतवर्ष हा सुवर्णभूमीपेक्षाही पुण्यभूमी म्हणून अधिक वंदनीय व प्रिय होता. हृदयाच्या उदारतेपेक्षा मधुरता किंवा साधनसंपन्नता केव्हाही गौणच ! सोन्याच्या ताटात पंचपक्वान्नांवर ताव मारण्यापेक्षा केळीच्या पानावर साधा भातच खाऊ, पण सारे मिळून भातच खाऊ असा त्यांचा कटाक्ष होता. ‘ सह नौ भुनक्तु ’ हे पुण्यभूचे आधारभूत सूत्र ! त्यांचे ‘ स्वदेशी समाजा ’वरील लेख या वृत्तीचे द्योतक आहेत.

कवीची प्रतिभा विधायक स्वरूपाची असते म्हणून ती इतकी हृदयंगम व रमणीय असते. तो समाजाचे व सृष्टीचे सगुणरूप विवरीत असतो. त्या सुंदर ध्यानाचे भक्तिभावाने गोडवे गातो. मूलभूत तत्त्वांचे प्रतिपादनही विधायक स्वरूपात करीत असतो. विश्वात्म्याच्या रूपाचे व गुणांचे ते निरूपण व संकीर्तन असते. साधकाची भूमिका याहून वेगळी असते. त्याला तत्त्वे जगायची असतात. असुंदर, असुचि, अपथ्य टाळायचे असते. म्हणून त्याच्या प्रतिपादनात विधीइतकाच निषेधाचाही भाग असतो. विधायक उपासनेबरोबरच निषेधात्मक आचारही तो अनुसरतो. पापाशी असहकार्य करण्याकरिता तो त्यातल्या सुखप्रद व शोभनीय भासणाऱ्या अंशांचा अट्टाहासाने त्याग करतो. गांधी व गुरुदेव यांच्यात जो फरक दिसून येतो तो याचमुळे ! कवि म्हणतो, पुण्याशी समरस व्हा. साधक म्हणतो, पापापासून दूर रहा. कवि म्हणतो, जे सुंदर आहे ते सत्य व शिव कसे नसेल ?

साधक म्हणतो, जे सत्य आहे तेच शिव व सुंदरही असलेच पाहिजे. दोघांचेही म्हणणे एकच. फरक फक्त प्रतिपादनाच्या पद्धतीत आहे. निषेधावर जोर द्यावयाचा का विधानावर, एवढ्याच बाबतीत आहे. या बाबतीत गांधी व गुरुदेव यांच्यात 'मॉडर्न रिव्हयू 'मध्ये झालेला वाद उद्‌बोधक व मननीय असला तरी रवींद्रांना ज्या दिव्य राष्ट्रधर्माचे दर्शन झाले होते त्याचाच विनियोग व अनुष्ठान गांधी करीत आहेत असे म्हणायला हरकत नाही. गांधींचे दर्शनही जीवनव्यापी आहे, सार्वभौम आहे. मूलगामी आहे ! पण त्यांचा जोर विधायक ऐक्याच्या साधनेवर विशेष आहे.

महापुरुषाचे वर्णन करताना बृहस्पतीसारखा ज्ञानी, सिंहासारखा शूर, पण बालकासारखा निष्पाप म्हणण्याचा प्रघात आहे. कवीची प्रतिभाही काहीशी अशीच असते अप्रतिहत व भव्य कल्पनाशक्तीमुळे त्याचे बालमनाशी तादात्म्य झालेले असते, याची साक्ष रवींद्रांच्या वाङ्मयात पदोपदी येते 'एक होता राजा' म्हटल्याने बालाचे समाधान होते. तो कोण होता, कुठला होता वगैरे वगैरे कितीही तपशील सांगितला तरी त्यातले सत्य फक्त 'एक होता राजा' इतकेच आहे हे रहस्य बालबुद्धीला नेमके कळते. म्हणून लहान मूल त्याबाबतीत फारशी विचारपूस करीत नाही. पण राजा मेला नि त्याचे जीवन संपले ही गोष्ट मात्र मुलाच्या अकुंठीत कल्पनेला सहनच होत नाही. त्याची जीवननिष्ठा निरपवाद असते. मृत्यूचा जय त्याला रुचत नाही. आयुष्य संपले तरी जीवन उरावे असे त्याला वाटत रहाते. रिक्तता, अभाव, शून्य त्याला खपत नाही. रवींद्रांनाही मुक्तीची अभावरूप व्याख्या मान्य नाही, ते म्हणतात –

मुक्ति एई--सहजे फिरिया आस । सहजेर माझे ।
न हे कुच्छ् साधनाय क्लिष्ट कृश ।

वंचित प्राणेर आत्म अस्वीकारे।
रिक्तताय निःस्वताय, पूर्णतार प्रेतच्छवि
ध्यानकरा असम्मान जगत लक्ष्मीर॥

मुक्ती म्हणजे आत्मनिषेध नव्हे, आत्म्याचा अव्हेर नव्हे. रिक्ततेत, आत्मशून्यतेत जो पूर्णतेच्या प्रेतच्छवीचे चिंतन करतो तो जगत्‌लक्ष्मीचा, जीवनाच्या शोभेचा उपमर्द करतो. कविवर्यांना मुक्ती जीवनाच्या परिसमाप्तीत दिसत नाही. जीवनाच्या पूर्णतेत तिची अनुभूती येते. कवी जीवनमुक्त असेल किंवा नसेल, पण मुक्त जीवनाची, मृत्यूला जिंकणाऱ्या शाश्वत जीवनाची उत्कंठा त्याला लागलेली असते. तो सर्वत्र जीवन पहाण्याचा व जीवनाचा आदर करण्याचा अभ्यास करीत करीत मुक्तजीवी बनून जातो. मग त्याला--

आज आमि देखितेछि, सम्मुखे मुक्तिर पूर्ण रूप
एई वनस्पति माझे .........
कम्पमान पल्लवे पल्लवे; लाभिल मज्जार माझे
से महा आनंद जहा परिव्याप्त लोके लोकान्तरे,
विच्छुरित समीरित आकाशे
आकाशे, स्फुटोन्मुख पुष्पे पुष्पे, पाखिदेर कंठे कंठे
स्वन उत्सारित।

संन्यासीर गैरिकवसन लुकायछे तृनतले
सर्व आवर्जना ग्रासी विराट धुलाय जयमन्य मिलेगेछे
पतंग--गुंजने। --

असा अपूर्व अनुभव येतो. लोक लोकांतरांना व्यापून आसमंतात झाल्यामुळेच उन्मुक्त झालेल्या अनंत जीवनाचा प्रसाद त्याला आपल्या अंतरंगात, पल्लवापल्लवात, उमलणाऱ्या फुलाफुलात, पाखरांच्या कंठांत, स्वैरसंचार करणाऱ्या वायूत

अनुभवतता येतो. संन्याशाचे भगवे वस्त्र सृष्टीच्या हिरव्या शालूत विलीन झालेले दिसते, सारे निषेध भूमातेच्या पवित्र 'पासृत' मिसळून गेलेले दिसतात आणि सगळे जपमंत्र पतंगाच्या गुंजनाशी एकरूप झालेले दिसतात. जीवनाच्या या विश्वरूप-दर्शनालाच कवी मुक्तीचे पूर्णरूप पहाणे म्हणतो. 'आमि देखितेछि मुक्तिर पूर्णरूप !' त्याला दिव्य दृष्टी प्राप्त झाली असल्यामुळे मृत्यूच्या अलिकडे व पलिकडेच नव्हे तर मृत्यूतही जीवनाचेच दर्शन होते. तो म्हणतो –

Saith the End. "One day every thing will end
Whence, O, Beginning the Boasting is in vain."
Saith the Beginning " Nay even there. O, Friend
Where there is finish, I lift my head again."

सार्वत्रिक जीवननिष्ठेचा परिपाक म्हणजेच ही अव्यभिचारी अशी निष्ठा. मृत्यूला भिणारा म्हणतो जीवनावर मरणाचे सावट पसरलेले आहे. त्याला दोन रात्रीत एक दिवस कुचंबून जगत असलेला दिसतो. अर्धा भरलेला पेला अर्धा रिकामा दिसतो. मृत्यूतही जीवन पाहणाऱ्या दोन दिवसांच्यामध्ये एक रात्र दिसते आणि अर्धा रिकामा पेला अर्धा भरलेला दिसतो.

सहज सौंदर्य हाच खरा प्रसाद ! हृदयातील संवादित्व आणि माधुर्य जीवनात उतरते आणि सृष्टीत दिसू लागते. या प्रसादाच्या पोटी कलेचा जन्म होतो. म्हणूनच रवींद्रांना कोणी, 'तुम्ही काव्ये कशी लिहिता ?' असा प्रश्न केला असता त्यांनी उत्तर दिले, 'ते मला नाहीच सांगता यायचे.' अंत:करणात भावनांचा उद्रेक झाला म्हणजे अश्रू कसे बाहेर पडतात ते कोणाला सांगता येणार ?'

रवींद्रांच्या प्रतिभेचे हेही एक वैशिष्टच आहे. त्यांच्या काव्यात व इतर साहित्यात एक प्रकारचे अकृत्रिम सौंदर्य आहे.

एकदा कालेलकरांच्या बरोबर आम्ही काही मंडळी गुरुदेवांच्या दर्शनाला गेलो होतो. उत्तरायणाच्या आवारातील त्यांच्या कुटी-समोर जो लहानसा चौथरा आहे त्यावर एक लहानसेच पण सुबक चाफ्याचे झाड होते. त्या झाडाखाली सहज गळून पडलेल्या चाफ्याच्या फुलांचा सडा पडलेला होता. फुलांच्या मधून मधून गड्याने केर काढून चौथरा स्वच्छ केला होता, पण ती फुले मात्र व्यवस्थित लावून त्यांची रांगोळी किंवा इतर प्रकारची चित्राकृती तयार करण्याचा प्रयत्न कोणीच केला नव्हता. त्या फुलांची पृष्ठभूमी अगदी स्वच्छ होती, तिच्यावर केर नव्हता. पण ती फुले मात्र भरमसाट, जशी झाडावरून गळून पडली तशीच विखुरलेली होती. आणि तरीही किती सुंदर दिसत होती ! त्यांच्या त्या अस्ताव्यस्ततेतही व्यवस्था व हेतू दिसून येत होता. गुरुदेव ठाकुरांच्या काव्याचे व लिखाणाचेही असेच आहे. त्यांच्या शांतिनिकेतनभोवती जी घनदाट वृक्षराजी पसरलेली आहे तीत व्यवस्था व संयोजन आहे, पण वाटिकेचा रेखीव नीटनेटकेपणा नाही. तसाच जंगलाचा भरमसाट अव्यवस्थितपणाही नाही. त्यात उपवनाची सहजता व सुंदरता आहे. रवींद्रांचे जीवनदर्शन याच वळणाचे होते. आणि तेच त्यांच्या साहित्यात ठिकठिकाणी प्रकट झालेले आहे. मानवी जीवनाला यांत्रिक नियमितपणा, रेखीवपणा, सूत्रबद्धता आणि सुयंत्रितपणा प्राप्त झालेला त्यांच्या कलात्मक वृत्तीला तेवढासा रुचत नसे. यांत्रिक जीवनाच्या कठोर रेषा जणू काही त्यांच्या कोमल दृष्टीत खुपत असत. यांत्रिक नीटनेटकेपणापेक्षा थोडेसे विस्कळित का होईना परंतु जीवत आणि सहज सौंदर्य त्यांच्या मानवनिष्ठ प्रकृतीला अधिक मानवत असे ते म्हणत, ' आज कुणी अर्थवादी आहेत तर कुणी परमार्थ-त्वादी आहेत. कुणी जीवनाचा बाजार करू इच्छितात तर कुणी याला वैराग्याच्या मठाचे स्वरूप देऊ इच्छितात. माणसे

कामावाचून, मतलबावाचून किंवा हेतूवाचून एकमेकांना भेटेनाशी झाली आहेत.' या मतलबी जगाला गुरुदेव कविवर्य म्हणतात– 'मानवांनो, एकमेकांना उगिचच भेटण्याची दिव्यकला तुम्हाला केव्हा रे साधेल ? ' त्यांच्या एकंदर तत्त्वज्ञानाचे हे हृदय आहे. म्हणून त्यांच्यावर एकदा एक तत्त्वज्ञ फारच उखडला आणि म्हणाला–

"Tagore is not a philosopher. There is no philosophy about him. He is a reckless poet, now seems to be in love with life."

तत्त्वज्ञान्याचा हा संताप त्यालाच लखलाभ होवो. आम्हाला आपले असे वाटते की, जीवनप्रेम हेच उपनिषद आहे. रवि ठाकुरांच्या कलेची पृष्ठभूमी स्वच्छ व निर्दोष आहे. पण त्यांच्या कलेत कृत्रिमपणा व टापटीप आणि रेखीवपणा यांचा अभाव आहे. तिच्या सहज सुंदरतेत तिचे विशिष्ट आकर्षण आहे, आणि विशिष्ट प्रभावशीलत्वही.

सार्वत्रिक अनिष्ठेच्या व नास्तिकतेच्या या युगात कविवर्यांचे अन्त:करण आस्तिकतेकरिता तळमळत होते. आस्तिकता म्हणजे मानवनिष्ठा. तीत वैयक्तिक अहंतेला आणि राष्ट्रीय अहंतेलाही वाव नाही. अहंतेची आणि ममतेची व्याप्ती वाढविणे हेच प्रगतीचे लक्षण आहे. या विश्वतोमुखी आत्मीयतेचा विकास करण्याचा संदेश त्यांनी भारतवर्षाला दिलेला आहे. आमचा भारतवर्ष विश्वभारती होईल, सांस्कृतिक सहयोगाचे आणि विनिमयाचे केंद्र होईल; मानवांच्या सहजीवनाचे काशीक्षेत्र होईल !

कविवर्य गुरुदेवांची तक्रार आहे की, आजच्या जगात देवपूजेपेक्षा देवपूजेचे देव्हारे अधिक माजविण्यात येत आहेत. सर्वच सुधारलेल्या राष्ट्रांत मानवप्रेमापेक्षा देशाभिमानाचे

माहात्म्य विशेष मानले जाते. व्यक्ती देवासमोर आपला नैवेद्य घेऊन जाण्याऐवजी आपल्या मागण्या घेऊन जाते. त्याचप्रमाणे आजची राष्ट्रेही मानवदेवतेला आपापला नैवेद्य अर्पण करण्या-ऐवजी आपापल्या मागण्यांच्या पूर्ततेसाठीच अहमहमिकेने झटत आहेत. आज जग अशा एका आस्तिक राष्ट्राची प्रतीक्षा करीत आहे की, जे स्वत:पेक्षा मानवतेवर अधिक प्रेम करील; आणि या स्वदेशभक्त कविवर्याला अशी श्रद्धा वाटते की, ते मानवनिष्ठ, आस्तिक राष्ट्र होण्याचे भाग्य माझ्या भारतवर्षाला लाभेल.

याचि हे तो मार चरमशान्ति,
पराने तो मार परम कान्ति,

अशी 'चरम शान्ति' व 'परम कान्ति' यांची उभयविध याचना कविवर्य रवींद्रांनी गीतांजलीतील पहिल्याच गीतात केली आहे. त्यांना तेजोहीन शान्तीची चाड नाही. शान्तिहीन कान्ती-चीही अभिलाषा नाही. शान्तीने पुनीत व उज्वल झालेल्या कान्तीचीच स्पृहा आहे.

बृहद्भारताचे क्रांतदर्शी कवी, मानवतेचे जागरूक वैतालिक व विश्वभारतीचे गुरुदेव रवि ठाकुर यांचे उदात्त दर्शन हे असे आहे. ते आम्हालाही डोळस बनविणारे ठरेल का ?

# लेखसूची

- सत्यनिष्ठ ' प्रयोगी ' गांधीजी–मूळ हिंदीवरून संकलित.
- गांधींचे उत्तराधिकारी जवाहरलाल–मूळ हिंदी भाषणावरून.
  (आकाशवाणी नागपूरच्या सौजन्याने; १९६६)
- विनोबांचे अद्वितीय विभूतिमत्त्व–मूळ हिंदीवरून संकलित.
- मी पाहिलेले जयप्रकाश–मूळ हिंदीवरून.
  (' मेरी विचारयात्रा ' या जे. पीं. च्या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेतून व अन्य लेखांतून संकलित. २५ ऑ. १९७२.)
- महात्मा ज्योतीराव फुले–(म. फुले गौरवग्रंथ–जुलै १९८२)
- भारतीय अस्मितेचे प्रतिक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर.
  (लोकराज्य–डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक–१६ एप्रिल १९८१.)
- एक अद्भुत सेनापती–मूळ हिंदीवरून.
  (महाराष्ट्र मानस– सेनापती बापट विशेषांक.)
- साने गुरुजी नावाचे सत्त्व–(बालविकास मासिक.)
- अखिल भारतीय व्यक्तिमत्त्वाचे लोकनायक अणे–
  (लोकराज्य विशेषांक–जानेवारी १९८१.)
- बॅ. अभ्यंकरांची तात्त्विक भूमिका–
  (' निस्पृह ' अभ्यंकर विशेषांक– १७ फेब्रु. १९३५.)
- समन्वयाचे उद्गाते काका कालेलकर–मूळ हिंदीवरून.
  (' समन्वयके साधक '–काका कालेलकर अभिनंदन ग्रंथ, १ डिसेंबर १९७९.)
- अद्वितीय व्यक्तिमत्त्वाचे मनोहर दिवाण–मूळ हिंदीवरून
  (मनोहर दिवाण–व्यक्ति व विचार–१५ फेब्रुवारी १९८१.)

## ☆ पहाटतारे ☆

- लोकसत्तेचा नित्य जागरूक लोकपाल :
  कै. किशोरीलालभाई मशरुवाला—मूळ हिंदीवरून.
- तत्त्वनिष्ठ, व्यवहारकुशलतेची मूर्ती :
  कै. जमनालालजी बजाज—मूळ हिंदीवरून
  ('सर्वोदय' हिंदी मासिक) मार्च १९४२.)
- भारताचा सहृदय लोहपुरुष : सरदार वल्लभभाई पटेल—
  मूळ हिंदीवरून. ('सर्वोदय' हिंदी मासिक जानेवारी १९५१)
- अध्यात्मवीर कै. रविशंकर महाराज—मूळ हिंदीवरून.
  ('मैत्री' मे १९७३.)
- सप्तधातूंची मूर्ती—डॉ. राममनोहर लोहिया.
  (डॉ. राम मनोहर लोहिया—लेखिका इंदूमती केळकर.
  या पुस्तकाच्या प्रस्तावनेतून.—जून १९६७.)
- रवींद्रदर्शन—(धनुर्धारी दिवाळी अंक १९४५.)

## दादांची इतर मराठी पुस्तके

- साम्ययोगाचे मार्गावर
- क्रांतिचे पुढचे पाऊल
- क्रांतिनिष्ठा
- पाकिस्तानी प्रवृत्तीचा प्रतिकार
- आपल्या गणराज्याची घडण
- स्नेहाचे झरे
- अंतरीचे उमाळे
- लोकनीति–विचार
- दादांची भाषणे
- सर्वोदय–दर्शन
- स्त्री–पुरुष सहजीवन
- दादांच्या शब्दांत दादा (दोन भाग)
- क्रांतिच्या संदर्भात
- संपूर्ण क्रांति
- मैत्री
- तरुणाई
- आशा उद्याची

